VM923.254
Shi/Nat
103138

THE LIBRARY

S. N. D. T.
WOMEN'S UNIVERSITY
BOMBAY.

21 JUL 1988

महादजी शिंदे यांचे चरित्र

123.254
Shi/Nat

~~600~~ 103138

S. N. D. T. WOMEN'S UNIVERSITY.
LIBRARY.

Shivaji And Sarvadharma Samabhav
Programme Committee
S. N. D. T. Women's University,
BOMBAY.

HE

[illegible]

OM

hey were some years ago. Thanks to the Publishers of the *avyetihas Sungraha* a journal which was specially devoted to he publication of Marathi chronicles. The publishers of that ery useful magazine have brought to light numerous old Bakhars hronicles), including—the histories of SIVAJEE and his successors, of the Peshwas, Bhonsles, Holkar and other Maratha houses;—narratives of important campaigns and battles like those of Panipat, Bassein, Jodhpur, and Kardo;—Shakavalis (Historical events chronologically arranged), memoes, treaties, and the public and private correspondence of the Peshwas, of NANA FADNIS and of other great personages. This was a great work in itself and the publication of these old records supplies a mass of trustworthy historical information. The work which was undertaken by the publishers had however to be given up for want of funds and there still remain many unpublished historical records in the possession of old Maratha families. The Government of Bombay have in their possession a complete State Record of the Peshwas, which, if made available to the historian, would certainly open a mine of correct, definite and reliable historical information. The Poona Dufter, which was under the able superintendence of NANA FADNIS contains all the public and private accounts of the Peshwas, and numerous other valuable letters, grants, treaties, memoes and similar other important documents. Unfortunately the Government of Bombay, enlightened as it is, still refuses access to these records and the loss to the Maratha historian is consequently very great, and one only hopes that the Government would some day be induced to throw open to the historian this secret depository of old records, which are now useful to none else. Besides the published records in the *Kavy tihas Sungraha* I was fortunate in having access to many other iginal documents relevant to the subject, and even to the private accounts of MAHADJEE between A. D. 1779 and 1794. I have made a copious use of these materials in the present book as would be seen from the foot-notes, and wherever possible I have scribed the events in the very words of the actors themselves, giving extracts from their own writings. These quotations ve especially made to record the very thoughts of the acto

and to show the way in which the Marathi language was the written. The Marathi of those days, though not strictly gram matical, was, no doubt, forcible, concise and terse. The recentl published Selections from the Government records by Pro Forrest and especially the volume entitled the "*Maratha Serie* have added greatly to our stock of original historical information. I also consulted either for corroboration or information many other well-known English and Marathi works, a list of which is appended here-unto.

Although no biography of MAHADJEE SINDIA was hitherto written in Marathi, still, as usual, several books appeared in the English language containing narratives of the life of this great man. Amongst them may be mentioned MALCOLM'S "*Memoirs of Central India*,' KEENE'S '*Fall of the Mogul Empire*', Colonel MALLESON'S Essay on MAHADJEE SINDIA published in the Calcutta Review of 1869 and republished in his "*Recreations of an Indian Official*," MR. S. N. ROY'S "*Gwalior*" and MR. COMPTON'S "*Military Adventurers of Hindustan*," a recent publication containing much useful information. Besides these, MR. KEENE'S "*Madhavrao Sindia*," a volume of SIR W. HUNTER'S "*Rulers of India*" *Series*, though the most important recent publication on the subject, has many of its draw-backs from the Maratha point of view. MR. KEENE'S account of the early life of MAHADJEE is very concise and the actions of his heroic brothers who were the real founders of the Sindia State have not been properly considered. Moreover, MR. KEENE'S account of MAHADJEE'S actions in the Deccan proper is both meagre and partial. His book is based upon Musalman authorities and written from the Musalman point of view. These Musalman historians, as well as some of the Marathi Bakhar writers, write in a hyperbolic style and narrate facts which never took place. MR. KEENE in writing out his biography has ignored the power of the Poona Court, and in common with many other English writers he believes that MAHADJEE'S conduct was throughout consistent and justi able, while those who opposed him were only intriguers bstructionists. It is a fashion to bestow an undue prais

MAHADJEE at the expense of the Poona Ministers who were trying to maintain the unity of the confederacy on the old basis and opposed his schemes which, however good for his own aggrandizement, were prejudicial to the interests of the Maratha nation as a whole. MR. KEENE had no access to the original Maratha records and his materials were more or less second-hand. The Biography of a Maratha Statesman, entirely written from foreign materials, would never be correct nor complete. Even the contemporary records from the Bombay or Calcutta Secretariats cannot safely be relied upon in respect of matters of domestic and internal administration of the Maratha Empire. The Maratha State papers and their public and secret correspondence must be read before any positive statement can be made. As MAHADJEE SINDIA was instrumental in bringing about the treaty of Salbai, as also for some years all correspondence between the Poona Darbar and the English passed through him and as he for some time befriended the English, English writers generally treat him as an independent Prince, giving credit to him alone for the successes of the Maratha arms during that period. MAHADJEE no doubt was anxious to assert his independence against the Ministers; but the Court of Poona, ever jealous of his schemes, came in his way and he was forced to observe the former relations between him and the Peshwa's Government. This was the secret of the jealousy between him and NANA. The house of SINDIA was exceptionally loyal to the PESHWAS and MAHADJEE also was true to his master. Though jealous of the power of NANA and other Ministers and though desirous to be free from their influence, he never cherished either secretly or openly the idea of over-throwing the PESHWAS. The English writers do a great injustice to the man by attributing to him motives which naturally lower him in the estimation of his country-men and which he never really entertained.

Like his father and brothers he was always loyal to the Peshwa, but wished to supplant NANA and other ministers only. He was a great respecter of forms and therefore he never showed that he was an independent Prince. Moreover the English writers

praise him for acts, some of which were his faults from the Maratha point of view. The policy of the Poona Durbar should not be seen from the English point of view alone. The interests of the English and the Marathas were not indentical but entirely opposed and, therefore, the man who favoured the English would not be the proper representative of the national interests. So what an English writer would consider a good point in MAHADJEE, would appear a selfish act to a Maratha. Besides, these writers not having access to the Maratha records and having limited information regarding the internal history of the Marathas, are in the habit of attributing every political step of importance to MAHADJEE but which in fact was directly controlled from Poona. Even the greatest act of MAHADJEE, *viz.*, that of assuming the duties of the Vazir of the Empire was not without a previous consent and support from NANA. Before SINDIA left Muthura for Poona in 1790 he caused a redistribution of the conquered country in Hindustan proper; and from the original documents which I have examined it is quite clear that he followed the old arrangement and gave the PESHWA and HOLKAR their due shares. The provinces conquered from the Rohillas were alone left undivided, which fact ultimately led to a war between his generals and HOLKAR, and although his army was victorious, he afterwards reconciled Holkar by giving him his proper share. Although often acting on his own responsibility, SINDIA was after all a general of the Peshwa and his actions were often more or less directed from Poona, and therefore no biography would be complete without a careful study of Poona politics. The facts recorded in the following pages would thus show that though MAHADJEE was a great personage of the time still the history of his life without the study of contemporary Maratha affairs would be defective and incomplete and these considerations have induced me to write the work on those lines and to entitle it as "the life and times of MAHADJEE SINDIA."

Before passing to the arrangement of the book, I would like to say a few words with regard to Grant Duff's History of the Marathas. The Marathas must feel grateful to this careful

and copious writer, who took great pains to master their History even to details and who has scarcely omitted to mention any fact of importance. All the English writers who write about the Marathas depend on his work and never trouble themselves to make original researches. This able Historian however has not preserved the voluminous original histories and other documents which he used and left nothing for the critic to verify the authenticity of his statements. Even in his foot-notes he has not mentioned the bakhars which he used; and for this reason many Maratha Scholars suspected the truth of his statements. However the bakhars and other papers lately brought to light and published, have supplied materials to examine Grant Duff's work. After carefully reading these publications and other unpublished documents along with his history I have found that he has not suppressed any facts, but on the contrary has in many places merely translated the original. The mistakes which he sometimes makes are due to the materials which he used and they are not intentional. Those who have read these Maratha chronicles, very well know that it is not always safe to believe any one of them alone without carefully comparing all and this want of sufficient materials for collation has led G. Duff into certain errors. In the foot notes to my book I have referred to these bakhars and the reader may be able to compare them with Grant Duff's history. Such a comparison would show that he has mentioned most of the facts referred to in my book, and that when he commits any error, it is also found in some of the original authorities. In the foot-notes I have also shown, wherever necessary, some of his important mistakes. I make these remarks not only to give due credit to Grant Duff, but also to congratulate ourselves on the fact that almost all the materials used by him have lately been recovered and published.

The first four chapters of this book are devoted to the early history and rise of the Sindia family. Chapter 2nd and 3rd contain much new information about the Nagore, Bharatpore and Lahore campaigns and about the political views of the Peshwa NANASAHEB whose valuable advice being dis-regarded by DATTAJEE

Sindia, the Musulmans found an opportunity to form a combination against the Marathas. The quotations from the letters of that Peshwa would throw much light on the history of that great statesman who is not properly viewed by G. Duff. The principles of policy laid down by him were followed by MAHADJEE throughout his career. In fact MAHADJEE formed his character during the regime of this great man. Chapter fourth gives an account of the battle of Paniput based almost entirely on Marathi chronicles, and especially on "*Bhaoosaheb's Bakhar*" a work of great historical and literary value. The history of this battle was hitherto written on the authority of KASIROY. Chapter fifth gives history of MAHADJEE'S succession to the family jahagirs which was strongly opposed by RAGHOBA. The chapter closes with an account of the work done by the great army sent by Peshwa MADHAVARAO for the first time after the battle of Paniput. Chapter 6th gives a detailed account of MAHADJEE'S movements in the Deccan proper during the period of civil confusion following NARAYANRAO'S murder, stating how he punished the Raja of Kolhapur, suppressed the revolt of the pretender BHAVU, punished the traitor ministers, established Nana's power and defeated the English army at Talegaum. Chapter 7th opens with the account of the renewed war with the English and closes with the treaty of Salbai. This is a very interesting period as here begins the jealousy between him and NANA. MAHADJEE'S conduct in this general war against the English was anything but praiseworthy from the Maratha point of view. The interesting correspondence between him and NANA is worth a perusal. During this war when NANA had already induced the Nizam, BHONSALE and HYDER to take field against the English, Mahadjee remained inactive at Jambgaun and would not move out till the whole of Guzrat was lost. When he at last moved out he did not fight seriously in the interest of his master until his own dominions were invaded, when only he was a little more serious. NANA had sufficient reason to blame him and HOLKAR for their conduct but as SINDIA favoured the English at the expense of his own Government English authors naturally bestow praise on him and call Nana and his party as Poona intriguers. Mahadjee's negotiations with

General GODARD and the account of his interviews with MR. ANDERSON distinctly show what ambition was upper-most in his mind. He however never wished to give up the cause of the young Peshwa, but wished to remove NANA and his supporters from power. Numerous quotations are given in the book to give the Maratha view of the war and its incidents up to the treaty of Salbai. Chapter 8th deals with Mahadjee's conquest of Gohad, his interference in Delhi politics, and his taking over the management of the Empire as Vazir. At this period he was engaged in the improvement of his army and in petty wars with the Rajputs of Malwa. By this time his friend WARREN HASTINGS had gone away and NANA had succeeded in establishing the influence of the Poona Court and in securing the friendship of the English. MAHADJEE did not like the appointment of an English Agent at Poona but was ultimately induced by Mr. MALET and by NANA. Chapter 9th gives an account of the revolt of GULAMKADIR and ISMAILBEG and of the rising of the Rajputs. In this period MAHADJEE had almost lost everything he had gained beyond the Chumbal. He asked for help from the Deccan and raised his own army, and after strengthening his sinews of war he defeated and punished Gulamkadir, restored the Emperor, crushed the Rajput revolt and regained the province of Ajmere. After having restored peace throughout the empire he returned to the Deccan with a great pomp. Chapter 10th gives the account of his slow march to Poona, where his first act was to present to the Peshwa at a grand Darbar, the sanads of Vakili-Mutlak and of the prevention of the slaughter of cows throughout the Empire. His stay in Poona was marked by a series of grand tamashas which he arranged to please the Peshwa and to dazzle the Poona society with his greatness. All this he did to secure his long cherished ambition of officiating as the Chief Minister of the Peshwa, but he never succeeded in that, and finally a reconciliation was brought about between him and his rival Nana.

Apart from his jealousy with NANA and his attempts to secure the chief power in the empire which led him to do acts which do not show him in a very favourable light. MAHADJEE

SINDIA deserved the praise of all the Marathas for restoring the Maratha supremacy in India. After SHIVAJEE he was the greatest Maratha Statesman and general, and his countrymen will ever cherish the memory of this great man with whom the glory of the Maratha Raj passed away.

Before concluding this rather lengthy preface, I must thank those who have from time to time supplied me with materials and am specially thankful to Prince BALVANTRAO Bhaiya Saheb Sindia, Memberof the Council of Regency, Gwalior, who encouraged me to take up this work. I am highly indebted to the publishers of the *Kavyetihas Sangraha* and to those authors whose works have supplied me with materials for this volume.

*Belgaum,*
1st February 1894.

V. R. NATU.

# प्रस्तावना.

हें पुस्तक वाचकांस गेल्यावर्षींच देण्याचें वचन होतें, परंतु अनेक कारणांमुळें तें वचन पुरें झालें नाहीं याबद्दल दिलगिरी वाटते. तथापि याच महिन्यांत इ. स. १७९४ सालीं महादजी शिंदे वानवडी येथें कैलासवासी झाले हें लक्षांत आणिलें तर या पुस्तकाची बरोबर शंभर वर्षांनीं प्रसिद्धि होणें हें त्या प्रसिद्ध पुरुषाचें एक लहानसें शतसांवत्सरिक स्मारक झालें असें समजण्यास हरकत नाहीं. महादजी शिंदे यांचें चरित्र मराठीमध्यें अद्यापपर्यंत लिहिलेलें नव्हतें. एकदोन लहान पुस्तकें प्रसिद्ध झालीं होतीं परंतु त्यांतील विषयविवेचन व इतिहाससामुग्री थोडी असल्यामुळें त्यांचा इतिहास वाचकांस उपयोग होण्यासारखा नव्हता. आजपर्यंत मराठीपेक्षां या विषयावर इंग्रजी ग्रंथ बरेच झाले परंतु त्यांचें स्वरूप एकदेशीय कसें असतें हें मागें इंग्रजी प्रस्ताविकेंत दाखविलें आहे. महादजी शिंदे ह्यांचें चरित्र ह्मणजे सामान्यतः गेल्या शतकांतील पन्नास वर्षांचा मराठ्यांचा इतिहास असल्यामुळें व त्या इतिहासाचा चरित्रनायकाचे इतिहासाशीं निकट संबंध असल्यामुळें या ग्रंथांत तत्कालीन इतिहास बराच सांगावा लागला. तसेंच तो इतिहास लक्षांत आणिल्या खेरीज महादजींचे आयुष्यांतील पुष्कळ गोष्टींचा संबंधही समजण्यासारखा नाहीं ह्मणूनच या पुस्तकास "महादजी शिंदे यांचें चरित्र व कारकीर्द" हें नांव देऊन तदनुरूप ग्रंथाची रचना केली आहे.

या पुस्तकास इंग्रजी ग्रंथांचा उपयोग केला आहे. तथापि अलिकडे काव्येतिहास संग्रहकारांनीं प्रसिद्धीस आणिलेल्या जुन्या मराठी बखरी, कैफियती, पत्रें, यादी इत्यादिक सामुग्रीचा उपयोग फार केलेला आहे. त्यांशिवाय ग्वाल्हेर वगैरे ठिकाणीं आह्मांस ही कांहीं कागद, पत्रें, जमाखर्च वगैरे पहाण्यास मिळाले, त्यांचाही उपयोग केला आहे. ही माहिती पुस्तक छापून तयार होईपर्यंत मिळतच होती, यामुळें एक नवीन परिशिष्टही जोडावें लागलें. मराठ्यांच्या राज्यांतील कर्त्या पुरुषाचें चरित्र केवळ परकीयांनीं

लिहिलेल्या आधारावर लिहिणें इष्ट नाहीं व त्यामुळें पुष्कळ चुका होण्याचा संभव आहे हें सांगणेंच नको. आजपर्यंत जेवढी ह्मणून प्रस्तुत इतिहासास योग्य माहिती मिळण्यासारखी होती, ती सर्व घेऊन हें पुस्तक लिहिलें आहे. या पुस्तकांत अनेक ठिकाणीं, स्वतःचे तर्क किंवा आपल्या शब्दांनीं हकिगत न देतां जेथें जेथें संधि मिळाली तेथें तेथें जुन्या लेखांतील भाषाच कायम ठेविली आहे व त्यावेळच्या मुत्सद्यांचे तोंडचे शब्दच उतरले आहेत. यापासून वाचकांस पुस्तकांतील विषयाचे आधार कळून, त्यावेळची मराठी भाषा कशी होती हेंही समजेल. कित्येक मोठमोठ्या प्रसंगीं तत्कालीन प्रसिद्ध पुरुषांचे मनांत काय काय विचार चालत होते हेंही स्पष्ट समजण्यास या पुस्तकांत दिलेल्या अवतरणांचा फार उपयोग होईल.

आजपर्यंत मराठ्यांच्या इतिहासावर इंग्लिश भाषेंत जे ग्रंथ झाले आहेत त्यांत ग्रँटडफ साहेबांशिवाय स्वतंत्र तऱ्हेनें माहिती संपादून लिहिणारे कोणीच झाले नाहींत. ग्रँटडफ साहेबाच्या पुस्तकावरच सर्व निर्वाह करितात. मराठ्यांची बखर ह्मणून जें एक पुस्तक मराठींत प्रसिद्ध झालें आहे त्यांत सुद्धां हाच प्रकार. ग्रँटडफ साहेबानां जी माहिती मिळाली होती ती इतरांस मिळाली नाहीं ही गोष्ट खरी तथापि आलिकडे बरींच साधनें उपलब्ध झालीं आहेत तेव्हां कोणी तरी मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचें मनावर घ्यावें. ग्रँटडफचे पुस्तकांत जी माहिती लिहिलेली आहे ती सर्व आतां काव्येतिहास संग्रहांतून वगैरे प्रसिद्धीस आलेल्या पुस्तकांत आहे; इतकेंच नाहीं तर कांहीं विशेषही आहे; तेव्हां आतां ग्रँटडफनें बखरी इ० जुने कागद जाळले ह्मणून वाद करण्याचें कारण नाहीं. उपलब्ध झालेले आधार व ग्रँटडफचा इतिहास काळजीपूर्वक वाचल्यानें असें ही आढळून येईल कीं, त्या ग्रंथकारानें कोणतीच महत्वाची गोष्ट सोडली नाहीं व पदरचेंहीं लिहिलेलें नाहीं. माझ्या पुस्तकांत पदोपदीं दिलेल्या टिपांवरून वाचकांनीं जर मूळ आधार व ग्रँटडफचा इतिहास वाचला तर ही गोष्ट प्रत्ययास येईल. मूळ आधारांतही जेथें भेद

आढळतो (व अशीं स्थळें पुष्कळ आहेत) तेथें त्यांची चूक असल्यास त्यांचा दोष नाहीं. आमचे बखरकार बहुतेक निष्काळजीनें निराधार असा पुष्कळ मजकूर लिहितात हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे.

मराठ्यांचा खरा इतिहास लिहिणें तर या बखरीपेक्षां पत्रें, यादी, शकावल्या व जमाखर्च किंवा खासगी हिशेब हे फारच भरंवशाचे दाखले आहेत परंतु मुंबई सरकाराकडून पुणें येथील पेशव्यांचें दफ़्तर इतिहासकारास पहाण्यास मिळेपर्यंत मराठ्यांचा इतिहास लिहिणें बरोबर होणार नाहीं, परंतु सरकाराकडून अशी परवानगी मिळण्याचा संभव तूर्त तरी दिसत नाहीं, ह्याबद्दल वाईट वाटतें.

हें पुस्तक फार विस्तृत झालें असा एक दोष येण्याचा संभव आहे, परंतु मराठ्यांच्या इतिहासावर पुष्कळ माहिती दिलेले तपशीलवार ग्रंथ जर मराठींत होऊं नयेत तर ते व्हावे तरी कोणत्या भाषेंत हेंच आह्मांस समजत नाहीं. आमच्या मतें मराठ्यांच्या इतिहासावर जीं अनेक लहान पुस्तकें लिहिण्यांत आलीं त्यांपासून मराठ्यांच्या इतिहासाचें चांगलें ज्ञान होणें संभवत नाहीं. या विषयावर जितके तपशीलवार ग्रंथ होतील तेवढे चांगलें. इंग्रजींत सुद्धां मराठ्यांच्या इतिहासावर पुष्कळ मोठमोठीं पुस्तकें असतां खुद्द मराठ्यांनाच जर आपल्या लोकांचा सविस्तर इतिहास वाचण्याची हौस नाहीं तर ही दुःखाची गोष्ट समजली पाहिजे. महादजी शिंदे यांना दौलत मिळे पर्यंत त्यांनीं आपल्या वडील बंधूंबरोबर पुष्कळ कामगिऱ्या केल्या. त्यांचा संबंध व पुढें महादजीनें हिंदुस्थानांत जीं मोठमोठीं कारस्थानें केलीं त्यांचा, त्यांच्या बंधूंच्या व इतर मराठ्यांच्या इतिहासाशीं किती निकट संबंध आहे हें समजण्यासाठीं पहिले चार भाग लिहावे लागले. शिवाय त्या भागांतील कांहीं प्रकरणांचें शिंद्यांचे घराण्याचे इतिहासांत महत्व असल्यामुळें त्यांचाही उल्लेख करावा लागला. जोधपूरची स्वारी, दत्ताजीच्या स्वाऱ्या व त्यांचा पानिपतच्या स्वारीशीं संबंध, जयाप्पाचे वेळेपासून रोहिल्यांचा व होळकराचे घराण्याचा शिंद्यांशीं उत्पन्न झालेला वैरभाव इत्यादि हकिगती या इतिहासांत देणें योग्य दिसल्यावरून दिल्या आहेत व त्यांचीं कारणें ही पुढें

तिसऱ्या भागांत सांगितलीं आहेत. पानिपतच्या लढाईची 'महादजींचे चरित्रांत माहिती देण्याची जरूरी नाहीं असें कोणीही ह्मणणार नाहीं. सुदैवानें त्या स्वारीबद्दल बरींच जुनीं प्रकरणें आलिकडे प्रसिद्धीस आल्यामुळें मुख्यत्वें करून मराठी बखरींचे आधारानें तो भाग स्वतंत्र लिहिला आहे. तात्पर्य, प्रस्तुत चरित्राशीं संबंध असलेला इतिहास, एकंदर उपलब्ध आधार लक्षांत आणून प्रत्येक भागांत दिला आहे. परंतु हें काम आमचेकडून कितपतसें तडीस गेलें हें ठरविणें वाचकांकडे आहे.

या पुस्तकाचे शिरोलेखावर "माधवराव" असें नांव कां दिलें, असा आक्षेप कित्येक मित्रांनीं घेतला आहे, परंतु बादशहाचे कागदपत्र, खलिते, इंग्रजांचे तहनामे वगैरे लेख व किताब ह्यांत या नांवाचाच उपयोग केलेला आहे इतकेंच नव्हे तर खुद्द नानानें हैदरा सारख्यांस जीं पत्रें लिहिलीं त्यांतही "माधवराव" असेंच लिहिलें आहे. आह्मां महाराष्ट्रीयांस जाडें भरडें 'पाटीलबावा' हें नांव खरोखर प्रिय असलें तरी चरित्रासारख्या पुस्तकांत बहुवचनीं नांवाचा उपयोग केल्यानें प्रमाद होणार नाहीं असें आह्मांस वाटतें. या पुस्तकांत ज्यांच्या ज्यांच्या ग्रंथांचा उपयोग केला आहे त्यांचे व विशेषतः काव्येतिहास-संग्रहकारांचे आभार मानून हा लेख पुरा करितों.

बेळगांव
ता० ३ फेब्रुआरी १८९४

ग्रंथकर्ता.

# List of Books referred to.


AITCHISON'S Treaties and Engagements.

BROUGHTON'S Letters from a Maratha Camp.

COMPTON'S Military Adventurers of Hindustan.

ELLIOT'S History of India as told by its own Historians [Volumes VII, VIII.

ELPHINSTONE'S History of India, Hindu and Mohmedan [Periods.

FRANKLIN'S Sháhalum.

FORREST'S Selections, Volume I, Maratha Series.

„ Selections, from State Papers preserved in the [Foreign Department, Volumes 3.

GRANT DUFF'S History of the Marathas.

HUNTER'S Imperial Gazetteer of India.

KEENE'S Sketch of the History of Hindustan.

„ Fall of the Moghul Empire.

„ Madhavarao Sindhia (Rulers of India Series).

MAC DONALD'S Memoir of the Life of Nana Fadnis.

MEADOWS Taylor's History of India.

MALLESON'S Native States of India.

„ Recreations of an Indian Official.

MALCOLM'S Memoirs of Central India.

OWEN'S India on the Eve of British conquest.

STRACHEY'S—Hastings and the Rohilla war.

SECRET Committee's Fifth Report.

S. N. ROY'S Native States of India, Gwalior.

Selections from Bombay Government Records. Vol. I.

TOD'S Rajasthan.

WALLACE—Giucowar.

## या पुस्तकास ज्या ग्रंथांचा आधार घेतला त्यांचीं नांवें.

लोकहितवादी—( लो. हि. वा. ) पानिपतची बखर.
" " ऐतिहासिक गोष्टी.
विविधज्ञानविस्तार—शेणवी व वीर मुत्सद्दी. ( पु. ११ )
सरंजामे—शिंद्याचे घराण्याचा इतिहास.
गाडगीळ—विंचूरकर घराण्याचा इतिहास.
रामचंद्र नारायण कृत—पंचांगसार.
काव्येतिहास संग्रहापैकीं बखरी, कैफियती इ०:—
मल्हार रामराव—संभाजी चरित्र.
थोरले राजाराममहाराजांचें चरित्र. ( थो. रा. म. च. )
थोरले शाहूमहाराजांचें चरित्र. ( थो. शा. म. च.)
धाकटे रामराजे यांचें चरित्र. ( धा. रा. रा. च. )
धाकटे शाहूराजे यांचें चरित्र. ( धा. शा. रा. च. )
भाऊसाहेबांची बखर—( भा. सा. ब. )
भाऊसाहेबांची कैफियत—( भा. सा. कै. )
रघुनाथ यादव कृत पानिपतची बखर —( र. या. पा. ब. )
नागपूरकर भोंसल्यांची बखर—( ना. भों. ब. )
गायकवाडची हकीगत—( गा. ह. )
विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांची बखर.
श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर.
होळकराची कैफियत—( हो. कै. )
साष्टीची बखर—( सा. ब. )
खर्ड्याचे स्वारीची बखर.
मराठी साम्राज्याची छोटी बखर—( म. सा. छो. ब. )
चित्रगुप्त विरचित शिवाजीची बखर—( चि. वि. शि. ब. )
पेशव्यांची बखर—( पे. ब. )
पंतप्रधानांची शकावली—( पं. प्र. श. )
पत्रें, यादी वगैरे—( प. व या. )

# चित्रानुक्रमणिका.


| चित्र. | | पृष्ठांक. |
|---|---|---|
| १ | महादजी शिंदे—मुखपृष्ठासमोर. .... .... .... | |
| २ | शिवाजी—मुखपृष्ठ. .... .... .... .... .... | |
| ३ | शिंद्यांचें राजचिन्ह. .... .... .... .... .... | १० |
| ४ | दिवाण-इ-खास. .... .... .... .... .... | ६२ |
| ५ | मल्हारराव होळकर..... .... .... .... .... | ९५ |
| ६ | शहाअलम. .... .... .... .... .... .... | १०७ |
| ७ | तीन पेशवे. .... .... .... .... .... .... | १२० |
| ८ | ग्वाल्हेरचा किल्ला. .... .... .... .... .... | १५६ |
| ९ | हैदर व टिपू..... .... .... .... .... .... | १६२ |
| १० | मथुरा.... .... .... .... .... .... .... | १६७ |
| ११ | ताजमहाल. .... .... .... .... .... .... | १९४ |
| १२ | जयपूरचा किल्ला. .... .... .... .... .... | १९८ |
| १३ | पर्वती. .... .... .... .... .... .... | २४४ |
| १४ | नानाफडणवीस. .... .... .... .... .... | २५४ |

[illegible]

# विषयानुक्रमणिका.

## भाग पहिला.

### उपोद्‌घात-मोंगल व मराठे.

(इ. स. १६८०--१७२०.)

मोंगल राज्याचें अंतःस्वरूप– हिंदूलोकांवर जुलूम—अवरंगझेबाचें धर्मवेड–हिंदूधर्माचा छळ–रजपुतांचीं बंडें–मराठी व मोंगली फौज–अवरंगझेबाची मराठ्यांवरील स्वारी–मराठ्यांच्या युद्धाचें स्वरूप–मोंगलांचा पराभव–अवरंगझेबाचा अंत–त्याची दुर्बल संतति–गृह कलह–मोंगली बादशाहीचे तुकडे– मराठ्यांचा दिल्लींत प्रवेश–स्वराज्य व चौथाईच्या सनदा. १-९.

---

## भाग दुसरा.

### शिंद्यांचें घराणें–राणोजी व जयाप्पा.

(इ.स. १७२०-१७५४)

बाजीरावाच्या हिंदुस्थान जिंकण्याच्या मसलती–त्याची फौज–राणोजीचा पूर्व वृत्तांत–शिंदे घराणें–त्याचा इतिहास– बाजीरावाच्या माळव्यांतील स्वाऱ्या–शिंदे, होळकर व पवार– महंमदशहाबरोबर तह–पोर्तुगीझ लोकांशीं लढाई– राणोजीचें शौर्य–नादीरशहाची स्वारी– बाजीरावाचा मृत्यु– राणोजीचा मृत्यु–(१७५०)–त्याची संतति–जयाप्पाची कारकीर्द– रामचंद्रबाबा शेणवई, सदाशिवरांव भाऊ–सातारचे महाराज व पेशवे– सांगोल्याचा करार–राजमंडळचा ऱ्हास व पेशवाईचा उदय–सफदरजंग वजीर–अबदल्लीची पहिली स्वारी–शिंद्याचे मदतीनें रोहिल्यांचा नाश–नानासाहेब पेशव्याचीं कारस्थानें– निजामाच्या मुलांमध्यें तंटे–सातारचे राजमंडळाचें बंड–रामदासपंताची मसलत–गायकवाडचें पारिपत्य–पेशव्याचें प्रसंगावधान–मोंगलाचा छापा–

महादजीचें इतिहासांत प्रथम नांव-फ्रेंचांचें प्राबल्य- पेशव्याच्या अडचणी-त्याचा शिंदेहोळकराशीं स्नेह-गाझीउद्दीनास दक्षिणेंत आणण्याची मसलत-त्याचा खून-दमाजीची मुक्तता व गुजराथेची वांटणी-रघुनाथरावाची गुजराथेंतील स्वारी-दिल्लींतील बखेडे-धाकटा गाझी उद्दीन व मराठे-जाटांवर स्वारी—कुंभेरचा वेढा-शिंदेहोळकरांत तंटा—अहंमदशहाची पदच्युति—अलमगीरची स्थापना-जोधपूरवर जयाप्पाची स्वारी-नागोरचा वेढा- मेरत्याची लढाई-जयाप्पाचा खून—पेशव्याचें दुःख—कुमकेची योजना—दत्ताजी रजपुतांचें पारिपत्य करून देशीं येतो. १०-३४.

## भाग तिसरा.

### मराठ्यांचा परमोत्कर्ष-पानिपतचीं पूर्वकारणें.

### (इ.स. १७५४-१७६०)

अलमगीरबादशहा- मीरमन्नूचा मृत्यु व अदिनाबेगाची नेमणूक-अहमदशहा अबदल्लीचा पूर्व वृत्तांत-त्याचे पराक्रम—त्याची पहिली व दुसरी स्वारी-तो पंजाब जिंकतो—गाझीउद्दीन पंजाब परत घेण्याचा यत्न करितो-त्याच्या विरुद्ध मसलती-नजीबखान रोहिला-अबदल्लीची तिसरी स्वारी-तो पंजाबांतून येऊन दिल्ली घेतो- मराठ्यांचा पळ- मथुरेचा हल्ला-नजीबखानाचें वर्चस्व—राघोबाची बडी स्वारी- अटकेवर मराठ्यांचे झेंडे लागतात—दक्षिणेंत निजामावर स्वारी-शिंदखेडची लढाई—जनकोजी शिंदे फौजेसह माळव्यांत जातो-उदेपूरवर स्वारी—होळकराचा उपदेश-होळकर व नजीबखान-दत्ताजीची गाझीउद्दीनाशीं खटखट—शिंदे पंजाबांत जातात-मराठ्यांचे राज्याची परम सीमा—नानासाहेब पेशवा-त्याचें शहाणपण व मसलती-त्याची राजनीति-या इतिहासाचा महादजींचे चारित्राशीं संबंध-पेशव्याच्या बड्या मसलती-बंगालच्या स्वारीची तयारी- त्याचे पोक्त विचार—त्याचा नजीबखानाविषयीं अभिप्राय-- पेशव्याचे उपदेशाकडे दत्ताजींचें दुर्लक्ष—त्याचे परिणाम--दत्ताजीला नजीबखान फसवितो--दत्ताजी

नजीबखानाशीं लढाई सुरू करितो--शुक्रतालची लढाई--रोहिले व सुजाउद्दौला एकत्र होतात -नजीबखान दत्ताजीस मारण्याची मसलत करितो--अबदल्लीची चौथी स्वारी--तो पंजाब घेतो—मराठी फौजेचा पळ--गाझीउद्दीन अलमगीर बादशहाचा खून करवितो-गाझीची दत्ताजीशीं मसलत- अबदल्लीची व मराठ्यांची गांठ पडते--मराठे पळतात--दत्ताजीवर मुसलमानांच्या एकत्र झालेल्या फौजांचा हल्ला--दत्ताजी शिंदे पडतो व जनकोजी जखमी होतो-शिंद्यांचा पूर्ण पराभव व पळ-होळकर फौजेसह शिंद्यास मिळतो-दुराणी दिल्ली घेतो -होळकराचा पराभव व पळ—दक्षिणेंत लढाईस जाण्याची तयारी- रघुनाथराव व भाऊसाहेब- निजामावर स्वारी—उदगीरची लढाई—भाऊ व विश्वासराव हिंदुस्थानांत निघतात, ३९-९७.

---

## भाग चौथा.

### सोनपत पानपत-महाराष्ट्र वैभवाची पूर्णाहुति.

(इ. स. १७६०-६१.)

भाऊसाहेब, शिपाई व मुत्सद्दी—मराठ्यांच्या फौजेचें स्वरूप-होळकराचा उपदेश—विंचूरकराचा उपदेश-- भाऊसाहेब आग्रा व दिल्ली घेतात -नवीन बादशहाची स्थापना--नारो शंकर वजीर होतो--सुरजमल्लाची सूचना—तो मराठ्यांस सोडून जातो--श ची हालचाल—सुजाची कारस्थानें—मराठ्यां विषयीं हिंदुस्थानांत तिरस्कार—कुंजपुऱ्यावर हल्ला--मुसलमानी फौज यमुना उतरून अलीकडे येते—मराठ्यांच्या सैन्याची अव्यवस्था—मराठ्यांचा दिल्लीचा रस्ता बंद होतो—ते पानिपतवर मागें परततात व खंदक खणून तळ देतात—उभय पक्षांच्या फौजांची संख्या—लढायांस सुरुवात होते—गोविंदपंत बुंदेल्याचा पराभव व मृत्यु—मराठे तळ सोडून मुसलमानांवर हल्ला करितात— शिंद्याच्या फौजेचें शौर्य-अन्नाची तूट व लोकांचे हाल हाल—सुजा व भाऊ तहाची बोलणी

लावितात—मुसलमानांची मसलत—बळवंतराव मेहेंदळ्याचा शत्रूवर हल्ला—त्याचा पराभव व मृत्यु—मराठ्यांचा नाश—मराठ्यांची सभा—होळकर व भाऊ यांचीं भाषणें—भाऊ आपली चूक कबूल करितात—अखेरचा प्रयत्न—तळ सोडण्याचा निश्चय—फौजेची रचना—लढाईची पूर्वरात्र—तहा बद्दल निराशा—भाऊंची मराठ्यांस शेवटली विनंति—मराठे खंदक सोडून बाहेर पडतात—मुसलमानांची तयारी—लढाईस सुरवात—जयापजय—मुसलमानांची कमसरशी-विश्वासराव पडतो—भाऊ गर्दींत मिसळतात—शिंद्याचा पराक्रम-तुकोजी शिंदे पडतो—गर्दी व पळ—मराठ्यांचा पराभव व हानि, पळांतील लोक—महादजी व नाना—जनकोजी शिंद्याचा क्रूरवध पानिपतमुळें महाराष्ट्र राज्याचें नुकसान—नानासाहेब पेशव्याचा मृत्यु— मराठ्यांच्या दुसऱ्या मसलती बंद होतात— पराभवांचीं कारणें. ९८-८४.

---

## भाग पांचवा.

### साडेतीन शहाण्यांची कारकीर्द—महादजीचा अभ्युदय.

(इ. स. १७६१-७३)

पळांतून आलेले दोन पुरुष—महादजीचा पळ—त्याचा पाठलाग-राणाखान त्यास वांचवितो—शिंद्याच्या दौलती बद्दल वाटाघाट-पेशव्याचे दरबारांत दुफळी—महादजी त्रासून पुणें सोडतो—पेशवा माधवराव महादजीस सरदारी देतो—महादजीची पूर्वीची हकीगत—रघुनाथरावाचीं कारस्थानें—देशस्थ व कोकणस्थ मुत्सदी-साडेतीन शहाणे—माधवरावाविरुद्ध मसलती व त्याचें शहाणपणाचें वर्तन—महादजीचा अनुभव—महादजी माळव्यांत जातो-रघुनाथरावाची अवकृपा—महादजीची सरदारी जाण्याची भीति-होळकरांची मध्यस्ति—मल्हाररावाचा मृत्यु—त्याचा स्वभाव—अहिल्याबाई व तुकोजी होळकर—महादजी बाईस मदत करितो-उज्जनीची लढाई—उदेपुरावर स्वारी—महादजी नवीन मुलूख सं-

पादन करितो—माधवराव पेशव्याचें वर्चस्व स्थापन होतें—रघुनाथ रावाचें बंड—पराभव व कैद—महादजी पेशव्याबरोबर भोंसल्यावर जातो—हिंदुस्थानांत पेशवे बडी फौज पाठवितो—महादजीची रवानगी—पानिपत नंतर हिंदुस्थानची स्थिति—नजीबखानाची वजीरी—विसाजी कृष्णाची स्वारी—रजपुतांवर मराठे जातात—जाटांशीं लढाई—नजीबखानाशीं होळकरांचें संधान—महादजीची मसलत-शहाअलम मराठ्यांची मदत मागतो—नजीबखानाचा मृत्यु—अखेरचा मुसलमान मुत्सद्दी—त्याचा स्वभाव—मराठे रोहिल्यांवर स्वारी करितात—दिल्ली काबीज होते—शहाअलमाशीं करार—त्याची बादशाहीवर स्थापना—बादशहा व मराठे रोहिल्यांवर जातात—पानिपतचा सूड—झबेताखान व होळकर—महादजी रागावून जयपुराकडे जातो—पेशव्याचा आकस्मिक मृत्यु—मराठे दक्षिणेंत परततात. ८५-१११.

---

## भाग साहवा.

### नारायणरावाचा वध—इंग्लिशांशीं पहिली सलामी.

### (इ० स० १७७२-७९).

माधवराव पेशव्याच्या मृत्यूचे मराठी राज्यावर परिणाम—पेशवाईचा शेवट—मराठे सरदारांतील कलह—भोंसल्यांचे गृह कलह-नारायणराव व रघुनाथराव—राघोबा व आनंदीबाई—तिची महत्वाकांक्षा—पेशव्याविरुद्ध मसलती—नागपुरकरांचे वकील व त्यांचीं कारस्थानें—नारायणरावाचें वर्तन—गार्द्यांचा दंगा-पेशव्याचा खून-पेशवाई जाऊन मुत्सद्यांची कारकीर्द सुरू होते—रघुनाथराव पेशवा होतो—रघुनाथरावाची कर्नाटकांत स्वारी—बारभाई व त्यांची मसलत—रघुनाथरावाविरुद्ध काहूर—कासेगांवची लढाई व त्रिंबकमामाचा मृत्यु-रघुनाथरावाला सरदार सोडून जातात—त्याचा पळ-शिंदे व होळकर सामील होतील अशी आशा व निराशा— इंग्रजांशीं तह-इंग्रजांचा मराठ्यांशीं पूर्वीचा संबंध—इंग्रजाचें बेमा-

पणाचें वर्तन-त्यांचा साष्टीवर हल्ला—सुरतेचा तह—महादजी व होळकर यांची रघुनाथरावाशीं तह करण्याबद्दल खटपट—महादजी शिंदे स्वस्थ रहातो—गुजराथेंत फडक्यांशीं लढाई—त्याचा पराभव—पेशव्याच्या राज्यांत बखेडे उत्पन्न होतात—मुत्सदीमंडळ महादजीस स्वपक्षास अनुकूळ करतात—सखारामबापूचा ग० जनरलास खलिता—महादजीचें दुटप्पीपणाचें वर्तन—पुरंदरचा तह-तोतया भाऊसाहेबाचें बंड—त्याला शिंदे पकडतो—त्याचें पारपत्य-कोल्हापूरकराचें बंड—महादजीची कोल्हापुरावर स्वारी—कोल्हापूरकरांचें पारपत्य व तह—हैदरावर स्वारी—हरिपंत व महादजी मिरजेस मिळतात—मागें पुण्यास फितूरी—मोरोबा फडणीस व राघोबाची मसलत—नाना विरुद्ध खलबतें—तो फडके व शिंदे यांस मदतीस बोलावितो—महादजी शिंद्याबद्दल फितूरी मुत्सद्यांचा भ्रम-शिंदे व फडके एकाएकीं पुण्यास जाऊन मुत्सद्यांस कैद करतात-इंग्रजलोक रघुनाथरावास कारभारी करण्याची मसलत करतात-फितूरी मुत्सद्यांची मदत-रघुनाथराव इंग्लिशांची फौज घेऊन घांटावर येऊं लागतो—शिंदे व नाना यांची तयारी—रघुनाथरावास मदत नाहीं असें इंग्रजांस समजतें—त्यांचा तह करून परत जाण्याचा विचार—तळेगांवची लढाई—रघुनाथराव शिंद्याशीं बोलणीं लावितो-इंग्लिश फौज घाबरते—तहाचीं बोलणीं—रघुनाथराव महादजीचे स्वाधीन होतो—वडगांवचा तह—सखारामबापूस शिंदे कैद करितो-सखारामबापूचा शेवट—त्याचा स्वभाव—महादजीचा इंग्लिश फौजे बद्दल अभिप्राय-सवाईमाधवरावास पुण्यास आणितात. ११२-१३८.

---

## भाग सातवा.

### इंग्रजांशीं पुन्हा लढाई-सालबीचा तह.

### ( इ० स० १७७९—१७८४ ) पर्यंत.

इंग्लिशांचें मराठ्यांशीं वर्तन—राघोबास मदत करण्यांत अन्याय-परराष्ट्रांतील अंतस्थ व्यवस्थेंत ढवळाढवळ—वडगांवच्या तहा वि-

रुद्ध त्यांचें वर्तन—बंगाल्याहून गोदर्द साहेब फौज आणितो—रघुनाथराव हिंदुस्थानांत जात असतां शिंद्याचे फौजेचे हातून पळून जाऊन इंग्रजांस पुन्हा मिळतो—इंग्रजांची तयारी—नानाची तयारी-महादजीबद्दल संशय—गोदर्द साहेब गायकवाडाचे मदतीनें गुजराथ घेतो—गुजराथेंत शिंदे व होळकर जातात—महादजी नर्मदा उतरतो—त्याचें तहाबद्दल भाषण—त्याच्या मसलती—पुण्याचा सर्व कारभार पहाण्याची महत्वाकांक्षा—गोदर्द साहेब त्याचे बोलण्याकडे दुर्लक्ष करितो—लढाईची तयारी व लहानसान चकमकी शिंदे व होळकर मनापासून लढाई करीत नाहींत—कोकणांतील लढाई—इंग्लिश लोक शिंद्याचे राज्यावर स्वारी करितात--त्यांचा रजपूत व जाटांशीं सलुखा—महादजी गुजराथेंतून फौजेसह माळजातो—बरसातीमुळें लढाई मंदावते—पुढील मोहिमेबद्दल नाना व शिंदे यांचे भिन्न अभिप्राय- नाना भोंसले—निजाम व हैदर यांस इंग्लिशांविरुद्ध उठवितो—महादजी व नाना—यांच्यामध्यें वितुष्ट; दोघांचे हेतु—नाना महादजीचा विनवणी व स्तुति करितो—अहिल्याबाई बद्दल वाटाघाट—सरकार कामाकडे दुर्लक्ष—महादजी तिचा पक्ष घेतो—नानाचें उत्तर- गोदर्द कोकणांत जाऊन वसई घेतो-मराठ्यांची फौज गोदर्दचा पराभव करिते—त्याचा पळ- हैदर इंग्रजांवर स्वारी करितो—माळव्यांतील लढाई—इंग्रज ग्वाल्हेर घेतात—महादजीचा व इंग्लिशांचा सामना—सिरोंजचा हल्ला—हैदरानें इंग्रजांचा पराभव केला—मराठ्यांशीं तह करण्याची इच्छा—भोंसले मध्यस्ति करितो—महादजीचा इंग्रजांशीं तह होतो—महादजीचे हातून साल्बीचा तह करण्याची कारणें- तहाबद्दल वाटाघांट- राघोबाचें कलम—सालबीचा तह—तह फार दिवस घोळत पडण्याचीं कारणें-भोंसले व निजाम यांचें वर्तन—गायकवाडाचें कलम- हैदराबद्दल नाजूक प्रश्न- त्याचा तह करून देण्याची जबाबदारी-शिंदे व नाना यांचा मतभेद- हैदराचा मृत्यु- सालबीच्या तहावर नानांचा अभिप्राय- टिपूनें लढाई चालू ठेविल्याबद्दल अडचणी

अंदरसनला जहागीर देण्याबद्दल महादजीचा आग्रह- रघुनाथराव कोपरगांवीं जातो-त्याचा मृत्यु.—१२९-१६६.

## भाग आठवा.

### दिल्लीची कारस्थानें—वकील-इ-मुतलक.

(इ. स. १७८४-८७.)

सालबीच्या तहामुळें महादजीचें वर्चस्व-त्याची पुण्यांतील मुत्सद्यां-विरुद्ध मसलत-त्याचा इंग्रजांशीं स्नेह- टिपूवर स्वारी करण्याचा विचार- अंदरसनचा महादजीबद्दल अभिप्राय- आपल्या संमती शिवाय टिपूशीं तह केल्या बद्दल महादजीचा राग-किरकोळ तक्रारी-इंग्रजांचे स्नेहाचा फायदा- रघुनाथरावानें आपल्याकडे येण्या बद्दल महादजीची खटपट-त्यांत त्याचा खरा हेतु- गोहदकराचें पारपत्य, महादजी ग्वाल्हेर परत घेतो- दिल्लींतील हकीगत-महादजी फौज सुधारतो- मराठी फौजेचें वर्णन- त्या फौजेचे गुणदोष-शिपाई कोण-कवायती फौजेचें महत्व- महादजी डिबॉईन याला चाकरीस ठेवून नवीन फौज उभारितो- राघवगडचें बंड व महादजी—रजपुतांच्या शौर्याची एक गोष्ट- दिल्लीकडील वर्तमानें-मिरझानजफची कारकीर्द- त्याचा मृत्यु- पुढील बखेडे- नाना व शिंदे यांची मसलत—वजीरी बद्दल बखेडे-इंग्रजांची खटपट— वारन हेस्तिंगचें वर्तन-दिल्लीचे मुत्सद्दी महादजीस बोलावितात— महादजी बद्दल हेस्तिंग साहेबाचा अभिप्राय- महादजी आग्र्यास जातो—वजिराचा खून व त्याबद्दल महादजीवर संशय-महादजीस सरदार मिळतात—बादशहाची भेट—महादजीस वजीरी मिळते-राज्याची व्यवस्था—मुसलमानांच्या जहागिरी जप्त करितो—इंग्रजांवर खंडणीची मागणी—शिखांवर स्वारी—हिंदुस्थानांतील लोकांची स्थिती—लोकस्थितीवर लढायांचा परिणाम—भयंकर दुष्काळ— पुणें येथें इंग्रज वकील ठेवण्याची मसलत- मालेट साहेब मथुरेस जातो-नानाची मसलत-तो पुणें दरबाराचें वर्चस्व स्थापन करितो-- नरगुं-

दचा छापा—टिपूवर स्वारी—नाना इंग्रजांस युक्तीनें आपणाकडे ओढितो—मालेट साहेबाचा प्रवास—पुणें येथें वकील ठेवण्या बद्दल महादजीचें मत व कबूली–टिपूशीं तह–हिंदुस्थानांत होळकर व अली बहादर यांस पाठविण्यांत नानाची मसलत. १६७-१९७.

---

## भाग नववा.

### रजपुतांचें बंड—गुलाम कादराचीं दुष्ट कृत्यें.

### (इ. स. १७८७–१७९२).

मराठ्यांविरुद्ध मुसलमान व रजपुतांचे बेत—बादशाही सरदारांत बेदील—रजपूत खंडणी नाकारितात—पैशाची अडचण—शीख लोकांची स्वारी–महादजीची रजपुतांवर स्वारी–लालसोटची लढाई–महादजीचा पराभव–मुसलमान सरदारांची फितुरी—महादजी परततो–जाटाशीं सल्ला–पेशव्यांचे सरदारांचें वर्तन–महादजी विरुद्ध इस्मायल बेग व गुलाम कादर बंड करितात–शिंदे चंबळा उतरून आलीकडे येतो–त्याच्या सत्तेचा ऱ्हास–गुलाम कादर–त्याची दिल्लीवर स्वारी—महादजी दक्षिणेंत मदत मागतो—शिंद्यावरील बिकट प्रसंग—नाना मोठी मदत पाठवितो—महादजीची स्वतःची तयारी—त्याच्या फौजेच्या इस्माइलबेगा बरोबर लढाया–चकसानची लढाई—मराठ्यांचा पराभव–आग्र्याची लढाई—मुसलमानांचा पराभव–मथुरेचा तळ–बादशहाचें वर्तन—दक्षिणेच्या कुमके शिवाय बंड मोडण्याचा शिंदे याचा यत्न–गुलामकादर व इस्माइलबेग एकत्र होतात–त्यांचे बेत–त्यांचा दिल्लींत प्रवेश—महादजी विरुद्ध खलबतें–महादजी दिल्लीस न जाण्याचीं कारणें–गुलामकादराचा राजवाड्यांत प्रवेश–गुलामकादरास वजीरी मिळते–त्याचा द्रव्यलोभ–त्याचीं क्रूरकृत्यें–जनान्याचे व राजपुत्रांचे हालहाल–बादशहाची अपेष्टा–गुलाम शहाअलमाचे डोळे काढितो–बादशाहीचा शेवट–मराठे येतात–गुलामाचें अखेरचें दुष्टकृत्य—त्याचा पळ–इस्माईलबेग तह करितो–मीरतचावेढा व लढाई—गुलामास

मराठे पकडतात—बंडखोरांस शिक्षा—गुलामाचा भयंकर शेवट व शिक्षा—महादजी दिल्लीस जातो—वकील-ई-मुतलक पेशव्यास मिळते-बादशाहीचा अंत—मुसलमानांच्या शक्तीचा ऱ्हास—पाटीलबोवांचे पुढील बेत—त्यांचे शत्रु—फौजेची सुधारणा—तो नवीन कंपू तयार करितो—डिबॉईन—जुन्या नव्या फौजेची तुलना—मराठ्यांच्या फौजेची निकृष्टावस्था—हिम्मतबहादुराचें बंड—नव्या फौजेविरुद्ध मराठे व इंग्लिश सरदारांचे अभिप्राय—अलीबहादुराची खटपट—बादशहाची थट्टा—महादजीची दरबारांत योग्यता—इस्माइलबेग व रजपूत पुन्हा बंड करितात—शिंद्याची स्वारी—रजपुतांचें वर्तन—पाटणची लढाई—रजपुतांचा पराभव—जयपूरशीं तह—जोधपूरवर स्वारी—अजमीरचा वेढा—मिर्ता येथील लढाई—राठोरांची कत्तल—रजपुतांचें शौर्य—विजयसिंग शरण येतो—शिंदे अजमीर घेतो—दक्षिणेंत जाण्याचा विचार—मेवाडाशीं मराठ्यांचा संबंध-टॉडसाहेबाचा शेरा—उदेपुरांतील बखेडे—शिंदे राण्यास मदत देतो-अंबाजी इंगळे—उज्जनीचा मुक्काम—दक्षिणेंत जाण्याचीं कारणें-नाना व इंग्रज यांचा स्नेह—दक्षिणेंतील मोहिमेबद्दल तर्क-जाण्याचीं कारणें व तयारी—अहिल्याबाईचा शाप. १९८-२४३.-

---

## भाग दहावा.

### पुण्यांतला मुक्काम—अखेरचा रंग व अवतार समाप्ति.

(इ. स. १७९२–९४.)

मार्ग क्रमण—नाना फौज जमवितो—बीड व तुळजापूर येथील मुक्काम—विवाह—पुणें येथें आगमन व स्वागत—फौजेची सलामी-फर्मान देण्याची तयारी—नानाची भेट—सवाईमाधवरावाचें वैभव-मराठ्यांचा राज्यविस्तार—वकील-ई-मुतलक व माहीमतराब देण्याचा समारंभ—त्याविषयीं मराठ्यांचा अभिप्राय—अपशकून-पाटीलबावांची कारभार मिळविण्याविषयींची खटपट—नानाचा मत्सर—पेशव्याचीं जाचणूक—नानाच्या वर्तनांत फेरफार—हिशेबा

संबंधीं लढा—इंग्रजावर खंडणीची मागणी—इस्माइलबेगाचें पुनः बंड—कनौदची लढाई आणि त्याचा शेवटला पराभव—महादजींचे सरदारांचें होळकराशीं वर्तन—लढाईची तयारी—बनासनदीवरील छापा—लाखेरची लढाई—होळकराचा पराभव—पाटीलबावा खेद करितात—नानाची तयारी—जयपूरचा राणा व डिबॉईन—पाटीलबावांची नानाच्या कारभारांत ढवळाढवळ—सचिवाचें प्रकरण—गायकवाडांचा लढा—कोल्हापूरकर व सावंत—सावंत व इंग्रज-पाटीलबावांची नार्वेतील मसलत—पेशव्याचें सयुक्तिक उत्तर-नाना व पेशवे—फडके व महादजी— काशीयात्रेस जाण्याची तयारी—समेट—एक आख्यायिका— पुण्यांतील उत्साह— अखेरचा रंग—पाटीलबावांचा मृत्यु—दौलतरावची स्थापना—पाटीलबावांची छत्री—त्यांचें स्वरूप—स्वभाव—धर्माभिमान—भोळ्या समजुती—त्यांचें शिक्षण—राज्यव्यवस्था-त्यांचा अलौकिक साधेपणा—त्यांची शिपायगिरी व सरदारी—पाटीलबावा व नाना यांची तुलना—त्यांचा इंग्रजाविषयीं द्वेष—पाटीलबावा व मराठेसरदार—त्यांचा स्वजातीयांविषयीं अभिमान—त्यांचें रघुनाथरावाचे बंडाचे वेळचें वर्तन—त्यांचे सरदार—मुत्सद्दी व सरदार—मराठेशाईच्या अखेर-परिणामाचें कारण. २४४—२७६.

---

## उपसंहार.

शिंद्यांचें सांप्रतचें राज्य—हल्लींच्या काळाचें स्वरूप—सध्यांचे महाराजांस विज्ञाप्ति. २७७.

परिशिष्ट (अ) विशेष टिप्पणी वगैरे. २७९—२८९.

" (ब)——————— २९१.

समाप्त.

# शिंदे घराण्याची वंशावळ.*

दत्ताजी

जनकोजी

१ राणोजी (मृत्यु १७५०, राणेगंज येथें.)

- २ जयाप्पा — मृत्यु १७५४ नागोर येथें मारला गेला.
  - ३ जनकोजी — पानिपत येथें पडला १७६१.
- दत्ताजी — दिल्ली जवळ लढाईंत पडला. १७५९.
- जोतीबा — मृत्यु १७६३, कुंभेर येथें लढाईंत.
- संताजी — मृत्यु १७५४, नागोरच्या लढाईंत.
- ४ महादजी — मृत्यु १२ फेब्रुआरी, १७९४ वानवडीस.
- तुकोजी — मृत्यु १७६१, पानिपतच्या लढाईंत.
  - रवळोजी, केदारजी, आनंदराव
    - (आनंदराव) दौलतराव

५ (दत्तक) दौलतराव १७९४-१८२७.

६ (दत्तक) जनकोजी राव १८२७ १८४३.

७ (दत्तक) जयाजीराव १८४३-१८८६.

८ माधवराव (सांप्रत विराजमान.)

* टीप—ही वंशावळ फक्त या पुस्तकापूर्ती दिली आहे.

# अलिजाबहादर महाराज,

# माधवराव उर्फ महादजी शिंदे

## यांचें चरित्र व कारकीर्द.

## भाग १ ला.--उपोद्घात.

### मोंगल व मराठे.

मोंगलराज्यरूपी वृक्षाचें रोपण बाबरानें केलें, हुमायुनानें त्याचें कोंवळेपणांत संरक्षण केलें, अकबरानें हिंदुकूश पर्वताच्या बर्फाच्छादित खोऱ्यांपासून बंगालच्या उपसागरापर्यंत व हिमालयाच्या उतरणीपासून तों दक्षिणेंत कावेरीनदीच्या चिमट्यांतील सुपीक प्रदेशापर्यंत सर्व मुलूख त्या वृक्षाच्या विस्तीर्ण छायेखालीं आणिला, व जहांगीर व शहाजहान बादशहांनीं त्याच्या फळांचा बहार उपभोगिला. पुढें अतिविस्तीर्ण व पुराण ह्मणून दिसण्यांत भव्य, परंतु आंतून जीर्ण व कोरम झालेलें हें जुनें खोड अलमगीर उर्फ अवरंगझेब बादशहाच्या हातांत आलें. बाहेरच्या सुंदर पोषाखानें व दागिन्यांनीं मढविलेला, परंतु अतिशय दुर्व्यसनांच्या सहवासानें ज्याचें शरीर व्याधिग्रस्त होऊन अगदीं क्षीण झालें आहे अशा पुरुषाप्रमाणें मोंगलराज्याची स्थिति होती. मोंगल राज्याच्या वैभवाची कीर्ति दोन्ही महासागरांपर्यंत पोंचली होती; परंतु त्याच्या विस्ताराबरोबरच त्याला व्याधि जडली. हिंदुस्थानासारख्या समृद्ध प्रदेशांत यथेष्ट संपन्न होऊन राज्यमदाच्या अमलांत मुसलमानलोक विलासी व धुंद झाले, व हिंदुस्थानांत कोणी शत्रु उरला नाहीं असें

त्यांनां वाटलें. ऐषआरामांत निमग्न झाल्यानें आंगांतील शूरत्व नाहींसें झालें. अकबराप्रमाणें हिंदुलोकांनां संतुष्ट ठेऊन राज्य चालविण्याची युक्ति त्यांस रुचेनाशी झाली व ते उलटा अकबरासच दोष देऊं लागले. कोणत्याही धर्मास त्रास न देतां राज्य करण्याचा मार्ग सोडून त्यांची प्रवृत्ति परधर्मी लोकांचा छळ करण्याकडे वळली व त्यांनीं फ्रान्स देशांतल्या बडेलोकांप्रमाणें सर्व करांचें ओझें गरीब हिंदूंवर लादलें. सर्व मुसलमान बडेलोक बनले व नानातऱ्हेचे हक्क स्वतःसाठीं त्यांनीं उत्पन्न केले. डोईकर ( जिजीया ) हिंदूंवर मात्र, मुसलमानांवर नाहीं. मोंगली सरदारांमध्यें कलह माजून खुद्द बादशहाच्या घरांतसुद्धां यादवी सुरू झाली. अशा अनेक कारणांनीं मोंगलांचे राज्यास रोग जडला व अखेरीस तें राज्य अवरंगझेबाचे हातांत आलें.

सगळ्या मोंगल बादशहांत याचा अंमल कडक होता. त्याच्या राज्याचा विस्तार जास्त होता व त्याच्या स्वतःमध्येंही तरतरी व पाणी जास्त होतें. त्याच्या लांबच लांब कारकीर्दींत मोंगलराज्याचा बाह्य भपका, डामडौल व दरारा कायम राहिला होता, परंतु आंतील स्थिति वाईट होती. मोंगलराज्य कांहीं दिवस जास्त टिकण्यास हा बादशहा जितका कारण होता, तितकाच त्याचा नाश होण्यासही तोच कारण झाला. त्यानें शहाजहानाच्या कारकीर्दींत सुरू झालेलीं लहानसहान बंडें नाहींशीं करून व विजापूर, गोवळकोंडा वगैरे नामांकित बादशाही खालसाकरून मोंगलराज्याचें एकछत्री राज्य केलें; परंतु त्याचे विलक्षण धर्मवेडामुळें त्यानें आपली सर्व हिंदुप्रजा नाखुष केली. त्याच्या वयपरत्वें त्याचें हें धर्मवेड फारच वाढत जाऊन, त्याचें वर्तन एखाद्या कडकडीत इमामाप्रमाणें झालें. अकबरादि बादशहांच्या राज्यकारभारांत हिंदुलोकांस मोठमोठ्या जागा मिळत होत्या एवढेंच नाहीं तर कित्येक पुढारी रजपुतघराण्यांशीं बादशहांनीं शरीरसंबंध करून रजपुतांचा स्नेह जोडिला होता; परंतु ही व्यवस्था अवरंगझेबानें मोडून टाकिली आणि हिंदूंच्या छळास आरंभ केला. त्याचा प्रख्यात सरदार राजा जसवंतशिग काबुलांत मरण पावला असतां, त्याच्या कुटुंबावर त्यानें जुलूम केला. त्यामुळें सर्व रजपूत खवळून गेले व त्यांवर

जिजिया नांवाचा कर बसविल्यामुळें तर त्यांच्या तळव्याची आग मेस्तकास गेली. हा कर फक्त हिंदूंवर मात्र होता. इतर जकातीही मुसलमानांपेक्षां हिंदुव्यापाऱ्यांवर दुप्पट बसविल्या! हा अप्रिय कर माफ करावा ह्मणून दिल्लींतील हिंदुप्रजेनें मोठी गडबड केली व बादशहाच्या दारापुढें हजारों लोक हात जोडून उभे राहिले. तथापि त्या धर्ममदांध, कठोरहृदयी, महत्वाकांक्षी व क्रूर बादशहाला त्यांची कींव न येतां त्यानें आपले मदोन्मत्त हत्ती त्या गर्दींत मुद्दाम घातले व शेंकडों गरीब अर्जदारांचे प्राण घेतले! अवरंगझेबास मनुष्याचा जीव कसपटाप्रमाणें वाटे! कर्नोल येथें सत्नामी पंथाच्या लोकांनीं बंड केलें. तें बंड मोडण्यासाठीं पाठविलेल्या फौजेच्या भाल्यांवर कुराणांतील वाक्यें त्यानें लिहविलीं. सत्नामी लोक शेतकी करीत; परंतु मुसलमानांच्या जुलमास त्रासून थेट दिल्लीपर्यंत त्यांनीं बराच दंगा केला, तथापि अखेरीस त्यांचा पराभव केल्यावरही, निरपराधी व बंडांत नसलेल्या प्रजेचीं घरेंदारें जाळून त्यांची कत्तल करण्यांत अलमगिरास आनंद झाला! हिंदूनीं पालखींत बसूं नये! हिंदूंनीं आरबी घोड्यावर स्वार होऊंनये! ह्या प्रकारांनीं हिंदूंनीं कोणत्याही प्रकारें स्वधर्मी मुसलमानांप्रमाणें सुखोपभोगाचीं चिन्हेंही दाखवूंनयेत अशी बादशाही मर्जी झाली!! त्यानें इतकें करूनच न रहातां, हिंदूंचीं प्राचीनकाळापासून अतिपवित्र मानिलेलीं पुण्यक्षेत्रें भ्रष्ट करून तेथील देवालयांतील मूर्ती फोडून टाकिल्या!! मुलतान, काशी, मथुरा, जोधपूर येथील पवित्र देवालयें मोडून त्यांवर मशीदी बांधिल्या! उदेपूर येथील देवालयांत रिघाव करितांना आंतल्या गाभाऱ्यांतच वीस असामी पुजाऱ्यांस कापून काढिलें! एका रजपुतान्यांतच त्यानें सुमारें तीनशें देवालयें भ्रष्ट केलीं. हिंदू व मुसलमानांत राजकीय संबंधानें जो भेद पूर्वीच्या बादशहांच्या वेळीं नाहींसा होत होता, तो त्यानें चेतविला. हिंदूंचे सण; त्यांचे देवालयांचे उत्साह, त्यांच्या जत्रा, यात्रा, गाणीं, नाचणीं, सोंगें हीं बंद करण्यास त्यानें मुसलमान

---

1 Elliot vol. VII; Ma-asiri Alamgiri. 185-188; Khafikhan 293-298.

अधिकारी नेमले। हिंदूंच्या धर्मकृत्यांवर परधर्मी अंमलदारानें देखरेख करणें, त्या वेळच्या लोकांस सहजच विषम वाटलें।

ह्या त्याच्या कृतीनें रजपूत लोक बंड करून उठले. खुद्द बादशहाचा मुलगाच त्यांस सामील झाला होता. पंजाबांत शीखधर्मी लोकांसही फार उपद्रव देऊन त्यांची त्यानें बंडाकडे प्रवृत्ति केली व दिल्लीच्या आसपास प्रदेशांत जाट लोक तर उघड दंगे करूं लागले. या धर्मच्छलानें सर्व हिंदुलोकांचीं चित्तें खवळून गेलीं व दक्षिणेंत तर शिवाजीनें मुसलमानांशीं धर्मयुद्ध चालविलें. शिवाजीच्या सर्व यशास कारणीभूत मुसलमानांचा जुलूम होता. गोब्राह्मणांचें व धर्माचें संरक्षण करण्याच्या बाह्यउद्देशानें शिवाजीनें धर्मयुद्ध चालवून, युक्तिप्रयुक्तीनें दक्षिणेंतून मुसलमानांस हुसकून लाविलें. याप्रमाणें प्रजा बिघडली, आपल्या अमीरउमरावांत व खुद्द आपल्या मुलांत तंटे सुरू झाले, असें असतां शिवाजीसारख्या वाढत्या शत्रूस जिंकण्यापूर्वीच, अवरंगझेबानें गोवळकोंडा व विजापूरचीं राज्यें घेण्यासाठीं दक्षिणेंतील मुसलमानांची शक्ति क्षीण केली व मराठ्यांचा फायदा करून दिला.

दक्षिणेंतील मराठ्यांचें बंडच शेवटीं मोंगलांचे नाशास कारण झालें. मुसलमानांच्या जुलमास त्रासलेल्या दक्षिणेंतील स्वतंत्र लोकांस शिवाजीसारखा पुढारी व ब्राह्मणांसारखे मंत्री मिळाल्यावर बंडाचें स्वरूप बदलून हळूहळू मराठेलोक मोंगलांचे भयंकर शत्रु होऊन बसले. आधींच डोंगरी मुलखांत राहून चपळ, धीट व साहसी झालेल्या लोकांत धर्मसंरक्षणाचें वारें शिरतांच त्यांचा जमाव वाढूं लागला, व ते मुसलमानांशीं मनापासून लढूं लागले. दिल्लीच्या सुखासनावर बसून शिवाजीचा नाश करण्यासाठीं बादशहानें एकामागून एक अशा अनेक फौजा पाठविल्या. त्या सर्वांचा मराठ्यांनीं फडशा उडवून त्यांनीं बादशाहीमुलखांत लुटी केल्या. मराठ्यांचें बंड प्रारंभीं अतिशय लहान होतें ह्मणून तिकडे बादशहानें प्रथम दुर्लक्ष केलें, परंतु

1 Owen 87—95; M. Taylor 342—343; History of Hindustan Keene 224—227; Elphinstone 636—638, 640.

उत्तरोत्तर त्याचें स्वरूप बदलून मराठ्यांचा मोंगलांस दरारा बसला. मराठ्यांची फौज साहसी, त्यांचीं घोडीं चपळ, सामान व हत्यारेंही सहज वापरतां येण्यासारखीं हलकीं, व कावेबाजीनें तोंडास तोंड न देतां छापे घालून घालून व भोंवतालचा मुलुख बेचिराख करून शत्रूस जेर करण्याची युद्धपद्धति, यांमुळें मराठ्यांस जय येत गेला. अशा चपळ शत्रूबरोबर झुंज करण्यास जी मुसलमान फौज येई, तिचें स्वरूप अगदींच भिन्न होतें. ती फौज महाराष्ट्रासारख्या विकट प्रदेशांत व मराठ्यांसारख्या शूर व कावेबाज शत्रूशीं टिकाव धरण्यास निरुपयोगी होती. मोंगलफौज निघाली म्हणजे एक मोठें शहरच निघाल्यासारखें भासे. त्यांच्या बरोबर अठरा कारखाने असून शिवाय जनानाही असे. त्यांच्या तळांवर सुशोभित डेऱ्यातंबूंची रांगच्या रांगच लागे व स्वारीबरोबर जवाहिरानें व किनखापानें मढविलेले हजारों हत्तीघोडे निघत; फौजे बरोबर नाच, तमाशे, कलावंतिणींचे ताफेचे ताफे चालत, व लढाईस निघालेल्या मिजासी अमीरांचा हुक्का संभाळण्यासच चार माणसें लागत! अशा फौजेचा, फक्त बाह्य भपक्यावरून, धाक उत्पन्न होईल तेवढाच, परंतु मराठ्यांसारख्या धाडस व काटक शत्रूस त्याची मुळींच भीति वाटत नसे. अमीरांपुढें तमाशे चालत असतांअसतांच ते मोंगलांच्या तळावर छापा घालीत.

हें मराठ्यांचें वाढतें प्रस्थ पाहून अवरंगझेबास फार काळजी लागली व शिवाजीचें पारिपत्य करण्यासाठीं, तो वर वर्णिलेल्या मासल्याच्या अवाढव्य फौजेनिशीं दक्षिणेंत उतरला. मराठ्यांचा नाश करीन तरच परत दिल्लीस जाईन अशा प्रतिज्ञेवर त्याणें मराठ्यांशीं युद्ध चालविलें व त्या सुमारासच गोंवळकोंडा व विजापूर येथील मुसलमानी राज्यें त्यानें घेतलीं. इ० स० १६८० त शिवाजी मरण पावला व पुढें संभाजीस कैद करून बादशहानें त्याचे हालहाल करून प्राण घेतल्यावर, मराठे जिंकल्यासारखेच बादशहाला वाटलें; व तो आपली फौज घेऊन मोठ्या आनंदानें भीमातीरावर तळ देऊन राहिला. संभाजीची बखर लिहिणारे मल्हार रामराव हे एक गमतीची गोष्ट लिहितात, तीवरून तर या बादशहाचें धर्मवेड फारच

Hardy. 2 A crafty plotter. 3 A set of dancing girls musicians) 4 Having strongest departments of a ditto. 5 A smoking apparatus

व्यक्त होईल. संभाजीराजा हस्तगत झाला आणि विजापूर व गोवळ-कोंड्याच्या बादशाही पादाक्रांत झाल्यावरून अलमगिरास "निर्वैरमुर्वीतलम्" असें झालें व त्यानें सर्व हिंदूंस वाटवून यावनी करण्याचा विचार केला. त्यानें आपल्या हिंदुफौजेला देण्याचें अन्न ओलें द्यावें असा हुकूम दिला! त्यामुळें एक दिवस सर्व हिंदुलोक बिथरून तळ सोडून दूर राहिले, तेव्हां बादशहा जरा शुद्धीवर आला व महाराष्ट्रांतील किल्ले, कोट ताब्यांत आणण्याच्या खटपटीस लागला; परंतु त्याला मराठ्यांची शक्ति कळली नव्हती. संभाजीचा क्रूर वध केला व राजपुत्र शाहूला कैद केलें यामुळें तूर मराठे फारच खवळून गेले व त्यांच्या साऱ्या देशाभिमानास ऊत आला. राजारामास गुप्तरीतीनें दूर तंजावरास पोंचवून त्याच्या नांवानें सगळ्या महाराष्ट्रांत मुसलमानांवर छापे घालून व त्यांच्या फौजा लुटून त्यांस जेरीस आणिलें. मराठ्यांचा नाश करण्याच्याच मुख्य हेतूनें अलमगीर बादशहानें सुमारें १२ लक्ष सैन्य दक्षिणेंत आणिलें होतें; परंतु संभाजीच्या मरणानंतर मराठ्यांचे अंगीं वीररस भरला व त्यांचे लढाईची रणभूमि सर्व दक्षिण व कर्नाटकभर पसरली. यामुळें मोंगलांचे फौजेस विसावा मिळेनासा झाला. यावेळीं मराठ्यांनीं जो दंगा उडविला, तो केवळ लुटीच्या आशेनें हें ह्मणणें बरोबर होणार नाहीं. आपला धर्म व आपला स्वदेश ह्यांचें संरक्षण करण्याचें स्फुरण मुसलमानांच्या जुलमामुळें फार वाढत चाललें व पुढें—

> बहुत लोक मेळवावे ॥ लोकां विचारें भरावे ॥
> कष्ट करूनि घसरावें ॥ म्लेंच्छांवरी ॥
> आहे तितुकें जतन करावें ॥ पुढें आणिक मेळवावें ॥
> महाराष्ट्र राज्यचि करावें ॥ जिकडे तिकडे ॥ *

या रामदासांच्या उपदेशाप्रमाणें त्यांची महत्वाकांक्षा वाढत चालली. वृक्षाची खची केल्यावर तो जसा जास्तच बळावतो, तद्वत् मराठे मों-

---

१ संभाजी च० १९. * संभाजी च० २४.

1 Palpitation or pulsation quickly [illegible] from [illegible] 3 Bouting [illegible] 6 Castrated [illegible]

गलांच्या स्वल्प जयापासून जास्तच बळावले; अवरंगझेब स्वतः रणामध्यें आला असतां त्याला दाद न देतां त्यांनीं मोंगलांची दाणादाण उडविली. शिवाजीमहाराजांच्या मृत्यूपासून संभाजीच्या वधापर्यंत मराठ्यांची जी नाउमेद झाली होती ती जाऊन, राजाराम महाराज तंजावरास अज्ञातवासांतच असतां इकडे कृष्णा, गोदा वगैरे नद्यांच्या थडी व सह्याद्रीचे कडे व कोट "हरहरमहादेव" ह्या विजयध्वनीनें गजबजून गेले. स्वदेश व स्वधर्मसंरक्षणासाठीं एकट्या मराठ्यांनीं मोंगलांच्या प्रचंड फौजेशीं बरोबर बावीस वर्षें टक्कर देऊन टिकाव धरिला. यावेळेस शेंकडों मराठे आपल्या बाहुबलावर प्रतिष्ठेस चढले, व त्यांस महाराजांकडून योग्य सन्मान व पदव्या मिळाल्या. आटोळे-समशेर बहाद्दर, पंवार-विश्वासराव, धनाजी जाधव–जयसिंगराव, संताजी घोरपडे–हिंदुराव ममलकतमदार, शिद्दोजी नाईक–सरलष्कर, परसोजी भोंसले–सेनासाहेबसुभे, हे सरदार त्यांत मुख्य होते. यांशिवाय या संधीस मराठ्यांच्या पक्षांत जे लोक आपल्या बुद्धीनें किंवा धैर्यानें राजकारणीं उपयोगीं पडले, त्यांत कोणास समशेरबहाद्दर, कोणास अमीरउल्उमराव, कोणास मदारउल्मुलूख, सेनाजंगबहाद्दर, फत्तेजंग, सरफत्मुलूख इत्यादि सार्थ पदव्या मिळाल्या. "मोंगली फौज मोठी, एके ठिकाणीं उभें राहून लढाई करणार. मराठे यांणीं आज एके ठिकांणीं तर दुसरे दिवशीं पांच पंचवीस कोस जावें. पुन्हां एकाएकीं येऊन छापा घालावा; कांहीं लढाई देऊन लुटून पळावें. कांहीं रसद मारावी, असें करूं लागले; तेव्हां यांशीं कसें लढावें, असें मोंगल ह्मणों लागले." "सारांश, महाराजांचे लोक प्राण तृणप्राय करून हिंदुजाती व राज्याविषयीं झटूं लागले." "आपलें सैन्य थोडें यास्तव मनुष्य राखोन जाया होऊं न देतां मसलतीनें मोंगलांच्या सैन्याभोंवती हिंडोन फिरोन त्यांची लांडगेतोड करावी, रयतेची मात्र वैरण राखून रानांतली वैरण जाळून टाकावी, रसद घालूं देऊंनये, आपल्या फौजेंत मणाची धारण, त्यांच्या लष्करांत शेराची धारण,

१ थी. राजाराम च० ३०-४०.

Ta dfg the effect of measures ?

अशा तऱ्हेनें मराठी फौज किती आहे याचा अंदाज ध्यानांत येऊं देऊं नये, व त्यांचे फौजेस चैन पडूं देऊं नये; मोंगलांचे घोडे नदीवर पाणी न पीत त्यांस मोंगली लोकांनीं, धनाजी व संताजी पाण्यामध्यें दिसतो काय असें ह्मणावें ! रात्रीं दिवसा मराठे कोठून येतील केव्हां येतील, असें मोंगल फौजेस अष्टौप्रहर भय असावें! मराठयांच्या चपळतेपुढें शत्रूला कांहीं सुचेना, सर्व मुसलमान फौज घाबरून गेली'." सेनापती धनाजी जाधव—जयशिंगराव व संताजी घोरपडे हिंदुरावंममलकत्मदार वगैरे शूर मराठे सरदारांच्या टोळ्या तापीनदीपासून कावेरीपर्यंत फिरूं लागल्या, व त्यांनीं मोंगलांच्या अवाढव्य फौजेस "दे माय धरणीठाव" करून दिलें; महाराष्ट्रांतला एकेक किल्ला सहा सहा महिने लढूं लागला, व दिवसेंदिवस मुसलमानांची हिंमत खचत जाऊन मराठ्यांचा धाक पडत चालला. खुद्द शिवाजीराजाचे वेळेससुद्धां मराठ्यांत इतका धर्माभिमान व देशाभिमान नव्हता; तो आतां दिसूं लागला. जेवढा ह्मणून हिंदु होता तेवढा अवरंगझेबावर उठला, व शेवटीं खुद्द बादशहाच्या डेऱ्यापर्यंत मराठ्यांचे छापे येऊं लागले! तेव्हां निरुत्साह होऊन मराठ्यांस घाबरलेला व आपल्या गृहकलहाच्या विवंचनेंत पडलेला वृद्ध बादशहा अवरंगाबादेस आपला देह ठेवण्यास गेला; आपल्या अवाढव्य राज्यांत आपल्या मागें सर्व अव्यवस्था होऊन भांडणें होतील, ह्याचें व आपल्या सर्व आयुष्यांत केलेल्या क्रूर कृत्यांचें चित्र बादशहाच्या डोळ्यांपुढें येऊन तो विव्हळत असे, व अशा वेदनेंत, दुःखांत व काळजींत पृथ्वींतील एका अफाट व विख्यात राज्याच्या शेवटल्या प्रसिद्ध बादशहाचा अंत झाला!!

याप्रमाणें प्रख्यात मोंगलबादशाहीची भरभराट व मोडकळ अलमगिराच्या हयातींत होऊन, ती डळमळीत झालेली इमारत त्याच्या दुर्बळवंशजांच्या हातीं आली, ह्यामुळें तिचा अंत समीप ठेपलेला सर्वांस दिसला. अवरंगझेबाच्या मागून झालेल्या बादशहांचे का-

---

१ थो. राजाराम च० ४१।४४.

1 Trembling tottering 2 A sudden attack upon an enemy 3 dispirited, Heart lef…

रकीर्दीत, मोंगलांचे परशत्रूंशीं चालणारे सर्व तंटे, दरबारांत सुरू झाले व राज्यरूपी इमारतीच्या भेगा व्यक्त झाल्या. बहादुरशहा, जहांदरशहा, फरुक्शिर वगैरे बादशहांच्या कारकीर्दींच्या इतिहासांत, बादशाही घराण्यांत खून, कत्तली व लढाया चालू होत्या व या दुर्बळ बादशहांवर अम्मल चालविण्यासाठीं दरबारांतील प्रतिस्पर्धी सरदारांचे तंटे वाढत चालले होते. झुलफिकारखान, सय्यदबंधू वगैरे महत्वाकांक्षी मनसबदारांनीं आपले तंटे भयंकर स्वरूपास पोंचवून सर्व मोंगलराज्य अव्यवस्थित व अस्वस्थ करून सोडिलें.

या अनावर गृहकलहापासून शीख, रजपूत, जाट व मराठे यांनीं आपापले स्वार्थ साधले. दिल्लीचे बादशहा दुर्बल, मूर्ख, व्यसनी व दुसऱ्याचे हातांतलीं बाहुलीं बनल्यामुळें, मोंगल राज्याचा नाश समीप येऊन ठेपला. शीख लोकांचें प्राबल्य वाढून त्यांनीं पंजाबांत आपला अम्मल पसरिला. रजपुतांनीं आपसांत तह करून मुसलमान अधिकाऱ्यांस पिटाळून दिलें व मराठ्यांच्या फौजेनें दक्षिणेची वाट बंद करून टाकिली. अयोध्या, बंगाल, दक्षिण वगैरे सुभ्यांतले सुभेदार मोंगलबादशाहीस जुमानिनातसे झाले व हिंदुस्थानचे किनाऱ्यांवर परद्वीपस्थ ख्रिस्तीलोकांचीं ठाणीं जास्त वळावूं लागलीं.

फरुक्शिरास गादीवर बसविणाऱ्या सय्यदबंधूंनीं आपल्या महत्वाकांक्षेस्तव हजारों उलाढाली करून, आपल्या तंट्यांत मराठ्यांची मदत घेतली व ती देण्यास मराठेही उत्सुक होते. अवरंगझेबामागून शाहूची मोकळीक झाल्यावर, मराठ्यांचें व मोंगलांचें युद्ध कांहीं वर्षें मंदावलें; परंतु तेवढ्या विसाव्यांत मराठ्यांच्या मुलुखांत व्यवस्था होऊन त्यांचें बळ दुणावलें व शेवटीं दिल्लीच्या गडबडींत मराठ्यांचेंच सहाय्य घेण्याचें मोंगलबादशहाच्या नशिबीं आलें! मराठ्यांनीं पहिला थोर पेशवा बाळाजीविश्वनाथ यास दिल्लीस पाठविलें व तेथेंच त्यानें बादशहाकडून चौथाई, सरदेशमुखी, व स्वराज्य या स्वतंत्र हकांच्या सनदा संपादून आणिल्या. या सनदा पुढें दक्षिणेच्या साडेसहा सुभ्यांपुरत्याच न थांबतां सर्व मोंगलाईस भोंवल्या.

2

Enquest 2 A. rault ... Come and formed the Mohomedan army

# भाग २ रा.

## शिंद्यांचें घराणें.

### राणोजी व जयाप्पा.

बाळाजी विश्वनाथासारखा कर्ता पुरुष मरण पावल्यावर पेशवाईचीं वस्त्रें त्याचा वडील शूर पुत्र बाजीराव ह्यास द्यावीं किंवा न द्यावीं, हा विचार सातान्यास शाहू महाराज करीत होते व त्यांस श्रीपतराव प्रतिनिधी, तीं न देण्याचा उपदेश करीत होता; तथापि मोंगलांकडून फौजेची मागणी आली असतां ती पूर्ण करण्यास बाजीरावच एक छातीचा पुरुष पुढें झाला. तसेंच एकंदर मराठी राज्यासंबंधीं जीं खलबतें सातारच्या वाड्यांत चालत, त्यांत बाजीरावाचें भाषण सदोदीत वीरश्रीचें असे. एके दिवशीं सातान्यास शाहू महाराजांच्या दरबारांत प्रतिनिधी व इतर मोठमोठे सरदार, अष्टप्रधान वगैरे जमले असतां हिंदुस्थानांत महाराष्ट्राचें राज्य करण्याबद्दल महाराजांनीं इच्छा दर्शविली; परंतु तसें करणें आज बरें नाहीं, कालांतरानें हळूहळू करावें असा प्रतिनिधीचा उपदेश पडला. बाजीरावानें ती संधि साधून त्या सभेंत एक मोठें वीररसभरित संभाषण केलें. तो ह्मणाला कीं, "मोंगलांचें राज्य जिंकण्याची उत्तम संधि हीच आहे. बादशाही कमजोर झाली आहे. तींत कांहीं जीव राहिला नाहीं, बखेडे बहुत झाले आहेत, बादशहा आमच्या कुमकेनेंच बादशाई रक्षूं इच्छीत आहे. अशा संधीस आपलें कार्य साधून त्यांचेही बखेडे मोडावे. मागें संभाजी महाराजांस कैद केल्यावर मोंगलानें मराठी राज्य व स्थळें सर्व घेतलीं व बादशहा मोठी फौज घेऊन महाराष्ट्रांत असतांही हिसाब न धरितां औरंगाबाद मारिली, अम्मल बसविले, राज्य, किल्ले व स्थळें साध्य केलीं. हें राज्य गेलेलें पुन्हां साध्य झालें, अनायासेंकरून स्वामी राज्यावर येऊन पदरीं मोठीं दैववान

1 Surat Consultation 2 Quarrels.

माणसें मिळालीं व बादशाहीस कुमक करावी, बादशहा स्थापावे, असें होऊं लागलें; पूर्वी वडिलांनीं मोठमोठीं कार्यें केलीं, तशीं न करावीं तर मोठीं पदें काय उपयोगाचीं? महाराज! मला सनदा मात्र द्याव्या, फौज व खजिना स्वामींचे चरणप्रतापेंकरून सिद्ध करितों; राज्य साध्य करितों, निजामाचा शह राखून हिंदुस्थानची मसलत करितों, कर्नाटकची मसलत घरांतील आहे, ती सहज साध्य होईल. थोरले महाराजांचा संकल्प हिंदुस्थान काबीज करावें असा होता; त्यासाठींच आपला अवतार उदय झाला आहे व पुण्यप्रतापही तसाच आहे. यास्तव आर्धी हें साध्य करावें आणि संकल्प शेवटास न्यावा!" बाजीराव मोंगलांचे राज्यास उद्देशून ह्मणाला:- "महाराज, अगोदर हें जुनें खोड तोडावें, ह्मणजे खांद्या आपोआप खालीं येतात." "तुह्मांसारखीं माणसें पदरीं असल्यावर हें साध्य होऊन हिमालयापलीकडील दुसरें किन्नरखंडही प्राप्त होईल" असे आनंदोद्गार काढून शाहूनें बाजीरावास त्याच दिवशीं पेशवाईचीं वस्त्रें दिलीं; व तेव्हांपासून बाजीराव हिंदुस्थान जिंकण्याच्या उद्योगास लागला.

आपला कृतसंकल्प सिद्धीस नेण्यासाठीं जी फौज बाजीरावानें पुढें उभारिली, त्यांतून मोठमोठीं शूर माणसें निपजलीं. त्यांत मल्हारराव होळकर, उदाजी पवार, राणोजी शिंदे, गोविंदराव बुंदेले हे प्रमुख होते. बाजीरावासारखी मनुष्यांची पारख फार थोड्यांस होती. त्यानें निवडलेले सर्व शिपाई, शूर व कर्ते पुरुष निपजले. राणोजी शिंदा कण्हेरखेडकर हा बाळाजीपंतांचे पदरीं खिजमतगार होता; परंतु त्याची स्वामिभक्तिवगैरे गुण बाजीरावाच्या मनांत भरले होते. साताऱ्यास एके दिवशीं बाजीरावास दरबारांतून परत येण्यास फार विलंब लागला, तेव्हां तो बाहेर येऊन पहातो तों आपले जोडे उराशीं घट्ट धरून निजलेला राणोजी हुजऱ्या देवडींत दिसला. तेवढ्या लहान गोष्टीवरून हा मनुष्य कोणतेंही काम मनःपूर्वक करण्यास लायख आहे अशी त्यानें परीक्षा केली व

१ प. ब. २४, थो. शाहु. च. ४६-४८, G. Duff 214-215,
२ "चांभारगोंदेकर," हो. कै. पृ. १५.

porch; also a ... terrace in front of the ...

तो त्यावर विशेष मर्जी करूं लागला. राणोजी हा बाळाजीपंताबरोबरच बारगीर होता. पुढें पुणेंमुक्कामीं बाजीराव असतां, मल्हारराव होळकराबरोबर हिंदुस्थानांत श्रीमंतांकडील एक पागा असावी असा विचार चालला होता व ती जागा कोणास द्यावी हें घाटत होतें; तेव्हां श्रीमंतांकडून ताट घेऊन राणोजी दररोज होळकरांकडे जात असे; तेव्हां बाजीरावाप्रमाणें होळकराचीही मर्जी त्याच्यावर बसली होती. एके दिवशीं कचेरीस होळकर येऊन बसले असतां तुह्मीं सांगाल त्याला पागा देतों असें बाजीरावाचें ह्मणणें पडल्यावरून, तेथेंच श्रीमंतांवर चवरी वारीत असणाऱ्या राणोजीकडे मल्हाररावानें बोट दाखविलें[1]. बाजीरावानें 'तथास्तु' ह्मणून लागलींच पाग्याचीं वस्त्रें राणोजीस देऊन, सरकारी शिक्के, कटार, जरीपटका वगैरे स्वाधीन केलीं. पुढें प्रख्यात रामचंद्रबाबा शेणवई यांस राणोजी शिंद्याबरोबर पेशव्यांकडील कारकून ह्मणून नेमिलें व शिंद्यानें आपले डेरे गारपिरावर दिले. ही गोष्ट इ. सन १७३२ सांत घडली. तेव्हांपासून शिंदे घराण्याच्या अभ्युदयास आरंभ झाला.

महाराष्ट्रांत या काळीं जीं मोठमोठीं मराठ्यांचीं घराणीं नांवलौकिकास चढलीं, तीं आपण मूळचे रजपुतांपैकींच असें समजतात; व कित्येक चव्हाण, जाधव वगैरे उपनांवांवरून तर हें अनुमान खरें असावें असें वाटतें. फार प्राचीन काळापासून या घराण्यांकडे वतनें आहेत; परंतु कलबुर्ग्याच्या ब्राह्मणीराज्याच्या कारकीर्दींत हे लोक जास्त पुढें सरसावले. फार प्राचीनकाळीं गृहकलहामुळें किंवा राज्यतृष्णेच्या योगानें रजपुतान्यांतून रजपुतांचीं अनेक घराणीं दक्षिणेंत उतरलीं असावीं असें अनुमान आहे. यादव व चालुक्य राजांच्या काळांत सर्व महाराष्ट्रभर किल्लेकोटानिहाय अनेक लहानलहान संस्थानें होतीं; परंतु मुसलमानी अमलांत त्यांचा अधिकार जाऊन पाटिलक्या वगैरे वतनें मात्र त्यांचे हातांत राहिलीं. पुढें दक्षिणेंत अहमदनगर व विजापूर येथील बादशहांनीं पुष्कळ मराठे लोकांस

---

१ हो. कै. पृ. १०. २ पं. प्र. श ५., G. Duff 227.

1 [illegible] Whistler [illegible] Bos-[illegible]. 2 [illegible] & equipped by the chief or state that employs him

आपल्या फौजेंत नोकऱ्या देऊन मोठेपणास आणिलें, व कित्येकांस जहागिरी व कितानतीही दिल्या. अशा घराण्यांपैकींच शिंद्यांचें घराणें आहे. शिंद्यांचें मूळ गांव शिंदखेड असें सांगतात; परंतु राणोजी पाटील हा साताऱ्यापासून १६ मैलांवर कण्हेरखेड गांवच्या पाटलाच्या घराण्यापैकीं होता, असा आधार सांपडतो. शिंद्यांचीं दोन घराणीं प्रसिद्ध होतीं:—एक कण्हेरखेडचें व दुसरें रविरावपदवी[1] मिळविलेलें. कण्हेरखेडच्या शिंद्यास अवरंगझेबबादशहाकडून मनसब होती. त्याशिवाय मराठ्यांच्या पूर्वइतिहासांतही, भोंसले, महाडिक, थोरात, घोरपडे, पांढरे ह्यांप्रमाणें, शिंदे आडनांवाचे पुष्कळ लोक पुढें आले होते. शिवाजी महाराजांचे पदरीं नेमाजीशिंदे हे एक सुभेदार होते[2]. थोरले राजाराम महाराजांचे कारकीर्दीत महाराष्ट्राच्या उपयोगीं पडलेल्या शूर पुरुषांत, नरसोजी व जिवाजी पाटील शिंदे, तोरगलकर पागनीस हे होते, व त्यांस महाराजांकडून इनामें मिळालीं होतीं[3]. खुद्द शाहू महाराजांस दोन बायका अवरंगझेबानें करून दिल्या होत्या त्यांपैकीं एक कण्हेरखेड येथील पाटील घराण्यांतील होती[4]. अवरंगझेबानें या घराण्यास गांव इनाम दिले होते. अलमगीरच्या फौजेची पन्हाळ्याच्या आसपास संभाजीमहाराजांबरोबर जी लढाई झाली तींत दौलतराव शिंदे नांवाचे महाराजांचे मानकरी कामास आले[5]. शाहूमहाराजांची सुटका होऊन ते दक्षिणेंत परत आले, तेव्हां त्यांस भेटून सामिल झालेल्या सरदारांत हैबतराव निंबाळकर व नेमाजी शिंदे पुढारी होते. दक्षिणेंत सुलतान मुअझ्झिम व कामबक्ष यांची जी हैदराबाद येथें लढाई झाली तेथें मुअझ्झिमाचा सरदार झुल्फिकारखान यास नेमाजी शिंदे मदत करण्यांत पुढारी होता[6]. ह्याच्या स्वाऱ्या माळवाप्रांतापर्यंत पोंचूं लागल्या[7]. फरुक्शीर बादशहाचे कारकीर्दीत इ. स. १७१९ त, प्रख्यात सय्यदबंधूंपैकीं हुसेनअल्लीखान हा

१ G. Duff. 212. २ शि. छ. ब. ८१, चि. गु. शि च. १२२, म. छो. ब. ५७. ३ थो. रा. म. च. ३९. ४ राजघराण्यांतील एक कन्या शिंदे यांचे घरींहीं दिली होती. थो. रा. म. च. ७२, थो. शा. म. च. ५. ५ प. व या. ४३८. ६ थो. शा. म. च. १०. ७ Elliot Vol VII. Khafikhan. 408.

The writer attached to a ... or body ? house.
A person entitled to ~~some~~ certain honours

दक्षिणेचा सुभेदार होऊन येत होता, त्यास मारण्याबद्दल बादशहानें गुजराथचा सुभेदार दाऊदखान यास गुप्त हुकूम दिला. दाऊदखानास नेमाजी शिंदे आपल्या फौजेसह मिळेल अशी आशा होती; परंतु पाटील धूर्त होता. त्याचा बेत ज्याचा जय होईल त्यास मिळावें असा होता; त्याप्रमाणें हुसेनअल्ली सय्यदाचा जय झाल्यावर त्यास तो जाऊन मिळाला. याशिवाय कोंकणांत व कोल्हापूरकरांच्या पदरींही शिंदे आडनांवाचे गृहस्थ प्रसिद्ध होते. कोंकणांत पोर्तुगीझ लोकांबरोबर झालेल्या लढायांत, राणोजी शिंद्याखेरीज दुसरे शिंदे पुष्कळ होते. तात्पर्य जरी प्रचारांत आडनांव शिंदे आहे, तथापि हें घराणें पुरातन अस्सल मराठ्यांचें होतें हें निर्विवाद आहे. शिसोदे अगर सिंधे याचा सुद्धां शिंदे अपभ्रंश होऊं शकेल. याप्रमाणें शिंदेघराणें राणोजीच्यापूर्वींच इतिहासांत प्रसिद्ध होतें; तथापि खुद्द राणोजी हा कनिष्ठ घराण्यापैकीं असल्यामुळें त्यास मोठी गरीबीची दशा आली होती. तेव्हां त्या वेळच्या इतर मराठेलोकांप्रमाणें, त्यानें बाळाजी विश्वनाथाजवळ खिजमतगारीची व नंतर बारगिरीची हलकी नोकरी पत्करिली; तो बाजीरावाजवळही हुजऱ्याचें काम करीत होता अशी आख्यायिका आहे; परंतु पुढें वर सांगितल्याप्रमाणें होळकराचे शिफारशीवरून बाजीरावानें राणोजीस पेशव्यांचे पागेचें काम सांगितलें. पुढें त्यास व मल्हारराव यांस हिंदुस्थानच्या विकट मोहिमेवर तो पाठवीत असे.

या सुमारास ह्मणजे इ. स. १७२२ त, महंमदशहा बादशहाला शिरजोर निजामउल्मुल्क याचा त्रास येऊन, त्यानें त्यास दिल्लीहून दूर करण्याच्या उद्देशानें दक्षिणच्या साडेसहा सुभ्यांवर सुभेदार करून पाठविलें; परंतु या कावेबाजमुत्सद्दी मुसलमान सरदारानें कालावर दृष्टि देऊन स्वार्थ साधण्यासाठीं दक्षिणेचा रस्ता धरिला व वस्तुतः त्या दिवशींच, मोंगलांनीं हरप्रयत्नानें शंभर वर्षें लढाया मारून मिळविलेले दक्षिणचे सुभे, मोंगल बादशाहींतून गेले ह्मणण्यास हरकत नाहीं. निजामानें दक्षिणेंत येऊन स्वातंत्र्य संपादन केलें व दिल्लीच्या नामधारी महंमदशहास तो जुमानीनासा झाला. त्याला मराठे मोठे शत्रु झाले

1 Refractory turbulent. 2 Designing &c a crafty plotter or schemer. 3 In fact. 4 To care for or stand in awe of. 5 A tradition tale. 6 In quarters. 7 A campaign.

असतें, परंतु त्यानें आपल्यावरचें संकट टाळून बाजीरावाला माळव्यांत व हिंदुस्थानांत स्वाऱ्या करण्यास खुला रस्ता करवून बादशाहीस बुडविण्याची युक्ति केली. बाजीरावास पाहिजे होतें तेंच प्राप्त झाल्यामुळें व निजामाकडून भीति न उरल्यामुळें, त्यानें हिंदुस्थानांत स्वाऱ्या करण्यास आरंभ केला. त्याचें अगोदरच त्याचे सरदार मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यांनीं जाऊन माळवा लुटला होता. इ.स. १७२९, या सालीं माळव्याचा सुभेदार राजा गिरिधर याचा पराभव करून या सरदारांनीं त्या प्रांतांत चौथाई वगैरे मराठी कर स्थापन केले. त्या सुमारासच बाजीरावानें माळव्याचें उत्पन्न शिंदे, होळकर, पवार व स्वतः सरकार अशा चौघांस वांटून सनदा करून दिल्या; महालाच्या वगैरे उत्पन्नांत श्रीमंतांचे ४९, शिंदे २२॥-, होळकर २२॥- व पवार १०, असे हिस्से ठरवून दिले व महालांचे वसूल उभय सरदारांनीं मिळून करावे असें ठरविलें. बाजीरावानें मोंगलांच्या मुलखांत स्वाऱ्या करकरून त्यांस जेरीस आणिलें तरी निजाम ही मजा पहात स्वस्थ होता. बादशाही दुर्बल होणें, हें त्याचे स्वातंत्र्यास इष्टच होतें. नर्मदेपलीकडे माळव्यांतून चंबळेपर्यंत मराठी फौज पसरली, ती परतविण्याचे हेतूनें महंमदशहानें बाजीरावाशीं तह करण्याचें कबूल केलें; परंतु पेशव्याच्या मागण्या वाढतें चालल्यामुळें बादशाहास त्याशीं लढाई देणेंच भाग पडलें. त्यामुळें इ. स. १७३६-त बादशहाचा वजीर खानदोरान यानें एक मोठी फौज तयार केली व ती बाजीरावाच्या रोखें आग्र्याकडे निघाली. त्याचप्रमाणें अयोद्धेचा नबाब सादतखान याचीही फौज अकस्मात् मराठ्यांवर आली तेव्हां मराठ्यांचे कांहीं लोक पडले. तेवढ्या लहानशा जयाच्या बढाया मारीत मुसलमानी फौज बसली व आतां बाजीराव येत नाहीं, असें त्यांस वाटलें. दिल्लीची उमराव मंडळी बाजीरावास दक्षिणेंत हांकून लाविला अशा आनंदांत होती, इतक्यांत बाजीरावानें आपली सर्व फौज जमवून, मोठे कूच करीत सपाट्यानें सहा दिवसांत दिल्लीच्या बाहेर तळ दिला! त्याबरोबर दिल्लींतले लोक घाबरले; पण बाजी-

१ हो. कै. ११, म. रा. थो. शा. म. ४८, प. व या. ५३५.

रावानें मुद्दामच आपण दुर्बळ असें दाखविलें; ती खुबी मुसलमानांस न कळून, ते ७।८ हजार सैन्य घेऊन बाजीरावावर निघाले. बाजीराव पाळद राखीतच होता, त्यानें राणोजी शिंदा व होळकर यांस पाठवून, मुसलमानांचा पराभव करून कत्तल केली. त्याबरोबर दिल्लीचे उमराव शुद्धीवर येऊन, बादशहानें बाजीरावाबरोबर तह केला. या लढाईत राणोजी शिंद्यांच्या पदरचा इंद्राजी कदम नांवाचा शूर शिपाई पडला. या तहामुळें, बादशहास मराठ्यांचा राग आला व त्यानें निजामाची विनवणी करून, मराठ्यांस माळव्यांतून घालवून द्यावें, ह्मणून त्यास बोलाविलें. पूर्वींच्या तहांत माळवा प्रांत मराठयांस दिला होता, त्याची सुभेदारी निजामाचा पुत्र गाझीउद्दीन यास देऊं केली. यावेळीं बाजीरावाचें प्रस्थ यापुढें वाढूं दिल्यास आपणासही उपद्रव होईल या भीतीनें, बादशहाचें ह्मणणें कबूल करून, तो मोठया फौजेनिशीं, सिरोजजवळ माळव्यांत तळ देऊन बसला; परंतु बाजीरावाची फौज ही चपळ व शूर होती, तिनें शत्रूच्या सैन्याभोंवती घिरटया घालघालून बेजार केल्यावर, एके दिवशीं भोपाळजवळ त्यांच्यावर अकस्मात् हल्ला करून लढाई दिली. तींत मराठ्यांचा जय झाला. या प्रख्यात लढाईत राणोजी शिंदे, पिलाजी जाधव व सयाजी गुज्जर हे प्रमुख होते. या लढाईमुळें मराठ्यांस माळव्यांत शत्रु उरला नाहीं व तो प्रांत पुढें त्यांच्याकडेसच राहिला आणि निजाम उलमुल्क हतवीर्य होऊन त्यानें बाजीरावाची मागणी कबूल केली व त्याच्याशीं तह केला. ( इ. स. १७३८. )

या सुमारासच दक्षिणेंत समुद्रकिनाऱ्यावर लढाई उद्भवली; तिकडे हिंदुस्थानांतल्या फौजा बाजीरावानें पाठविल्यामुळें, राणोजी शिंदे व होळकर हे कोंकणांत उतरले. कोंकणांतील शत्रु दुसरे कोणी नसून युरोपांतील पोर्तुगीझ लोक होते. या लोकांनीं सुमारें दोनशें वर्षे हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील गोवें, दाभोळ, दमण, दीव, साष्टी, वसई वगैरे जागा बळकाविल्या होत्या व तेथील रहिवाशी हिंदु लोकांस धर्मसंबंधानें अनेक क्रूर प्रकारांनीं छळिलें. पृथ्वीवरील सर्व

---

१ प. व या. २९.

1 A [illegible] & covert watching [illegible] doings & goings of another) 2 [illegible] about

धर्मांत, धर्माच्या नांवावर अत्यंत क्रूर व अमानुष कर्में करण्यांत कांहीं काळपर्यंत ख्रिस्तीधर्म पुढें होता. रोमन क्याथोलिक पंथाविरुद्ध जे लोक असत त्यांचा छळ करण्यासाठीं एक सभा काढिली होती. त्या सभे पुढें हिंदूंस सुद्धां अकस्मात् पकडून नेऊन त्यांचे छळ करून बाटवावें हा क्रम चाले. या क्रूर कृत्यांत स्पेन व पोर्तुगालचे लोक पुढारी होते; जेव्हां पोर्चुगिझ लोकांचा अंमल इकडे झाला तेव्हां त्यांनींही अशीच एक पाद्र्यांची सभा गोंव्यास स्थापिली होती. तिच्या हुकमतीनें कोंकणांतील गरीबहिंदूंवर अनेक तऱ्हेचे घाणेरडे जुलूम होऊं लागले; जुलुमानेंच त्यांचे गांवचे गांव पोर्चुगिझांनीं बाटविले. मुसलमानांसही धर्मसंबधानें त्यांचा त्रास आला होता. अशा रीतीनें त्रासून गेलेल्या लोकांस, मराठी राज्याची स्थापना झाल्यापासून थोडी स्वस्थता मिळाली होती. मराठ्यांची व पोर्चुगीझ लोकांची लढाई बरींच वर्षें थोडी बहुत चालू होती. संभाजी राजानें तर गोवें प्रांतांत पोर्चुगीझ लोकांवर स्वारी केली होती; तथापि मध्यंतरीं मराठ्यांनीं त्यांजकडे फारसें लक्ष दिलें नव्हतें. इतक्यांत उत्तरकोंकणांत साष्टी प्रांत पोर्चुगीझ लोकांकडे होता; तेथील हिंदु रहिवाशांनीं बाजीरावाकडे कागाळ्या केल्या, त्यावरून व मानाजी आंग्रे यांस मदत केल्यावरून मराठ्यांनीं त्यांजबरोबर युद्ध सुरू केलें. या लढाईत मराठ्यांनीं आपण पळपुटे, तोंड चुकवून पळणारे नव्हे, तर प्रसंग पडल्यास छातीस छाती भिडवून लढणारे आहों हें सिद्ध करून दाखविलें. पोर्चुगीझ लोकांनीं मोठी तयारी केली व युरोपांतूनही कुमक आणविली; तथापि मराठे लोकांनीं शौर्यानें दोन वर्षेपर्यंत टिकाव धरून, वसई वगैरे प्रांत काबीज केले. या लढाईत राणोजी शिंद्यानें आपली फौज समुद्रकिनाऱ्यावर नेऊन थोड्याच दिवसांत सालसुंबें, नारगोळ, डहाणू वगैरे गांव घेऊन, ( १७३९. ) लवकरच तारापूर, केळवें व शिरगांव हीं ठाणीं काबीज केलीं. तेथून पुढें तो वसईच्या प्रख्यात वेढ्यांत हजर होता. वसई काबीज करण्यांत मराठ्यांनीं जें शौर्य दाखविलें, तसें त्यांनीं फार थोड्या प्रसंगीं दाखविलें असेल.

१ Elliot, Vol. VII, Khafi Khan 345-346,. लो. हि. वा. ७७,

२ साष्टीची बखर १९-२०, म. सा छो. म. ७६, थो. शा. म. च. ७५.

3

inhuman Inhuman, atrocious. 2 To pollute defile ceremonially. 3 of a runaway di...

वसईचा वेढा तीन महिने पडला होता व त्यांत किल्ल्याचा एक बुरूज उडविण्याचें काम राणोजीकडे होतें. अखेरीस निरुपाय होऊन पोर्चुगिझांनीं तारिख १६ मे १७३९ रोजीं वसईचा किल्ला मराठ्यांचे स्वाधीन केला तेव्हां तटावरील क्रूस जाऊन तेथें भगवा झेंडा फडकूं लागला. या प्रख्यात लढाईंत राणोजीनें फारच शौर्य दाखविलें.

मराठे व मुसलमान या परस्परांमध्यें सतत चाललेल्या कलहास घटकाभर विश्रांति देणारें दुसरेंच एक मोठें संकट या वेळीं हिंदुस्थानावर ओढवलें. प्राचीन काळापासून हिंदुस्थानच्या वायव्येकडून तुराणी शाखेचे लोकांच्या ज्या स्वाऱ्या या देशाच्या सुपीक प्रदेशावर उतरून नाश व लूट करित्या झाल्या, त्यांत इ. स. १७३८।३९ सालीं इराणचा बादशाहा नादिरशहा याची स्वारी मोठी होती. नादिरशहा अगदीं लहान स्थितींतून मोठेपणास आला होता व त्यानें इराणची गादीही बळकाविली होती. पुढें त्याचें कांहीं कारणांनीं अफगाण लोकांशीं वैर माजल्यावरून त्यानें अफगाणीस्थानावर स्वारी करून तो देश जिंकिला व तेथून तो पंजाबांत उतरला. तैमूरलंगाप्रमाणेंच नादिरशहाचा उद्देश हिंदुस्थान लुटण्याचा होता. नादिरशहास हटविण्यासाठीं दिल्लीचा बादशहा महंमदशहा यानें थोडा प्रयत्न केला, परंतु अखेरीस इराणी फौजेनें दिल्ली काबीज केली. हें वर्तमान ऐकून बाजीरावानें युद्धाची तयारी केली. " मुसलमान आणि हिंदु, सर्वांनीं मिळून या परशत्रूचें पारिपत्य करावें, नंतर गृहकलह करावे, ही वेळ सर्वांची एक होण्याची आहे, " असें बाजीराव ह्मणाला व त्यानें आपली सर्व फौज जमा केली त्यामुळें राणोजी शिंद्यास कोंकणांतील काम संपतें न संपतें, इतक्यांत हिंदुस्थानाकडे वळावें लागलें; परंतु बाजीरावाच्या तयारीचें कारण उरलें नाहीं. दिल्लींत आल्यावर, एका क्षुल्लक कारणावरून झालेल्या तंट्याच्या रागांत, दिल्लीच्या लोकांची कत्तल करण्याचा नादिरशहानें हुकूम दिला. सारखे नऊ तास कत्तल चालली होती, तितक्यांत सुमारें पन्नास हजार लोकांचे प्राण गेले असें ह्मणतात. नादिरशहानें परत जातांना महंमदशहास पुनः गादीवर बसविलें व हिंदुस्थानांतच काय, परंतु सर्व पृथ्वीवरील खनिज रत्नांत श्रेष्ठ जो तेजो-

1 Of a red-ochre colour 2 the ensign of the Marathas. 3 To flutter in the wind.

गिरि कोहिनूर नांवाचा हिरा, तो आणि शहाजहानानें कोट्यावधि रुपये खर्च करून तयार केलेलें रत्नखचित मयुरासन, हीं लुटींत घेऊन गेला. त्यानें हिंदुस्थानांतून सुमारें १४०कोट रुपयांचें वित्त नेलें असा अजमास आहे.

नादिरशहा गेल्यावर पुनः हिंदुस्थानांतले तंटे व दिल्लीच्या दरबारांतील बखेडे सुरू झाले. इतक्यांत बाजीरावासारखा शूर व कार्यकर्ता पुरुष सन १७४०त मरण पावल्यावर, पेशवाईचीं वस्त्रें त्याचा वडील मुलगा बाळाजी बाजीराव यास मिळालीं. त्यानेंही दोन तीन वर्षांतच कर्नाटक, गुजराथ व बंगाल वगैरे प्रांतांत मराठ्यांचें वर्चस्व स्थापून मागल्या तहाप्रमाणें माळवा ताब्यांत घेण्यासाठीं तो निघाला. तेंव्हां मराठ्यांचे भीतीनें बादशहानें पूर्वीच्या तहाप्रमाणें वागण्याचें कबूल करून, राणा जयसिंग याची हमी दिली व त्याचप्रमाणें पेशव्यानें आपल्यातर्फे मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यांस जामीन दिले. राणोजी शिंदे इ.स १७९० सालीं सुजावलपूर येथें मरण पावला, त्यावरून त्या गांवास राणेगंज असें नांव पडलें[1]. राणोजीच्या मरणाचे वेळीं माळव्याच्या एकंदर १॥कोट रुपये उत्पन्नांत, ६९॥लाख रुपयांचे उत्पन्नाचा मुलुख शिंद्याकडे होता.

राणोजीस पांच मुलगे होते. त्यांत जयाप्पा, दत्ताजी, जोतिबा असे त्याची लग्नाची बायको मैनाबाई इचे पोटचे असून, महादजी व तुकोजी हे दासीपुत्र होते[2]. महादजीच्या आईचें नांव चिमाबाई होतें व ही स्त्री माळव्यांतील रजपूत जातीची होती असें सांगतात. राणोजी मरण पावल्यावर त्याची पागा व सरंजाम त्याचा वडील मुलगा जयाप्पा याचे नांवें जाहली. दत्ताजी व महादजी खुद्द पेशव्यांचे खासगी पागेंत अधिकारी होते. राणोजीच्या मुलांनां स्वाऱ्यालढायांचेंच बाळकडुं असल्यामुळें सर्व मुलगे सरदारच निपजले. तरवारीवरच प्रत्येकानें पुरुषार्थ केला. महादजी शिंदे व त्याचे इतर बंधु

---

[1] सरंजामे १०. [2] Keene, "Mahadjee". कीन साहेबानें जोतिबा ही विदुर असें वंशावळींत दिलें आहे, परंतु त्याचेविरुद्ध पुढील आधार आहेत:-सरंजामे १२, पे. म. टी. ५२, S. N. Roy 109, Malleson 138, G. Duff 310, Forrest Vol. I-695.

त्यांनां पेशव्यांचे हुकुमाप्रमाणें वारंवार स्वाऱ्यांवर जावें लागे. लहानपणापासून समरांगणाचीच संवय, यामुळें त्यानां लढाईची भीति कधींच वाटली नाहीं. स्वामिकार्यतत्परता हेंच यांचें ब्रीद होतें असें पुढील हकीगतीवरून सहज दिसून येईल. लहानपणापासून तोच व्यासंग, यामुळें राणोजीचे मुलगे युद्धकलेंत व राजकारस्थानांत प्रवीण झाले. पेशव्यांचे कामीं शिंद्यांचे घराण्यानें मात्र अखेरपर्यंत एकनिष्ठ सेवा केली व या पांच पुत्रांपैकीं बहुतेकांचा समरांगणांतच शेवट झाला[1]. राणोजीच्या कारकीर्दींत महादजीचें नांव अर्थातच पुढें आलें नाहीं. साष्टीप्रांताचा बंदोबस्त कांहीं दिवस महादजीशिंदे याजकडे होता, परंतु तो आमचा चरित्रनायकच किंवा कसें, याबद्दल स्पष्ट समजत नाहीं[2].

जयाप्पाचे कारकीर्दींत महत्वाची गोष्ट झटली ह्मणजे रामचंद्रबाबा शेणवई यांस शिंद्यांचे दिवाणगिरीवरून पेशव्यानें दूर केलें ही होय. हा गृहस्थ जयाप्पास आवडत नव्हता; व त्याला दूर करावें अशी मल्हाराव होळकराचीही मसलत पडल्यावरून पेशव्यानें त्यास दूर केलें. याला बाजीरावानें राणोजीपाशीं नेमिलें होतें. रामचंद्रबाबानें पेशव्याचा चुलतभाऊ सदाशिवराव याला पुढें करून लाखों रुपये नजर देऊन आपलें पद पुनः मिळण्याविषयीं खटपट केली; परंतु ती व्यर्थ झाल्यामुळें अभिमानास पेटून सदाशिवरावानें बाबास आपला दिवाण नेमिलें. ही गोष्ट जरी वस्तुतः महत्वाची नव्हती तरी पुढें पेशव्यांचे घरांत जे बखेडे झाले व मल्हारराव व सदाशिवराव यांचें जें वैमनस्य पडलें तें या बाबाच्या कारणामुळें पडलें. या घरच्या बखेड्यांचा परिणाम मराठ्यांच्या राज्यास कसा अपायकारक

---

१ जोतिबा कोठें मरण पावला हें समजत नाहीं. कित्येक ग्रंथकार ह्मणतात कीं तो जाटांच्या लढाईंत (१७५४.) कुंभेर येथें मेला:- (Malcome 118; Forrest 695; Keene's 'Mahadjee';); कांहीं ह्मणतात तो गिलच्यांबरोबरच्या ज्या लढाईंत दत्ताजी पडला (१७५९.) तींत पडला:- (सरंजामे १३; G. Duff 312.) परंतु या दोन्ही गोष्टींबद्दल उपलब्ध बखरींत आधार नाहीं. तसेंच तुकोजी, राणोजीच्या अगोदर मेला असें ग्रांटडफ ह्मणतो (312.) परंतु ती चूक आहे. तो पानिपतच्या लढाईंत मेला. २ साष्टींची बखर २१.

1 Aoud maintenance of one own notion

झाला हें पुढें दिसून येईल. रामचंद्रबाबा हा मोठा कारस्थानी कारकून होता. त्याचे उपदेशावरून सदाशिवरावानें पेशवाईचा कारभार करण्याचा हट्ट धरिला व शेवटीं रुसून त्यानें कोल्हापुरकरांची पेशवाई संपादिली; परंतु पेशव्यांचे महादजीपंत पुरंदरे ह्मणून कारभारी होते, त्यांनीं पुढें हा गृहकलह अनिष्टकारक होईल असें जाणून, भाऊंस कारभार मिळावा ह्मणून ते आपण घरीं बसले. भाऊंबरोबर रामचंद्रबाबाही कारभारांत आले. पुढें सातारचे नूतन महाराज रामराजे यांस घेऊन भाऊसाहेब हे सांगोल्याकडे प्रतिनिधींचें पारपत्य करण्यास गेले होते, त्या ठिकाणीं पुनः रामचंद्रबाबाचे मसलतीनें भाऊसाहेबांनीं मराठी राज्याची व्यवस्था केली. निरनिराळ्या सरदारांचे व प्रधानांचे हक्क व मुलुख ठरविले व मराठी राज्यांत पेशव्यांचें पूर्ण वर्चस्व स्थापन केलें[1]. शाहू महाराजांनीं मरण्याचेपूर्वी बाळाजीपंताचे नांवें सर्व मराठी राज्याचें व्यवस्थापत्र करून दिलेंच होतें; त्याला या सांगोलें येथें ठरलेल्या यादीनें विशेष बळकटी आली. यापुढें सातारा व मराठेशाई मागें पडली व पुणें व ब्राह्मणशाई पुढें सरसावली, आणि सर्व राज्यसूत्रें पुण्याहून हालूं लागलीं. या नवीन व्यवस्थेनें सातारचे महाराज केवळ नांवाचे मुख्य राहिले. राजानें ६९ लक्षांच्या वार्षिक नेमणुकींत खुशाल चैन मारावी, परंतु राज्यव्यवस्थेंत मात्र मन घालूंनये असाच या व्यवस्थेचा परिणाम झाला. या व्यवस्थेपासून एकंदर मराठ्यांच्या राज्यावर काय परिणाम घडला याबद्दल बराच मतभेद आहे; तथापि या पुस्तकांत त्याचा विचार जरूर नाहीं ह्मणून तो विषय सोडितों.

हिंदुस्थानांत शिंदे व होळकर यांच्या फौजांस नेहमीं कांहींना कांहीं तरी काम असेच. मराठी फौजा फक्त देश जिंकण्यांत अगर जिंकलेल्या मुलखांतून चौथाई सारख्या बाबी वसूल करण्यांत केवळ गुंतत नसत; तर पैसे व लूट मिळत असल्यास जो कोणी बोलावील त्याचे मदतीस जात. हिंदुस्थानांत पहिल्यानें फ्रेंच व इंग्लिश यांनीं जो आपला पाय शिरकवला तो याच प्रकारानें होता. कंपन्यांनीं फौजा उभारावयाच्या व व्यापारीधंदा बाजूस ठेवून जो कोणी दाम देईल त्याची बाजू उच-

१ घा. रा. राजे ५११०, पे. ब. ६२-६४, पं. प्र. श. ११-१३, प. यादी ३५९.

Deep-plotting, shrewd & profound in counsel

लावयाची. इंग्रजी राज्याची पहिली रचना या पद्धतीनेंच झाली. हिंदुस्थानांत निरनिराळ्या संस्थानांतून गृहकलह व लढाया हमेश सुरू असत. त्यांत मराठ्यांची फौज फायद्याचे पक्षाकडे सामील होई, इतकेंच नाहीं, तर एक मराठा सरदार एक पक्षास व दुसरा मराठा सरदार दुसऱ्या पक्षास, असेही प्रकार सुरू झाले. त्याचा परिणाम अर्थातच मराठे लोकांतही दुही झाली हा होय. महादजीचे चरित्रांत वाचकांस अशीं पुष्कळ उदाहरणें आढळून येतील.

सन १७४९त निजाम उल्मुल्क मरण पावल्यावर, अहमदशहानें अयोध्येचा नबाब सफदरजंग यास वजिरी सांगितली. याच सुमारास अहमदशहा अबदल्लीनें पंजाबांत पहिली स्वारी केली. अयोध्येचा नबाब ह्याचें गंगा यमुनेच्या दुआबांत असलेल्या रोहिल्यांशीं फार वैमनस्य होतें. त्यांणीं नबाबाचे मुलुखावर स्वाऱ्या करून वजीरास जेरीस आणिलें. त्यामुळें वजीरानें मराठ्यांशीं स्नेह करून त्यांची मदत मागितली. ती मदत पैशाच्या लोभानें शिंदे व होळकर यांणीं कबूल करून रोहिल्यांवर आपल्या फौजा घातल्या व त्यांच्या मुलुखाची राखरांगोळी करून वजीराची इच्छा तृप्त केली. याबद्दल वजीरानें दुआबामधील कांहीं प्रदेश मराठ्यांस दिला. बाळाजीपंतानें याबद्दल शिंदे सरदारांची फारच तारीफ केली. "शाबास तुमच्या हिमतीची व दिलेरी रस्तुमीची व शाबास लोकांची! आमच्या दक्षिणेच्या फौजांनीं यमुनागंगा पार होऊन रोहिलेपठाणांशीं युद्ध करून आपण फत्ते पावावें, हें कर्म लहानसामान्य न झालें. तुह्मीं एकनिष्ठ, कृतकर्मे सेवक. या दौलतीचे स्तंभ आहां!! जें चित्तावर धरितां तें घडून येतें.... इरानतुरान पावेतों लौकीक झाला कीं, वजीर मोडला व पळाला असतां फिरोन फत्तेच्या मसनदीवर बसविला. याजहून यश कोणतें अधिक आहे?" वजीराची अब्रू राखोन रोहिल्यांची धुळधाण उडविली व बादशाहत पठाण रोहिल्यांचे ताब्यांत जात होती ती कांहीं काळपर्यंत बादशहाचेच हातीं ठेविली याबद्दल पेशव्यानें शिंद्याची फारच स्तुति केली[1]; तथापि केवळ वजीरावर फार भिस्त ठेवून

१ पत्रें व यादी १६२।१६३।३६४.

1 Disagreement. 2 utter demolition, ruin. 3 Intrepidity - heroism. 4 Of mind & affections intently fixed upon one object.

रोहिल्यांचा संपूर्ण चुराडा केला हें पेशव्यास पसंत पडलें नाहीं. त्याचे बुद्धीनें सर्व "एकदेशी मनसोत्रा" झाला. पुढें याबद्दल पानिपतच्या स्वारींत मराठ्यांस पुरा प्रत्यय आला.

दक्षिणेंत निजामउल्मुल्क १७४९ त मरण पावल्यावर त्याचा मुलगा नासिरजंग हा दक्षिणचा सुभेदार झाला. त्याचा वडील मुलगा गाझीउद्दीन हिंदुस्थानांत दिल्लीच्या कारस्थानांत मग्न होता. तेव्हां त्याला इकडे येण्याची सवड झाली नाहीं; परंतु इतक्यांत दक्षिणच्या सुभेदारीबद्दल निजामाच्या संततींत रण माजलें! प्रथम नासीरजंग व मुझफरजंग यांची लढाई सुरू झाली. मुझफरजंग हा नासिरजंगाच्या भाचा असून गादीवर त्याचा हक्क नव्हता; तथापि फ्रेंचांचे मदतीनें त्यानें बराच दंगा केला. परंतु शेवटीं नासिरजंगानें त्याशीं गोडीगुलाबीनें सख्य केलें व तंटा मिटविला. इतक्यांत कर्नूलच्या नबाबानें त्याचा खून केल्यामुळें फ्रेंचांचे साह्यानें मुझफरजंग हाच नबाब झाला. त्याचाही खून लवकरच झाल्यामुळें फ्रेंचांचा सरदार बुसी यानें निजामउल्मुल्काचा तिसरा मुलगा, सलाबतजंग यास दक्षिणचा सुभेदार केला. या हैदराबादच्या भानगडींत दक्षिणेंत व कर्नाटकांत सारख्या लढाया सुरू झाल्या व या लढायांमुळेंच फ्रेंच व इंग्लिश कंपन्यांस कारोमांडेल किनाऱ्यावर मुलुख संपादन करण्यास उत्तम संधि मिळाली. इकडे बाळाजीपंतासारख्या कावेबाज व मतलबी माणसास अशी संधि सांपडल्यावर मराठी राज्याचा फायदा करण्याकडे त्याचेंही सहजच लक्ष लागलें. फ्रेंचांचे मदतीनें व विशेषतः ताराबाईच्या चिथावणीवरून रामदासपंताचे सल्यानें, सलाबतजंगाची व पेशव्यांची घांसाघांस सुरू झाली. अशा वेळेस गाझीउद्दीनास दक्षिणेंत बोलावून त्यास सुभेदारी द्यावी असा बेत केल्यास सलाबतजंगाकडून किंवा गाझीउद्दीनाकडून मुलुख व पैसा मिळेल अशी युक्ति पेशव्यास सुचून त्यानें आपला बेत जयाप्पा व होळकर यांस हिंदुस्थानांत लिहून कळविला. पेशव्याचें कारस्थान फार खुबीचें होतें. निजामाचे दोन्ही मुलांस धाक दाखवून

१ हो. कै. १४।१५, प. व या. १६१.

Any intricate & confused affair ... 2 constant
... & scalding. Wrangling. 3 Appl.

ज्या बाजूनें जमेल तिकडून आपलें कार्य करावें हा त्याचा हेतू होता. सलाबतजंगाकडेच त्यानें अगोदर बोलणें लाविलें व गाझीउद्दीनाला अमुक एक प्रकारचें गुंतण्यासारखें वचन न देतां त्यास फक्त नादास लाऊन ठेवावें असें पेशव्यानें शिंद्यास सुचविलें.[1] प्रथम सलाबतजंगास भय दाखविण्यासाठीं पेशवा अवरंगाबाद येथें गेला. इतक्यांत तेथेंच ताराबाईच्या बंडाचें वर्तमान कळलें. तेंव्हां तो ताबडतोब दररोज ४० मैलांप्रमाणें मजल मारून एकदम साताऱ्याकडे गेला व विशेष प्राणहानीचा प्रसंग टाळून, मोठ्या युक्तीनें बंडांतील मुख्य दमाजी गाईकवाड यास एकाएकीं कैदकरून पुणें येथें ठेविलें. सलाबतजंगाचा दिवाण रामदासपंत ह्मणून एक कर्नाटकी ब्राह्मण होता, त्याच्याशीं सख्य करून त्याचे पुतण्यास पेशवाई देण्याचा विचार ताराबाईनें केला होता. त्यावरून त्यानें सलाबतजंगास पेशव्याची खोड मोडण्याची ही संधि फार चांगली आहे असें सांगितलें. दाभाडे, गाईकवाड, बाबूजीनाईक व साताऱ्चें प्रतिनिधिमंडळ पेशव्याचे विरुद्ध असून शिंदे होळकरांची मुख्य फौज दूर दिल्लीकडे गुंतलीं होतीं, त्यामुळें पेशव्यावर यावेळेस जाणें फार उत्तम आहे, असें रामदासपंतानें निजामाचें मनांत भरवून दिलें व फ्रेंचांची मदत घेऊन, त्यानें पेशव्यावर स्वारी केली. त्यास्वारीचा रोंख पुण्याकडे होता. मोंगलांनीं वाटेंत गांवें जाळीत व मुलूख बेचिराख करीत चाल केली. परंतु इकडे ताराबाईच्या सगळ्या खलबतांत जोरदार व फौजबंद दमाजी गाईकवाड होता, त्यास पेशव्यानें कैद केल्यामुळें पेशव्यास मागें भीति राहिली नाहीं. पेशवेही निजामाशीं सामन्यास चालले. एके दिवशीं फौज तळावर असून रात्रीं चंद्रग्रहण होतें त्यावेळीं सर्व हिंदुलोक स्नानजपांत गुंतलेले पाहून शत्रूंनीं मराठ्यांवर एकाएकीं छापा घालून घावरून दिलें व पुष्कळ लूट मिळविली. यावेळीं पेशव्याचे फौजेंत दत्ताजी व महादजीशिंदे हे उभयतां बंधू होते. मोंगलांनीं असा अपमान केलेला पाहून महादाजीपंत पुरंदरे, कोन्हेरराव एकबोटे, दत्ताजी शिंदे व महादजी शिंदे वगैरे अकरा असामींनीं दुसरेच दिवशीं मोंगलांची खोड मोडण्याची

---

१ प. व या. १६१।३५८।३९६.

1 To hold in expectation.

पैज मारून पांच हजार फौजेनिशीं मोंगलफौजेवर हल्ला करून त्यांस मागें हटविलें. तथापि मोंगलांचें सैन्य रांजणगांव व ढमढेऱ्यांचें तळेगांव घेऊन पुढें आलें. त्यांची व वरील फौजेची उंबरीवर गांठ पडून मोठी लढाई झाली. त्यांत मोंगल शिकस्त होऊन मागें हटले. या लढाईत महादजी शिंदे पेशव्याच्या खासगी पागेंत एक बारगीर होता. त्यानें या लढाईतच आपलें शौर्य प्रथम दाखविलें[1]. पुढें मराठ्यांनीं त्रिंबककिल्ला घेतल्यामुळें मोंगलांचें सैन्य अहमदनगराकडे परतलें. परंतु रघोजी भोंसल्यानें दुसरीकडूनही त्यांच्यावर स्वारी केल्यामुळें त्यांस परत जावें लागलें.

फक्त तरवारींच्याच जोरावर बाळाजी बसला नव्हता. त्यानें सलाबतजंगाच्या मंडळींतच तंटे लावून सरलष्कर व निंबाळकर या दोन मुख्य सरदारांस आपल्या पक्षाकडे ओढिलें. हैदराबादेच्या दरबारांत परद्वीपस्थ फ्रेंचांचें वजन वाढत चाललेलें या दोघांस आवडत नव्हतें, परंतु रामदासपंत हा फ्रेंचांनींच वाढविला होता तेव्हां तो मात्र त्यांच्या तर्फे होता. गाझीउद्दीनास दक्षिणेंत आणवून त्यास सुभा दिल्यानेंच फ्रेंचांचें पारडें फिरेल ही गोष्ट त्या उभयतांस पेशव्यानें सुचवून दिली व त्यांनां गाझीउद्दीनाच्या बाजूस आणून सलाबतजंगाचे सरदारांत दुफळी उत्पन्न केली. या एक दोन वर्षांत ताराबाईचीं सातारा एथील कारस्थानें, पेशव्याच्या शत्रूंस आपल्याकडे वळविण्याचा तिचा प्रयत्न, फ्रेंचांच्या सहाय्यानें सलाबतजंगानें पेशव्याशीं मांडलेला विरोध, याकारणांनीं दक्षिणेमध्यें मोठी गडबड उडून गेली होती. या वेळेस बाळाजीपंतानें जयाप्पास लिहिलेल्या पत्रांतून ताराबाईचा बिघाड, गाईकवाडाची मसलत व त्याचें पारिपत्य, घरांत रामचंद्रबाबा व सदाशिवभाऊ यांनीं उत्पन्न केलेले कलह इत्यादि गोष्टींचा उल्लेख आलेला आहे[2]. रामचंद्रबाबाचें पेशव्याशीं व जयाप्पाशीं वांकडें होतें, व होळकराचा दिवाण गंगाधर यशवंत

---

१ पं. प्र. श. १३, G. Duff 276. २ नागपूरकर. भाँ. च. ५४।५८, घा. रा. य. ३, प. व या. ३३४, ३५८, ३५९, ३३५, ३५३-५५; ३८३, ३८९, ३९१. ३९६, पं. प्र. श. १२, १४.

याच्याशीं त्याचा स्नेह होता. त्याच्या मदतीनें होळकरास ताराबाईच्या जुटांत आणण्याचीं खटपट चाललेली होती. हें वर्तमान पेशव्यास समजतांच मल्हाररावाचें लक्ष कोणीकडे आहे तें पाहून त्यास आपल्या पक्षाकडे संभाळण्याचें नाजूक काम पेशव्यानें आपला विश्वासू सरदार जयाप्पा याजवर सोंपविलें होतें. व खरोखर होळकरापेक्षां जयाप्पावरच पेशव्याचा फार विश्वास होता असें दिसतें. सलाबतजंगाचें प्रस्थ फार माजत चाललें, आपली फौज थोडी, पैशाची टंचाई व गृहकलहानें स्वराज्यांत उत्पन्न झालेली अंव्यवस्था, यांचेमुळें पेशव्यास आपली मसलत कशी तडीस जातें अशी काळजी उत्पन्नझाली. त्यानें जयाप्पास व होळकरास त्वरा करून गाझीउद्दीनास दक्षिणेंत आणण्याविषयीं तगादा लाविला. त्यामुळें शिंद्यानें भर पावसाळ्यांतच मोठ्या सरंजामानिशीं गाझीउद्दीनास ब्र्हाणपुरास आणिलें. इकडे पेशव्यानें ही तयारी करून मोंगलाचे मुलखावर चाल केली.

याप्रमाणें या फौजा दोन्हीकडून एकदम भर पावसांतच औरंगाबादेजवळ एकत्र झाल्या. त्या वेळीं पेशव्याचें सैन्य १९०,००० जमलें. हा एवढा भयंकर जमाव आपल्यावर येत आहे असें पाहून सलाबतजंग घाबरला. पेशव्यानें गाझीउद्दीनाकडून वऱ्हाड प्रांताच्या पश्चिमेकडील तापी व गोदावरी नद्यांमधील सगळा मुलूख आपणांस मिळण्याचा करार केला होता. इतक्यांत एके दिवशीं गाझीउद्दीनास, त्याचा सावत्रभाऊ निजामअल्ली याच्या आईनें मेजवानीस बोलावून आपल्या पुत्रास गादी मिळण्याचे हेतूनें गाझीचे अन्नांत वीष कालविलें, यामुळें गाझीउद्दीन त्याच रात्रीं मरण पावला. (१७५१, सप्टेंबर १२.) यामुळें पेशवे व शिंदेहोळकर यांस बेत फसल्यामुळें फार वाईट वाटलें. तथापि एवढी फौज मावारी जाईलसें कठीण वाटून सलाबतजंगानेंच पेशव्याबरोबर तह करून वरील मुलूख पेशव्यास दिला. त्यामुळें शिंदे व होळकर हिंदुस्थानांत परतले. जयाप्पा शिंदे हिंदुस्थानांत परतल्यावर महादजी व दत्ताजी शिंदे मागें दक्षिणेंत राहिले.

---

१ म. व या. ३३६, ३६३, ३८३, ३५३.

मागें दमाजी गायकवाडास पेशव्यानें कैद केलें होतें ह्मणून सांगितलें आहेच. त्याची मुक्तता होण्यासाठीं त्याणें पेशव्याची सत्ता कबूल केली व पेशव्याची नोकरीही पत्करिली. त्यामुळें बाजीरावापासून गुजराथेवरही आपला अंमल असण्याबद्दल पेशव्याची जी इच्छा होती ती पूर्ण झाली. दमाजीनें, जिंकलेल्या एकंदर मुलुखांत निम्मे हिस्सा देण्याचें कबूल केलें. या करारामुळें पेशव्याचा अंमल गुजराथ प्रांतांतही सुरू झाला. या कराराप्रमाणें मुलुख ताब्यांत घेण्यासाठीं पेशव्यानें रघुनाथरावास गुजराथेंत पाठविलें. दादांबरोबर दत्ताजी शिंदे होते[1]. सुरत घेण्याचे इराद्यानें १७५१ त दादासाहेबांस गुजराथेंत पाठविलें होतें; परंतु त्यांत कांहीं लभ्यांश मिळाला नाहीं. दादासाहेबांनीं या खेपेस अहमदाबाद घेतली व गाईकवाडापाशीं मुलुखासंबंधानें करार पुरे केले[2]. गुजराथेंतून परत आल्यावर दादासाहेबांस, तालनेर येथें मल्हाररावाचा मुलगा खंडेराव होळकर मिळाला. त्यालाही बरोबर घेऊन दादांची स्वारी माळव्यांतून खेचीवाडा, बुंदी, कोटा, राजगड, उदेपूर, जनगड, नरवार, ग्वाल्हेर, झांशी, काल्पी वगैरे ठिकाणांहून खंडण्या व चौथाई घेत घेत, अखेरीस भरतपुरकर सुरजमल्ल जाटावर फिरली. मराठ्यांची फौज जाटांवर जाण्यास दिल्लींतील बखेडे कारण झाले.

मागील हकीगत वाचणाऱ्यांस दिल्लीच्या बादशाहीचा अपकर्ष कसा होत गेला हें चांगलें कळलें असेल. महंमदशहा बादशहा १७४८ त मरण पावल्यावर अहंमदशहा गादीवर होता व दरबारामध्यें सादतखान, निजामउल्मुल्क वगैरे मागील काळ पाहिलेलीं शूर व अनुभविक माणसेंही होतीं. पुढें हे दोघे मरण पावल्यावर सफद-

---

१ म. सा. छो. ब. ८२, गाय. इ. ४२-४४, धा. रामराजे १८, "Guicowar" by Wallace 24-25. २ रघुनाथरावानें गुजराथ व अहमदाबाद १७५५ त घेतली असें ग्रांटडफ याचें ह्मणणें आहे. (see Grant Duff P. 284 and note.) परंतु तें चूक आहे. अहमदाबाद १७५३ च्या एप्रिल महिन्यांत घेतली, याबद्दल शंका नाहीं. (पहा विठ्ठल शि. विंचूरकर ब. ५; पंतप्रधानांची श. १३; धा. रामराजे १३; प. व या. २७, २८ व ३३२; लो. हि. वा. ७५, १८०)

रजंग हा वजीर झाला व निजामउल्मुल्कचा वडील मुलगा अमीर-उल्-उमराव या किताबानें सेनाधिपति झाला. या वजीराच्या मदतीसाठींच जयाप्पा शिंदे व होळकर हे मागें सांगितल्याप्रमाणें रोहिलखंडांत गेले होते. त्यांनीं पुढें बादशहाकडून गाझीउद्दीनास दक्षिणेचा सुभा देववून दक्षिणेंत आणिलें व तेथें तो विषप्रयोग होऊन मरण पावला हें वर सांगितलेंच आहे. त्यानें दक्षिणेंत येतांनां मागें आपला मुलगा मीरशहाबुद्दीन यास अमीर-उल्-उमराव केलें. गाझीउद्दीनाचे मरणानंतर त्यानेंही आपणास गाझीउद्दीन नांव घेतलें. या तरूण व अनुभवशून्य मनुष्याच्या हातीं एवढा अधिकार येतांच त्यानें मनाला वाटेल तसा दंगा मांडिला. तो बादशहाला किंवा वजीर सफदरजंग यास बिलकूल जुमानीनासा झाला. त्यानें वजीराशीं उघड वैर मांडिलें व बादशहास अनुकूल करून वजीरी इन्तीझम उद्दौला नांवाच्या आपल्या एका आप्तास सांगितली. त्यामुळें त्याच्या व वजीराच्या तर्फेच्या लोकांच्या, दिल्लीच्या रस्त्यांत चकमकी झडूं लागल्या. शेवटीं सफदरजंगानें आपल्या पक्षास जाटांचा राजा सुरजमल्ल यास बोलाविलें. त्यानें दिल्लीस वेढाही दिला होता, परंतु सहा महिनेपर्यंत मांडून, सफदरजंग कंटाळून लखनौस गेला व सुरजमल्ल भरतपुरास परतला. ही हकीगत सन १७५३ च्या अखेरीस झाली. ह्या गडबडी दिल्लींत चालल्या होत्या तों मराठ्यांच्या फौजाही दक्षिणेंतून तिकडे पोंचल्या.

गाझीउद्दीनानें वजीराविरुद्ध सहाय्यास जयाप्पा शिंदे व मल्हारराव होळकर यांस बोलाविलें होतें. त्यांच्या सहाय्यानें त्यानें जाटांचा सूड उगविण्यासाठीं भरतपुरास वेढा दिला. जाटांचा स्नेही सफदरजंग हा दूर लखनौस जाऊन स्वस्थ बसला। इकडे कुंभेरी व भरतपूर या जाटांच्या किल्यांस वेढा पडल्यावर मागें दिल्लींत नव्या वजीरानें आपणास पुढें आणणाऱ्या गाझीउद्दीनाविरुद्ध मसलत करून बादशहाचे संमतीनें त्यानें जाटांशीं पत्रव्यवहार सुरू केला. हें गाझीउद्दीनास कळतांच त्यानें दिल्लीसभोंवतीं लूट आरंभिली. न-

१ Elphinstone 738; Keene's Fall of the Moghal Empire. 27-34.

1 Tumult, Disorder Confusion

वीन वझीराचे मनांत मराठ्यांस दूर ठेवण्याचें होतें, परंतु त्याची तितकी शक्ति नव्हती. मराठ्यांच्या फौजांनीं कुंभेरीस वेढा घातला असतां मल्हाररावाचा एकुलता एक मुलगा खंडेराव, प्रसिद्ध सति अहिल्याबाईचा नवरा, गोळा लागून मरण पावला. त्यामुळें होळकरानें जाटांचा समूळ उच्छेद करण्याचें मनांत आणिलें व जाटांस मदत करण्यास जी फौज घेऊन बादशहा येत होता तीवर होळकराचे फौजेनें छापा घालून फडशा उडविला. या छाप्यांत मराठी फौजेनें स्त्रियांचीही फार अब्रु घेतली. हें जयाप्पास न आवडून त्यानें लुटींत वांटा घेतला नाहीं. त्याचप्रमाणें शिंदे यांचे आग्रहावरून रघुनाथराव व सखारामबापू यांणीं जाटांशीं तह करून स्नेह केला. हें ही होळकरास आवडलें नाहीं व त्यामुळें पेशव्याच्या एकनिष्ठ अशा दोन प्रसिद्ध व पुढारी सरदारांत वैमनस्य पडलें व तें पुढें तसेंच वाढून अखेरीस पेशवाईही त्यांत नाहींशी झाली ! जयाप्पाही रागावून आपली फौज घेऊन मारवाडांत गेला; त्यानंतर त्याचें व होळकराचें दर्शन झालें नाहीं[1] !

इकडे मागें दिल्लींत, गाझीउद्दीनानें बादशहा विरुद्ध झाला म्हणून त्यास पदच्युत करून सालिमगड येथें कैदेंत ठेविलें व जहांगीर बादशहाचा एक मुलगा होता त्यास 'अलमगिर' ही पदवी देऊन गादीवर स्थापिलें. ह्याच सुमारास अयोध्येचा नबाब सफदरजंग मरण पावला व त्याचा मुलगा प्रसिद्ध सुजाउद्दौला अधिकारारूढ झाला.

मारवाडचा राणा अजितसिंग यास अभयसिंग व बख्तसिंग असे दोन पुत्र होते. इ.स. १७२९त अभयसिंग जोधपूर येथील गादीवर बसला व त्याणें १७५०पर्यंत राज्य केलें. त्याच्यामागून त्याचा मुलगा रामसिंग यास गादी न मिळतां बख्तसिंगास मिळाली. रामसिंग राज्यास उपयोगी नाहीं अशा समजूतीनेंच हा प्रकार झाला होता. रामसिंग जयपूर येथेंच काळ क्रमण करीत होता. १७५३ सालीं बख्तसिंग

---

१ हो. कै. १६।१७; भाऊ सा. ब. ४-११; Keene's Fall of the Mogul Empire 27-34.

विषप्रयोग होऊन मरण पावला, तेव्हां त्याचा मुलगा विजयसिंग याच्याकडून आपलें राज्य पुनः परत मिळवावें ह्या हेतूनें, रामसिंगानें जयाप्पा शिंदे यास आपल्या सहाय्यास बोलाविलें[1]. त्या संकेताप्रमाणें शिंद्यानें कुंभेर येथील कामगिरी संपतांच मारवाडाकडे मोर्चे फिरविले. होळकराचें लक्ष विजयसिंगाकडे होतें यामुळें रामसिंगानें होळकराशीं कांहींच संधान बांधिलें नाहीं. शिंदे आपल्या फौजेसह कोट्याचे मार्गानें अजमीर येथें पोंचले. तेथें त्यांच्या व रामसिंगाच्यामध्यें करारपत्र ठरलें. विजयसिंगानें नागोराहून ९०हजार फौज घेऊन पुढें चाल केली व मेडतें ( मिरता ) येथें तळ दिला. मराठे व रामसिंग अजमिराहून पुष्करास गेले. या वेळेस मारवाडांत मराठे सरदारांपैकीं शिंद्याची एकटीच फौज होती. तेव्हां आपल्या यशाला कोणी वांटेकरी नाहीं असें पाहून, लढाईच्यापूर्वी आपल्या सरदारांच्या उत्तेजनार्थ सभा करून, जयाप्पानें या कामांत जिव गेला तरी बेहत्तर परंतु यश संपादिलें पाहिजे असें सांगितलें. शत्रूपासून शिंद्याची फौज दहा कोसांवर होती. फौजेच्या दोन टोळ्या करून एकीवर आपण व दुसरीवर दत्ताजी मुख्य होऊन, मराठे निघाले. दोन्हीं सैन्यें जवळ येतांच लढाईस सुरवात झाली.

ही लढाई दोन दिवस चालोन मोठ्या श्रमानें मराठे विजयी झाले. या लढाईत, दोन्ही पक्षांच्या शक्तीची परीक्षा झाली. मराठ्यांप्रमाणें मारवाड्यांनींही फार शौर्य दाखविलें. मराठ्यांनीं हा जो विजय मिळविला त्याबद्दल त्या प्रांतांतील भाट लोक अजून गाणीं गात असतात. जोधपूर, विकानेर व किशनगड या तीनहीं संस्थानांचे राणे या लढाईतून पळून गेले व विजयसिंग हा एका शेतकऱ्याचे खटाऱ्यांत बसून पळाला व त्यानें मोठ्या शर्तीनें नागोर गांठलें. त्यावरून मराठ्यांच्या फौजेनेंही पुढें चाल करोन नागोरास वेढा दिला. या लढाईचे संबंधानें, सर्व धोरणें लक्षांत आणून, आपलें हित करून घ्यावें व मनुष्य फार जाया होऊन फार नुकसानी होण्यापूर्तें लढाईच्या ईर्षेत जाऊंनये, असें

१ या पहिल्या वाटाघाटींत, महादजी पाटील शिंदे, हे अजमीर येथें रामसिंगास भेटण्यास गेले होते, परंतु त्यांचें नांव पुढें लढाईत आलेलें नाहीं. Tod's Rajsthan.

1 Agreement, contract. 2 Abr[illegible]. 3 the spirit of competition or rivalry.

पेशव्यानें शिंद्यास लिहिलें होतें, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं[1]. जयाप्पा ह्मणजे पक्का शिपाई, त्याला मसलत, आपमतलबपणा वगैरे माहीत नव्हतें. असली चांगली फौज मारवाडांत व्यर्थ लहान कामांत गुंतविण्यापेक्षां, तिचा दुसरे योग्य ठिकाणीं उपयोग करण्याचा विचार पेशव्याचा होता. अयोध्येचा नवीन, प्रसिद्ध वजीर सुजाउद्दौला, यास वजीरी पद देऊन त्याचेकडून प्रयाग व काशी वगैरे मुलुख मिळवावे व बंगाल्यावर स्वारी करावी असा नाना साहेबांचा विचार होता[2]. परंतु तिकडे जयाप्पानें दुर्लक्ष केलें व सुमारें ४० हजार फौज नागोरच्या वेढ्यांत गुंतवून ठेविली. मारवाड हा बोलून चालून रेताळ प्रदेशच पडल्यामुळें, सुरंगाचा उपयोग होईनासा झाला. तोफांचा मार जरी सारखा चालला होता, तरीही शहर खालीं येईना. वेढा सुमारें सात आठ महिने पडला होता. मराठ्यांच्या इतिहासांतील भोपाळ, श्रीरंगपट्टण, कुंभेर, वसई वगैरे प्रसिद्ध वेढ्यांपैकींच हा वेढा होता. या वेळीं जयाप्पानें, रामसिंगास व जनकोजीस, मेडत्यास वेढा घालण्यास पाठविलें व नागोरपुढें आपण बसला. हें चाललें असतां विजयसिंगानें मल्हारराव होळकरास अनुकूळ करून घेतला. परंतु शिंदे व आह्मीं एका खावंदाचे नोकर तेव्हां तुमची कुमक उघडपणें आह्मांस करतां येत नाहीं, तेव्हां परभारें या राज्यांतील उमराव व राजेरजवाडे यांस पत्रें देऊन तुमची कुमक करतों, असें त्यानें उत्तर दिलें. त्या प्रमाणें जयपूरच्या व उदेपूरच्या राण्यांस होळकराचीं पत्रें गेलीं. हें वर्तन खरोखरच वाईट होतें हें सांगणेंच नको. असल्या घरच्या भेद्यांमुळेंच राज्यें बुडतात. कांहींच उपाय चालत नसल्यास 'मोंगलाई कावा करावा' अशीही होळकराची विजयसिंगास सूचना झाली[3]. रजपुत मारवाड्यांचा कांहींही उपाय शिंद्यापुढें चालेनासा झाल्यावर, विजयसिंगानें मोंगलाई मसलतीचा उपयोग करण्याचा विचार केला. व तीन मारेकऱ्यांस, कंगाल भिकाऱ्यांच्या वेषानें, शिंद्याच्या गोटांत पाठविलें व आपण फौज तयार करून राहिला.

---

१ प. व या. ३७६, ३९३, ३४३. २ प. व या. ३७३. ३ भा. सा. ब. १६।१७. या दुष्ट मसलतीचे सत्यासत्यतेबद्दल दुसरा आधार नाहीं.

Acrafty Scheme.

विजयसिंगानें पाठविलेले मारेकरी सुमारें दोन तास दिवसास शिंद्याच्या गोटांत आले व पागेंतील घोड्यांपुढचे दाणे, केवळ भिकाऱ्यांप्रमाणें वेंचूं लागले. जयाप्पा शिंदे जवळच चवरंगावर स्नान करून तोंडावर वस्त्र घेऊन डोळे चोळीत होते, ही संधि राखून मारेकऱ्यांनीं धांवत येऊन एकाएकीं आप्पांच्या दोन्हीं कुशींत सुऱ्या भोंसकल्या! त्यासरसे आप्पा खालीं पडले. जवळ एक अफ्दागिऱ्या मात्र होता; त्यानें एका मारेकऱ्यास पकडला, परंतु धांवाधाव होते तोंच, दुसरे दोघे निसटून पार नागोरास गेले. हें भयंकर कृत्य समजतांच दत्ताजी शिंदे धांवून आले व आपल्या बंधूची ती स्थिति पाहून त्यांनीं जमिनीवर घालून घेतलें. नोकरांनीं दोघांसही डेऱ्यांत उचलून नेलें. शिंद्याच्या गोटांत चोहोंकडे हाहा:कार उडाला व इतक्यांतच पूर्वसंकेताप्रमाणें विजयसिंगानें आपलें सैन्य पुढें आणिलें. परंतु जयाप्पानें प्रसंग पाहून, दत्ताजीस रडूं नको, लढाईस जा, ह्मणून सुचविलें. "वैरी युद्धास आला आणि तूं रांडेसारखा रडतोस? हें क्षात्रधर्माला उचित नव्हे, आतां मला कांहीं होत नाहीं, तुह्मीं शत्रूचा पराभव करा" हींच त्या शूर पुरुषाच्या तोंडांतलीं शेवटलीं अक्षरें होतीं[1]. दत्ताजीनेंही आज्ञेप्रमाणें स्वार होऊन फौज तयार केली व मोठ्या नेटानें शत्रूला टक्कर देऊन त्यास शहरांत परत घालविलें. इतक्यांत जयाप्पाचा अंत झाला होता. त्याच दिवशीं जनकोजी शिंद्यानें मेडतें ( मिरता ) घेऊन, भगवा झेंडा तटावर चढविला. परंतु हें आप्पाचें वाईट वर्तमान कळल्यावर तोही नागोर येथें दत्ताजीच्या कुमकेस गेला. भावाच्या मरणाचा सूड उगविण्यासाठीं दत्ताजीनें जास्त नेट धरला व पुनः वेढ्याचें काम मोठ्या ईर्षेनें चालू केलें.

जयाप्पाच्या मृत्यूचें वर्तमान पुण्यास श्रीमंतांस समजतांच त्यांस फारच वाईट वाटलें व आपला एक मोठा मित्र व आधार गेला ह्याबद्दल त्यांचे मनास बराच धक्का बसला. जयाप्पासारखा सत्यप्रतिज्ञ शूर व इमानी सरदार पेशव्यांचे पदरीं दुसरा कोणीच नव्हता ह्मटलें

१ भा. सा. व. १८, प. व या. ४५१.

1 Emulation rivalry 2 A square stool 3 To step out of ... to bilt - 4 A general ... lamentation or wailing 5. houat ...

तरी शोभेल. श्रीमंतांनीं दत्ताजीला दुखवट्याचीं पत्रें पाठवून समाधान केलें व मारवाडांतून हरतऱ्हेनें लवकर निघावें ह्मणून लिहिलें. तथापि भावाच्या मरणाचा पुरा सूड उगविल्याखेरीज दत्ताजी परतणार नाहीं, हें पेशव्यास पक्कें माहित होतें, ह्मणून त्यानें आपला दिल्लींतील सरदार अंताजी माणकेश्वर, यास तावडतोब दहा हजार फौजेसह शिंद्याच्या कुमकेस पाठविलें. शौर्याबद्दल व शिपायगिरीबद्दल शिंद्याची पेशव्यानें फारच तारीफ केली, पण सरदारांच्याप्रमाणें युक्तिप्रयुक्तीनें कार्यभाग उरकून घेतला नाहीं, असा दोषही दिला[१].

शिंद्याच्या कुमकेस स्वतः जाण्याचाही पेशव्याचा विचार होता, परंतु त्यानें अगोदर अंताजी माणकेश्वरास पुढें पाठविला. अंताजीपंतांनीं दहाहजार सरंजामानिशीं मारवाडावर स्वारी केली व विजयसिंगास मदत देणाऱ्या रजपुत संस्थानांत लूट सुरू केली. हा शह पोंचतांच मारवाड्यांचा कमजोर झाला. केरोली व बुंदीकोटेकर यांचीही मराठ्यांस मदत मिळाली. अशा तऱ्हेनें मारवाड प्रांत मारून लुटून जेरीस आणला. नागोरास १८ महिने वेढा होता, अखेरीस निरुपाय होऊन विजयसिंगानें मराठ्यांशीं तह केला. त्यांत रामसिंगास नागोर, मेडतें वगैरे प्रांत मिळाले व मराठ्यांस लढाईच्या खर्चाशिवाय कांहीं मुलुख व रजपुतान्यातील मुख्य शहर अजमीर हें मिळालें. शिंद्याची फौज याप्रमाणें कृतकृत्य होऊन मारवाडांतून एकदां बाहेर पडली. या लढाईपासून पुढें मारवाडांत मराठ्यांचा जो रिघाव झाला तो कायमचा झाला[२].

त्यानंतर दत्ताजी व जनकोजी शिंदे माळव्यांत परतले व फौजे-

---

१ प. व या. ३५१. २ भा. सा. ब. ११।२०, Malleson 51-52. या मोहिमेबद्दल प. व या. ४५१, व भा. सा. ब, यांत सविस्तर वर्णन आहे. जोधपूरच्या मोहिमेबद्दल ग्रांटडफचें वर्णन फार थोडें आहे व ही प्रसिद्ध मोहीम १७५९ त झाली असें त्याचें मत आहे. परंतु जाटांशी लढाई संपते न संपते तोंच ह्मणजे १७५४ सालीं, जयाप्पा मारवाड्यांवर गेले. मोहीम होऊन शिंद्याची फौज आल्यावर, दादासाहेब लाहोरच्या मोहिमेस १७५६ त गेले. (पं. प्र. श. १५।१६, भा. सा. ब. २१, प. व या. ३३२।३९३.)

5

ची फेड करून, दक्षिणेंत आपला गांव चांभारगोंदें येथें आले. तेथून पुण्यास गेल्यावर श्रीमंतांनीं व भाऊसाहेबांनीं समाधान करून, जनकोजीचे नांवें शिक्के करून दिले व समजाविशीस नवीन संपादन केलेला मारवाडांतील मुलूख शिंद्यांस बहाल केला. या सुमारास होळकरही दक्षिणेंत आले होते, व त्यांच्या मनांत दत्ताजीस भेटण्याचें होतें, परंतु पूर्वीचा राग मनांत धरून, 'आतां स्वर्गांतच भेट,' असा निष्ठूर जाब दत्ताजीनें दिला[1]. पुढें शिंदे दक्षिणेंतच राहिले व होळकर हे रघुनाथरावाच्या शेवटल्या वड्या स्वारीच्या बरोबर हिंदुस्थानास जाण्यास निघाले.

---

१ भा. सा. व. २१.

# भाग ३ रा.

## मराठ्यांचा परमोत्कर्ष.

### पानिपतचीं पूर्व कारणें.

वझीर गाझीउद्दीनानें अहमदशहा बादशहास ठार मारून अलमगीर बादशहास १७५४ सालीं गादीवर बसविलें, हें मागें सांगितलेंच आहे. प्रख्यात अलमगीर (अवरंगझेब,) बादशहाचें नांव मात्र या बादशहास मिळालें, परंतु बिचाऱ्याच्या हातीं काडीभरही सत्ता नव्हती. गाझीउद्दीनानें मराठ्यांच्या सहाय्यानें दिल्लींत पाहिजे तो दंगा सुरू केला व मोंगल बादशहाचे हाल हाल केले. अलमगीर गादीवर बसला त्या वर्षींच पंजाबचा सुभेदार मीरमन्नु हा मरण पावला. पंजाबप्रांत १७५२ पासून अफगाणिस्थानचा बादशहा अहमद अबदल्ली, याजकडे होता. मरिमन्नु मरण पावतांच अहमदशहानें त्याच्या बायकोकडे सर्व अधिकार देऊन अदिनाबेग नांवाच्या एका सरदारास तिचा नायब नेमिला होता.

इराणचा बादशहा नादिरशहा हा हिंदुस्थानची मोहीम आटपून परत आपल्या देशास गेल्यावर, थोड्याच वर्षांनीं मारेकऱ्याचे हातून मरण पावला, तेव्हां अबदल्ली हा त्याच्या पदरीं एक सरदार होता. बादशहा मरण पावतांच योग्य संधि पाहून अबदल्लीनें आपल्या फौजेसह हिरातेस येऊन तें शहर घेतलें. त्याबरोबर नादिरशहाच्या अमलास त्रासलेल्या अफगाण लोकांनीं त्याला एकदम आपला बादशहा केलें. त्यानें कंदाहार येथें आपली गादी स्थापिली. अहमदशहा हा अबदाली नांवाच्या तातार जातीचा असून त्यानें लहानपणापासून शिपायगिरी करून नादिरशहाची मर्जी संपादिली होती. तो जात्या मोठा शूर असून त्यानें कास्पियनपासून भागिरथीपर्यंत मोठमोठ्या स्वाऱ्या करून काबूल, कंदाहार, खोरासान, पेशावर, सिंध, काश्मीर वगैरे प्रांत आपल्या राज्यास जोडिले. गिलझी व दुराणी लोकांवर त्याचा अम्मल असून, त्याचे सैन्यांत यांचा भरणा होता म्हणून अब-

Prosperous or flourishing condition

दल्लीस "दुराणी" व "गिलच्या" या संज्ञा मराठे लोकांनीं दिल्या होत्या. अदिनाबेगाच्या बोलावण्यावरून अबदल्लीनें इ. स. १७४७।४८ त पंजाबांत स्वारी करून सरहिंदापर्यंत चाल केली, परंतु महंमद बादशहाची फौज येते असें पाहून त्यानें स्वदेशास गमन केलें. पुढें इ.स. १७५१।५२ त त्यानें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली. तेव्हां सुजाउद्दौल्याचा बाप सफदरजंग हा वजीर होता. रोहिल्यांचें पारिपत्य करून आल्यावर, जयाप्पा शिंदे व मल्हारराव होळकर यांच्या मदतीनें अबदल्लीशीं लढाई करण्याचा त्याचा विचार होता. परंतु वजीर दिल्लीस परत पोंचण्याचे पूर्वींच, बादशहानें पंजाबप्रांत अबदल्लीस देऊन परत लाविलें. यानंतर हा प्रांत त्याच्या ताब्यांतच होता. परंतु जाटांचा पराभव करून आल्यावर नवा वझीर गाझीउद्दीन यानें पंजाब परत घेण्याचा निश्चय करून, तिकडे चाल केली व एकाएकीं लाहोरास जाऊन त्यानें मीरमन्नूच्या विधवेस पकडलें व तिच्या मुलीशीं लग्न लावून दिल्लीस घेऊन आला. त्यानें अदिनाबेगासच आपल्यातर्फे सुभेदार नेमिलें. याप्रमाणें तेथून परत आल्यावर, दिल्ली येथील बंदोबस्त अंताजीमाणकेश्वर ह्या मराठ्यांचे सरदारास सांगून, वझीर बेफिकीर विलासांत मग्न झाला.

तथापि त्याला नकळत त्याच्या विरुद्ध पुष्कळ खटपटी सुरू झाल्या. खुद्द बादशहाही त्याच्या हातून मोकळा होण्यासाठीं खलबतें करूं लागला. या खलबतांत गाझीउद्दीनानें वाढविलेला व त्याचा विश्वासू सरदार नजीबखान हा सामील झाला. नजीबखान जातीचा रोहिला असून आपल्या शौर्यानें गाझीच्या मनांत भरला होता. म्हणून त्यानें त्याला पुढें आणून मोठ्या पदास चढविलें व गंगा यमुनेच्या दुआबांत त्यास जहागीर दिली. परंतु ते उपकार न स्मरतां तो आपल्या उपकारकर्त्याविरुद्ध मसलत करूं लागला व बादशहाच्या जनान्यापैकीं मलकाजमानी वगैरे मोठ्या खटपटी स्त्रियांशीं सूत बांधोन त्यानें अबदल्लीशीं राजकारण लाविलें. आधींच मराठ्यांच्या अमलामुळें दिल्लींतील उमराव मनांत जळफळत होते व गाझीउद्दीनाला काढिल्याशिवाय कांहीं मराठे हालत नाहींत असें त्यांस वाटत होतें; म्हणून अहमदशहा आल्यास

1 Wanton pleasure. 2 To establish a means of connection or communication with. 3 A State-Koram

आपली उर्जितस्थिति येईल या इच्छेनें नजीबखान, शहाजाद्या व कांहीं उमराव वगैरे लोकांनीं अहमदशहास दिल्लीवर स्वारी करण्याचें निमंत्रण दिलें[१].

या निमंत्रणाची अहमदशहास जरूरच राहिली नव्हती. मीरमन्नूच्या विधवेची गाझीनें अप्रतिष्ठा केली व आपला अम्मल पंजाबांतून झुगारिला या गोष्टींवरूनच अबदल्लीस त्वेष येऊन, इ.स. १७५६ सालांत तो मोठ्या फौजेसह पंजाबांत उतरला व झपाट्यासरशी मुलतान, लाहोर वगैरे जागा ताब्यांत घेऊन सतलज नदीच्या आलीकडे सरहिंदास येऊन थडकला. हें होईपर्यंत गाझीउद्दीनास कांहीं दादच नव्हती. अबदल्ली इतका जवळ आला हें कळतांच त्यानें थोडीबहूत फौज जमवून नजीबखानास शत्रूवर पाठविलें. परंतु बाह्यात्कारीं गोड बोलून या रोहिल्यानें अबदल्लीशीं पत्रव्यवहार ठेविला होता. अबदल्लीची फौज दिल्लीच्या उत्तरेकडील भागांत येतांच नजीबखान उघड रीतीनें त्यास मिळाला. तेव्हां वजीर घाबरला. मराठ्यांची फौजही त्यावेळीं मोठी नव्हती. अंताजी माणकेश्वरानें अबदल्ली येतांच आपली लहानशी फौज घेऊन दिल्लींतून पळ काढला. गिलच्यांनीं दिल्ली सर करून गाझीस व बादशहास कैद केलें व शहरांत लूट व कत्तल करून अनर्थ उडविला. नंतर अबदल्ली मथुरेकडून आग्र्याच्या रोंखें चालला. तितक्यांत गाझीउद्दीन त्याचे हातून निसटून आग्र्याचे किल्यांत राहिला होता. गिलच्यांची फौज लुटीच्या हेतूनें निघाली होती. त्यांनीं आपल्या फौजेच्या टोळ्या करून एक टोळी सुरजमल्ल जाटावर पाठविली. परंतु दक्षिणेंतून रघुनाथराव भारी फौजेसह येत आहे ही बातमी जाटांस होतांच ह्मणून ते आपल्या बळकट किल्यांच्या आश्रयास जाऊन, गिलच्यांस दाद देईनासे झाले. आग्र्याचा किल्लाही पुष्कळ खटपट केली तरी सर होईना. गिलचे लोक तेथील प्रखर उन्हाच्या तापानें मरूं लागलेले पाहून अबदल्लीनें फौज माघारी दिल्लीस नेली. गिलच्यांनीं वाटेंत अकस्मात् मथुरा शहरावर छापा घातला. त्या दिवशीं त्या पवित्र शहरीं यात्रा भरली होती. गिलच्यांनीं हजारों ब्राह्मण, साधु,

---

[१] भा. सा. ब. २७-२८; Elphinstone 740, Keene 37-38.

Prosperous days

संत, तापसी, बैरागी, बायका, मुलें वगैरे जें जें पुढें सांपडलें त्यांची कत्तल केली. लोकांचीं घरें व देवळें लुटलीं, स्त्रियांची अप्रतिष्ठा केली व गाई मारून त्यांच्या रक्ताचें देवांस स्नान घातलें! याप्रमाणें हिंदुधर्माचा अपमान करण्यासाठीं अतिक्रूर व नीच कर्मे करून अफगाण लोकांनीं दिल्लीस तळ दिला. इ.स. १७५७ च्या सप्टेंबरपासून नोव्हेंबर महिन्यापर्यंत अफगाण लोक दिल्लींत होते. तोंपर्यंत दिल्लींत सारखा रक्तपात व लुटीचा झपाटा चालला होता. ह्या गोष्टीपासून बरोबर शंभर वर्षांनीं १८५७ च्या सप्टेंबर महिन्यांतच, या शहरांत इंग्लिशांच्या व बंडवाल्यांच्या चकामकी चालू होत्या. अबदल्लीनें बादशहास पुनः गादीवर बसविलें. गाझीउद्दीन शरण गेल्यामुळें वजिरी त्याचेकडेसच कायम ठेऊन, नजीबखानास अमीर-उल्-उमराव नेमिलें व त्यास सेनाधिपत्य दिलें. याप्रमाणें व्यवस्था करून थोडकेच दिवसांत अबदल्ली स्वदेशास गेला व त्याणें पंजाबाचे बंदोबस्तास आपला मुलगा तैमूरशहा यास ठेविलें.

इतक्यांत रघुनाथरावदादा व होळकर मोठ्या फौजेनिशीं मजल दर मजल करीत दिल्लीस आले. वजीरानें मराठ्यांचे मदतीनें नजीबाचा पराभव करून त्यास पळण्यास लाविलें व तेव्हांच बादशहाचा मुलगा अल्लीगौर ह्याही पळाला. दिल्लीहून अदिनाबेगाच्या विनंतीवरून दादासाहेब पंजाबांत गेले. मराठी फौज येते असें ऐकून तिशीं लढाई न करितांच तैमूरशहा व अफगाण फौज स्वदेशास पार झाली. राघोबानें लाहोर घेऊन मराठी फौज अटकेपर्यंत पोंचवून कृष्णातीराचे घोड्यांस अटकेवर सिंधूनदीचें पाणी पाजविलें व मराठ्यांचा यशस्वी जरीपटका हिंदुस्थानच्या शेवटल्या सीमेवर रोंवला. याप्रमाणें विजय करून दादा, १७५८ च्या मे महिन्यांत लाहोरास राहिले. त्यांनीं अदिनाबेगास पंजाबचा सुभेदार नेमून पंजाब प्रांत मराठी राज्यास जोडिला व तेथें थोडीशी मराठी फौज ठेऊन ते मागें परतले. मराठ्यांच्या सर्व इतिहासांत ही अखेरची प्रख्यात मोहीम झाली व यापुढें मराठ्यांस उतरता काळ लागला. राघोबानें ही स्वारी इतक्या त्वरेनें केली कीं, तीवरून त्यास 'राघोभरारी' हें नांव पडलें.

1 To flatter, to pat on the ground. "Rising up" a whirl or flurr.

दादांनीं दिल्लीहून नजीबखानास घालवून दिलें, परंतु त्याची जहागीर मात्र होळकराच्या मध्यस्तीमुळें त्याच्याकडे ठेविली. होळकरानें नजीबापासून लांच घेतला होता.

रघुनाथराव हिंदुस्थानांत स्वारीस निघाले होते, इतक्यांत मागें दक्षिणेंत शिंद्याच्या फौजेसही लहानशी कामगिरी आली होती. अबदल्लीच्या स्वारीच्या आवईमुळें शिंद्यांनीं यासालीं, (इ.स. १७५६.) ४० हजार नवी फौज उभी केली होती, तिचा उपयोग प्रथमतः दक्षिणेंत झाला. पेशव्यांचा व दक्षिणचा सुभा सलाबतजंग याचा पुनः बेबनाव होऊन प्रकरण हातघाईला आलेलें पाहून, पेशवे यांनीं आपला वडील मुलगा विश्वासराव यास फौज देऊन गोदावरीच्या थडींत पाठविलें. विश्वासरावाबरोबर दत्ताजी, महादजी, तुकोजी व जनकोजी शिंदे आपल्या सर्व फौजेसह होते. शत्रूकडून व्यंकटराव निंबाळकर, जानवा निंबाळकर, इब्राइमखान गारदी वगैरे सरदार आले. त्यांवर विश्वासरावादिकांनीं चाल करून लढाई दिली. या लढाईत जनकोजी शिंदे हे आपल्या बायकोचा भाऊ व्यंकटराव निंबाळकर याशीं लढत होते. त्याच लढाईत जनकोजीचे साडू नागोजी माने-म्हसवडकर, हे निजामाकडून आले होते, ते गोळी लागून ठार झाले.

इतक्यांत शिंदखेडचे रामचंद्रराव जाधवराव मोठ्या फौजेनिशीं पेशव्यांच्या फौजेवर आले. त्यांचा पाठलाग करून शिंद्याच्या फौजेनें त्यांस शिंदखेडांत घेरिलें. तेथें निजामअल्लीही आपली फौज घेऊन आल्यामुळें मोंगलांची व मराठ्यांची मोठी निकराची लढाई झाली व मराठ्यांचा विजय झाला. या लढाईत महादजी शिंदे यांनीं आपली तरवार पुनः दाखविली, परंतु दत्ताजीच्या विलक्षण शौर्यापुढें सर्व दिपून जात. पुढें थोडेच दिवसांत मराठ्यांचा व मोंगलांचा साखरखेडली येथें तह होऊन पेशव्यास २५ लक्षांचा मुलूख मिळाला. तेथून परतल्यावर थोडेच दिवसांनीं जनकोजी शिंद्यास हिंदुस्थानचे मोहिमेस जाण्याची आज्ञा मिळाली व दत्ताजी शिंदे चांभारगोंदें येथें लग्नास

१ Elphinstone 741, Owen 357, भा. सा. ब. ३५.

निघून गेले. जनकोजी शिंदे उज्जनीस पोंचल्यावर, बुंदीवाड्यांतील हरगड येथील गुमानशिंग हा फार पुंड झाला होता, त्याचें पारिपत्य केलें. तेथून शिंद्याची फौज खेचीवाडा, राजगड, पाटण, बुंदी व कोटा येथील खंडण्या घेऊन जयनगरास गेली. तेथून मारवाडांत जाण्याचा विचार होता, इतक्यांत उदेपूरच्या राण्यानें आपल्या पदरच्या शिवपूरच्या राजानें बंड केलें होतें, त्याचे पारिपत्यास शिंद्यास बोलाविलें. जनकोजीनें पावसाळा त्या स्वारींत घातला व शिवपुरच्या राजास हस्तगत करून उदेपुरच्या राण्याच्या ताब्यांत दिलें. तुह्मी खुद्द फौजेसह दिल्लीस अगर पंजाबांत राहावें, तसें न केल्यास पावसाळ्यांत पुनः अब्दल्ली येईल अशी वजीरानें दादांस विनंति केली; परंतु तिकडे दुर्लक्ष करून दादा दक्षिणेंत परतले[1]. त्यांनीं शिंद्यांस नजीबउद्दौल्याचें पारिपत्य करा ह्मणून आज्ञा केली. इतक्यांत मागाहून मल्हारराव होळकर येत होते, त्यांनीं जनकोजीच्या मनांत ब्राह्मण व विशेषतः पेशवे यांविषयीं वैषम्य उत्पन्न केलें व स्वामिकार्य-तत्पर व दौलतीचे स्तंभ मानलेले शिंदे यांचे मनांत पाप भरवून दिलें. एवढाच जरा वस्ताद शत्रु पेशव्यांस राहिला आहे; नजीबखानाचें रक्षण करावें, त्याला मारला तर पेशवे आपला वसूल अटकेहून जासुदांचे हातून आणवतील. मग आह्मी सरदार सहजच निर्माल्यवत् होऊं, असें जनकोजीच्या मनांत पक्कें भरवून देऊन, होळकरानें तुकोजी होळकर यास दोन हजार फौजेनिशीं शिंद्याबरोबर दिलें[2]. मागाहून थोडेच दिवसांनीं दत्ताजी शिंदे व पेशव्यांचे सरदार नारोशंकर हे हिंदुस्थानांत निघाले. त्यांची व दादासाहेबांची गांठ पडली व दादांनीं पूर्ववत् नजीबखानाचें पारिपत्य करा, ह्मणून त्यांस सांगितलें व त्यांणीं ही गोष्ट मान्य केली. परंतु पुढें उज्जनी मुक्कामीं मल्हारराव होळकर यांचीं गांठ पडल्यावर, पूर्वीचा द्वेष जनकोजीनें मिटविला हें लक्षांत आणून दत्ताजीनें मल्हाररावाची भेट घेतली. तेव्हांही मल्हाररावानें दत्ताजीस नजीबखानाचें रक्षण करा, ह्मणून

---

१ प. व. या. ३४. २ भा. सा. ब. ४१.

1 Refractory, turbulent freebooter.

सांगितलें. नजीबखानास हातीं धरून भागीरथी पार व्हावें व अयोध्या, बंगाल वगैरे प्रांत सर करावे; असें न करतां नजीबखानाचें पारिपत्य कराल तर पेशवे सर्वांस धोतरें बडवावयास लावतील, असा मंत्र पुष्कळ सांगून दत्ताजीसही त्यानें भारून टाकिलें. पेशव्यांचे न ऐकतां मल्हाररावाच्या सांगण्यावर विश्वास ठेवण्याचा परिणामही लवकरच भोंवला.

शिंद्याची फौज दिल्लींत आल्यावर वजीराची भेट झाली. त्यांत पंधरा लक्ष रुपये देतों, नजीबखानाचें पारिपत्य करा व मीही फौज घेऊन येतों असें त्याचें ह्मणणें पडलें, परंतु तें वरकांती होय ह्मणून, दत्ताजीनें कांहीं कुरापत काढण्याचा बेत करून, मोंगलांच्या दोन तीन उत्तम तोफा मागितल्या. त्या देण्याचें नाकारल्यावरून, शिंदे यांनीं मराठ्यांचा मित्र गाझीउद्दीन याशीं मोठी खटकट करून दिल्लींत दंगा केला व दांडगाईनें तोफा काढून घेतल्या. तेथून शिंदे पुढें पानिपत, कुरुक्षेत्र वगैरे रस्त्यानें सतलजनदीपर्यंत गेले. या स्वारींत महादजी शिंदेही होते. अदिनाबेग मेल्यामुळें पंजाबांत कोणीतरी चांगला मराठा सरदार ठेवावा, असें सांगण्यासाठीं दादांनीं नेमलेला कारभारी लक्ष्मीनारायण दत्ताजीकडे आला. त्यावरून पंजाबांत साबाजीशिंदे व त्र्यंबक बापूजी यांस पंधराहजार फौजेसह पाठविलें व त्यांच्याकडे लाहोर, मुलतान वगैरे पंजाबचा बंदोबस्त सांगितला.

या सुमारास चोहोंकडे मराठे राज्यांत साधारण स्वस्थता होती व म्हैसूर, हैदराबाद, मारवाड, दिल्ली वगैरे प्रांतांत मराठ्यांचें वजन स्थापन होऊन त्यांस कोठें भीति राहिली नव्हती. यावेळीं मराठ्यांचें राज्य परमावधीस पोंचलें होतें. पंजाब, अजमीर, माळवा, नागपूर, वऱ्हाड, महाराष्ट्र, गुजराथ व कर्नाटक, यांमध्यें मराठ्यांचा अंमल पक्का बसला होता व बंगाल, राजपुताना वगैरे प्रांतांतून व इतर सर्व लहानसान राजेरजवाड्यांकडून मराठ्यांस चौथाई मिळत होती. म्हैसूरकर, निजाम व अयोध्येचा नवाब हे खंडणी देत असत. तात्पर्य, यावेळीं सर्व हिंदुस्थान मराठ्यांचे ताब्यांत होतें व त्यांची शक्ति अपार

१ भा. सा. व. ४२.

झाली होती. राघोबानें तर अटकेवर झेंडा लाऊन थोरल्या शिवाजीमहाराजांचें भविष्य पुरें करून दाखविलें. या काळांत बाळाजीपंत, सदाशिवराव, रामचंद्रबाबा वगैरे मुत्सदी व शिंदे, होळकर, राघोबादादा वगैरे शूर सरदार, यांच्या खटपटीनें सर्व हिंदुस्थानांत मराठ्यांचा डंका वाजूं लागला.

पेशव्यांमध्यें नानासाहेबासारखा मुत्सदी, कार्यकर्ता पेशवाच झाला नाहीं. त्याला पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्यापासून, त्याचेवर गृहकलहादि मोठमोठीं लचांडें आलीं, परंतु तीं सर्व निभावून त्यानें जसा प्रसंग येईल तसा उपाय करून मराठी राज्याचा व विशेषतः पेशव्यांचा अंमल सर्व हिंदुस्थानांत स्थापन केला. हिंदुपदबादशाहीची मराठ्यांस जी इच्छा होती तिची सत्यता होण्याचा समय जवळ आला होता. परंतु पानिपतची लढाई होण्याचे पूर्वीं त्याच्या सरदारांनीं ज्या कित्येक मोहिमा व मुलखगिऱ्या केल्या, त्यांत त्याच्या मसलतीविरुद्ध कामें झालीं व पेशव्यावर कर्जाचा मोठा बोजा बसला. हिंदुस्थानचें राज्य मिळवून त्याचें रक्षण करणें त्या काळीं फार कठीण होतें. त्यासाठीं लाखों फौज पदरीं बाळगावी लागे. तिच्या खर्चासाठीं शिंदे, होळकर, बुंदेले वगैरे सरदारांनीं कराराप्रमाणें पेशव्याकडे ज्या रकमा पाठवावयाच्या त्या न पाठविल्यामुळें राज्यकारभार चालविणें पेशव्यास व भाऊंस फार कठीण जाऊं लागलें. नानासाहेबानें आपल्या कारकीर्दींत गुजराथ, माळवा वगैरे प्रांतांत मराठ्यांचा कायम अंमल बसविला. त्यानें कान्होजी आंग्र्यासारखे चांचे लोकांची बंडाई मोडली व त्याचे मनांतून इंग्रजांचे मदतीनें पोर्तुगीझ लोकांसही हिंदुस्थानांतून घालविण्याचा विचार होता. पेशव्यानें जी ह्मैसुराकडे स्वारी केली, त्यावेळीं बेदनूरचा किल्ला जर ताब्यांत येता तर यापुढें मराठ्यांच्या राज्यास नवीन होणारा शत्रु हैदर मुळींच पुढें आला नसता. परंतु पानिपतच्या घोर प्रसंगामुळें हे सर्व बेत जागच्या जागीं राहिले. नानासाहेबाच्या खासगी पागेंत बरींच वर्षें काढल्यामुळें महादजीसही मुत्सदीपणाचें बाळकडूंच मि-

, Owen 288-292.

झालें होतें. याप्रसंगीं पेशव्यानें जीं पत्रें शिंदेहोळकरांस लिहिलीं होतीं, त्यांवरून पेशव्याचा मुत्सद्दीपणा व्यक्त होतो. "सर्व प्रकारें समाधान चित्ताचें करून अष्टपैलूचे रीतीनें जसा जे समयीं प्रसंग पहाल तसा मनसबा करीत जाणें. एकाशीं स्नेह तर एकाशीं विघाड. एकदांच सर्वांशीं कज्जा करूंनये. तोंडानीं सर्वांशीं गोड बोलून, राज्यभार अष्टपैलूपणास उचित असें प्रसंगानुरूप वागावें," हा पेशव्याचा मुत्सद्दीपणाचा मूळ मंत्र होता. यामुळेंच कसाही विकट प्रसंग आला तरी न डगमगतां त्यांतून तो पार पडला. व त्याणें मराठी राज्याचे विजयी झेंडे सिंधूपासून कावेरीपर्यंत नाचविले. महादजी शिंद्याचे सर्व चरित्रांत व वर्तनांत हाच मुत्सद्दीपणा दिसून येईल. या दोन तीन भागांत जो इतिहास आह्मीं पाल्हाळानें दिला आहे, त्याचा महादजीचे चरित्राशीं विशेष संबंध नाहीं, असें आमचे कांहीं वाचक ह्मणतील, परंतु पुढें महादजी मोठा सरदार, मुत्सद्दी व कार्यकर्ता झाला, त्याचें कारण त्याचे पूर्ववयांत त्यास जें शिक्षण मिळालें तें होय. हें शिक्षण पुस्तकी नसून प्रत्यक्ष होतें. विशेष जबाबदारी शिरावर नसतां या मराठ्यांचे वैभवाचे काळांत त्याला हिंदुस्थानचीं सर्व कारस्थानें दृष्टीस पडत होतीं. तो आपल्या बंधूंबरोबर अगर पेशव्यांबरोबर बहुतेक स्वाऱ्यांत असल्यामुळें मराठ्यांचा विजय कसा होत होता व पानिपतचें संकट महाराष्ट्रावर कां ओढवलें, हेंही तो लक्षपूर्वक पहात होता. जात्या धूर्त पुरुषास याहून जास्त शिक्षणाची जरूर नव्हती. या दोन तीन प्रकरणांत जो इतिहास दिला आहे त्याचा महादजीच्या पुढील एकंदर राज्यकारस्थानांशीं निकट संबंध आहे, असें वाचकांस दिसून येईल; इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानचें आधिपत्य जें पुढें महादजीकडे आलें त्यांत, त्याच्या ज्या वीरबंधूंनीं आपले प्राण धारातीर्थीं अर्पण केले, त्यांचा किती अंश आहे, हेंही स्पष्ट दिसणार आहे. महादजी एकदम मोठा मुत्सद्दी व सरदार बनला नाहीं, तर त्याचे लहानपणींच त्याला जें शिक्षण मिळालें त्यामुळेंच तो पुढें आला. नानासाहेबांचे कारकी-

१ प. व या. ३५१, ३५२, ३७६, ३६६.

Eight—Circled. 2 Amplification; embellishment. Leaving not at tedious length!

र्दीत मोठमोठे नामांकित वीर व मुत्सद्दी त्याचे डोळ्यांपुढें होते, हेंच त्याच्या पुढील वैभवाचें कारण झालें.

याप्रमाणें बाळाजीपंताच्या राजकीय शहाणपणानें मराठ्यांचा दिग्विजय झाला होता. तथापि बंगाल, प्रयाग व काशी या प्रांतांवर पेशव्याचा डोळा होता. कसेंही करून हे प्रांत साध्य करण्याची त्याची इच्छा होती, ह्मणून त्यानें दत्ताजीस त्याप्रमाणें लिहिलें. सुजाउद्दौल्याकडून ५० लाख रुपये घेऊन त्याचे सहाय्यानें बंगालप्रांत घ्यावा असा पेशव्याचा बेत होता. यावेळीं सुजाउद्दौल्यानें गाझीस काढून आपणास वजीरी दिल्यास ५० लाख रुपये देण्याचें दत्ताजीजवळ कबूल केलें होतें. व त्याचप्रमाणें नजीबखानानें पुनः बक्षिगिरी दिल्यास ३० लाख रुपये देण्याचें बोलणें लाविलें होतें. परंतु गाझीउद्दीनास आपणच वाढविलें असून त्यास काढणें बरोबर दिसणार नाहीं व त्याची आपणास केव्हांही भीति नाहीं हें लक्षांत आणून त्यास काढूंनये असें पेशव्याचें ह्मणणें होतें. सुजास वजीरी दिल्यानें तो व त्याचे स्नेही जाट एकत्र होऊन मराठ्यांस भारी जातील यासाठीं त्यास देणें ती फार विचार करून द्यावी व तो अयोध्येंत मजबूत असून, हल्लीं ज्यांत कांहीं राम राहिला नव्हता, असें वजीरीचें पद तो मागतो, तेव्हां त्यांत कांहीं तरी लबाडी असावी असा बाळाजीपंतास संशय आला. परंतु ही वजीरीची मसलत सहसा घडून येण्याचा संभव नाहीं, हें पेशव्यास वरच दिसत होतें. यासाठीं दादासाहेबांजवळ कबूल केल्याप्रमाणें वजीराकडून अयोध्या, प्रयाग व काशी, हीं हिंदुधर्माचीं मुख्य पवित्रस्थानें काबीज करून घ्यावीं व त्यांबद्दल सुजाला कांहींतरी बंगाल्यापैकीं प्रांत द्यावा असा पेशव्याचा विचार होता. " पुढीलसालीं दादासाहेबांस पाठवून देतों. तुह्मीं अगोदर वजीरास किंवा सुजास घेऊन बंगाल्याकडे जावें " असें पेशव्यानें लिहिलें. परंतु या सर्व मसलती दत्ताजी शिंद्याचे चुकीनें जागच्याजागीं राहून मुसलमानांत एकी होऊं लागली.

नजीबखानाचें पारिपत्य करावें, असा पेशव्याचा फार आग्रह हो

1 Plan, Scheme, 2 Concerted design, 2 Never, no account. 1'

ता व त्याच्या तीस लाखांच्या खटपटीला पेशव्यानें पाठविलेलें उत्तरही खरमरीत व स्पष्ट आहे.

"नजीबखानास बक्षिगिरी दिलीयास तीस लाख रुपये देतों ह्मणोन लिहिलें ऐशीयास–नजीबखान पुरा हरामखोर बाट आहे. गुदस्तां चिरंजीव दादांशीं कांहीं त्याची मजा राहिली नाहीं. तो दिल्लीस प्रविष्ट जाहल्यास, अवदल्लीचेंच दिल्लींत पक्कें ठाणें बसलें असें जाणावें. बेमान हरामखोर आहे. त्यास वाढविणें सर्पास दूध पाजण्याप्रमाणें आहे. फाविले मानीं त्याचें पारिपत्यच करावें. नजीबखान बाट, अर्धा अवदल्ली, त्याचें राजकारण न करावें" अशी पेशव्याची सक्त ताकीद असतांही, दत्ताजीनें होळकराचे बोलण्यास लक्ष देऊन, महाराष्ट्रावर मोठें संकट ओढविलें. नजीबखान मराठ्यांचा पुरा शत्रु आहे हें पेशव्यास कळलें होतें, परंतु मल्हाररावाच्या दुष्ट उपदेशाप्रमाणें दत्ताजीनें वर्तन केलें. पण अखेरीस नजीबखानानेंच दत्ताजीचा शेवट केला! यावेळीं जनकोजी शिंदे, नारो शंकर, अंताजी माणकेश्वर वगैरे सरदारांचा बेत नजीबाचें पारिपत्य करण्याचा होता, परंतु दत्ताजी कोणाचेंही ऐकेना. त्यानें गोविंदराव बुंदेल्याचे मार्फत नजीबाशीं सलुख्याचीं बोलणीं लाविलीं. तथापि वरकांति गोडगुलाबी दाखवून, त्या महाकपटी रोहिल्यानें मराठ्यांचे सत्तेचा नाश करण्याच्या मसलती चालविल्या होत्या. पेशव्याचे ह्मणण्याप्रमाणें मराठ्यांचा व सुजाचा बंगालच्या मोहिमेचा बेत होण्याचे अगोदरच त्यानें सुजास आपल्या बाजूस घेतलें व त्याचप्रमाणें मराठ्यांचा शत्रु विजयसिंगजोधपूरवाला, फरकाबादचा नवाब व खुद्द बादशहा यांशीं ही मसलती करून, बादशहाकडून अवदल्लीस परत बोलाविलें. परंतु सरळ मनाच्या दत्ताजी शिंद्यास हें कपट कांहींच समजलें नाहीं!

पेशव्याची मसलत यासालीं बंगाल्यावर होती. वजीर व सुजाउद्दौला यांचे सहाय्यानें नजीबखानाचें पारपत्य करून बंगालची मोहिम करावी व कांहीं मुलुख सुजास देऊन प्रयाग, काशी वगैरे प्रांत आपले ताब्यांत घ्यावे अशी मसलत ठरली होती. इ.स. १७५७त, अव-

---

१ प. व या. ३६२, ३८७, भा. सा. व. ४४१४५.

Blunt Smart - 2 Faithless, false. 3 Knavish Clever Friendly terms.

दल्लीनें दिल्लीची राखरांगोळी चालविली, तेव्हां इंग्रजांनीं प्लासीची लढाई जिंकून हिंदुस्थानच्या राज्याचा पाया घातला होता. परंतु पेशव्याची मसलत जर सर्व सिद्धीस जाती तर, हिंदुस्थानचे इतिहासाचें स्वरूप अगदीं पालटलें असतें. अवदल्लीच्या तोंडावरचा व नवीन जिंकलेला, असा जो लाहोरप्रांत, त्याचा बंदोबस्त उत्तम ठेऊन नंतरच हीं कारस्थानें हातीं घ्यावीं अशी पेशव्याची दत्ताजीस सूचना होती. तो बंदोबस्त करून मुख्य फौज दिल्लीस जमवावी व नंतर सुज्याच्या मदतीनें बंगाल साधावा असा विचार होता. परंतु दत्ताजीनें नजीबाशीं स्नेह करून सर्व मसलत बुडविली. पंजाबाचा बंदोबस्त राहिला नाहीं व सुजाउद्दौल्याशींही सलुखा जमविला नाहीं, यामुळें पंजाब हां हां ह्मणतां गेला व सर्व हिंदुस्थानांतील मुसलमान सरदार मराठ्यांविरुद्ध एकत्र झाले. ही सर्व मसलत अल्पस्वार्थासाठीं मल्हाररावानें दिली व दत्ताजीनें ऐकिली. ह्यांतच मराठ्यांच्या पुढील नाशाचें बीज समजावें. दत्ताजी केवळ शिपाई असें जें पेशवा ह्मणे तेंच अखेरीस अनुभवास आलें. नजीबखानाचे सहाय्यानें गंगा पार होऊन सुजाउद्दौल्याच्या मुलखावर स्वारी करण्याचा दत्ताजीनें बेत केला. परंतु सुजा व नजीब आंतून एक झाले व अबदल्लीची स्वारी निघाली, हें दत्ताजीच्या समजण्यांतही आलें नाहीं. नजीबखानानें मराठ्यांस हुलकावण्या दाखवून, तो गंगातीरीं, मीरपूरनजीक शुक्रताल ( शुकतेल ) च्या किल्यांत जाऊन राहिला व सुजाउद्दौल्यास त्यानें गनीमांविरुद्ध तयार होऊन आपणास मदत करण्याबद्दल विनंति केली. त्यानें दत्ताजीस फसविलें व अकस्मात् अयोध्येच्या मोहिमेबद्दल 'बाजत बरसात देखलेऊं' असें उत्तर पाठविलें. दत्ताजीसमोर शपथ घेऊन, अयोध्येवर जाण्याच्या बेताला एक पुरा महिनासुद्धां लोटला नव्हता, तोंच हें उत्तर पाहून दत्ताजीचे डोळे उघडले व आपण पेशव्यांचें ऐकिलें नाहीं व होळकरांचें ऐकिलें, यागोष्टीबद्दल त्यास खेद वाटला. दत्ताजीनें नजीबाचा सूड घेण्यासाठीं तावडतोब रोहि-

१ प. व या. ३६२, ३७३, ३८८, ३८७. हीं पत्रें फार महत्वाची आहेत. यांतील एकंदर महत्वाच्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्यामुळें मराठ्यांवर पुढील संकट आलें.

1 Misleading statements

त्यांच्या मुलुखावर फौज घातली व थोड्याच दिवसांत, १२०० गांवें उध्वस्त करून टाकिलीं. सर्व रोहिलेलोक पळाले व कमाऊन पहाडाकडील तराई नामक जंगली प्रदेशांत शिरले. शिंद्याच्या फौजेनें पुढें शुक्रतालास वेढा दिला, परंतु किल्ला चार महिने हातीं येईना. एकादिवस नजीबखानाची फौज बाहेर पडली तेव्हां मोठीच लढाई झाली व त्यांत जनकोजी व दत्ताजी ह्या दोघांसही वार लागले. या लढाईत शिंद्याकडील जिवाजी व हणमंतराव शिंदे हे सरदार ठार झाले. मराठ्यांचे सात आठशें लोक पडले व शेंकडों लोक जखमी झाले. याप्रमाणें दसरा होईपर्यंत हकीगत चालली. इतक्यांत अहमदशहाच्या स्वारीच्या वातम्या येऊं लागल्या. नजीबाची व सुजाची फौज एकत्र होऊं देऊंनये, या बेतानें दत्ताजीनें गोविंदपंत बुंदेले, अंताजीमाणकेश्वर, भोइटे, तुकोजी होळकर वगैरे सरदारांस २० हजार फौजेसह हरिद्वारावरून गंगेपार केलें होतें. परंतु त्यांचा उपयोग न होतां, सुजाउद्दौला मोठ्या फौजेसह येऊन नजीबास मिळाला.

पुढें रोहिले व नबाब यांच्या फौजा जमल्यावर त्यांची बळकटी झाली. तरी दत्ताजीची त्यांस फार भीति होती. यासाठीं दत्ताजीला कपटानें ठार मारावें असा त्यांनीं बेत करून, तह करण्याचे मिषानें खाश्या मंडळीसह त्यानें आपल्या डेऱ्यास यावें असा त्यांनीं घाट घातला. परंतु नारोशंकर वगैरे धूर्त मंडळीनें दत्ताजीचें जाण्यास हरकत घातली, त्यामुळें दुष्टांचा हेतु तडीस गेला नाहीं. दत्ताजीला त्यांनीं तहाच्या बोलण्यावर गुंतवून ठेविलें व तो एकटा सांपडला आहे, दुसरी मराठी फौज जवळ नाहीं, याकरितां तावडतोब येण्याबद्दल अबदल्लीस ही लिहिलें. त्याप्रमाणें अबदल्ली झपाट्यानें पंजाब उतरून पुढें आला. पंजाबांतले मराठे सरदार त्र्यंबक बापूजी शत्रूंच्या हातीं सांपडले व साबाजी शिंदे, लक्ष्मी नारायण वगैरे मंडळी पळत पळत कुरुक्षेत्रावर आली. तोंच पाठीवर कर्नाल येथें गिलच्याचे सैन्यानें तळ दिला.

इकडे अंतर्वेदी, दिल्ली वगैरे प्रांतांतीलही मुसलमान सरदार शत्रूकडे मिळूं लागल्याच्या वातम्या सुटल्या व शिंद्याचें नजीबाशीं युद्ध चाललें असतांच, अबदल्लीच्या नांवचीं बादशहाच्या स्वदस्तुरचीं पत्रें

वजीर गाझीउद्दीन यास मिळालीं. हीं पत्रें, अबदल्लीचें कर्नोलवर येणें, मुसलमान सरदारांचें व बादशहाचें संगनमत, व मराठ्यांचा कमजोर पहातांच, वजीर फार घाबरला व त्याणें अलमगीर बादशहास ठार मारण्याचा बेत केला.

हा बादशहा धार्मिक व भोळा होता असें पाहून, गाझीनें त्याला असें सांगितलें कीं, शहराबाहेर एका एकांतजागीं एक मोठा 'अवलिया आला असून तो मोठा साधू आहे. बिचाऱ्या बादशहास तें सर्व खरें वाटून, तो त्या अवलियाची खासगी रीतीनें भेट घेण्याकरितां एक रात्रीं त्या जाग्यावर थोडक्याच लोकांनिशीं गेला. त्याचे एक दोन हुजरे मात्र बाहेर उभे राहिले. बादशहा अवलियाचे भेटीसाठीं तेथें एक पडदा लाविला होता, त्याचें आंत गेला. थोडक्याच वेळानें आंतून ओरडणें ऐकूं आलें व कांहीं दगा आहे असें वाटून हुजरे आंत जाऊन पहातात तोंच, दोन तीन मारेकरी रक्त बंबाळ नागव्या तरवारीनिशीं एकदम बाहेर पळाले. बादशहाचें शीररहित धड मात्र जमिनीवर पडलें होतें. दुष्टांनीं शीर मागें नदींत फेंकून दिलें होतें! हें अघोर कृत्य करून गाझीउद्दीन अबदल्लीच्या भयानें खून चढलेल्या मनुष्याप्रमाणें दिल्ली सोडून पळाला व जाटांच्या आश्रयास जाऊन राहिला. ( ३० नवंबर १७५९ ).

असें भयंकर कृत्य करून गाझीनें स्वतःच दत्ताजीस भेटून "दुराणी समीप आले, त्वरा करोन या प्रांतांतून निघून जा, सर्व मुसलमान एक झाले, आतां तुमचा निभाव लागणार नाहीं," असें सांगितलें. त्यावरोबर होळकर जयपुरास होते त्यांस दत्ताजीनें तातडतोब बोलाविलें व आपण घाईनें यमुना उतरून कुंजपूर येथें तळ दिला. ह्या दुष्ट गाझीचा उपदेश ऐकते तरी मराठे निभावते, परंतु वृथाभिमानास पेटून त्यांनीं सर्व नाश करून घेतला.

दत्ताजीचे फौजेनें कुंजपूर शहरासमोर यमुना उतरून अलीकडे तळ दिला, तोंच अहमदशहाचा तळ कुरुक्षेत्राच्या मैदानांत झाल्याची बातमी आली. अहमदशहाच्या व रोहिले वगैरे इतर मुसलमान सरदारांच्या फौजांची गांठ पडण्याच्या अगोदरच अफगाणांशीं टक्कर द्यावी

1 A Sage, 2 Madness considered a sort ie retribution by the avenging deities ... become bloodthirsty from having killed a person. 3 Happy Prospect said

असा निश्चय करून दत्ताजीनें बुणगें, मुलेंमाणसें व जनकोजी शिंदे आणि गाझीउद्दीन यांस दिल्लीस रवाना केलें व आपण सडा राहिला. दुसरे दिवशींच मराठे सरदारांची सभा जमून अबदलीवर जाण्याचा निश्चय झाला. पुढें टेहळणीकरितां अंताजी माणकेश्वरचा मुलगा व जिवाजी व नाईकजी भोईटे आणि गोविंदपंत बुंदेले यांस १५००० फौजेनिशीं पुढें पाठवून, बाकीची फौज घेऊन दत्ताजी मागाहून निघाला.

मागाहून दत्ताजीहि निघाला तोंच, पहिल्यानें अपशकून झाला. पंजाबांत त्रिंबक बापूजीचीं पथकें गिलच्यांनीं कैद केलीं होतीं. त्यांस त्यांनीं कुरुक्षेत्रापर्यंत बरोबर आणिलें होतें. तो तळ सोडल्यावर अबदलीनें त्या उपासमार झालेल्या कैदी लोकांस शिंद्याकडे पाठविलें. तीं सर्व मरणोन्मुख, नागवींउघडीं माणसें प्रथम दर्शनीं दत्ताजीच्या पुढें आलीं. त्यांच्या पोटाची तजवीज करून शिंदे पुढें चालले. ते जाऊन पोंचण्यापूर्वींच पुढें गेलेल्या लोकांची व दुराणीची लढाई सुरू झाली. अबदलीनें आपलें सर्व जड सामान यमुनेपार केलें होतें व तो केवळ सडा होऊन मराठ्यांवर माघारा फिरला. थोडीशी चकमक झाली तोंच, मराठ्यांनीं धास्ती खाऊन निशाणें फिरविलीं व एकदम पळण्यास सुरुवात केली. त्याबरोबर गिलच्यांनीं पाठलाग करून कत्तल सुरू केली. शिंद्याची फौज भीतीनें इतकी घाबरली कीं, तिनें जरासुद्धां शस्त्र चालविलें नाहीं. दत्ताजी शिंदे पोंचतात तोंच, सुमारें २५०० मराठे मारले गेले होते. पुढचा पळ दृष्टीस पडतांच दत्ताजीच्या तुकडीनेंही धूम ठोकिली. थोडावेळ पाठलाग करून दुराणी फौज अनुपशहर येथें छावणीस गेली व तेथें त्यांस नजीबखान, सुजाउद्दौला व अनुपशहरकर अहमदखान लंगडा पठाण आपआपल्या फौजांसह येऊन मिळाले. शत्रूची फौज सुमारें एक लक्ष चाळीस हजार जमा झाली. त्यांत सुजाची फौज फार होती.

दत्ताजीची फौज विमुख होऊन माघारी फिरली व दिल्लीजवळ तिचा तळ पडला. तेथें गाझीउद्दीनाला धीर देऊन दत्ताजी हा होळकराची वाट पहात राहिला. दत्ताजीला आपल्या फौजेचा मोड झालेला पाहून फार त्वेष आला होता व त्यानें जिवावर उदार हो-

7

The Suttlers & followers & baggage of an army. 2 A body of horse 3 of ... 3 Having the face averted or turned from 4 anxious apprehensive

ऊन, कांहीं सोक्षमोक्ष होवो, अफगाणांशीं पुरी टक्कर द्यावी, असा निश्चय केला. त्यानें बुणगें व कबिले माळव्यांत पाठविण्याचा निश्चय केला व सुरजमल्लाचा वकील रूपराम कटारी यास बरोबर देऊन, त्यांस वाटेस लाविलें.

इकडे अहमदशहा, नजीबखान, सुजाउद्दौला, कुतुबशहा, अहमदखान लंगडा पठाण व दुंदेखान वगैरे सर्व मुसलमान सरदारांची फौज अंतर्वेदींत चालू होऊन, त्यांनीं यमुनातीरीं तळ दिला. दुसऱ्या बाजूसच मराठे उतरले होते. ती प्रचंड सेना पाहून अगोदरच शिंद्याची फौज भयग्रस्त झाली होती, तथापि तिशीं तोंड देण्याचा शिंद्यानें निश्चय केला होता. दत्ताजीनें राजघाट वगैरे दिल्लीजवळील दोन तीन घाटांचा उतार पाहिला, परंतु मिळाला नाहीं. यामुळें ती रात्र तेथेंच घालविण्याचा निश्चय करून, घांटरक्षणार्थ जानराव वाबळे व मालोजी शिंदे यांस नेमिलें. मुसलमान फौजेनें त्या रात्रीं कांहीं यमुना उतरण्याचा प्रयत्न केला नाहीं. दुसरे दिवशीं मराठे घांटावर तोंड देऊन राहिले. पण शत्रूंच्या तोफांच्या मारापुढें निरुपाय होऊन, जानराव वाबळे यानें त्वरेनें कुमक मागितली. तेव्हां दत्ताजीनें सांबाजी शिंदे याचा मुलगा बयाजी शिंदे, यास ९ हजार फौज देऊन घांटावर पाठविला. हा तरूण सरदार नुक्ताच अबदल्लीचा मार खाऊन पंजाबांतून पळून आला होता. यामुळें त्याचें धैर्य अगोदरच पळालें होतें. घांटावर येतो तोंच, दुराणी लोक नदी उतरून आलिकडे आले होते. त्यांच्याशीं नीट बेताबेतानें लढाई न करतां, बयाजी शिंदे यानें आपला घोडा एकदम पुढें घातला, त्याबरोबर गोळी लागून तो नदीच्या तीरावरच खालीं पडून प्राणास मुकला.

हें वृत्त कळतांच दत्ताजीनें शत्रूवर स्वतः चाल केली. तथापि शत्रूला एकदमच तोंड देण्याचा त्याचा बेत नव्हता. यासाठीं त्यानें आपली फौज यमुनेच्या ओतांतून अडचणींत नेली. तेथें शेरणीचीं बेटें फार वाढलीं होतीं, यामुळें व खांचखळग्यामुळें, सर्व फौजेस प्रसंग पडल्यास एके ठिकाणीं जमा करणें कठीण होतें. दत्ताजीचें निशाण हळूहळू यमुनेपर्यंत पोंचलें. इतक्यांत मुसलमान फौजेनें एकदम

तोफांची सरवत्ती देऊन मराठ्यांवर घोडे घातले. त्याप्रसंगीं तेथें मोठी निकराची चकमक सुरू झाली. इतक्यांत राजगडचे घांटावर मालोजी शिंदे यांची टोळी होती, तिजवरही दुराणी फौजेनें हल्ला करून मराठ्यांची कत्तल केली व खुद्द मालोजी शिंदे ठार झाले. त्याचप्रमाणें गोविंदराव बुंदेले, याचे टोळीचीही तीच दुर्दशा झाली. हें समजतांच, दत्ताजी केवळ जिवावर उदार झाला. अन्नु गमाऊन तोंड फिरवावें, त्यापेक्षां जीव गेलेला बेहत्तर, असा कृतसंकल्प करून दत्ताजीनेंही आपला घोडा पुढें घातला. इकडे मराठ्यांच्या निशाणापाशीं मोठी निकराची खणाखणी चालली होती. त्यांत जनकोजी शिंदे लढत होते. त्यांचे उजवे दंडास गोळी लागून त्यांस घेरी आली व ते खालीं पडले. बाबासाहेब गोळी लागून पडले, हें वर्तमान समजतांच दत्ताजीस फारच दुःख झालें. "बाबा आह्मांस सोडून गेले. आतां आह्मांस देशीं तोंड दाखवावयास येणार नाहीं. रणांत मृत्यु आला तर उत्तम आहे, नाहींतर वीष भक्षून प्राण द्यावा," असे उद्गार काढून वीस पंचवीस घोड्यांसह दत्ताजीनें शत्रूंवर हल्ला केला. त्या गडबडींत यशवंतराव जगदळे थोराळेकर, यांस गोळी लागून ते ठार झाले, तेव्हां त्यांचा मुलगा पिराजी जगदळे हा बापाचा मुर्दा शत्रूंचे हातीं न जावा ह्मणून, दत्ताजीस हाक मारूं लागला. दत्ताजी आपल्या लालमणि नांवाच्या घोड्याचें तोंड फिरवतो न फिरवतो इतक्यांत, एक गोळी येऊन त्याच्या उजवे बगलेच्याखालीं बरगडींत घुसली; त्यासरसा दत्ताजी घोड्याखालीं आला. तेव्हां राजाराम चोपदार व राघोराम पागे हे जवळ होते, त्यांनीं त्या गर्दींत व लढाईच्या भरांत आपल्या धन्यास सांवरून धरिलें. दत्ताजीचा प्राण गेला नव्हता. इतक्यांत शत्रूकडील कुतुबशहा नामक सरदाराचा हत्ती तेथेंच येऊन ठेपला. त्यास ही दत्ताजी बोवांची स्थिति सांगितली असतां तो पाटिलांस वांचवील, या आशेनें त्यांनीं त्याची विनवणी केली. त्याबरोबर तो खालीं उतरोन दत्ताजीजवळ आला व "पटेल, हमारेसाथ तुम् और लडें गे?" अशा कठोर शब्दांनीं त्यानें पाटलाला हिणविलें. परंतु जिवावर उदार झालेला तो

A volley or a rapidly consecutive discharge
A determined resolve 3 Giddiness

103138

शूर दत्ताजी, विद्ध झाला होता, तथापि त्याचा मानी स्वभाव शेवटपर्यंत कायम होता. "इनूशहाअखनल्ला! बचेंगे तो और बी लढेंगे," हें त्या शूर पुरुषानें कुतुबशहास योग्य उत्तर केलें! त्याबरावर कुतुबशहास राग येऊन त्यानें कमरेचा सुरा काढला व राघोराम पागे व राजाराम चोपदार हे, पाटलास वांचविल्यास एक कोट रुपये देतों, अशी पायधरणी करीत असतां असतांच, त्या क्रूर व निर्दय पठाणानें, दत्ताजीस लाथ मारून पालथें पाडिलें आणि त्याचें शीर कापून घेतलें. व एवढें महत्कृत्य केलें त्याबद्दल शिफारस मिळविण्यासाठीं त्यानें तें शीर नजीबखान रोहिल्यास नजर केलें! याप्रमाणें या शूर, स्वामिभक्तिपरायण, एकवचनी व अभिमानी पुरुषाचा शेवट झाला! दत्ताजी शूर होता खरा, परंतु दूरवर दृष्टि देऊन कोणतेंही काम करीत नसे, यामुळें त्याचा असा नाश झाला.

दत्ताजी व जनकोजीबाबा पडल्याचें वर्तमान फौजेंत पसरलें. तेंव्हां निशाण माघारें घेऊन, फौज अडचणीचा जागा सोडून मैदानांत आली. इकडे तळावर लक्ष्मीनारायण, पंजाबचे सुभेदाराचे दिवाण, पांचहजार फौजेनिशीं उभे होते. त्या सर्वांभोंवतीं रोहिले व दुराणी लोकांनीं गराडा घातला. बाकीच्या मराठे फौजेनें पळ सुरू केला व त्यांच्या पाठीवर दुराणीही निघाले. मराठे लोक पळाले तरीं, आतां मराठीकाव्याप्रमाणें परततील, अशी लक्ष्मीनारायण यास आशा होती, पण आतां तर मराठ्यांनीं पुराच क़ावा केला. जे पळाले ते पुनः मागें सुद्धां फिरून त्यांनीं बघितलें नाहीं! दुराणी फौजेनें तळावरील सर्व चीजवस्त लुटून एकंदर माणसांची कत्तल केली. जनकोजीबाबा घायाळच होते, त्यांस येसू भोईटे व जानराव वाबळे, यांनीं घोड्यावर घालून पलायन केलें. या दोन तीन तासांच्या लढाईत, सुमारें ८००० मराठ्यांची क़त्तल झाली[1] व त्यांचा सर्व गोट लुटून फस्त

[1] या लढाईंत महादजी शिंदे होता व तो पळून गेला, असें ग्रांड डफ म्हणतो. परंतु त्याला आधार नाहीं. (G. Duff 312.) महादजी यावेळीं दक्षिणेंत असावा, कारण पुढें तो व तुकोजी शिंदे असे दक्षिणेंतून भाऊसाहेबांबरोबर आले असा दाखला मिळतो. ( भा. सा. ब. ९०. )

(Upside down.. 2 Devoted to the ... Matter. ~ Left .. Things, chattels, ... baggage

झाला. मराठे पराभव पावून पळाले हें वर्तमान कळतांच, गाझीउद्दीन दिल्लीच्या किल्यांत होता, तो घाबरला व त्यानेंही दिल्ली सोडून कालिकाभवानीकडून पळ काढिला. सुमारें पांच कोसांवर त्याची व जनकोजीची भेट झाली.

इकडे शिंद्याची फौज पळत पळत जी निघाली, तिला दिल्लीपासून २१ कोसांवर दोन दिवसांपूर्वी रवाना केलेलीं मुलेंमाणसें व बुणगें, हीं भेटलीं. या पळांत शिंद्याचे फौजेचे फार हाल झाले; दत्ताजीची बायको भागिरथीबाई व जनकोजीची बायको काशीबाई यांणीं याप्रसंगीं फार धारिष्ट दाखविलें[1]. या पळत आलेल्या फौजेची व होळकराच्या फौजेची रेवारीजवळ गांठ पडली. होळकर यावेळीं जयपूर प्रांतांतून दिल्लीकडे दत्ताजीच्या मदतीस येतहोतो[2]. शिंदे यांची लढती शूर फौज अशी नाश होऊन आलेली पाहून, होळकराचे मनास मोठा धक्का बसला व अफगाणांपुढें आपल्या खानदेशी लोंकांचा निभाव कसा लागतो असें त्यास झालें. यानंतर शिंद्यांची मोडकी फौज व होळकराचें लष्कर मिळालें व त्यांनीं केरोलीच्या राजाच्या आश्रयानें सर्व बुणगें व बायका मुलें, यांस माळव्यांत रवाना केलें. चमेलीवर दत्ताजीचा दहावा दिवस पडला. तेथें क्रियाकर्म करून, कुपारीनदीच्या कांठीं ही मंडळी येऊन पोंचली. त्याच दिवशीं भागीरथीबाई प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. खुद्द जनकोजी व मल्हारराव आपल्या सड्या फौजेनिशीं मागें राहिले, व दुराणीभोंवत्या गिरक्या घालून गनीमी काव्यानें त्यास जेरीस आणावा, असा बेत करून ते प्रथम मारवाडांत गेले.

मागें दुराणी लोकांनीं दिल्ली सर करून तेथें मुकाम केला व कांहीं निवडक सैन्यास होळकरावर पाठविलें. मराठ्यांस त्यांच्यापेक्षां जलदीनें कूच करणारे लोक हिंदुस्थानांत अद्यापि कोठें भेटले नव्हते, परंतु स-

---

१ भा. सा. ब. ७४–७७. ह्या पळाचें हृदयद्रावक वर्णन प्रत्येकानें वाचण्यासारखें आहे. २ ग्रांट डफचें ह्मणणें कीं, होळकर दत्ताजीचे पराभवाचे वेळीं जयपूर प्रांतांत नसावेत व ते एकदम दिल्लीजवळ गेले हें ही असंभवनीय दिसतें, परंतु भाऊसाहेबांच्या बखरविरून होळकर व शिंदे, यांच्या फौजांची हालचाल स्पष्ट होते.( G. Duff- 3-2 note; भा. सा. ब. ७७-८०; हो. कै ३३.)

funeral rites & solemnities, obsequial rites performed immediately after death.

ह्याद्रीच्या डोंगराळ मुलुखापेक्षां विकट मुलुखांत राहणारे काटक व हाडाचे मजबूत, अफगाण लोक प्रसंगीं कच्चे चाळीस कोसांची मजल मारीत! यामुळें मराठ्यांच्या गनीमी काव्याचा उपयोग मुळींच झाला नाहीं. जेथें जेथें मराठे पळत, तेथें तेथें मुसलमानांची फौज पाठीवर हजर राही. मराठ्यांच्या फौजांस पळतां पळतां दे माय धरणी ठाव झालें. शिंदे होळकराची फौज मारवाडांत नागोरकडे गेली, तों गिलचे पाठीवर आले; तेव्हां ते पानिपत–नर्नोलकडे गेले. अफगाण लोक तिकडे जातांच, मराठे दिल्लीकडे वळले व तेथून आग्र्याकडून जयनगर प्रांत वलांडून उदेपूरच्या रोखें मराठी फौज चालली. पण दुराणी फौज पाठीवर होतीच. गनीमी काव्यानें शत्रु जेरीस न येतां, मराठेच जेरीस आले. पुढें मराठ्यांनीं आपली फौज एकाएकीं मागें वळवून, अंतरवेदींत शिकंदरशहरावर हल्ला केला व मोठी लूट मिळविली. (१७५९ मार्च.). त्यादिवशींच तेथें शिमगी पौर्णिमा पडली, यामुळें आपलें दुःख विसरून सर्व मराठे सणाच्या गमतींत होते, इतक्यांत सुरजमल्ल जाटानें "दुराणी आले, पळा!" असा घाईचा निरोप पाठविला. होळकराचे फौजेनें दुराणी अजून पाहिले नव्हते. यामुळें शिंद्यांनीं आपला अनुभव सांगितला तरी तो मनास न आणितां, मल्हाररावानें दुराणीशीं तोंड देण्याचा निश्चय केला. पुढें शिंदे व मल्हारराव यांनीं, आपली कांहीं फौज मागें फिरवून, आग्र्या नजीक आणिली; बाकी होळकराची फौज गंगाधरपंत, शेटियाजी खराडे, संताजी बावळे वगैरे सरदारांबरोबर होती, तिला दुराणीनें गांठून कांहीं वेळ चकमक झाली. सुमारें हजार पांचशें मनुष्य पडल्याबरोबर, होळकरी फौजेचा धीर सुटून पळण्यास सुरवात झाली. मराठे पळतात हें गिलच्यांस पक्कें ठाऊक झालें होतें, ह्मणून अगोदरच त्यांच्या पळण्याच्या वाटेवर त्यांनीं फौज ठेविली होती. तिनें या पळत आलेल्या खानदेशी शिपायांची रांगोळी उडविली व शेंकडों लोक मारले. हा पळ आग्र्यास पोंचतांच, मल्हाररावानें व शिंद्यांनें पुनः आग्रा सोडून जयपुरचा रस्ता धरिला. पाठीमागें दुराणी लोक होतेच. याप्रमाणें एका जाग्याहून दुसऱ्या जाग्यावर

1 Hardy. Grind

पळत पळत दोन महिने काढले. ज्येष्ठाचे सुमारास, यमुनानदीस पाणी चढून उतार बंद झाला. यामुळें दुराणी फौजेनें अंतरवेदींत कालजेश्वर येथें छावणी केली व मराठ्यांच्या राहिलेल्या फौजेनें जयपूर व केरोलच्या आसपास तळ दिला. ( १७५९ जून. )

शिंद्यांचे फौजेचा मोड झाल्याचें वर्तमान दक्षिणेंत गेलेंच होतें व होळकराचीही तीच दशा झाल्याची वातमी पेशव्यांस पोंचली. शिंदे, होळकरांचीं निकडीचीं पत्रें आल्यामुळें, पेशव्यांनीं हिंदुस्थानांत फौज पाठविण्याचा निश्चय केला व स्वारीस रघुनाथरावांनीं जाण्याचें ठरलें[1].

मागें रघुनाथरावदादासाहेबांच्या थोरल्या मोहिमेची हकीकत सांगितलीच आहे. यास्वारींत राघोबांनीं भगवा झेंडा अटकेवर रोंविला खरा, परंतु खजीन्यास काडीभरही भर न घालतां एक कोट रुपये जास्त कर्ज मात्र केलें. ह्यावेळीं पेशव्यांच्या ज्या सर्व हिंदुस्थानभर मुलुखगिऱ्या होत, त्यांचा मोठा खर्च होई व शिंदे, होळकर, अंताजी माणकेश्वर, बुंदेले वगैरे सरदार हिंदुस्थानांतील महालांचे उत्पन्नाचा नीट हिशेब देत नसत. यामुळें पेशव्यांस कर्जाचा पेंच भारी पडला होता. त्यांतच हें नवें कर्ज पाहून कारभारी सदाशिव चिमाजी उर्फ भाऊसाहेब यांस फार राग येऊन, त्यांनीं रघुनाथरावास शब्द लाविला. तें रघुनाथरावांस सहन न होऊन, तेही कांहीं परत बोलले. त्यामुळें यापुढें "मी मुलुखगिऱ्या करतों, तुह्मीं कारभार पहावा" असें भाऊंनीं रागानें भाषण केलें. नानासाहेबांनीं प्रयत्न केला, तरी भाऊ व दादा यांची समजूत पडेना. याशिवाय पेशव्यांची बायको गोपिकाबाई भाऊंला पाण्यांत पहात असे. तिच्या मनांत भाऊंनीं कारभार केला, तर आपले तिघे मुलगे मागें पडतील, अशी शंका येऊन ती भाऊंचा द्वेष करी. शिवाय, भाऊ घरांतून रुसून गेले होते वगैरे गोष्टी सर्वांच्या मनांत वागत होत्या. भाऊसाहेबांनां ही बाई आपला द्वेष करते हें माहीत होतें. ह्मणून त्यांनीं तो द्वेष दूर होण्यासाठीं पेशव्यांचे तिन्ही मुलांच्या शिक्षणावर स्वतः नजर देऊन, त्यांस हुषार करविलें व आपण कारभार करीत असतां विश्वासरावास सर्व कामकाजाची ते माहिती

१ Price's Diary, Forrest Vol. 1 134.

करून देत असत. भाऊंची या तिघांमुलांस चांगली शिक्षा होती व त्याचीं चांगलीं फळें थोरले माधवरावानें दाखविलींच. भाऊंला मूलबाळ कांहीं नव्हतें यामुळें तर पेशव्यांचे पुत्रांवर त्यांची फार ममता होती. परंतु बायकांच्या कोत्या समजुतीप्रमाणें घरांत नेहमीं खुसखुस चालत असे. अखेरीस पुढील मोहीम आपण करावी, या इराद्यानें भाऊनीं शके १६८१ आक्टोबर १७५९ सालीं विजयादशमीचे मुहूर्तें[1] वानवडीवर डेरे दिले व रघुनाथरावांचा जाण्याचा बेत रहित झाला. हिंदुस्थानांत स्वारी करण्याचा भाऊसाहेबांचा फार दिवसांपासून मनोदय होता. यासाठीं त्यांनीं यावेळीं चांगले लढाऊ लोक जवळ बाळगून आपल्याबरोबर अनुभवीक सरदार घेतले. याच सुमास इभ्राईमखान गारदीयाचीं १० पलटणें चाकरीस ठेविलीं. हा इभ्राईमखान निजामाच्या पदरीं होता व त्याच्या फौजेस फ्रेंचांकडून कवाईत मिळाली होती. दक्षिणेंत भाऊसाहेबांनीं ज्या ज्या लढाया पाहिल्या, त्यांत कवाईती फौजेचा चांगला उपयोग होतो, हें त्यांच्या लक्षांत होतें, ह्मणून मुद्दामच ही नवी फौज त्यांनीं चाकरीस ठेविली. या इभ्राइमखान गारद्यास चाकरीस ठेविलें, ह्मणून भाऊंच्या पदरीं मुझफरखान ह्मणून एक सरदार होता त्यास वाईट वाटून त्यानें वानवडी मुक्कामी भाऊंचा खून करण्यासाठीं मारेकरी पाठविले. भाऊसाहेब डेऱ्यांत लिहीत होते इतक्यांत मारेकऱ्यानें वार केला, परंतु सुदैवानें भारी दुखापत झाली नाहीं. मारेकऱ्यांस अर्थात् तेथेंच पकडून चौकशी करून मुझफरखानाचे पारिपत्य केलें. पुढें थोडक्याच दिवसांनीं मराठ्यांनीं कूच करून, अहमदनगरच्या किल्याकडे फौज चालविली. हा किल्ला विसाजी कृष्ण यानें फितुरीनें काबीज केला होता. यामुळें अगोदरच धुमसत असलेल्या कलहाग्नीस भर पडून, निझाम व पेशवे यांमध्यें लढाईचा प्रसंग आला. भाऊंची फौज तयार होतीच, तिनें निजामअल्लीवर स्वारी करून शत्रूस मांजरानदीच्या तीरावर तांदुळजें येथें गांठलें. यासुमारास खुद्द पेशवेही फौजेसह नगरास येऊन राहिले होते. भाऊंबरोबर पेशव्यांचा वडीलपुत्र विश्वासराव होता. निजामअ-

[1] Price's Diary, Forrest, Vol. I 137.

1 The auspicious moment or season for the commencement of an undertaking (or a business) 2 Tis moulder.

ईनें आपली सगळी फौज एकत्र करण्यापूर्वींच मराठ्यांशीं तोंड दिलें. त्यामुळें मराठ्यांची व मोंगलांची मोठी निकराची लढाई झाली. इब्राईमखानाचे लोकांनीं व मराठ्यांच्या स्वारांनीं थोडक्याच वेळांत शत्रूचे ३००० लोक ठार मारिले व मराठ्यांस जय झाला. ह्या लढाईसच उदयगीरची लढाई असें ह्मणतात. निजामाचें शिल्लक सैन्य जवळच येऊन ठेपलें होतें, पण त्याची गांठ पडेपर्यंत मराठे आपला सत्यनाश उडवतील, या भीतीनें निजामअल्लीनें भाऊसाहेबांकडे तहाचें भाषण लाविलें. यावेळीं मराठ्यांनीं जें जें मागितलें, तें तें सर्व शत्रूनें कबूल केलें. यामुळें त्यांस बऱ्हाणपूर, सालेर, मालेर, दवलतावाद व नगर वगैरे सहा किल्ले मिळून, ६२ लाखांचा मुलूख मिळाला. असा विजय झाल्यावर, मराठी फौज आनंदांत असतांच, दिल्लीकडून शिंदे होळकरांचीं गडबडीचीं पत्रें आलीं. तीं पाहून भाऊंनीं स्वारीस जाण्याचा निश्चय केला. इकडे खासा पेशवे नगराहून आंबेपडदरी मुक्कामीं आले होते. तेथें सर्व खासे मिळून, हिंदुस्थानच्या मोहिमेबद्दल वाटाघाट चालली. दिल्लीकडे होळकर शिंद्यांच्या शूर व लढाऊ फौजेची दुर्दशा झाली व मुसलमान सर्व आपणाविरुद्ध उठले, हें सर्व लक्षांत आणून हिंदुस्थानांत कोणीच खाशानें जाऊंनये, असा खुद्द पेशव्याचा आग्रह होता. परंतु नुकत्याच मिळविलेल्या जयामुळें गर्विष्ठ झालेल्या भाऊंस गिलच्यांशीं टक्कर देण्याची फारच हौस आली होती, यासाठीं हट्टास पेटून त्यांनीं पेशव्याची परवानगी मिळविली व आपणाबरोबर विश्वासरावांसही घेतलें. भाऊंनीं आपला आग्रह पुरा करून असली दूरचीं मोहीम अंगावर घेतली, हें पाहून पेशव्यांस फार दुःख झालें व ज्या दिवशीं शेवटला निरोप घेऊन भाऊ व विश्वासराव निघाले, त्यावेळेस तर ह्या दोघा बंधूंच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहला! भाऊ हट्टी होते, तथापि पूर्वीपासून पेशव्यांचो त्यांच्यावर फार ममता होती. हीच या प्रसिद्ध बंधूंची अखेरची भेट!

# भाग ४ था.

## सोनपत पानपत.

### महाराष्ट्रवैभवाची पूर्णाहुति.

भाऊसाहेवाचा जन्म, इ. स. १७३० त झालां. त्याचा स्वभाव चिमणाजी आप्पांप्रमाणें तापट होता. भाऊसाहेव सातव्या वर्षापासून लढाई पहात होता व तो दक्षिणेंतल्या वहुतेक स्वाऱ्यांत हजर होता; यामुळें तो युद्धकलानभिज्ञ होता असा दोष त्याला देतां येत नाहीं. त्यानें बारा वर्षांचा असतांच सावनूरवर स्वारी केली होती. कर्नाटकांत नानासाहेबाच्या ज्या मोठमोठ्या मोहिमा झाल्या, त्यांत भाऊ असून, श्रीरंगपट्टणला त्यानें दोनदां मोर्चेवंदी केली होती. शिवाय त्यानें निजामावर दोनदां मोहीम करून फत्ते मिळविली होती. तो जसा तरवार बहाद्दर होता त्याप्रमाणें कलमाचाही बहाद्दर होता. रामचंद्र बावा शेणव्याच्या योगानें त्याला कारभारांत वाकवगारी प्राप्त झाली होती व त्याच्या कारभारांत महाराष्ट्रांत सर्व मुलखाची व्यवस्था उत्तम असून हिशेब चोख असे. त्याच्या कारकीर्दीपासूनच पेशव्यांच्या दप्तराची सुधारणा झाली व मुलखांत बंदोवस्त होऊन प्रजा आबादान राहिली. प्रांतोप्रांतींच्या अंमलदारांस भाऊंचा वचक होता. यामुळें बंदोवस्त उत्तम होता. भाऊनें पुणें शहराची फारच सुधारणा केली होती. याप्रमाणें लहान वयांतच भाऊ पेशव्यांच्या उपयोगी पडला होता. भाऊ साहेब हिशेबाचा तगादा लावीत, म्हणून शिंदे होळकर, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले, हे त्याचा द्वेष करीत होते.

असो. याप्रमाणें तरवार-व कलम-बहाद्दर भाऊसाहेबांनीं हिंदुस्थानांत गिलच्यांवर जाण्याचा निश्चय करून, पेशव्याचा निरोप घेऊन ते मजल दरमजल करीत, आंबेपडदराहून आठवे दिवशीं बऱ्हाणपुरास पोंचले. भाऊसाहेवांनीं आपल्याबरोबर दक्षिणेंतून

---

१ श. १६५२, वि. वि. पु. ८ अं. ४; श. १६५२, प. व या. ४१२ श. १६५५; पं. प्र. श.

1 The last oblation _ 2 hot, fiery. 3 [illegible] of batteries

चांगले निवडक सरदार व लोक घेतले होते. चांगली फौज, चांगले हत्ती, सरस घोडे, उंच उंच वस्त्रें, अलंकार, भरजरी व किनखाप यांनीं मढविलेले डेरे, राहुट्या वगैरे चांगल्या चिजा भाऊंनीं बरोबर घेतल्या होत्या. निवडक लढाऊ फौजेशिवाय, त्यांच्याबरोबर दक्षिणेंतून शेंकडों मनुष्य निघालें होतें. बायका, मुलें, बुणगें वगैरे सर्व लचांडें बरोबर होतींच. यावेळचा भाऊंच्या फौजेचा सर्व थाट मोंगली होता व त्यांत जुनी मराठी रीत कांहीं उरली नव्हती. स्वारीबरोबर नाचतमाशे सुद्धां होते. अशा थाटानें ही दक्षिणी फौज नर्मदातीरीं येऊन पोंचली. हिंडीया मुक्कामीं इब्राईमखान गारदी आपल्या फौजेसह येऊन मिळाला व त्यानें गनीमी काव्यानें लढाई करणार असल्यास आपण येत नाहीं, असें ह्मटल्यावरून लढाईच्या कामीं तुमच्या ह्मणण्याप्रमाणें वागूं, असें भाऊंनीं त्यास अभिवचन दिलें. ही फौज फ्रेंचांनीं कवाईत शिकवून तयार केलेली होती. कवाईत शिकलेल्या फौजेस जरी या मोहिमेंत अपेश आलें, तरी कवायती फौज उत्तम, ही गोष्ट महादजी शिंदे यांचे लक्षांत येऊन पुढें त्यांनीं त्याचप्रमाणें आपलीही फौज तयार केली. भाऊंबरोबर दक्षिणेंतून मोठमोठे सरदार आपापल्या पथकांसह निघाले होते. त्यांतः—दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, समशेर बहाद्दर, हरि दामोदर, सोनाजी भापकर, महादजी व तुकोजी शिंदे, नाना व त्रिंबक सदाशिव पुरंदरे, गोपाळराव पटवर्धन, बळवंतराव मेहेंदळे, संताजी आटोळे, आनंदराव व तुकोजीराव पवार आणि शिवाय मोहिते, बांडे, देवकांते, माहारणे, निंबाळकर, जाधवराव वगैरे प्रमुख मराठे होते. यांत बळवंतराव मेहेंदळे, गोपाळ गोविंद बरवे, पुरंदरे वगैरे सरदार कर्नाटकांत मोहिमा करून प्रख्यातीस आले होते. मेहेंदळे यांची तर शौर्याबद्दल फारच ख्याति झाली होती. प्रत्येक कामांत भाऊसाहेब बळवंतरावाचा सल्ला विचारीत. ही पुणेकर ब्राह्मण मंडळी कर्नाटकांतल्या विजयामुळें गर्वानें चढली होती व ते दुसऱ्या लोकांच्या उपदेशांकडे दुर्लक्ष करूं लागले. याप्रमाणें ही दक्षिणी फौज मोठ्या थाटानें माळव्यांत आली. तेथें अंताजी माणके-

composed wholly of gold or silver threads embroidered figures of stuffs clothes,

श्वर, गोविंदपंत बुंदेले, विठ्ठल शिवदेव वगैरे सरदार येऊन मिळाले. याशिवाय माळवा वगैरे प्रांतांतील जेवढे ह्मणून मांडलिक राजेरजवाडे होते, त्यांनींही थोडेबहुत लोक पाठविले. उज्जनी मुक्कामीं फौजेची गणती केली तेव्हां १,२७००० शिपाई व १०० तोफा जवळ होत्या. याशिवाय पुष्कळ किरकोळ पथकें होतीं. भाऊंनीं बरोबर दोन कोट रुपये खर्चास घेतले होते. ग्वाल्हेरीस त्यांचा मुक्काम चार दिवस पडला. तेथून चंबळेच्या खळ्या उतरून ते ढोलपुरास गेले. तेव्हां शिंदे होळकरांकडून पत्रें आलीं कीं, फौज पुढें आणूंनये, गनीमी काव्यानेंच शत्रूस आह्मीं जेर करितों, प्रसंग पडल्यास आपण पुढें यावें. पण हा उपदेश आमच्या पुणेकर फरड्या[1] शिपायांस न आवडून, शिंदेहोळकर, मत्सरानें आपणास येऊंनको असें ह्मणतात असे कुतर्क सुरू झाले. होळकरानें पुन्हा लिहिलें कीं, "आधींच न यावें. ज्यांनीं मनसवा केली ते थोर आहेत! रोहिला, सुजाउद्दौला, अहमदखान व दुराणी कांहीं सामान्य नाहींत. यास्तव मोहरा इरेस पाडावा असा अर्थ नाहीं. याकरितां साहेबीं माळवे प्रांतीं राहून छावणी करावी. पुढें फौज मात्र सडी पाठवावी. आह्मीं साहेबांचे दमावरच कार्य उरकून घेतों[2]." हा उपदेश चांगला होता; कारण मुख्य फौजेचा जर पराभव झाला तर सर्वस्वी नाश होईल, याकरितां निवडक फौज घेऊन शत्रूस जेरीस आणावें, असा होळकराचा अभिप्राय होता. पण बळवंतराव मेहेंदळे याचा उपदेश दिल्लीवर जाण्याचाच पडला. भाऊ आपला उपदेश न ऐकतांच निघाले असें समजल्यावर, मल्हाररावानें भाऊंच्या तरुण उपदेशकांची निर्भत्सना करून रागानें लिहिलें कीं, "तुह्मांस माळवेप्रांतीं छावणीस रहा ह्मणून लिहिलें असतां येथपर्यंत येण्यास काय कारण? तस्मात् सर्व भोंवताले नूतनवय मिळाले ते तुमचे हिताचे आणि आह्मीं वृद्ध, आमची साठीची बुद्धी नाटी झाली. आह्मीं आजपर्यंत जितकें कर्म केलें तितकें साहेबांचें अनहित केलें[3]. असो. आतां सर्व मिळून स्व-

---

१ भा. सा. कै. ८, भा. सा. ब. ९२. २ भा. सा. ब. ९२.
३ भा. सा. ब. ९३.

1 Smart & ~~Sha~~ Sharp. 2 Adventurous speculative fancy &c. 3 A pun at [illegible] ... 4 Treating with low indignity; rebuking; cursing

हित करावें. " असें खोंचून लिहिलें तरी त्याचा विचार कोणी केला नाहीं. जवळ विठ्ठल शिवदेव होते, त्यांनींही पुष्कळ प्रकारें सांगितलें कीं, आपल्याबरोबर यात्रेची मंडळी, बायकामुलें वगैरे अडचण आहे, याकरितां त्यांस मागें ठेवून कांहीं निवडक फौज मात्र पुढें पाठवावी. पण जवळच्या मंडळीनें तें सर्व विनोदावर घालवून, शिंदेहोळकर, विठ्ठल शिवदेव, बुंदेले वगैरे लोक या प्रांतांत मातबर झाले आहेत, त्यांस आपण आल्याचें पहावत नाहीं, असें धिक्कारयुक्त मात्र भाषण केलें. पुढें त्यांच्या उपदेशाप्रमाणें भाऊंनीं कूच करून आग्र्याजवळ गंभीरानदीचे तीरीं तळ दिला. तेथें मल्हारराव, जनकोजी शिंदे व नारो शंकर आपापल्या फौजांसह येऊन मिळाले. शिंदे यानें सुरजमल्लजाटासही आपल्याबरोबर घेतलें. होळकरानें भेटल्याबरोबर, आपलें ह्मणणें न ऐकिल्याबद्दल भाऊंची चांगली कानउघाडणी केली, परंतु तिचा उपयोग झाला नाहीं. आषाढवद्य ३०,( १२ जुलै १७६०) रोजीं भाऊसाहेब आग्र्यास पोंचल्यावर, तेथील किल्ल्यांत कांहीं मुलेंमाणसें वगैरे ठेवून ते पुढें मथुरेस गेले. इतक्यांत शत्रूची फौजही यमुनेच्या पैलतीरीं दाखल झाली. मुसलमानांचें जूट फोडावें ह्मणून भाऊसाहेबांनीं सुजाउद्दौल्याकडे वकील पाठवून त्यास अबदलीस मिळूंनये ह्मणून सांगितलें. येथून सुजाचा व भाऊंचा पत्रव्यवहार सुरू झाला. मथुरा, वृंदावन वगैरे पुण्यक्षेत्रांत दक्षिणेंतील यात्रेकरू लोकांनीं तीर्थविधि उरकल्यावर, भाऊंनीं बळवंतराव मेहेंदळ्यास पुढें पाठविलें. त्यांनीं दिल्ली शहरास मोर्चे लाविले, इतक्यांत मागाहून मुख्य फौजही दाखल झाली. दिल्लींत नजीबखानाचे चार हजार पठाण लोक होते, त्यांनीं बराच वेळ टिकाव धरला, पण अखेरीस शहर काबीज होऊन मराठे आंत शिरले. तेथें गेल्यावर श्रीमंत विश्वासराव यांस बादशहा करण्याचा विचार चालला होता, परंतु तो बेत राहिला.


भाऊ साहेबांनीं बरोबर आणलेला पैसा पुरत नाहींसा पाहून, दिवाण-इ-खास मध्यें बादशहाचे तख्तावर रुप्याचें छत होतें, तें फोडून रुपये पाडले. त्यांत १७ लक्ष रुपये मिळाले. हें

---

१ G. Duff 314, note.

scornful, contemptuous; 2 the ceremonies of pilgrimage; the observances at a place; to hold out.

कृत्य न करण्याबद्दल होळकर, जाट वगैरे वृद्धांनीं फार फार सांगितलें, पण बळवंतराव मेहेंदळ्यापुढें कोणाचेंच चालेना. गोविंदपंत बुंदेल्यास ९० लाख रुपये द्यावे ह्मणून तगादा लाविल्यामुळें, तो आपल्या पथकांसह अंतरवेदींत गेला. दिल्लीचा वजीर गाझीउद्दीन यानें अलमगीर बादशहास ठार मारल्यामुळें गादी मोकळी होती. या दुर्दैवी अमलगीर बादशहाचा मुलगा अलिगौर, जो पुढें शहाअलम बादशहा या नांवानें प्रसिद्धीस आला, तो वजीराचे भयानें



दिवाण-इ-खास, दिल्ली.

दिल्ली सोडून पळाला होता व त्यानें बंगाल्यांत लढाई चालविली होती. यामुळें भाऊसाहेबांनीं त्याचा मुलगा जवानबक्त यास बादशहा केलें[1] व नारोशंकर यांस राजे बहादर अशी किताबत देऊन वजीरी सांगितली. सुरजमल्लाचा आग्रह गाझीउद्दीनासच वजिरी द्यावी असा होता, परंतु तें बोलणें भाऊंस पसंत पडलें नाहीं. ही जी दिल्लीमध्यें नवीन सृष्टि भाऊ करीत होते, त्यामुळें मुसलमान लोकांस तर फार

१ भा. सा. ब. ९५.

राग आला व फार दिवसांच्या संवईमुळें ज्यांची दिल्लीच्या बादशहाचे ठायीं पूज्य बुद्धि होती, अशा रजपूत व जाट लोकांसही वाईट वाटलें। भाऊसाहेबांनीं आपला चांगला उपदेश ऐकिला नाहीं इतकेंच नव्हे, तर ते कोणतीच गोष्ट आपली ऐकत नाहींत हें पाहून त्या अनुभवी वृद्ध जाटास वाईट वाटलें व पुढचीं लक्षणें त्यास सर्व विपरीत दिसूं लागलीं. यामुळें त्यानें गुप्त रीतीनें आपल्या फौजेसह दिल्ली सोडून भरतपुरास कूच केला. जाटाची मदत गेल्यानें केवढें नुकसान झालें ह्याचा प्रत्यय भाऊंस फारच लवकर आला.

लढाईच्या परिणामावरूनच भाऊंस दोष द्यावयाचा हें खरें, परंतु सुरजमल्ल सुजाउद्दौल्याचे सांगण्यावरूनच परत गेला. त्याचा व सुजाचा स्नेह होता. जाटाचे मनांत दिल्लीचा बंदोबस्त आपल्याकडे असावा असें होतें. तो न दिल्यामुळेंही तो रुसला होता.

सुरजमल्ल जाटानें जाऊं नये ह्मणून भाऊंनीं बंदोबस्त केला होता, तथापि होळकराच्या फिसादीमुळें जाट निघून गेला. यावेळेस मराठ्यांची फौज दिल्लीच्या आसपास पसरली होती व तिच्यासाठीं धान्य, वैरण, सर्पण वगैरे पुरवण्यांत आसपासचा २५ कोस मुलूख बेचिराख झाला होता. यावेळेस भाऊंजवळ खजिनाही बराच जमला होता, यामुळें तूर्त पैशाची पंचाईत नव्हती. याप्रमाणें आगष्ट व सपटंबर(१७६०,) हे दोन महिने दिल्लीच्या आसपास गेले. इतक्यांत मागें शत्रूच्या फौजेनें अंतरवेदींतील कालजेश्वर मुक्कामीं जी छावणी दिली होती, ती मोडून यमुनेच्या पैलतीरीं, दिल्लीसमोर शहादरा येथें तिनें तळ दिला. याप्रमाणें उभयपक्षांच्या फौजांची नजरानजर झाली, परंतु यमुनेचें पात्र भरून चाललें होतें यामुळें लढाई कांहीं दिवस टळली.

सुजाउद्दौला पावसाळ्यांत आपल्या अयोध्याप्रांतांत छावणीस गेला होता व त्याचे मनांतून कोणत्याही पक्षास मिळूं नये असें

---

१ भा. सा. कै. १०.

stility, adverse. 2 Experience. 3 Sedition 3 the ... ... in ... of a ...

होतें. अबदल्लीं व नजीबखान यांचा सुजाशीं फारसा स्नेह नसून, ज्या कारणांवरून ही मराठ्यांशीं लढाई उद्भवली होती, त्या कारणांशीं त्याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नव्हता. तथापि शहाजादा अल्लीगौर याचा वनवास, गाझीउद्दीनाचीं दुष्ट कृत्यें, भाऊंचें दिल्लींतलें वर्तन वगैरे गोष्टींपासून त्यास सर्व मुसलमानांचीच बाजू घेणें हिताचें दिसलें. यामुळें अबदल्लीच्या सांगण्यावरून नजीबखानानें सुजाउद्दौल्यास विनंति केल्यावर, तो आपल्या फौजेसह ताबडतोब त्यांस मिळाला. तथापि भाऊंच्या वकीलांस त्यानें तह करण्याची आशा लावून ठेविली होती, इतकेंच नव्हे तर विश्वासानें जीं जीं बोलणीं भाऊंकडून येत तीं सर्व तो अबदल्लीस सांगत असे. त्यानें जाटांशींही पत्रव्यवहार ठेविला होता. यावेळीं हिंदुस्थानांतील सर्व मुसलमान एकत्र झाले होते, व शिवाजीनें स्थापन केलेल्या हिंदुराज्याविरुद्ध हें मोठें काहूर उठलें. जयपूर व जोधपूर येथील रजपूत संस्थानिकही मराठ्यांस त्रासून, पैशाची मदत आंतून मुसलमानांस करीत होते. नागोरचा विजेसिंग तर मराठ्यांचा नाश होण्याची वाट पहात होता. भाऊंनीं दिल्लीपतीची व गादीची जर अब्रु राखली असती आणि अवरंगझेबानें रायगडचें तक्त फोडिलें ह्मणून आह्मीं दिल्लीचें तक्त फोडतों इत्यादि अप्रासंगिक देशाभिमानाच्या स्वाधीन जर ते झाले नसते, तर मराठ्यांविरुद्ध एवढा जमाव झाला नसता.

याप्रमाणें पर्जन्यकाळ संपेपर्यंत हें मराठ्यांचें प्रचंड सैन्य स्वस्थ बसलें होतें व लढाईच्या कामास ज्यांचा काडीभर उपयोग नाहीं, अशा लाखों माणसांनीं अन्नाचा मात्र फडशा करून लष्करांत दुष्काळाची महागाई आणिली. इतक्यांत आश्विनमास लागून दसरा जवळ आला. तेव्हां मराठे सरदारांनीं दिल्लीच्या उत्तरेस कुंजपुरा ह्मणून एक बळकट जागा होती, तीवर हल्ला करण्याचा बेत केला. या कुंजपुऱ्यांत शत्रूकडील कुतुबशहा व सैय्यदखान कत्तलबाज हे सरदार दहाहजार फौजेनिशीं असून, तेथें खजिनाही पुष्कळ होता. यासाठीं दुराणी यमुनेच्या अलीकडे येण्यापूर्वींच हें ठाणें घ्यावें, असा बेत करून मराठ्यां-

Otherwise, in no respect.

नीं दसऱ्याचे मुहूर्तानें, त्या शहरावर हल्ला केला. (तारीख २० आक्टोबर १७६०).[1] शत्रूंची फौजही शहर सोडून मैदानांत आली होती. येथें सुमारें ४ तास निकराची लढाई होऊन मराठ्यांनीं शत्रूंचें ७ हजार मनुष्य ठार करून सर्व फौजेस लुटलें व शहराचीही लूट केली.

या ठिकाणीं भाऊ तारीख २४ आक्टोबरपर्यंत मुक्काम करून राहिले हा जय झाल्यामुळें बळवंतरावादि तरुणमंडळी अगदींच शेफारून गेली व ह्मणूं लागली कीं, "दुराणी दुराणी" ह्मणून होळकरशिंद्यांनीं उगाच भय घातलें होतें! यानंतर दुराणी यमुना उतरूं लागल्याची वार्ता आली व तारीख २६ आक्टोबर रोजीं दुराणीची सर्व फौज नदीपार झाली. भाऊसाहेबांनीं दिल्लीस परत येण्याचें सोडून कुंजपुऱ्यास मुक्काम केल्यानें, दिल्लीचा मोठा आश्रय चुकला. या वेळीं भाऊंची फौज सोनपतपासून कर्नोळ व थानेश्वरपर्यंत टोळ्याटोळ्यांनीं पसरली होती. खासा स्वाऱ्या व यात्रेच्या उद्देशानें बरोबर आलेलीं माणसें थानेश्वरजवळ सरस्वतीनदीच्या तीरावरील कुरुक्षेत्र नामक तीर्थास गेलीं होतीं. पानिपत शहरापासूनच पुढें कुरुक्षेत्राच्या मैदानास प्रारंभ होतो. येथें असतांच गिलचाचें सैन्य आलीकडे उतरल्याची बातमी कळली. ती कळतांच मराठे लोक एकत्र होऊन, त्यांनीं दिल्लीस परत जाण्याचा बेत केला, व त्याप्रमाणें सर्व फौज निघते, इतक्यांत दुराणीनें मराठ्यांकडील बाजी हरी वगैरे दोन हजार लोकांस ठार मारल्याची बातमी आली. हे लोक टेहळणीसाठीं पुढें पाठविले होते. दुराणीची फौजही दिल्लीच्या मार्गावर आली, त्यामुळें दिल्ली गांठणें कठीण वाटून भाऊंनीं जवळच पानिपत गांव होतें तेथें तळ दिला. पानिपत गांवापासून तीन चार कोसांवर दिल्लीच्या रस्त्यावर मुसलमान फौजेनें तळ दिला. मराठ्यांच्या फौजेच्या रस्त्यावरच दुराणीची फौज आली, त्यामुळें मराठ्यांचा नाश झाला. मराठ्यांच्या पाठीमागें हिमालया-

[1] वि. वि. व लोकहितवादी, यांनीं एकाच इंग्लिश ग्रंथाचीं भाषांतरें केलीं असून त्यांच्या तारखा वेगळाल्या आहेत. दसऱ्याचे दिवशीं २० तारीखच पडते. (भा. सा. कै. ११।१२).

चा पहाडी मुलुख असून, आश्रा नाहींसा होऊन रसद मिळण्याच्याही सोई कमी झाल्या इतकेंच नाहीं, तर माळवा वगैरे एकंदर मराठी मुलखाशीं मराठी फौजेचा संबंध तुटला. पळण्यास सुद्धां जवळपास आपला किंवा स्नेह्याचा मुलुख नव्हता. या चुकीमुळें मराठी फौज कोंडली गेली. मल्हारराबानें पुष्कळ सांगितलें तरी न ऐकतां, भाऊसाहेबांनीं इब्राईमखानगार्द्याचा उपदेश ऐकून आपल्या लष्कराभोंवती ४० हात रुंद व १२ हात खोल असा खंदक खणला. त्याचप्रमाणें मुसलमानांनीं सुद्धां झाडेंविडें आडवीं घालून आपल्यापुढेंही भिंताडासारखी उंच जागा बांधून वर तोफा चढविल्या. दोन्ही फौजांमध्यें एक मोठें मैदान होतें. पानिपतगांव बराच मोठा असून घरें पक्क्या विटांचीं होतीं व गांवास तटबंदी असून एक, नादुरुस्त खंदकही होता. गांवाच्या आसपास मैदानांत पळसाचीं खुरटीं झुडपें पुष्कळ उगवलीं होतीं. दोन्ही दळें महाभारतांतील कौरवपांडवांच्या प्रख्यात युद्धभूमीवरच उतरल्यामुळें, मराठे लोकांस ती गोष्ट महत्वाची वाटूं लागली व होणारा सामना उभयपक्षांची रांगोळी उडविणार, असेंही वाटूं लागलें. मराठ्यांनीं आपल्या लष्कराच्या मध्यभागीं एक उंच रणखांब उभा केला होता व त्यावर मराठ्यांचा जरिपटका झळकत होता. ह्या उंच जाग्यावरून शत्रूंची हालचाल मराठे पहात असत.

दोन्ही फौजांनीं तळ दिल्यावर, दररोज गोळागोळी सुरू झाली. काशीराय आपल्या बखरींत लिहितात कीं, दुराणीकडील सर्व मुसलमान सरदारांची फौज, ४१,८०० स्वार व ३८,००० पायदळ इतकी होती व त्यांच्या जवळ ८० तोफा होत्या. दुराणीच्या पश्चिमेकडे मराठे लोकांची फौज होती. काशीरायाच्या हिशेबावरून मराठ्यांकडे ५५,००० स्वार व १५,००० पायदळ असून तोफा २०० होत्या. यांखेरीज लहान सान पथकें, पेंढारी वगैरे मिळून, २०,००० जवळजवळ आणखीं फौज होती. या झुंझत्या फौजांखेरीज मराठ्यांकडे १,५०,००० बुण

१-१,२०००० फौज व ३०० तोफा होत्या. ( भा. सा. च. १०५ ); मुस सरदारांची फौज ४७ हजार व किरकोळ २५ हजार होती. ( भा. सा. कै. १३

1 crop wise 2 fortification 3 [illegible] 4 pillar [illegible]

वगैरे निकामी मनुष्यें होतीं[1]. त्याचप्रमाणें मुसलमानांकडेही मोठा जमाव होता.

मराठे लोकांकडील पेंढारी शत्रूंच्या नाक्यांवर हल्ला करून लढूं लागले, त्यामुळें लढाईस सुरवात झाली. तारीख ८ नवंबर रोजीं, दोन्हीं फौजांचे गोळे एकमेकांचे लष्करांत पडूं लागले. त्यामुळें मराठ्यांकडील घोडींमाणसें नित्य मरूं लागलीं व दाणावैरणीची रसद वेळेवर पोंचेना ह्मणून लष्करांत महागाई होऊं लागली. गवत वगैरे आणण्यासाठीं मराठ्यांचे चार हजार स्वार दररोज बाहेर निघत. त्यांची व शत्रूंकडील स्वारांची चकमक नेहमीं होई. याप्रमाणें नित्य क्रम सुरू झाला. या वेळेस मराठे लष्करापेक्षां शत्रूंकडे महागाई फार होऊन अन्नाची टंचाई झाली. भाऊसाहेबांनीं गोविंदराव बुंदेले यास अंतरवेदींत रवाना केलें होतें. त्यानें बराच खजिना जमवून दिल्लीस आणिला होता. शत्रूंकडे अंतरवेदींतून रसद पोंचते हें पाहून, गोविंदरावानें सर्व रस्ते बंद करून रसद पोंचेनाशी केली, यामुळें मुसलमानफौजेंत फारच महागाई पडली. तेंव्हां दुराणीनें गोविंदपंतावर कांहीं फौज पाठविली. तिची व गोविंदपंताची एकाएकीं गांठ पडून लढाई झाली, त्यांत दुर्दैवानें मराठे शिकस्त झाले व गोविंदपंत ठार झाला. गोविंदपंताच्या मृत्यूमुळें अवदल्लीच्या फौजेस पूर्ववत् अन्नाचा पुरवठा होऊं लागला. गोविंदपंतानें दिल्लीस ठेवलेला खजीना घेऊन पाराजीपंत वाघ निघाला, तो कर्मधर्मसंयोगानें पानपतजवळ आल्यावर मराठ्यांच्या फौजेंत जावयाचें सोडून चुकून शत्रूंच्या तळावर गेला! ही चूक त्याच्या लक्षांत येते न येते, इतक्यांत हा आयताच मिळालेला ठेवा पाहून शत्रूंनीं मराठ्यांस कोंडून सगळा खजिना लुटला व मराठे स्वारांस कापून काढलें.

---

[1] साडेतीन लक्ष एकंदर लोक होते. त्यांपैकीं साधारण लढाऊ लोक एक लक्ष सत्तर हजार असावे. ( र. या. कृ. पानिपतची ब. १४,१८; ) गार्दींचें पायदळ व तोफखान्या खेरीज मराठ्यांची झुंझती फौज सुमारें ६० हजार होती व हीच संख्या खरी दिसते. (भा. सा. कै. १३,) रघुनाथ यादव याणें एके ठिकाणीं तर भारती युद्धाची संख्या दिली आहे! ( पृ: १० ).

एक दिवस मराठे सरदारांच्या सभेमध्यें बळवंतराव मेहेंदळे, शिंदे-होळकरांस कांहीं टोंचून बोलले. तें सहन न होऊन, वयानें लहान, पण अर्जुनासारखे पराक्रमी जनकोजी शिंदे, यानीं दुसरे दिवशीं एकट्यानेंच शत्रूवर हल्ला करण्याचा विडा उचलला. त्या दुसरे दिवशीं शिंद्यांनीं आपली सर्व फौज घेऊन शत्रूच्या तोंडावर चाल केली. तें पाहून, भाऊसाहेबांनीं बळवंतरावास दोष दिला कीं, " शिंदे यांस निष्कारण रागास आणिलें. त्यांचें घराणें स्वामिभक्त असून आतां हा एवढाच वंश राहिला आहे, त्यास व्यर्थ इरेस घातलें." असें ह्मणून त्यानीं बळवंतरावास शिंद्याचे मदतीस पाठविलें. लढाई दोन्ही पक्षांकडून मोठी निकराची होऊन, प्रतिज्ञेप्रमाणें शिंद्यांनीं खूपच तरवार गाजविली. मराठे फौजेनें शत्रूवर चाल करून मोठी कत्तल केली आणि त्यास मागें परत ढकलून, त्यांच्या चार तोफाही घेतल्या. या लढाईत शत्रूकडील सुमारें एक हजार मनुष्य पडलें व मराठ्यांकडील ७।८ शें लोक ठार झाले. त्यांत शेटियाबा खराडे व सटवाजी फाळके नांवाचे शिंद्याचे दोन मोठे सरदार पडले. याप्रमाणें शिंद्यास जय आला. ( ता० ८ नवंबर, सन १७६०. )

या सुमारास मराठ्यांच्या लष्करांत अन्नाची तूट पडूं लागली. रसद व सर्पणांसाठीं फौजेचे फार हालहाल सुरू झाले. विश्वासराव व जनकोजी यांनीं कुमक पाठविण्यासाठीं दक्षिणेंत खासगी रीतीनें पत्रें लिहिलीं. तथापि एवढ्या दूर पल्ल्यावर ह्या प्रसंगीं मदत पाठविणें कठिण होतें. भाऊसाहेब दिवसेंदिवस जिवावर उदार झाल्यासारखीं भाषणें करूं लागले व निराशेमुळें दक्षिणेंत पत्रें सुद्धां पाठविण्याचें त्यानीं बंद केलें. मराठी फौजेभोंवतीं रात्रंदिवस गिलच्यांच्या टोळ्या फिरूं लागल्या व सगळा खजिना व अन्न संपत आल्यामुळें सर्व लष्कर जेरीस आलें आणि सर्वांची हिम्मत खचूं लागली. तमाम फौज निरवानिरव करूं लागली. कोणास जगून परत जाऊं अशी आशा राहिली नाहीं. लष्करांतील लोकांच्या आंगावरचे सोन्यारुप्याचे दागिने मोडून, भाऊशाई, मल्हारशाई व जनकशाई रुपये व मोहरा नव्या पाडिल्या, तरी पैसा पुरेना. कर्नोल, नर्नाळा वगैरे गांवांकडून

ज्यावेळीं महाप्रयासानें एखादा लमाणाचा तांडा येऊन पोंचे, तेव्हां मात्र धारण जरा सवंगाई होई, नाहींतर रुपयास शेर धान्य झालें होतें. सर्पणासाठीं गांवांतलीं सर्व झाडें तोडून त्यांचे ढीग केले होते. सरकारी व शिंदेहोळकरांचा पुष्कळ खजिना दिल्लीस होता, परंतु तो इकडे पोंचेनासा झाला.

हा प्रकार चालला होता, तरी भाऊसाहेब व सुजाउद्दौला यांच्या तह करण्यासाठीं खटपटी चालू होत्या; आणि मराठ्यांप्रमाणेंच, नजीबखानाखेरीज सर्व मुसलमान सरदारांची तह करण्यास खुषी होती. दोन्ही पक्षांस परस्परांचें भय होतेंच तथापि धान्याच्या टंचाईमुळें मराठे फार घाबरले होते. मराठ्यांकडून लक्ष्मण बल्लाळ, भवानी शंकर व मुसलमानांकडून रहिमत व रसूलखान पठाण, काशीराय, वगैरे वकील सलुख्याचीं बोलणीं लावण्याकरितां नेहमीं इकडून तिकडे येत जात असत. प्रत्येकवेळीं कांहीं तरी भाषणें होत. सुजाउद्दौला व अहमदशहाचा मुख्य वजीर, यांचे मनांतून तह करण्याची फार इच्छा होती, परंतु नजीबखान रोहिला त्यांस अडथळा आणी. मराठ्यांचें ह्मणणें होतें कीं, लाहोर किंवा सरहिंदपर्यंत मुलूख घेऊन गिलच्यांनीं परत जावें व हिंदुस्थानचे संस्थानिकांच्या तंट्यांत आपण पडूं नये. हीं तहाचीं भाषणें उभय पक्षांकडून सारखीं चाललींच होतीं, परंतु मराठ्यांचा पेंच पाहून, मुसलमान भलभलत्या मागण्या करूं लागले. त्या कबूल करणें भाऊंसारख्या अभिमानी पुरुषास कठीण झालें. अडचणीच्या वेळीं पाहिजे तें कबूल करून, मागाहून, कलकत्तेकराचा हुकूम नव्हता, असें सांगण्याची जी युक्ति इंग्रजांनीं पुढें चालविली, तशी राजकीय मसलत भाऊंसारख्या सरळ पुरुषास माहीत नव्हती. शिवाय मुसलमानांचे मनांत मनापासून तह करण्याचें मुळींच नव्हतें. यामुळें बोलणीं पुष्कळ होत, परंतु जमण्यासारखें बोलणें होईना. लढाईपेक्षां अन्नावांचून मराठ्यांस जेरीस आणण्याचा त्यांचा बेत होता. लढाईच द्यावयाची तर ती एकदम देण्याची सोडून, जनावरें व मनुष्यें खंदकांत कोंडून, तीं उपासमारीनें थकल्यावर व त्यांचें सर्व धैर्य पळाल्यावर, लढाईचा निश्चय करण्यांत भाऊंची फार

heart or an individual ... They are ... cattle ... Sikh ... 2 A tranquilline ... 3 Peace ... 4 Truth ... a trophy body ...

चूक झाली. या तळावर मराठ्यांचे जे हाल झाले, त्यामुळें शत्रूंसही त्यांचें अवसान समजून आलें.

तहाचीं भाषणें चालू होतीं, तथापि दररोजच्या लढाईस खळ नव्हताच. शिंद्याचा वरील जय झाल्यावर, थोडेच दिवसांनीं बळवंतराव मेहेंदळे यांस स्वतः लढाईस जाण्याची हौस येऊन, त्यांनीं भाऊंची आज्ञा घेतली. खुद्द बळवंतराव जरीपटका घेऊन निघतात ह्मणून, त्यांच्या संरक्षणार्थ जाण्यासाठीं मोठमोठ्या सरदारांस भाऊंची आज्ञा झाली. त्यांच्यावर गिलचे व रोहिले चालून येऊन, उभयपक्षांच्या तोफांचा सारखा भडिमार सुरू झाला. दशदिशा धूर व धूळ यांनीं भरून गेल्या. या लढाईत दोन्ही पक्षांकडील तोफांचा फार उपयोग झाला. ही लढाई फार निकराची होऊन, उभयपक्षांकडे क्षणोक्षणीं जय अपजय होण्याचीं चिन्हें दिसत. संध्याकाळचे सुमारास रोहिले तोफांचा मार करीत मराठ्यांच्या मोर्च्यांपर्यंत आलेले पाहून, बळवंतराव मेहेंदळे मागें परतले. यावेळीं शत्रू अगदीं मराठ्यांच्या गोटांत शिरण्याच्या बेतांत आले होते, परंतु बळवंतरावाच्या लोकांनीं मोठ्या नेटानें लढाई चालवून रोहिल्यांस दवाविलें. इतक्यांत एकाएकीं एक गोळा येऊन, बळवंतरावांस लागून, ते ठार झाले. त्याबरोबर मराठे घाबरून परतणार, तोंच शिंदे होळकरांनीं आपली फौज शत्रूंवर एकदम घालून बचाव केला व शत्रूंची कत्तल करून मुर्द्यांचे ढीग पाडले. बळवंतरावांचें प्रेत राखण्यासाठीं फारच कचाकची झाली व रक्ताचे पाट वाहूं लागले. अशी मोठ्या निकराची लढाई रात्रीचे नऊ वाजेपर्यंत चालली होती. शेवटीं उभयसैन्यें आपापल्या गोटांस परत गेलीं. या लढाईत फक्त नजीबखानाचेच ५००० लोक मारले गेले व इतर हजारों मुसलमान ठार झाले. त्याप्रमाणेंच मराठ्यांचाही फार नाश झाला. बळवंतरावांसारखे सुमारें १३४ मोठमोठे सरदार ठार झाले. त्यांत बळवंतरावांच्या मृत्यूमुळें तर मराठ्यांस फारच दहशत पडली. आपला जिवलग मित्र गेल्यानें, भाऊंनीं फार शोक केला. नंतर कृतसंकल्पाप्रमाणें मेहेंदळ्यांची बायको साति गेली. ही लढाई ता. ७ दिजंबर, १७६०

१ भा. सा. कै. १५; नानांचें आत्मचरित्र प. व या. ५३.

1 Capability - 2 A determined resolution

रोजीं झाली. हींतच मराठ्यांचा फडशा उडावयाचा, परंतु रात्र झाल्यामुळेंच तो दिवस निभावला.

याप्रमाणें कडाक्याच्या, पण याहून लहान लहान, एक दोन दुसऱ्या लढाया झाल्या. मुसलमान सुद्धां घाबरलेच होते व तह करण्यास ते राजी होते, पण प्रत्येक वेळीं नजीबखान आडवा येई. मराठ्यांचे अन्नावांचून फार हाल होऊं लागून घोडीं, उंटें, हत्ती वगैरे जनावरें हजारों मरूं लागलीं व लोकांस उपोषणें पडूं लागलीं. या दोन महिन्यांत हजारों जनावरें व मनुष्यें मरून लष्करांत दुर्गंधी झाली.

मराठ्यांचे लष्करांत तीन रुपयांस शेर धान्यही मिळेनासें झालें. असा प्रकार झाल्यावर, सर्वांनीं पानिपत सोडण्याचा निश्चय करून, सर्व मराठे सरदार व लोक भाऊंच्या डेऱ्याभोंवती जमा होऊन पुढें काय विचार करावा, याबद्दल वाटाघाट सुरू झाली. "भाऊसाहेब, आह्मांस रणांत मारावें, पण अन्नाशिवाय मारूं नये,[1]" असें सर्व बोलूं लागले. "आज सव्वा महिना सर्वांनीं तवाई सोसली. अन्नपाण्यासाठीं, घोड्यामाणसांचे प्राण जातात. पुढें महाराज, काय तजवीज सांगणें ती सांगावी. अन्नावांचून हातपाय सुजले, तरवार कोणत्या रीतीनें करावी? आतां साहेबीं आजपर्यंत यश संपादून, शत्रू पादाक्रांत केला. आतां सर्व दौलत बुडवून, नाश आरंभिला. दुसरें कांहींएक नाहीं. विनाश काळासारखी तुमची बुद्धी झाली. आपणांबरोबर आह्मां सर्वांची घरें बुडतात. आमचीं रांडापोरें आमच्या डोळ्यांदेखत इराणी सर्व घेऊन जातो. असा समय प्राप्त झाला. तुमचे बुद्धीस भ्रंश झाला. ह्मणून आपण कोणाचें तिळमात्रही ऐकत नाहीं. उगाच हेका केला, तो या समयीं फळास आला. सारांश, आपण सर्वांचें मान्य करून, सलुख करून देशीं गेलों ह्मणून भित्रे झालों, असा अर्थ नाहीं. या हट्टानें, सर्व लयास गेलें. कांहीं आहे तेंही जाणार[2]." असें त्यांचें भाषण ऐकून भाऊंस वाईट वाटलें व ते स्तब्ध झाले. तेव्हां मल्हारराव होळकर पुढें सरून ह्मणाले कीं, "महाराज,

---

[1] भा. सा. ब. ११७. [2] र. या. पा. ब. ३२,३३.

added under foot. 2 Deviation from ... al aberration

द्वापारयुगीं राजा दुर्योधन शतबंधूंसहित राज्य करीत असतां, द्रौपदीमुळें सर्व राज्य लयास गेलें. त्याकाळीं व्यास, विदूर व श्रीकृष्ण, यांनीं बहुत प्रकारें सांगितलें, परंतु राजाचें ह्मणणें कीं, 'सुईच्या अग्राइतकी मृत्तिका देणार नाहीं,' यामुळें मार्गशीर्ष वद्य ३०, सायंकाळीं, राजा दुर्योधन युद्धांत पडोन, राज्य हरविलें. तसेंच भाऊसाहेब आपणास घडून आलें. आतां अंत राहिला नाहीं. तुमच्या लष्कराची खराबी दुराणीस कळली, आतां सर्वस्वी बुडवितो. काळचक्रांत पडलों, उत्तम गोष्ट बनून न आली. पहिल्यानेंच स्नेह संपादिला नाहीं. आतां इराणी तुह्मांस खातरेंत आणीत नाहीं. तुह्मीं हेका केल्यानें, सर्व दौलत बुडविली. यासमयीं, याठायीं श्रीमंत राजश्री नानासाहेब असते तर कसच्या गोष्टीचा हेका न करते. तुह्मीं प्राणांनिशीं जातां. तुमच्या चित्तांत असें येत असेल, इराणीचा मजकूर किती? मारून धुडकावून देऊं. ही गोष्ट सांगतां खरी, परंतु तो प्रसंग आतां नाहीं. हा जीव तुमचे अन्नाचा, या प्रसंगीं खर्च झाला असतां चांगला, परंतु अगोदर अन्नावांचून डोळ्यांपुढें अंधारे येतात, तेव्हां युद्धाची वार्ता कशी करावी? आतां जीवित्वाचा तमा[1] धरून रांडापोरें वांचतात असा अर्थ नाहीं. तुह्मीं सर्वांचा घात केला, आपल्या हातें सर्व वैभव बुडविलें! आमच्या डोळ्यांदेखत आमचीं रांडापोरें गिलचा बाटवितो, यांत संदेह नाहीं. तें दुःख प्रत्यक्ष दृष्टीनें पहावें. आपण आपला कुटुंबघात आपल्या देखत करून, उद्यांच्या लढाईत आह्मीं सर्व प्राणांनिशीं गेल्यानें आपली स्वारी फत्ते होतेकीं काय?"

हें भाषण ऐकून भाऊंचें तोंड उतरलें व ते निराश होऊन ह्मणाले कीं, "होणारास उपाय काय? आपण आपलें अनिष्ट कोणी चिंतीत नाहीं, दैवगतीनें घडून आल्यास उपाय कोणाचा? यश किंवा अपयश महाराज छत्रपतीकडे. आतां शरीर तृणप्राय मानून मर्दुमीचा[2] हिय्या[3] न सोडतां, समशेरीची शर्थ करून दाखवावी. कौरव पांडव सकल सेनेसहित कुरुक्षेत्रीं धारातीर्थी सुस्नात झाले. तदनुरूप आपणही व्हावें. यापरता पराक्रम कोणता? सर्व सत्ता श्री-कैलासनाथाची, त्याप्रमाणें

१ र. या. पा. प. ३३.

1 Regard for or great, care or fear respect
2. Valor · 3 Spirit or ardour

ज्या गादीभोंवतीं जमून ते एकोप्यानें लढाया व मसलती करीत त्या गादीची अगदींच पायमल्ली झाली होती. तात्पर्य नजीबखानाचें शहाणपण व मसलती यांचा दिल्लीच्या बादशाहीस फारसा उपयोग झाला नाहीं. नजीबखान स्वभावानें धीट, दूरदर्शी, परंतु कपटी व विश्वासघातकी होता. राजकारणी पुरुषांत हीं शेवटलीं दूषणें गुणच समजलीं जातात!

नजीबखानाच्या मरणानें मुसलमानांच्या राज्याची मोठीच बाजू खचली. त्याचामागून त्याचा मुलगा झबेतखान हा आपणास अमीरउल्-उमराव ह्मणवूं लागला. पण त्याचें वर्तन त्याच्या बापाच्या अगदीं विरुद्ध होतें. मराठे व बादशहा या दोघांस गोडीगुलाबीनें वागवून घेण्याची जी नजीबखानाची युक्ति होती, तीप्रमाणें झबेताखानाचें वर्तन होईना. मराठ्यांचें व बादशहाचें सूत लागलेलें ठाऊक असतांही त्यानें अधिकारारूढ होतांच बादशहाची नेमणूक बंद केली व जनानखानांतल्या स्त्रियांचाही त्यानें अपमान केला. यामुळें बादशहा संतापून त्यानें मराठ्यांस रोहिलखंडावर स्वारी करण्यास सूचना केली.

महादजी शिंदे वगैरे सरदार रोहिल्यांचें पारिपत्य करण्याची वाट पहातच होते. बादशहास दिल्लीस आणण्याच्या खटपटींत नजीबखानाचें सहाय्य पाहिजे होतें ह्मणून हा बेत राहिला होता, परंतु आतां ही स्वारी करण्यास विसाजी कृष्ण ही अनुकूल झाला. होळकर मात्र झबेताखानाशीं संधान बांधीत होता, तथापि त्याचें न ऐकतां पेशव्यांची फौज अंतरवेदींत उतरली व त्यांनीं रोहिल्यांवर स्वार पाठविले. मराठे येतातसे पाहून झबेताखान उत्तरेकडे शुक्रताल किल्ल्यांत गेला होता. पानिपतमध्यें ज्या रोहिले लोकांनीं एवढें शौर्य केलें, त्यांपैकीं सरदार दुंदीखान नुक्ताच मेला होता व हाफीज रहिमानाजवळ फौजफांटा कमी होता, यामुळें तोही दुर्बळच झाला होता. तात्पर्य, यावेळीं रोहिले लोकांची उतरती कळा होती व मराठ्यांशीं टक्कर देण्यापुरती त्यांना शक्ति उरली नव्हती. यामुळें पानिपतच्या लढाईत एवढें शौर्य दाखविलें असतांही, मराठ्यांचा घोडा दिसला कीं रोहि-

लखंडांतले गांव पळून जात. याप्रमाणें एकाच स्वारींत मराठ्यांनीं बरेंच रोहिलखंड काबीज करून, पुष्कळ लूट मिळविली.

त्याचप्रमाणें दिल्लीकडे कोणीच वैरी न उरल्यामुळें तेंही शहर खालीं येऊन मराठ्यांनीं तेथें पुनः प्रवेश केला. पानिपतच्या पळांतून वांचलेले पुष्कळ मराठे यावेळीं होते. त्यांस जो आनंद झाला तो वर्णन करतां येत नाहीं. मराठे रोहिलखंडांत शिरले तेव्हां सुजाउद्दौल्यानें त्यांशीं सलुख्याचीं बोलणीं लाविलीं व तोही रोहिल्यांचा नाश होण्याची वाट पहात होता.

इकडे शहाअलमास दिल्लींत नेण्याचा ठराव झाला होता त्याप्रमाणें, त्यानें आपल्या इंग्लिश मित्रांचा निरोप घेऊन अलहाबाद सोडली. त्याला पोंचविण्यासाठीं अयोध्येचा नबाब व जनरल बेकर हे आपापल्या हद्दींपर्यंत आले होते. शहाअलमास मराठ्यांकडे जाऊंनये ह्मणून इंग्लिशांनीं अनेकप्रकारें सांगून पाहिलें, पण तें त्याच्या पसंतीस न उतरून, त्यानें शेवटीं मराठ्यांचें सहाय्य स्वीकारलें. बादशहाच्या बरोबर फौज फार नव्हती, पण जी होती ती उत्तम निवडक असून, कांहीं लोक फ्रेंचांच्या हाताखालीं कवाईत शिकलेलेही होते. बादशहाची स्वारी पावसाळ्याच्या सुमारास फरुकाबाद येथें आली व पर्जन्यकाळपर्यंत जवळच नबीगंज येथें छावणी करून रहाण्याचा बेत झाला. मराठ्यांस फरुकाबाद मात्र मिळालें नव्हतें. फरुकाबादचा नबाब अहमदखान बंगश पानिपतमध्यें होता. तोही याच सुमारास मेल्यामुळें बादशहानें त्याच्या मुलास गादीवर स्थापून पांच लाख रुपये नजराणा घेतला. यावेळीं बादशहापाशीं विसाजी कृष्णाकडून अनंतराव नांवाचा एक गृहस्थ वकील होता. त्याच्या मार्फत मराठ्यांनीं जो करार बादशहाशीं केला त्यांतील मुख्य कलमें पुढें दिल्या प्रमाणें होतीं:—

१ महमदशहापासून शिल्लक पडत आलेली चौथाईची रकम द्यावी.

२ रोहिलखंडांत वगैरे जेथें जेथें बादशहाची व मराठ्यांची फौज जाईल, तेथें मिळालेल्या लुटींत दोघांचा सारखा हिस्सा असावा.

---

1 Franklin's "Shan-Alum" 2 Strachey's "Hastings & the Rohilla war" 41

३ दिल्लीस येतांच मराठे सरदारांच्या जहागिरी पूर्वीप्रमाणें सुरू कराव्या.

४ जाटांशीं लढाई चालविण्यासाठीं तात्काळ पांच लाख रुपये द्यावे.

बादशहाला हीं कलमें मान्य झाल्यावर त्याला दिल्लींत आणण्या-



शहाअलम.

करितां विसाजी कृष्णानें, महादजी शिंद्यास फरुकाबादेस पाठविलें. बादशहाची स्वारी तारीख २५ डिसेंबर १७७१ रोजीं, मोठ्या समारंभानें दिल्लींत आली. दिल्लीच्या लोकांसही बादशहा आल्यामुळें फार

आनंद आला. रोहिले पठाणांच्या अमलास ते लोक त्रासले होते, यामुळें आपला खरा बादशहा परत आलेला पाहून त्यांस आनंद होणें साहजिकच होतें.

यानंतर बादशहाची व मराठ्यांची फौज रोहिल्यांवर पुनः स्वारी करण्यास निघाली. या मराठीफौजेंत, महादजी शिंदे हा प्रमुख असून नजीबखानाचें घराणें मुळापासून नाहींसें करण्याचा त्याचा कृतसंकल्प होता. या फौजेसअटकाव करण्यासाठीं गंगेवर जेथें जेथें उतार होते, तेथें तेथें शत्रूंच्या टोळ्या जमा झाल्या होत्या. परंतु आपण ते उतार सोडून दुसरीकडे जातों, अशी हुलकावणी दाखवून महादजी शिंद्यानें अकस्मात् माघारें फिरून नदी ओलांडिली व बेसावध असलेल्या रोहिल्यांची कत्तल उडविली. यामुळें चोहोंकडे मराठ्यांचा दरारा बसून त्यांस हरकत करण्यास कोणी उभा राहीनासा झाला. नजीबखानाच्या जहागिरींत शुक्रताल, फत्तरगड (नजीबाबाद) व घोसगड, असे तीन बळकट किल्ले होते, तेही सहज

---

१ यासुमारास एक गमतीची गोष्ट झाली. ती पाहून मराठे सरदार आपला धनी जो पेशवे त्याची आज्ञा कशी शिरसा मानीत होते हें दिसून येईल. एके दिवशीं सर्व मराठे सरदार बादशहाच्या भेटीस जाण्यास निघाले होते. इतक्यांत पेशव्यांकडून चार ढालाईत (जासूद) येऊन दाखल झाले. मराठे सरदारांमध्यें बेबनाव झाला हें ऐकून माधवरावानें तावडतोब जासुदांस आज्ञापत्रें देऊन पाठविलें होतें. जासुदांस पहातांच सरदारांनीं काय आज्ञा ह्मणून विचारिलें व पेशव्याचे लखोटे वाचून, संध्याकाळीं दरबाराहून आल्यावर उत्तर देऊं असें ते ह्मणाले. परंतु सरदार जेथें भेटतील तेथें गांठून उत्तर त्वरित आणावें ह्मणून श्रीमंतांनीं आज्ञा दिली आहे, सबब उत्तर दिल्याखेरीज पुढें जाऊं देणार नाहीं, असें जासुदांनीं सांगतांच, सर्व मराठे सरदार मुकाट्यानें मागें परतून त्यांनीं आपसांत एकोपा झाल्याचें वृत्त लिहून पत्रें दिलीं. चार जासुदांनीं सर्व मराठ्यांस वळविलें हें पाहून पेशव्याचे दराऱ्याचें बादशहास फारच आश्चर्य वाटलें.

खालीं आले. त्यांपैकीं फत्तरगडावर झवेता राहिला होता. त्यानें आपल्या बचावाविषयीं पुष्कळ प्रयत्न केले. शेवटीं निरुपाय होऊन तो एकटाच जाटांकडे पळाला. मागें मराठ्यांनीं किल्ला घेतला व नजीबखानाचीं मुलेंमाणसें कैद केलीं. पानिपतच्या युद्धांत मराठ्यांची जी संपत्ती त्यानें लुटींत जमवून ठेविली होती, ती सर्व मराठ्यांचे हातीं सांपडली. पानिपतावर कैद केलेल्या मराठ्यांच्या कांहीं बायकाही त्या किल्यांत सांपडल्या असें सांगतात. याचवेळीं झबेताखानचा मुलगा गुलामकादर याचें बादशहानें पुरुषत्व नाहींसें केलें, व त्याचद्वेषानें पुढें त्यानें बादशहाचे डोळे काढले! मराठ्यांनीं सर्व लूट वगैरे घेऊन कांहीं फौज माघारी दिल्लीकडे पाठविली. परंतु महादजी शिंदे मात्र दुआबांत राहिला होता. नजीबखानाच्या जहागिरीचा आपण नाश केला या गोष्टीचा महादजीस फार अभिमान वाटे. परंतु या वेळीं मराठ्यांनीं मिळविलेल्या लुटींपैकीं बादशहास कराराप्रमाणें हिस्सा दिला नाहीं यामुळें व अशाच पैशाच्या कांहीं प्रकरणांवरून, बादशहाचें व मराठ्या सरदारांचें जमेनासें झालें होतें.

जाटांकडे झबेताखान गेल्यामुळें त्यांच्यावर मराठ्यांची फौज रवाना झाली होती. इकडे मराठ्यांनीं सर्व रोहिलखंड कावीज केल्यामुळें अयोध्येच्या नबाबास धास्ती पडली होती, ह्मणून त्यानें हाफिजरहिमतखान वगैरे रोहिल्यांस मदत देण्याचा करार करून, प्रसंगीं इंग्लिशांचीही मदत घेण्याचा विचार केला. याप्रमाणें रोहिलखंडांत मराठ्यांच्या विरुद्ध हा नवा जमाव होत होता. पण झबेताखानानें तुकोजी होळकराचे विद्यमानें मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें. त्याच्याबरोबर तह करणें महादजीस पसंत पडलें नाहीं व तो रागावून आपल्या फौजेसह जयपूर प्रांतांत गेला. मागें होळकरानें एकलाख रुपये घेऊन झबेताचीं, हातीं लागलेलीं मुलें माणसें मुक्त केलीं व झबेतास पुनः अमीर-उल्-उमराव हा अधिकार मिळवून द्यावा ह्मणून, त्याच्याकडून पुष्कळ रुपये घेतले. इतक्यांत सुजाउद्दौलावगैरे एकत्र झालेल्या शत्रूंनीं बादशहा व मराठे यांचेमध्ये वैमनस्य पाडण्याविषयीं फार खटपट

केली. यामुळें जाटांच्या मदतीला मराठे गेले असतां बादशहानें होळकरावर फौज पाठविली. बादशहास गादीवर बसवून पुरें वर्ष सुद्धां झालें नव्हतें, तोंच या प्रसंगावर बेतलें. होळकरानें बादशाही सैन्याचा दिल्लीजवळ मोड करून तो दिल्लींत गेला व त्यानें झबेताखानास अमीर-उल्-उमराव केलें. महादजी शिंदे जयपुराकडे होता. तेथेंही त्यानें पुष्कळ लूट मिळविली. याप्रमाणें वर्तमान चाललें आहे तोंच, विसाजी कृष्ण, पेशव्याचे हुकुमावरून दक्षिणेंत परतला. त्यासुमारासच, माधवराव पेशवे आपल्या वयाच्या अठ्ठाविसाव्यावर्षी, थेऊर येथें मरण पावल्याचें दुःखकारक वर्तमान आलें. त्यामुळें होळकरानें सुद्धां हिंदुस्थानांतून आपलेडेरे उचलून दक्षिणेकडे निघण्याचा विचार केला. तुकोजीनें बादशाही फौजेचा मोड केल्यावर बादशाहाकडून कोरा व अलहाबाद प्रांतांच्या सनदा करून घेतल्या. परंतु हे प्रांत इंग्लिशांनीं अगोदरच दडपले होते, यामुळें इंग्लिशांची व मराठ्यांची लढाई जुंपण्याचा बेत आला होता. परंतु पुढें दक्षिणेंत माधवरावाच्या मरणापासून जे घोंटाळे उत्पन्न झाले, ते मिटविण्यांतच मराठे सरदार गुंतून राहिले.

माधवराव, तारीख १८ नवंबर १७७२ रोजीं मरण पावला. त्यामुळें मराठ्यांच्या वाढत्या शक्तीस जबरदस्त धक्का पोंचला. पानिपतच्या लढाईपेक्षां त्याच्या मरणानें महाराष्ट्राचें फार नुकसान झालें. त्याच्या कारकीर्दींत प्रजेस न्याय व सुख मिळूं लागलें होतें व मराठ्यांचें पुनः ऐक्य होण्याचा रंग दिसत होता. परंतु विपरीत काळ आला ह्मणजे चांगल्या वस्तु व चांगलीं माणसें नाहींशीं होतात. माधवरावाच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून महादजी शिंद्यास फारच वाईट वाटलें. माधवरावानेंच त्याला लहानाचा थोर सरदार करून त्याचेवर कृपादृष्टि ठेविली होती व रघुनाथरावाच्या रागांतून माधवरावामुळेंच महादजी मुक्त झाला. त्यानें मरण्याच्या अगोदर शिंदेहोळकरांस हैदरावर स्वारी करण्याच्या उद्देशानें दक्षिणेंत बोलाविलें होतें, ह्मणून महादजी जयपुराहून दक्षिणेंत येण्यास निघाला होता. होळकरानेंही दिल्ली सोडल्यामुळें चंबळेपलीकडे मराठ्यांची फौज नाहींशी होऊन,

सुजाउद्दौला, इंग्लिश व रोहिले यांनीं स्वारीकरून मराठ्यांचीं दुआ-बांतील सर्व ठाणीं उठवून त्यांस हांकून लाविलें. इटावा नांवाचा किल्ला, १७७३ च्या अखेरीस मराठ्यांच्या हातून गेल्यावर त्यांचें तिकडे कांहींच राहिलें नाहीं. माधवरावाच्या मृत्यूमुळें व पुढें नारायणरावाचा खून झाल्यावर दक्षिणेंत राघोबादादानें जें बंड केलें, त्यांत इंग्लिशांशीं लढाई करण्यास गुंतल्यामुळें, मराठ्यांस दहाबारा वर्षेंपर्यंत पुनः चंबळी ओलांडण्यास फावलें नाहीं आणि तिकडल्या राजकारणांतून त्यांचा हात कांहीं वर्षें अगदीं नाहींसा झाला. महादजी शिंदे माळव्यांत आल्यावर उज्जनी येथें गेला व तेथें बसून त्यानें आपल्या जहागिरीकडे विशेष लक्ष दिलें.



# भाग ६ वा.

## नारायणरावाचा वध.

### इंग्रजांशीं पहिली सलामी.

'माधवराव पेशव्याच्या मरणामुळें पेशव्यांच्या घराण्यास उतरती कळा लागली. यापुढें पेशवाई फक्त नांवाची राहिली. मराठ्यांचें राज्य ज्या एकसूत्रानें हालत होतें, तें सूत्र ढिलें पडलें. पुण्याचा दाब कमी झाला व मराठ्यांची राज्यसत्ता या पुढें विभागली गेली. "मराठे, मराठे" ह्मणून शत्रूंना जो आजपर्यंत वचक होता, तो यापुढें कमी झाला. 'मराठे' या व्यापक शब्दाच्या ऐवजीं पेशवे, शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड, हीं घराणींच स्वतंत्रतेनें हिंदुस्थानच्या राज्यकारस्थानांत मन घालूं लागलीं. मध्यवर्ती शक्ति लयास पावल्यामुळें शिथिल झालेले अवयव मात्र वेगळे वेगळे हालूं लागले. पेशव्यांचा कमजोर झाला नसता व गृहकलहामुळें पेशव्यांच्या घराण्याची दुर्दशा उडाली नसती तर हा प्रसंग कदाचित् आला नसता. माधवरावाच्या कारकीर्दींत खासगी द्वेष व गृहकलह यांमुळें अव्यवस्थित झालेल्या मराठ्यांच्या राष्ट्राची पुनः एकजूट करण्याविषयीं, त्याला जास्त आयुष्य असतें तर त्यानें प्रयत्न केला असता. सातारच्या महाराजांस पुनः पुढें करून, मराठ्यांची शक्ति एकवटण्याची माधवरावाची फार इच्छा होती. परंतु त्याच्या अकालिक मृत्यूमुळें महाराष्ट्राचा व मराठ्यांचा सर्वस्वी नाश झाला. हिंदुस्थानभर पसरलेल्या शेंकडों लहान मोठ्या मराठे सरदारांचें आकलन करण्याची शक्ति जी इतके दिवस पेशव्यांकडे होती ती नाहिंशी झाली. माधवरावाच्या थोडक्या कारकीर्दींतच मराठ्यांनीं आपल्या विजयी स्वाऱ्यांनीं पानिपतच्या महाघोर प्रसंगाचें विस्मरण पाडलें होतें व सर्व महाराष्ट्राचें लक्ष या शूर,

१ धा० रामराजे. च० ३८.

1 Comprehensive - 2 Central 3 Languid

तरुण, प्रजापालनदक्ष व भाग्यशाली माधवरावाकडे लागलें होतें. आपल्या प्रजेचें न्यायानें पालन करण्याविषयीं त्याची फार इच्छा असे व राजधर्माच्या कर्तव्यकर्मास तो जागृत होता. त्याच्या अकालिक मृत्यूमुळें महाराष्ट्राच्या सर्व आशेचा भंग झाला व पेशव्यांच्या वैभवसमुद्रास ओहटी लागली.

पेशव्यांप्रमाणेंच गायकवाडादि मराठे सरदारांच्या घरांमध्येंही कलह माजले. पेशव्यांच्या खालोखाल, मराठ्यांचें दुसरें मोठें बलाढ्य राज्य, नागपूरच्या भोंसल्यांचें होतें. रघूजी भोंसल्यानें बंगाल, बहार, ओरिसा, वराड, गोंडवण वगैरे प्रांतांत मुलुखगिऱ्या करून आपला अंमल बसविला होता व पुष्कळ संपत्ति जमविली होती. परंतु त्या बलाढ्य घराण्यांतही अतिशय द्वैत माजून भावाभावांमध्यें लढाया सुरू झाल्या. जानोजी भोंसले-सेनासाहेब सुभा, माधवरावाच्या मागून थोड्याच महिन्यांनीं तुळजापुरास मरण पावला. त्याच्या मागें त्याचे बंधु साबाजी व मुधोजी भोंसले—सेनाधुरंधर, या उभयतांमध्यें दत्तकासंबंधानें वितुष्ट पडलें. जानोजीच्या मनांत मुधोजीचा मुलगा रघोजी याला दत्तक घ्यावयाचें होतें, पण 'सेनासाहेबसुभा' हें पद आपल्यास मिळण्याविषयीं साबाजीची इच्छा फार होती. माधवरावानें रघोजीलाच तें पद दिलें असतें, परंतु त्याच्या मरणापासून पुढें पुणें येथील दरबारांत दुफळी झाली होती. रघुनाथराव व त्यांचें मंडळ यांचा, नारायणराव व त्याचे कारभारी मंडळीशीं बेबनाव झाला होता. यामुळें रघुनाथरावाच्या पक्षाच्या मुधोजीभोंसल्यास पेशव्याचें पाठबळ नाहींसें होऊन, नारायणरावानें 'सेनासाहेबसुभा' हें पद साबाजीला सांगितलें. यामुळें मुधोजी व साबाजी युद्धास तयार झाले. साबाजीला पेशवे व निजाम यांची मदत होती, व मुधोजीला राघोबादादाचें आंतून सहाय्य होतें. हें प्रकरण निकरावर ठेपलें इतक्यांतच एकाएकीं नववयस्क पेशवे, नारायणराव, यांच्या भयंकर खुनाची बातमी चोहोंकडे पसरली व या विलक्षण अमानुष कृत्याकडे हिंदुस्थानचे डोळे लागले.

राघोबादादा ऊर्फ रघुनाथराव हा पुरुष मोठा शूर सरदार होता,

15

हें त्याच्या शत्रूंस देखील कबूल करणें भाग होतें. परंतु तो जितका तरवारबहाद्दर होता तितकाच तो व्यवहारशून्य, मंदबुद्धि व स्त्रीलंपट होता. कोणत्याही राष्ट्राच्या अवनतीस प्रारंभ होण्यास अनेक कारणें असतात, परंतु कांहीं प्रसंगांनीं एकटाच मनुष्य त्या राष्ट्राच्या दुर्दशेस प्रत्यक्ष कारण होतो. त्याप्रमाणेंच रघुनाथरावाची कथा आहे. पेशव्यांचे घराण्यांत याच्यामुळेंच प्रथम कलीचा प्रवेश झाला असें ह्मटलें तरी शोभेल. सदाशिवरावानें कारभार सोडून पानिपतचें भारती युद्ध करण्याचें मनावर घेण्यास दादाच कारण झाले. पुढें माधवरावाला अनेक वेळां दादांनीं उपद्रव देऊन राज्यस्थितीस व व्यवस्थेस व्यत्यय आणिला, त्यामुळें त्यांनां प्रतिबंधांत ठेवणें भाग पडलें. परंतु आपण क्षीण झालों, पुढें वांचणें कठीण व नारायणराव तर अल्पवयी कोंवळें मूल, त्याच्या हातून दिवसेंदिवस जड होणारा महाराष्ट्रराज्यरूपी शकट हांकणें कठीण होईल, हें लक्षांत आणून मरण्याचे पूर्वीं कांहीं दिवस, माधवरावानें रघुनाथरावास मुक्त करून कारभारांत घेतलें व मरतेवेळींही नारायणरावाचें मुलाप्रमाणें पालन व रक्षण करीन, असेंही त्याचेकडून अभिवचन घेतलें. माधवरावाच्या मरणापूर्वींच, पुढें आपण पेशवा व्हावें ह्मणून रघुनाथरावानें निजाम व हैदर यांशीं अनुसंधान बांधलें होतें. माधवरावाच्या अगदीं असाध्य अवस्थेंतच त्याचे फितुरी कागदं पकडले जाऊन, मसलतींत असणाऱ्या बऱ्याच मंडळीस गडांवर वास करावा लागला. पण रघुनाथरावाला क्षमा करणेंच भाग पडलें. माधवरावाच्या मागून, रीतीप्रमाणें पेशवाईचीं वस्त्रें नारायणरावास आलीं. नंतर कांहीं दिवस चुलता पुतणे एक विचारानें काम पहात होते. पण रघुनाथरावाची खुपसुरत, परंतु जितकी वरून चांगली तितकीच आंतून दुष्ट अंतःकरणाची स्त्री, आनंदीबाई, हिच्या राजकीय मसलती सारख्या चालू होत्या. आपण पेशव्याची बायको ह्मणवून घ्यावें, ही महत्वाकांक्षा तिला होती. माधवरावाच्या पश्चात् आपले हेतु सिद्धीस जातील, ह्या आशेची नारायणरावाला पेशवेपद मिळाल्यावर निराशा होऊन, तिला चैन नाहींसें झालें व ती राजकीय उलाढलीच्या मसलतीस लागली. रघुनाथ

1 Commutation, deletion. 2 Incurable.

राव तिच्या सौंदर्यास लुब्ध होऊन तिचा गुलाम झाला होता. त्याला तिचें मन मोडवेना व तोही मसलतींत मिसळला. इतक्यांत वर सांगितलेलें भोंसले प्रकरण उद्भवलें व त्यांत तर चुलतापुतण्याचे वेगळे विचार झाले. रघुनाथरावाच्या एकूणएक मसलती नानाफडणीस वगैरे कारभाऱ्यांस कळत असत. तेव्हां रघुनाथरावाचा कांहीं तरी बंदोबस्त करणें अवश्य वाटून, माधवरावानें पूर्वी ज्याप्रमाणें त्यास ठेविलें होतें, त्याप्रमाणेंच पुनः त्यास नजरकैदेंत ठेवण्याची पेशव्यांस कारभाऱ्यांनीं मसलत दिली. त्याप्रमाणें कैदेंत ठेवल्यामुळें तर कलह जास्तच माजला व रघुनाथरावाचे स्नेही भारी मसलतींत पडले. या मसलतींत मुधोजी भोंसल्याचे वकील गुंतले होते, इतकेंच नाहीं तर ज्या गार्द्यांनीं नारायणरावाचा खून केला, त्यांनां भोंसल्याचे पैशाचे आमिष मिळालें होतें. नारायणरावाचा खून करण्यांत आनंदीबाई लौकिकास पुढें झाली, परंतु आंतून जीं कारस्थानें चाललीं होतीं, त्यांत भोंसल्याचे पदरच्या परभू लोकांचें आंग होतें. परभू लोकांचा[1] पेशव्याचा कांहीं जातिसंबंधी न्यायावरून द्वेष पडला होता. त्याचा सूड उगविण्यामध्यें त्यांनीं आनंदीबाईस पुढें करून गार्दी मंडळीस आपण फितर केलें. ही हकीगत तेव्हां पुण्यामध्यें सुद्धां फारशी कोणास समजली नव्हती.

नारायणराव अल्पवयांतच मारला गेल्यामुळें, त्याच्या स्वभावाविषयीं मत देणें कठीण आहे. तथापि, माधवरावाच्या आंगीं जी धूर्तता व जो पेंच होता, तीं याच्यांठायीं वास करीत नव्हतीं. गोपिकाबाईच्या चिथावणीनें त्यानें रघुनाथरावाची पुष्कळ अमर्यादा केली ह्यांत संशय नाहीं. त्याचप्रमाणें तो आपल्या तर्फेच्या कारभाऱ्यांशीं सुद्धां नीट नसून हलक्या लोकांचे नादीं लागला होता. आपल्या वाड्यांत इतका फितुर झाला आहे, हें नारायणरावाचे लक्षांतही आलें नाहीं. नारायणरावास कैद करण्याचे मसलतींत मुधोजीभोंसल्याचे वकील व सखाराम बापू हे मुख्य असून, रघुनाथराव त्यांस अनुकूळ होता. हैदराचा

[1] नागपूरकर भोंसले ब० ९०,९३–१००. का० प्रभूंच्या इ० साधनें "मामलेप्रकरण" ४–६.

वकीलही या मसलतींत होताच. पावसाळ्यांत पुण्यांत फौज शिल्लक नव्हती व दसरा अद्यापि दूर होता; तोंपर्यंत मराठी फौज बहुतेक रजेवर असे. ही संधि राखून परदेशी गार्द्यांस तीनलाख रुपये देण्याचें करून पेशव्यास कैद करण्याची मसलत वरील मंडळीनें केली. खुद्द नारायणरावाचे खिजमंतगारसुद्धां फितुरांत सामील होते. कांहीं फंदफितुर आहे, अशी कांहीं दिवस गांवांत गुणगुण होती, परंतु श्रीमंतांचे जिवावरचा प्रसंग आहे असें कोणाचेही ध्यानीं नव्हतें. शिवाय माधवरावपेशव्यांनीं मरण्यापूर्वी नारायणरावाबद्दल आपल्या चुलत्यास इतकें सांगून घेतल्यावर त्याचे हातून असें क्रूर व दुष्ट कृत्य होण्याची शंका सुद्धां कोणाचे मनांत येईना. शेवटीं त्याअखेरच्या दिवशीं स्वतः नारायणरावास फितुरीची बातमी समजली असतांही तो बंदोबस्ताशिवाय पर्वतीहून वाड्यांत गेला. दुपारची शांत वेळ असून शहरांत चोहोंकडे स्वस्थता पाहून, पूर्वसंकेताप्रमाणें, गार्द्यांनीं वाड्यांत अकस्मात् प्रवेश करून, अत्यंत क्रूर रीतीनें राघोबाच्या समोर पेशव्याचा खून केला! हें राक्षसी कृत्य झाल्यावर पुतण्याच्या रक्ताचा टिळा लावून दुष्ट, नीच, कुळांगार, रघुनाथराव, पेशव्याच्या गादीवर विराजमान झाला! पेशवाईची व ब्राह्मणी शहाणपणाची सीमा झाली!! मोंगलांचें अनुकरण अखेरीस पुणें शहरांत सुरू झालें. नारायणरावाच्या मरणामुळें इंग्रजांचें पाऊल आंत शिरलें व अखेरीस पेशवाईचा ऱ्हास झाला. यापुढील इतिहास पेशव्यांचा नसून मुत्सद्यांचा आहे. त्यांच्या शहाणपणानेंच पुढें चाळीस पंचेचाळीस वर्षें पेशवाई चालली.

नारायणरावाच्या मरणामुळें रघुनाथराव पेशवा होऊन अंमल चालवूं लागला. परंतु नारायणरावाच्या वधास या मूर्ख पुरुषानें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें मदत केली होती ही गोष्ट सर्व महाराष्ट्रांत प्रसिद्ध होऊन, सर्व लोक रघुनाथरावाचा द्वेष करूं लागले. इतकेंच नव्हे तर थोडक्याच दिवसांत प्रख्यात रामशास्त्री यांनीं सबळ पुरावा मिळवून, नारायणरावाचे खुनांत आपलें आंग होतें, असें खुद्द रघु-

---

१ पं. प्र. श. २७-२८; ना. भों. ब. ९३; धा. रा. च. ३९; श्री. ना. पेशवे यांची बखर १-५.

नायरावाकडून कबूल करविलें! रघुनाथरावानें सखारामबापूस आपला कारभारी नेमिलें. परंतु चिंतो विठ्ठल, सदाशिव रामचंद्र वगैरे मंडळीवर त्याचें प्रेम फार होतें. नारायणरावाचा खून झाल्यापासून तत्पक्षीय लोकांच्या रघुनाथरावाविरुद्ध मसलती चालल्या होत्या, परंतु रघुनाथरावास मात्र आतां आपण निर्भय झालों असा भ्रम होता.

निजाम व हैदर या उभयतांनीं पेशव्यांच्या घरांतच कलह माजलेला पाहून मराठ्यांवर चाल करण्याचे विचार चालविले. साबाजी भोंसले व मुधोजी भोंसले यांच्या तंट्यांत, साबाजीला निजामानें मदत देण्याचें कबूल केलें. रघुनाथरावानेंही ताबडतोब फौजेची तयारी करून कर्नाटकांत जाण्याचा विचार ठरविला. परंतु जातां जातां निजामाचा समाचार घेतल्याशिवाय पुढें जाणें आपल्या राज्यास अपायकारक आहे असें जाणून त्यानें निजामावर प्रथम चाल करून, बेदराजवळ मोंगलांचा पराभव केला. पुढें निजामानें पेशव्याशीं तह करून वीस लाखांचा मुलूख पेशव्यास दिला. परंतु थोडक्याच दिवसांत एका भेटीच्या प्रसंगीं, निजामानें रघुनाथरावाची स्तुति करून इतकें चढविलें कीं, त्या भरांत दादासाहेबांनीं मिळविलेला सर्व मुलुख परत केला! पुढें दादांची स्वारी कर्नाटकाकडे वळली. इतक्यांत साबाजी भोंसले यानें अवरंगाबादेकडे चाल केली. हें ऐकून दादांनीं त्याचे पारिपत्यास त्रिंबकरावमामाची रवानगी करून आपण दक्षिणेकडे चाल केली.

नारायणरावाच्या तर्फेचे प्रख्यात मुत्सद्दी नाना फडणवीस, मोरोबादादा फडणवीस, बजाबा पुरंधरे, हरिपंत फडके, त्रिंबकराव मामा, सखारामबापू व बाबुजी नाईक बारामतीकर इत्यादि असून, ते रघुनाथरावाचें पारिपत्य करण्याच्या खटपटींत होते. सखारामबापूला या मंडळीनें दादांकडून आपल्या जुटांत ओढल्यामुळें, दादासाहेबांची बाजू कमजोर झाली. परंतु जोंपर्यंत दादासाहेब पुण्यामध्यें होते व एकंदर फौजफाटा त्यांचे हातीं होता, तोंपर्यंत एकाएकीं बंड करण्याचें या बारभाईस साधलें नाहीं. परंतु रघुनाथरावानें पुणें सोडतांच त्यांच्या मसलतीस जोर आला. इतक्यांत नारायणरावाची विधवा स्त्री, गंगाबाई गरोदर आहे असें समजतांच, पुत्र हो-

ईल या आशेनें तिला पुरंदरच्या किल्ल्यावर त्यांनीं पाठविलें. रघुनाथराव कर्नाटकाकडे जातांच नानाफडणीस, सखारामबापू वगैरे मंडळी, एकामागून एक, कांहीं तरी निमित्य सांगून परत पुण्यास आली. त्यांचें गूढ दादासाहेबांचे लक्षांत आलें नाहीं. दादासाहेब दूर जातांच या कारभारी मंडळीनें, सावाजी भोंसले व निजामअल्ली यांस आपल्या पक्षाकडे अनुकूळ करून घेतलें. इकडे रघुनाथरावानें हैदराचे मुलखांत प्रवेश करून त्यास जेरीस आणिलें. परंतु मागें पुरंदर येथें गरोदर गंगाबाईस ठेविलें व गर्भवासी सवाईमाधवरावाचे नांवें राज्य चालू झालें. हें समजतांच कारभारी मंडळीचे पारिपत्यासाठीं दादासाहेब हैदराशीं कसावसा तरी तह ठरवून मागें परतले. परंतु त्यांच्या बरोबरच्या फौजेंत सुद्धां बिघाड होऊन शेंकडों लोक परत निघून आले. भवानराव प्रतिनिधी, वामन हरी पटवर्धन व मुरारराव घोरपडे वगैरे प्रख्यात सरदार तर त्याचे विरुद्ध उघड रीतीनें वागूं लागले.

सावाजी भोंसल्यावर त्रिंबकरावाला पाठविलें होतें. परंतु ते उभयतां मिलाफ होऊन रघुनाथराव कर्नाटकांतून परत येत होता त्याच्यावर चालून गेले. पुण्याहून हरिपंत फडकेही फौज घेऊन निघाले व निजामानें आपली तयारी चालविली. एथपर्यंत कारभाऱ्यांनीं जीं कारस्थानें केलीं, तीं सर्व त्यांस अनुकूल होऊं लागलीं. परंतु थोडक्याच दिवसांनीं त्रिंबकरावमामाच्या फौजेस एकाएकीं गांठून रघुनाथरावानें त्याचा पराभव करून, त्यास ठार मारिलें.

त्रिंबकरावाच्या मृत्यूमुळें किंवा त्याच्या फौजेचा पराभव केला त्यामुळें रघुनाथरावाला कांहींएक फायदा झाला नाहीं. त्याचें नांवसुद्धां लोकांस आवडेनासें झालें होतें. इतक्यांत हरिपंत फडक्याच्या फौजेस, सावाजी भोंसले व निजाम यांची फौज मिळाली. तसेंच वामनहरी पटवर्धन व भवानराव प्रतिनिधी हे ही त्यास मिळाले. बाकी राहिला मुरारराव घोरपडे, तो गुत्तीस परत निघून गेला. इतकें झालें तरी रघुनाथरावाजवळ चाळीस हजार फौज होती. तीसह उत्तरदि-

१ पत्रें व यादी. ४४७.

ठेनें चाल करून तो बऱ्हाणपुरास गेला. तिकडे गेलें असतां आपणास मुधोजी भोंसला, शिंदे व होळकर, हेही अनुकूल होतील अशी त्यास खात्री होती. रघुनाथरावाच्या पाठीवर त्याच्या विरुद्ध पन्नास हजार फौजेसह हरिपंतांनीं चाल केली. हरिपंत येतात असें कळतांच रघुनाथराव नर्मदापार होऊन इंदुरास गेला. तेथें महादजी शिंदे व तुकोजी होळकर या दोघां सरदारांनीं त्याचा बाह्यात्कारें चांगला आदरसत्कार केला. परंतु तो नर्मदा पार होतांच भोंसले वगैरे इतर सरदार त्यास सोडून गेले.

मागें पुण्याच्या दरबारांत, कारभारीमंडळांत परस्परांमध्यें मत्सर सुरू झाला व बजाबा पुरंदरे, मोरोबा फडणीस वगैरे मंडळी दादांस अनुकूल होण्याच्या बेतांत आली. ही संधि पाहून निजाम व हैदर यांनींही पुनः मराठे मुलखावर स्वाऱ्या करण्याची तयारी चालविली. तथापि कारभारीमंडळीपैकीं नानाफडणीस व सखारामबापू यांणीं, यावेळीं मोठ्या युक्तीनें सर्व मराठे सरदारांस आपल्या पक्षास ओढून घेतलें, नवी फौज उभारली व किल्लेकोटांनिहाय लढाईची सर्व सामुग्री जमवून बंदोबस्त आरंभिला. नारायणरावाची गरोदर स्त्री गंगाबाई, ही प्रसूत होऊन ( ता० १८, एप्रिल, सन १७७४. ) मुलगा झाला. त्याचें नांव सवाईमाधवराव ठेऊन त्याला साताऱ्याहून महाराजांकडून पेशवाईचीं वस्त्रें आणविलीं.

यागोष्टीमुळें तर राघोबाचा पक्ष महाराष्ट्रांत दुर्बळ झाला. त्याला शिंदे, होळकर व गायकवाड हे मदत देतील अशी मात्र आशा होती. त्याशिवाय इंग्रजलोकांचीही प्रसंगीं मदत मिळविण्याचा त्याचा विचार होता. सखारामबापू व नाना यांनीं दक्षिणेंत सुमारें तीस हजार फौज जमवून, ते पुरंदराहून निघून हरिपंत फडके यांच्या मदतीस तापीनदीकडे गेले. दरबारी मंडळीचे सर्व बेत सफल झाले व त्यांनीं मोठ्या युक्तीनें महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांनांही, पेशवा-

[1] शिंदे व होळकर यांचे मनांतून तह करून तंटा आपसांत मिटवावा असें होतें. परंतु रघुनाथरावास ती गोष्ट पसंत पडली नाहीं. ( धा. रा. च. ४३; "Gwalior" by S. N. Roy 133. )

ईचा खरा वारसदार सवाईमाधवराव, याचे पक्षास वळवून घेतलें. या दोघांनींही आपली पाठ सोडली, हें पाहून रघुनाथराव मोठ्या



थोरले माधवराव. नारायणराव.

सवाईमाधवराव.

जलदीनें गुजराथेंत गेला. या आणीबाणीच्या व पळाच्या प्रसंगींच

प्रसिद्ध शेवटले बाजीराव, हे आणंदीबाईच्या पोटीं धारच्या किल्ल्यांत जन्मास आले!

रघुनाथरावानें, आपणास कोणीही मराठे सरदार पाठबळ देत नाहींत, व सवाईमाधवरावाचा अंमल चालू झाल्यामुळें, पुणें येथें परत आपला पाय लागत नाहीं, असें पाहून, व पुतण्याचा वध केला एवढेंच पातक इहपरलोकीं आपल्या अपकीर्तीस पुरें नाहीं, असें समजूनच जणूं, परदेशी व परधर्मी लोकांस आपल्या घरांत घेतलें. इंग्रज लोकांनां मदत विचारल्यास ते देतील व तेच आपणास पुण्यास गादीवर बसवितील असें त्याला वाटूं लागून, त्यानें प्रथम सुरतेचा गव्हरनर गांबीर साहेब, याशीं तहाचें बोलणें लाविलें. ही मसलत त्यानें बऱ्हाणपुराकडे असतांच चालविली होती, परंतु इंग्रजांचें मागणें फारच पडल्यामुळें त्यानें तो नाद कांहीं वेळ सोडून दिला होता.

मुंबई बेटांत इंग्लिशांची वसाहत झाल्यापासून त्यांचा मराठ्यांशीं निकट संबंध झाला होता. परंतु मद्रास इलाख्यांत ज्याप्रमाणें इंग्रजांची सरशी झाली, तशी पश्चिमेकडे झाली नव्हती. त्यांचे व पेशव्यांचे व्यापाराच्या संबंधानें एक दोन तह झाले होते. त्यांनां मराठ्यांनीं कधींही उपद्रव दिला नाहीं इतकेंच नव्हे, तर पेशवे त्यांनां चांगल्या रीतीनें वागवीत. परस्परांचा असा स्नेह संबंध असतांनाही व पूर्वीचे तहनामे कायम असतांनाही, कंपनीचे इंग्लंदांतील अधिकाऱ्यांस मुंबईच्या आसपास मुलुख संपादण्याची फार हांव सुटली. "कसेंही करा, लांच द्या, फितुर करा, दुफळी वाढवा, परंतु मुंबई जवळील साष्टी, उरण, घारापुरी, करंजे वगैरे बेटें संपादा," अशा अर्थाचीं पत्रें विलायतेहून सदोदित मुंबईच्या अधिकाऱ्यांस येत. ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थान काबीज करण्यांत जीं जीं कृष्णकारस्थानें केलीं, त्या सर्वांत, राघोबाचा पक्ष धरून, मराठे लोकांशीं असलेला स्नेह व तहनामे गुंडाळून युद्ध सुरु केलें, आणि लबाडीनें व आपमतलबानें साष्टी घेतली, हीं कृत्यें वाईट होतीं. राष्ट्रांनीं परस्प-

रांशीं वागण्याचे जे नियम आहेत, त्यांचें इतकें उल्लंवन कधींही कोणी केलें नसेल.

इ.स. १७६८ साला पासून मुंबईकर इंग्रजांचा साष्टी व वसई यांवर डोळा होता. तीं मिळविण्याच्या हेतूनेंच त्यांनीं मोठ्या युक्तीनें पुणें येथें आपला एक वकील नेमिला. थोरले माधवराव असतानां त्यांचें कांहीं चाललें नाहीं. परंतु नारायणरावाच्या मरणानंतर हे जे गृहकलह उत्पन्न झाले, त्यांत आपला फायदा करून घेण्याची अमोल्य संधि त्यांस मिळाली.

इ.स. १७७४च्या सपटंबर महिन्यांत राघोबाचें व इंग्लिशांचें बोलणें सुरू झालें, परंतु तें जमलें नाहीं. राघोबा कांहीं केल्यास साष्टी व वसई देण्यास कबूल होईना. रघुनाथरावाकडून साष्टीबद्दल निराश झाल्याबरोबर मुंबई येथील अधिकाऱ्यांनीं ठाण्याच्या किल्लेदारास लांच देऊं केला. तेंही पुण्याच्या कारभाऱ्यांच्या दक्षतेमुळें साधलें नाहीं, तेव्हां दिसेंबर महिन्यांत इंग्रजांनीं, विनाकारण, केवळ आपस्वार्थावर लक्ष देऊन, मित्रत्वानें वागणाऱ्या शेजारी राज्यावर हल्ला करून, ठाणें घेतलें व साष्टी बेटही काबीज केलें! या सुमारास पुणें दरबाराची सगळी फौज तापीतीरीं रघुनाथरावाचे पाठीवर होती व इंग्रज असें अत्यंत नीच काम करतील, असें त्यांच्या स्वप्नींही नव्हतें!

इकडे इंग्रजांनीं जबरदस्तीनें साष्टी घेतली, त्या सुमारास मराठ्यांची फौज रघुनाथराच्या पाठीवर होती; तो गुजराथेंत असतां त्यांनीं तारीख १७ फेब्रुआरी १७७५ रोजीं, महीनदीचे कांठीं त्याचा पराभव केलो. तेव्हां निरुपाय होऊंन ते जें मागतील तें दण्याचें मनांत योजून, राघोबानें इंग्रजांशीं तह करण्याचा विचार ठरविला. शेवटीं ता० ६ मार्च, १७७५ रोजीं, सुरतेचा तह झाला. त्यांत साष्टी, वसई वगैरे मुंबई जवळील स्थळें आणि भडोच व सुरत परगण्यांचा येणारा वसूल, मिळून एकोणीस लक्षांचा मुलख इंग्रजांस देण्याचें ठरलें. या

१ परिशिष्ट अ पहा. २ या लढाईंत महादजी शिंदे व तुकोजी होळकर हे आपल्या फौजांसह फडक्यास मदत करीत होते. Forrest, Vol. I, 217.

शिवाय तीन हजार फौज इंग्रजांनीं दादासाहेबांचे मदतीस देण्याचें ठरून तिचा सर्व खर्च दादानींच सोसण्याचें कबूल केलें. या तहानें रघुनाथरावानें स्वराज्यावर परचक्र आणिलें.

महादजी व तुकोजी प्रथमतः दादांशीं मलुल्यानें वागत होते. मुत्सद्दी मंडळीचा पुणें येथें कितपत जोर आहे, तें पाहिल्या शिवाय राघोबाशीं एकदम उघड वैर करण्याचा त्यांचा विचार नव्हता. परंतु दक्षिणेंतील एकंदर बडे सरदार रघुनाथरावाविरुद्ध उठलेले पाहून त्यांनीं दादांचा निरोप घेतला. या कलहाचा परिणाम फार वाईट होणार हें लक्षांत आणून, तह करून रघुनाथरावाशीं समेट करण्याबद्दल त्यांनीं खटपट केली व त्याच हेतूनें नाना व बापू हे खानदेशाकडे गेले होते. रघुनाथरावाला उज्जनी प्रांतांत जहागीर देण्याचा त्यांचा विचार होता, परंतु त्या गोष्टीस तो कबूल होईना. तेव्हां शिंदे, होळकर हे आपल्या फौजांसह पुण्यास दाखल झाले, व रघुनाथरावानें गुजराथ प्रांतांत जाऊन वर सांगितल्याप्रमाणें इंग्रजांशीं करार केला. सुरतेचा तह होण्यापूर्वीच इंग्लिशांची कांहीं फौज गुजराथेंत रघुनाथरावाच्या मदतीस गेली होती. शिंदे होळकर दक्षिणेंत आले होते त्यांनांही कारभाऱ्यांनीं फडक्याच्या मदतीसाठीं गुजराथेकडे पाठविलें. वरील लढाई झाल्यानंतर शिंदे व होळकर यांची कांहीं फौज मात्र हरीपंताबरोबर होती, परंतु खुद्द महादजी माळव्यांत जाऊन बसला, त्यामुळें त्याच्या स्वामिभक्तिबद्दल नानातऱ्हेचे विकल्प सुरू झाले.

इकडे गुजराथेंत इंग्रजांच्या मदतीनें रघुनाथरावानें हरिपंताशीं एक लढाई मारली, तींत तो विजयी झाला. रघुनाथरावाकडे मानाजी शिंदे उर्फ फांकडे, नांवाचा शूर सरदार होता. त्यालाच जनकोजी शिंद्याच्या मागें शिंद्यांची दौलत देण्याचा राघोबाचा विचार होता. तेव्हां पासून व मागील भागांत सांगितलेल्या कांहीं कारणांवरून महादजीचें व राघोबादादाचें मन शुद्ध नव्हतें. तथापि, पुणें येथील दरबारांत सखारामबापू वगैरे ब्राह्मण मंडळी डोईजड झाली, हें महादजीस सहन होईना व जेव्हां सखारामबापूनें, पेशव्यांच्या ये-

Swarajin, foreign sway

ण्याची बाकी मागितली, तेव्हां वर सांगितल्या प्रमाणें महादजी शिंदे व होळकर, सुमारें बारा हजार स्वारांनिशीं स्वदेशीं परत गेले¹.

हरिपंताचा पराभव होतांच, गायकवाड सुद्धां राघोबाच्या पक्षास मिळाला. इकडे शिंदे होळकर माळव्यांत गेले, कोकणांत सदोबा-नांवाच्या तोतयानें बंड उभारिलें; समुद्रांत इंग्रजांनीं मराठी आरमार बुडविलें; दक्षिणमहाराष्ट्रांत कोल्हापुरकरांनीं पेशव्यांच्या मुलुखांत बखेडा सुरू केला व कर्नाटकांत हैदरानें तुंगभद्रा उतरून धारवाड पर्यंत फौजा पाठविल्या. अशा अनेक कारणांनीं पुणें येथील मुत्सद्दी मंडळ घाबरून गेलें व आतां रघुनाथराव खचित पुणें येथें पेशवे पदावर येतो, अशी सर्वांस भीति उत्पन्न झाली. नागपुरकर मुधोजी भोंसले व निजामअल्ली हेही रघुनाथरावास मिळण्याचा संभव होता. इतक्यांत पर्जन्यकाळ येतांच गुजराथेंतील लढाई मंदावली व हरिपंत फडके दक्षिणेंत आले. यास्वारींत गुजराथेंतील अहमदाबाद वगैरे शहरें सुद्धां दादासाहेबांचे हातीं आलीं.

पर्जन्यकाळची सुवड होतांच, पुणें येथें मुत्सद्दी मंडळींनीं निजाम अल्ली व शिंदे होळकर, यांस मुलुख वगैरे देण्याचें कबूल करून त्यांस आपल्या पक्षाकडे अनुकूळ करून घेतलें. इतक्यांत, कलत्त्याहून गव्हर्नरजनरल साहेबांचा वकील, अप्तनसाहेब पुणें येथें कारभाऱ्यांशीं तह करण्यास आला. मुंबईकडील इंग्रजी अधिकाऱ्यांनीं राघोबाशीं तह करून मराठ्यांशीं जो कलह माजविला, तो गैर असून अन्यायाचा व इंग्लिशलोकांचे नांवास कालिमा आणणारा प्रकार झाला, असें हिंदुस्थानांतील वरिष्ठ इंग्रजी दरबाराचें मत ठरून, त्यांनीं मुंबईच्या गव्हर्नरास राघोबाला मदत देऊं नये ह्मणून हुकूम दिला व आपला एक स्वतंत्र वकील मुत्सद्यांबरोबर तह करण्यासाठीं पुणें येथें पाठविला.

सदर वकील पुणें येथें येण्यापूर्वी सखारामबापू यांनीं कलकत्त्यास वारनहेस्टिंग्स साहेबांचे नांवें ता. २९ जुलै १७७५ रोजीं एक लांबलचक खलिता पाठविला². तो कागद फार महत्वाचा आहे, परंतु स्थल संकोचास्तव सर्व देतां येत नाहीं. या खलित्यामध्यें पेशवे सर-

१ Forrest Vol. I, 219, 254-255. २ परिशिष्ट ( अ ) पहा.

1 A counterfeit pretender [illegible]
2 dispatch.

काराचा व इंग्लिशांचा पूर्वापार संबंध कसा होता तो दाखविला आहे. तसेच आजपर्यंत मराठेलोकांचा व सर्व हिंदुलोकांचाही, इंग्लिशलोक हे वचनाचे बळकट, तहनामे पाळणारे व चोख व्यवहार ठेवणारे, असा अभिप्राय असतां मुंबईचे अधिकाऱ्यांनीं लबाडीनें पेशवे सरकारच्या साष्टीबेटावर हल्ला केला व प्रत्यक्ष पुतण्याच्या रक्तानें हात विटाळलेल्या व देशोधडीस लागलेल्या राघोबाचा पक्ष उचलून पेशवेसरकाराशीं लढाई माजविली, हें त्यांचें करणें धडधडीत दांडगेपणाचें आहे, इत्यादि मजकूर त्यांत होता. हा खलिता पोंचतांच, कलकत्ताकौन्सिलास सुद्धां मुंबईकरांचें वर्तन गैर वाटलें. कर्नल अप्टन साहेबास त्यांनीं अधिकार देऊन तह करण्यास पाठविलें व मुंबई सरकारास सक्तीचा हुकूम पाठवून लढाई बंद करविली. कर्नल अप्टन पुरंदर येथें दाखल झाल्यावर तहाचें बोलणें चालू झालें. परंतु प्रथम कांहीं दिवस तह होण्याचा रंग दिसेना, त्याबरोबर वॉरनहेस्टिंग्स साहेबानें हिंदुस्थानांतील प्रमुख संस्थानिकांस पत्रें पाठवून आपणास अनुकूळ होण्याबद्दल विनविलें. महादजी शिंदे यांसही तसेंच पत्र लिहिलें. महादजी शिंदे सवाईमाधवरावाचा पक्ष सोडून आपल्या मुलुखास गेला व त्याला कैद करून पुण्यास पाठविण्याबद्दल बापूनें हरिपंतास हुकूम दिला होता, अशी बातमी त्यावेळीं पसरली होती[१]. परंतु ती सर्वथा खोटी असावी, कारण पुढें थोडेच दिवसांनीं महादजी दक्षिणेंत आला, व तो सुद्धां ज्या वेळेस दरबारी लोकांचे हात अगदीं ढिले पडले होते तेव्हां आला. याप्रमाणे मदतीस आल्यामुळें रघुनाथरावाचा पक्ष त्यास मनापासून नको होता, हें उघड आहे. रघुनाथराव यांस उज्जनीस येण्यासाठीं शिंदे ह्यांचीं पत्रें जात, परंतु तीं मनापासून नव्हतीं. सखाराम बापूला आपलें महत्व वाढावें एवढेंच त्याचें धोरण होतें. आप्पाजी महादेव नांवाचा एक वकील राघोबादादाकडून उज्जनीस शिंदे यांचेकडे गेला होता, परंतु अप्टन साहेब पुण्यास गेल्यावर तो निराश होऊन परतला.

तह न ठरविल्यास इंग्रजांस हैदर, निजाम, गायकवाड, शिंदे वगैरे सर्व अनुकूल होतील या भीतीनें सखारामबापूनें पुरंदरचा तह

[१] Forrest, Vol. I, 259.

from the 1st = 7 from the first

ठरविला व इंग्लिशांच्या कांहीं मागण्याही कबूल केल्या. त्या तहाचीं कलमें अशीं होतीं:—साष्टी इंग्लिशांकडे रहावी, परंतु परत दिल्यास पेशवे सरकारानें तीन लक्षांचा दुसरा मुलुख मोबदला द्यावा; भडोच परगणा, तीन लाखांचा, इंग्रजांस स्नेहाखातर द्यावा, व रघुनाथरावाबरोबर सुरत येथें केलेला तह रद्द समजावा. त्याला इंग्लिशांनीं मदत करूं नये व तो स्वस्थ रहात असल्यास त्यानें २५०००, रुपये दरमहा घेऊन गोदातीरीं कोपरगांवीं रहावें, त्याच्या तैनातीस १००० घोडे असावे व त्याला अगर पेशवेसरकारच्या राज्यांतील कोणत्याही बंडखोर किंवा फितुर इसमास इंग्रजांनीं मदत देऊं नये. हें कलम त्या तहांत मुद्दाम घातलें होतें. हा तह होतो न होतो इतक्यांत कोकणांत तोतया सदोबाचें बंड जास्त वाढत चाललें.

पानिपत येथील लढाईत सदाशिवराव भाऊसाहेब मारले गेले किंवा ते पळून जिवंत आले, ह्या गोष्टीचा निर्णय झाला नव्हता. या वरून एका कनोजा ब्राह्मणानें, पुणें दरबारांतील गृहकलह पाहून आपणच सदाशिवराव असें ह्मणून, दक्षिण कोकणांत बंड उभारिलें. आमचे देशांत विचार न करतां अशा तोतयांस मदत देण्याचीं फार उदाहरणें आहेत. पावसाळा संपण्याचे पूर्वीच सदर तोतयानें कोकणांतले बहुतेक किल्ले घेतले व तो बोरघांट चढूं लागला. त्याला बाणकोट येथील इंग्रज अधिकाऱ्यांनींही बरीच मदत दिली. पुरंदरचा तह न जुमानतां या तोतयास मुंबईसरकारानें मदत दिली, हें कांहीं लहान आश्चर्य नव्हे. ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थान मिळविलें हें खरें, परंतु इंग्लिश लोकांचे नांवास कलंक देणारीं पुष्कळ अन्यायाचीं कर्मे कंपनीकडून घडलीं, हें सर्वत्र स्पष्ट दिसतें. सदोबाचें बंड झालें त्याला रघुनाथरावाची ही फूस होतीच व खुद्द अमृतरावही त्याचे बरोबर होता. याचवेळीं हैदरानेंही तुंगभद्रा उतरून पेशव्याचे मुलुखावर स्वारी केली व त्याला कोल्हापूरकरही अनुकूल होते. जेव्हां जेव्हां पेशव्यांच्या राज्यांत गडबड दिसे, तेव्हां तेव्हां सातारच्या राजमंडळांतील सरदार, कोल्हापूरकर व निजाम वगैरे त्यांचे शत्रु, उचल खात. यावेळीं पुण्यास फारशी फौज नाहीं

1 Surat instigation & encouragement

असें पाहून हैदरानें जोर केला. परंतु दसऱ्याचे सुमारास शिंदे होळकर यांची फौज पुरंदरा खालीं उतरली. पुढें पावसाळा कमी होतांच भिऊराव पानसे व महादजी शिंद्याकडील सरदार, रामजी पाटील, हे यांचाखालीं तोतयाचे फौजेवर जाऊन त्याचा त्यांनीं पराभव केला. तेव्हां सदोबा एकटाच मुंबईस पळून गेला. तेथून पुढें तो अलीबागेस जात असतां रघूजी आंग्रे यानें त्याला वाटेंत पकडून कैद करून पुण्यास पाठविलें. तेथें त्याची चांगली चौकशी करून भाऊसाहेबांची पत्नि पार्वतीबाई हिला ही त्यास दाखविलें. मुंबईचा गवर्नर, हॉर्नबी साहेबानें हा तोतया नसून खरोखरच भाऊसाहेब आहे, अशा अर्थाचें पेशव्यास एक उद्धटपणानें पत्र लिहिलें होतें. पण या तोतयाची चौकशी उघडरितीनें पांच दिवस पर्यंत अप्तन साहेबाच्या समक्षच झाली. शेवटीं तो भाऊ नव्हे, केवळ तोतयाच असें ठरलें, व त्यास ता० १७ दिजंबर, १७७६ रोजीं देहान्त शिक्षा दिली. याचें खरें नांव बाजी गोविंद असें होतें. कोणी ह्मणतात, कीं तो कनोजा ब्राह्मण होता. यानंतर दरबारानें कोंकणच्या बंदोबस्तास पानशे यांस पाठऊन तिकडे स्वस्थता केली.

पेशव्यांचें व कोल्हापूरकरांचें जुनें वैर होतें. कोल्हापूरकर वरचेवर बंडफितुरी करून निजाम व हैदर वगैरे शत्रूंशीं सलोखा करतात, असें पाहून माधवरावानें त्यांचा कांहीं मुलुख घेऊन पटवर्धनांकडे दिला होता. पुण्यास अव्यवस्था सुरू होतांच, कोल्हापूरकरांनीं आपला गेलेला मुलुख परत घेण्याचे हेतूनें, पटवर्धन व पेशवे यांचे मुलुखास उपद्रव सुरू केला. त्यांच्यावर रामचंद्र गणेश यांची फौज रवाना केली होती, तरी नीट बंदोबस्त होईना; ह्मणून मुत्सद्यांनीं महादजी शिंदे याला मोठ्या फौजेसह कोल्हापुरावर पाठविलें. शिंद्याचे फौजेनें शहरास वेढा देऊन तोफांचा मारा सुरू केला. पुढें कांहीं वेळानें शहर खालीं आल्यावर, शरण येऊन कोल्हापुरकरांनी महादजीचे विद्यमानें पेशव्यांशीं तह केला. या तहांत कोल्हापुरकरांनीं पटवर्धनांचा मुलूख सोडून दिला, नुकसानीबद्दल पंधरा लक्ष रुपये

---

१. तोतयाचे बंड मोडण्यांत महादजीशिंदे हेच पुढारी होते असें दिसतें; धा. ग. च. ४४, म. सा. छो. ब. १०२, प. प्र. श. ३०;

दिले व पुनः पेशव्याच्या मुलुखास उपद्रव देणार नाहीं व पेशव्यांचे शत्रूंस आश्रय देणार नाहीं, असें कबूल केलें. ह्या स्वारीनंतर त्याच्या आयुष्यांत महादजी शिंदे पुण्याच्या दक्षिणेस कधीं ही गेला नाहीं. कोल्हापुरास असतानां महादजी शिंदे, हे आपला कुलस्वामी जोतिबा ह्याच्या दर्शनास गेले होते. ही स्वारी चालली असतांच हैदरानें धारवाड पर्यंत चाल करून बराच मुलुख बळकाविला होता. त्याचे मनांत कोल्हापुरकरांस मदत देण्याचें होतें, परंतु ती मदत येण्याचे अगोदरच कोल्हापुरकरांचा शिंद्यानें पराभव केला व खुद्द हरिपंत फडके मोठ्या तयारीनें हैदरावर जाण्यासाठीं मिरजेस दाखल झाले.

मिरजेस त्यानां शिंद्याचीं फौज मिळाल्यावर उभयतांनीं हैदरावर जाण्याची तयारी चालविली. परंतु ही तयारी खरी नव्हती, कारण यावेळींच पुण्यामध्यें, दादासाहेबांच्या पक्षाच्या मंडळीनें मोठाच फितुर आरंभिल्याची बातमी पोंचली होती. तेव्हां हैदरावर चाल करून जाण्याचा संभवच नव्हता. पुण्याचे फितुरीमुळें सवाईमाधवरावाच्या पक्षाकडे फक्त नाना, महादजी व हरिपंत येवढेच राहिले. अशा आणीबाणीच्या वेळीं या तिघांनीं मोठ्या युक्तीनें हैदराचा बंदोबस्त केला व पुण्याचे फितुरीमंडळीचीही खोड मोडली.

नारायणरावाचा खून झाल्या पासून आज पांच वर्षं लढाया चालल्या, तरी रघुनाथराव आटपत नाहीं, राज्यांत बंडें होऊं लागलीं, व मराठ्यांचे बलिष्ठ शत्रु इंग्रज, हैदर, निजाम इत्यादिकांस मराठ्यांचा मुलुख आंगाखालीं दाबण्यास सवड मिळाली, ह्या व अशाच कारणांनीं पुण्याचे बारभाई ब्राह्मण मुत्सदी त्रासून गेले. राघोबाला पुण्यांत आणून त्याचे हातून कारभार केल्यानें राज्यांतलें द्वैत संपून मराठ्यांस आपल्या भोंवतालच्या शत्रूंचा समाचार घेण्यास सांपडेल, असे विचार ते करूं लागले. परंतु या विचारांत नाना फडणीस मात्र मिळेना. रघुनाथराव पुण्यास आल्यास पूर्वी प्रमाणें नवे बखेडे उत्पन्न करील, ही गोष्ट त्याला पूर्ण माहीत होती. या ब्राह्मण मुत्सद्यांत सुद्धां या वेळीं द्वैत सुरू होऊन परस्परांविषयीं मत्सर वाढला. सखारामबापू तर "तटस्थः स्यात् अर्थात् घटयतिच मौनं च भजते." या

Disagreement

मसलती प्रमाणें, हळके हळके नाना फडणिसास कारभारांतून काढ-ण्याच्या खटपटींत असे. असे दरबारचे घोंटाळे चालले असतांच, पुणें येथें एक सेंटल्युबी नामक लबाड फ्रेंच मनुष्य गेला होता; त्यानें आपण आपल्या बादशहाकडून इंग्रजांविरुद्ध फौज मदतीस देववितों, अशीं बोलणीं लाविलीं. त्यामुळें मुंबईकर इंग्रजी अधिकाऱ्यांनें पुणें दरबारचा द्वेष करून त्याच्यामध्यें जास्त दुही माजविली. मोरोबादादा, बजाबा पुरंदरे, सखाराम हरि, चिंतोविठ्ठल वगैरे मंड-ळीनें मुंबईस पत्र लिहिलें कीं, राघोबादादास परत पुणें येथें जलदीनें आणावें. या मसलतीस सखारामबापूचें आंतून आंग होतेंच, परंतु तो उघडपणें नानाप्रमाणें बोले. आपल्या तर्फेचे थोर सरदार फडके व शिंदे वगैरे बहुतेक, कोल्हापुराकडे होते ह्मणून नानासुद्धां आपल्या मुल-खाविरुद्ध फारसा बोलत नसे. परंतु मोठ्या युक्तीनें शिंदे व फडके यांस आपल्या मसलतींत घेऊन, विरुद्धपक्षाची, ते बेसावध असतां एकाएकीं फजिती उडविण्याची त्यानें तयारी केली. मोरोबादादा वगैरे मंडळीनें इंग्रजांची जी कुमक मागितली होती, तीही देण्याचें मुंबईकर इंग्रजांनीं ठरविलें. पुरंदरचा तह झाला तरी, सुरतेचा तह जास्त फाय-देशीर वाटून विलायतेंत मुंबईच्या गव्हर्नरास वाहवा मिळाली! यामुळें तो पुरंदरच्या तहास बिलकुल जुमानिनासा झाला व त्यानें फितुरी मंडळीस मदत देण्याचें ठरविलें. त्याला कलकत्त्याचे गव्हर्नरजनरल-चेंही अनुमोदन मिळालें व इंग्रजांची फौज उत्तरहिंदुस्थानांतून दक्षि-णेस येण्याच्या तयारीस लागली. पावसाळ्यामध्यें कोंकणांतून फौज नेऊन घांटमाथा चढणें सोईचें नव्हतें, ह्मणून दसरा होतांच ही सारी मसलत तडीस नेऊन राघोबास पुणें येथें न्यावें, असा मुंबईच्या कौ-न्सिलांत बेत झाला. ही सर्व व्यवस्था अगदीं गुप्तरीतीनें चालली होती तरी, नानाफडणिसाला ती सर्व समजून, त्यानेंही आपली तयारी गुप्त रीतीनें सुरू केली व अखेरीस त्यालाच यश आलें.

हैदरावर जाण्याकरितां मिरज येथें हरिपंतांनीं फौजेचा मोठा जमाव तयार केला व त्याला शिंद्याची फौजही मिळाली वगैरे हकिगत वर सांगितलीच आहे. कोल्हापुरकरांची मदत देण्याची आशा राहिली

नाहीं, पेशव्यांच्या फौजेचा जमाव मोठा झाला व पर्जन्यकाळ समीप आला, हें पाहून हैदरखानानें मराठ्यांशीं तह करून आपली फौज मागें काढली. पुणें येथें फितुरी मुत्सद्दी व सरदार यांस वाटत होतें, कीं फडके व शिंदे कर्नाटकांत जातील. परंतु पूर्वी ठरलेल्या संकेताप्रमाणें एकाएकीं तां. ८ जून १७७८ रोजीं, निरनिराळ्या रस्त्यांनीं दोघांच्याही फौजा पुरंदर येथें दाखल होऊन, त्यांनीं नानाचा अधिकार पुनः स्थापन केला. नाना फितुरी मंडळीच्या भयानें पुरंदर येथें पळून गेला होता व आपण काशीयात्रेस जाणार अशी त्यानें आवाई उठविली! शिंदे व फडके, पुरंदर येथें येतांच पेशवेही गडाखालीं भेटीस आले. नाना व शिंदे यांच्या फौजेनें पुण्याच्या आसपास रस्तोरस्तीं फौज ठेऊन रस्ते बंद केले. शिंदे पुरंदरपासून ८ कोसांवर असतांच, इंग्रजांस लौकर बोलवा, असा मोरोबादादांस होळकरानें आग्रह केला. शिंद्यानेंही त्यांस आपण मदत करतों असें दाखवून फितुरी मंडळीस फसविलें. इंग्रजांची फौज हिंदुस्थानांतून दक्षिणेकडे येत होती, तिला आपल्या मुलखांतून जाण्याचा परवानाही महादजीनें दिला होता. त्यावरून इंग्लिश वकीलास सुद्धां शिंदे आपणास अनुकूळ होतो असें वाटलें होतें. परंतु शिंद्याची व नानांची काय मसलत ठरली होती हें कोणासच कळलें नाहीं!

महादजीनें जर यावेळीं खऱ्या अंतःकरणानें सवाईमाधवरावाच्या पक्षास सहाय्य दिलें नसतें, तर मोरोबाची सरशी होऊन रघुनाथरावाची स्वारी इंग्रजांचे मदतीनें पुणें येथें आली असती. महादजीचे मनांत दादांबरोबर मुळींच स्नेह करण्याचा नव्हता; म्हणून त्यानें पुरंदरास पोंचतांच तुकोजी होळकरास मोरोबाच्या जुटांतून बाहेर काढिला. महादजी खेरीज, होळकरासारख्या भारी सरदारास, नानाच्या पक्षास आणणें कठीण होतें. होळकर आपल्याकडे येतांच व इंग्रजांची फौज घांटावर येण्याचे अगोदर पुण्यांतील फितुरी मंडळीचें पारिपत्य करण्याचा निश्चय करून, महादजीनें आपले लोक अकस्मात् पुण्यामध्यें पाठवून, मोरोबास ता. ११ जुलै रोजीं कैद केलें व त्याला नगरच्या किल्यांत बंदींत घातलें. बजाबापुरंदरे यासही

त्याचप्रमाणें कैद करून किल्ल्यावर टाकिलें. फक्त सखारामबापू-खेरीज फितुरांतील इतर मंडळीचा याप्रमाणें शिंद्यानें बंदोबस्त केला. सखारामबापूचे कपाळीं तोच प्रसंग तेव्हांच आला असता, परंतु तसें केल्यानें तूर्त फायदा नव्हता. सखारामबापू हें एक मोठें प्रस्थ होतें. त्याला आपल्या बाजूस बाह्यात्कारीं तरी ठेविल्यानें, पुणें दरबाराचा शत्रूवर वचक राहील, असें नाना व शिंदे यांस वाटत होतें; ह्मणूनच त्यांनीं आपला पूर्ण अंमल बसेपर्यंत सखारामबापूस मोकळा ठेविला होता. खरोखर प्रकार मात्र वेगळा होता, कारण तेव्हांपासून बापूच्याभोंवतीं रात्रंदिवस शिंद्याचे स्वारांचा पहारा होता.

या सुमारास, रघुनाथरावास पेशवाई परत देण्याचा आजपर्यंत इंग्रजांचा जो विचार होता, तो नाहींसा होऊन, सवाईमाधवराव हे वयांत येईपर्यंत दादासाहेबांनीं फक्त कारभार पहावा एवढेंतरी साधावें, असें त्यांनीं ठरविलें. सवाईमाधवराव हा खरोखरच नारायणरावाचा पुत्र, ह्याबद्दल आतां शंका उरली नव्हती, व यामुळें त्याचा पेशवाईवर जास्त अधिकार होता. त्याशिवाय, मोरोबादादा, बजाबापुरंदरे वगैरे मुत्सद्यांनीं सवाईमाधवरावाकडे पेशवाई कायम ठेऊन, रघुनाथराव पुणें येथें फक्त कारभार पहाण्यास येत असेल तरच त्याला आणावा, असें ठरविलें होतें. रघुनाथरावाचे पुण्यांतील स्नेही याप्रमाणें कारागृहांत गेले, तरी इंग्रजांनीं त्यास पुण्यास नेऊन कारभारीपदावर स्थापन करण्याचा जो निश्चय केला होता, तो कायम ठेविला व ते पावसाळा संपतांच आपला हेतु सिद्धीस नेण्याचे तयारीस लागले. शिंदे व होळकर हे आपणास अनुकूळ आहेत हा जो भ्रम होता, त्यामुळें त्यांना पुण्यांतील नानादि विरुद्ध मंडळीची पर्वा वाटत नव्हती. महादजीचें वर्तन याप्रसंगीं व अखेर सालबी येथील तह होईपर्यंत, इतकें खुबीदार होतें, कीं तो खरोखर कोणत्या पक्षास अनुकूळ आहे हें कोणासही सांगतां येईना. रघुनाथरावाबरोबरही तो पत्रव्यवहार ठेवीत असे व इंग्रजांशींही उघडपणानें त्यानें वैर दर्शविलें नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें बंदोबस्त करून व नानाफडणीसाचें दरबारांत वर्चस्व स्थापून, महादजी आपल्या जाहगांवीं गेला. इकडे,

Erroneous conception & judgment

पुढें पर्जन्यकाळ संपतांच इंग्रजांशीं लढाई देण्याचा प्रसंग येणार असें जाणून, नानानेंही लढाईची सारी तयारी चालविली. यावेळीं महादजी शिंदे याणें जी कामगिरी केली, त्याबद्दल त्याला बऱ्हाणपूर शहर व अशीरगड हीं इनाम मिळालीं.

पर्जन्यकाळ संपतांच नोव्हेंबर महिन्यांत, इंग्लिशांनीं कांहीं एक विचार न करितां, चार हजार फौज घेऊन पनवेलच्या वाटेनें बोरघांट चढून पुण्यावर चाल केली. या स्वारीचा हेतु फक्त सवाईमाधवराव अल्पवयी असेपर्यंत रघुनाथरावास कारभारी नेमण्याचा होता. इंग्लिशफौजेबरोबर रघुनाथराव, अमृतराव व दुसरे थोडे लोक होते. बोरघांट चढून इंग्लिश फौज, ता० २३ रोजीं घांटमाथ्यावर आली.

इंग्रजांची फौज येते आहे, ही बातमी पुणें येथें समजतांच, नानानें कांहीं फौज निरानिराळ्यां घांटांनीं कोंकणांत पाठविली. याच वेळेस शिंदेहोळकरांनीं नानाच्या तर्फेनें वागण्याबद्दल शपथप्रमाणें केलीं व प्रथमतः इंग्रजांचे तोंडावर महादजीनें जावें असें ठरलें. त्याबद्दल नानानें त्याला तीनलाख रुपये दिले. परंतु हा बेत कायम राहिला नाहीं असें दिसतें, कारण ता० २० डिसेंबरच्या सुमारास, भिऊराव पानसे, बाजीपंत जोशी व गणेशपंत बेहरे यांनीं सुमारें दहाहजार स्वारांनिशीं वडगांव येथें तळ दिला. शिंदे, होळकर व नाना हे आपल्या फौजांसह पुण्यासच होते. इंग्रजांची फौज घांटावर येतांच, पानसे वगैरे सरदारांनीं टोळ्याटोळ्यांनीं हल्ले सुरू केले; तथापि होळकर आपणास सामील आहे, या आशेवर राघोबानें इंग्लिश फौजेस पुढें चाल करण्याविषयीं आग्रह केला. कारलें मुक्कामास फौज पोंचतांच कॅप्टनस्टुअर्ट (इष्टुरफांकडा) गोळा लागून ठार झाला. इतक्यांत मराठ्यांची मुख्य फौज सुद्धां पुणें सोडून पुढें आली. तुकोजी होळकराबद्दल नानास व महादजीस संशय होता, म्हणून त्याच्यावर त्यांनीं सदोदित नजर ठेविली होती. यावेळीं रघुनाथरावाला वाटूं लागलें कीं, घांटमाथा चढतांच प्रमुख मराठे सरदार आपणास सामील होतील, अशी जी आशा इंग्रजी फौजेस लावून ठेविली होती.

Accupany or accontentment ..

ती निव्वळ खोटी असें दिसण्याचा प्रसंग आला. कारण अद्याप-र्यंत एकही सरदार मिळाला नाहीं व होळकरसुद्धां लढाई देण्यासच येत आहे असेंही समजलें. असा खरा प्रकार समजतांच इंग्लिश स-रदारांनीं, परत जावें असा विचार मनांत आणिला. ता० ९ जानेवारी च्या सुमारास इंग्लिशफौज खडकाळ्यावरून तळेगांव येथें पोंचली. तेथें मराठ्यांची मोठी फौज आसपास असल्याचें समजलें व रघुनाथ-रावास मदत मिळण्याचीही आशा राहिली नाहीं. परंतु आतां पर-तावें, तर मराठे कांहीं सुरक्षित जाऊं देत नाहींत, यासाठीं जमल्यास सखारामबापूस खासगी रीतीनें सामील करावा व शिंदे-होळकरांसही लालूच दाखवून अनुकूळ करावे, असा त्यांनीं बेत केला.

परंतु हे सर्व बेत फुकट होते, कारण यावेळीं सखारामबापूचें व-जन सरदारांवर मुळींच नव्हतें. सर्व सूत्रें हालविणारा नानाच होता व त्याला तर एकंदर सरदार अनुकूळ होते. त्यांच्यामध्यें फितुर मा-जविण्यास आतां सवड नव्हती. मराठ्यांचा बेत इंग्रजांबरोबर एक-दम लढाई देण्याचा नसून, शत्रूचें सैन्य आंगावर घेतघेत पुढें आ-णावें व त्यांची कोंकणची वाट बंद करून त्यांस कोंडून मारावें, असा होता. इंग्रज पुढें येतांच, मराठ्यांची कांहीं फौज त्यांचे पा-ठीवर गेली व त्यांनीं शत्रूस रसद पोंचेनाशी केली.

यापुढें रघुनाथरावाच्या नादास न लागतां, आतां फक्त कंपनीच्या नांवावर मुत्सद्यांशीं सलुख करून परत जावें, असा इंग्लिश फौजेनें ठराव केला. कार्नाकसाहेबानें होळकरास एक अखेरची चिटी लि-हिली, परंतु तिचा उपयोग झाला नाहीं. ता० १० जानेवारी रोजीं रघुनाथरावानें शिंदे-होळकरांस पत्र लिहिलें कीं, "पुण्यांतील मुत्स-द्दी मंडळी बंड करून पेशव्याचे राज्याचा नाश करीत आहेत, त्यांनां तुम्हीं पुरातन सरदारांनीं तरी मदत देणें इष्ट नाहीं, यासाठीं तुम्हां उभयतांबरोबर स्नेह करावा अशी माझी इच्छा आहे." राघोबा-च्या इच्छेप्रमाणें महादजीनें दोन माणसें गुप्तवेषानें त्याचेकडे पाठ-विलीं होतीं, त्यांचे मार्फत आपण शिंद्याचे स्वाधीन होण्यास कबूल आहों, असा त्यानें निरोप पाठविला. रघुनाथरावाचा हा बेत बरेच

दिवसांपासून चालला होता व त्याला ज्या बातम्या कळत त्यांवरून त्याची खात्री झाली होती कीं, ह्याप्रसंगीं महादजीच्या मध्यस्तीनें व आश्रयानें मात्र आपला बचाव लागेल. यावेळीं महादजीच प्रमुख सरदार होता व त्याच्या गोष्टींबाहेर नानाला वागण्याचें धैर्य नव्हतें.

तारीख ११ रोजीं, इंग्रजी फौज निराश झाली व त्यांनीं राघोबास त्याचे नशिबाचे हवालीं करून आपण परतण्याचा निश्चय केला. त्यांनीं आपल्या तोफा व जड सामान फेंकून दिलें व पळ सुरू केला. सुरक्षित परत जावें, या हेतूनें त्यांनीं मि. फार्मर यास मराठ्या सरदारांशीं स्नेहाचें बोलणें करण्यास पाठविलें. या दोनतीन दिवसांत मराठ्यांनीं इंग्रजांवर हल्ले करून, त्यांस जेरीस आणिलें व त्यांचे शेंकडों लोक ठार मारिले. आतां शरण गेल्या खेरीज जीव बचावून परत जाण्याची त्यांस आशा राहिली नाहीं व राघोबाच्या सर्व गप्पा निरुपयोगी व खोट्या, असें त्यांच्या अनुभवास आलें. ता० १४ रोजीं फार्मरची आणि महादजी शिंदे, नानाफडणवीस व हरिपंत फडके यांची दरबारांत भेट झाली. तेव्हां मि. फार्मर यानें पेशव्यांचे मुलुखांत इंग्लिशफौज घेण्याचें कारण सांगितलें व आतां सुरक्षित परत जाण्यास परवानगी दिल्यास इंग्लिश कंपनीचा स्नेह संपादन होईल, असेंही कळविलें. परंतु त्यांचा दम कितपत होता, हें मराठे सरदारांस कळून आलें होतें. रघुनाथरावास स्वाधीन करून कायतें भापण करा, असें त्यांनीं स्पष्ट सांगतांच, इंग्रजांनीं दादालाही तोच उपदेश दिला. त्यावरून दादासाहेब त्याच दिवशीं महादजी शिंद्याचे स्वाधीन झाले.

रघुनाथराव स्वाधीन होण्याचें ठरतांच, फार्मर यानें मुत्सद्यांशीं बोलणें लाविलें कीं, आतां आह्मांस परत जाऊं द्यावें. नंतर नाना व फडके यांनीं त्याला महादजीकडे नेलें. दरबारांत महादजीच प्रमुख होता व सर्व बोलणें त्याच्या बरोबरच सुरू झालें. महादजीनें स्पष्ट सांगितलें कीं, "लढाई करण्याबद्दल बाऊ दाखवूं नका. त्याबद्दलची आपणाला मुळींच पर्वा नाहीं, परंतु ज्याअर्थी तुह्मी कर्नेल अप्तन यानें पुरंदर येथें केलेला तह मोडून, पेशव्यांचे मुलुखावर स्वारी केली

व मराठ्यांचें लाखों रुपयांचें नुकसान केलें, त्याअर्थी याच ठिकाणीं नवीन तह केल्या खेरीज तुह्मांस आह्मी परत जाऊं देणार नाहीं." परंतु आपणास तह करण्याची परवानगी नाहीं, असें इंग्रज वकिलानें सांगितलें. तेव्हां महादजीनें विचारलें कीं, तुह्मांला पुरंदरचा तह मोडण्यास मात्र अधिकार आहे, हें कसें? त्यावर निरुत्तर होऊन वकील स्वस्थ बसला व शेवटीं निरुपायास्तव इंग्लिशांनीं महादजीचे विद्यमानें पेशव्यांशीं तह केला. या तहाशिवाय त्यांनीं महादजी शिंद्याबरोबर एक वेगळा करार केला. त्यांत महादजीस भडोच परगणा इंग्लिशांनीं नजर केला व एकेचाळीस हजार रुपये मुत्सद्दी-खर्चाबद्दल दिले. तहाचीं कलमें योग्य रीतीनें अमलांत येईपर्यंत दोन इंग्लिश कामदार महादजीकडे ओलिस दिले. इंग्लिशांकडून तह अमलांत आणविण्याची हमी महादजीनेंच पत्करली. इंग्रजांशीं फारसें वैर माजवि-ल्यानें आपला फायदा न होतां नुकसान होईल, असें महादजीस ठाऊक होतें, कारण हिंदुस्थानांतील मसलतींत कदाचित् इंग्लिश जर पडते, तर त्याचे सर्व बेत जागच्याजागीं राहिले असते. शिवाय इंग्रजांशीं स्वतंत्र करार केल्यापुळें आपलें स्वातंत्र्यही त्यानें स्थापन केलें. यापुढें महादजी हा पेशव्यांचा केवळ नांवचा मात्र सरदार होता, परंतु त्याचें सर्व वर्तन स्वार्थपर असून, तो ज्यांत आपलें वर्चस्व राहील, अशा मसलती मात्र करी. तथापि आपणास पेशव्यांचा नोकर ह्मणवून घे-ण्याची त्याला फार हौस होती, यासाठीं त्यानें मरेपर्यंत पेशव्यां-विरुद्ध कधींही खटपट केली नाहीं. फक्त पेशव्याचे दरबारांत आ-पलें वर्चस्व चालावें व आपल्या सल्लयाशिवाय कोणतीही मसलत चालूं नये, अशी त्याची महत्वाकांक्षा होती. यामुळेंच पुढें नानाचें व त्याचें जुळेनासें झालें. रघुनाथरावाला आपल्या स्वाधीन करा, त्याचा बंदोबस्त आपण करतों, असें महादजीनें नानास सांगितलें. ह्या त्याच्या मसलतींतही पुष्कळ अर्थ होता, कारण पुढें जर दरबा-रच्या मंडळींनें आपल्याबरोबर विरोध मांडिला, तर रघुनाथरावाला पुढें करून पुनः गडबड करण्यास साधन होतें. ही गोष्ट नानाच्याही

[1] परिशिष्ट (अ) पहा.

लक्षांत आली नव्हती असें नाहीं, परंतु यावेळीं महादजीच्या इच्छे- विरुद्ध वागण्याचें सामर्थ्य नानाला नव्हतें. उलट शिंद्याचे मदतीनेंच सखारामबापूवगैरे आपल्या शत्रूंचा शेवट करून, आपण दरबारांत मुख्य होण्याची नानाची इच्छा होती.

असो, वर सांगितल्याप्रमाणें करार ठरल्यावर इंग्रजांची फौज परत मुंबईस गेली. रघुनाथरावाला कांहीं उत्पन्न देऊन महाराष्ट्रापासून दूर झांशीप्रांतांत पाठविण्याचें ठरून, त्याचे बरोबर शिंद्यानें आपली फौज देऊन त्यास रवाना केलें. याप्रमाणें विजयी होऊन सर्व सरदार पुण्यास परतल्यावर, महादजी शिंदे हे आपली मुलगी बाळाबाई हिच्या लग्नासाठीं रहिमतपूर येथें गेले. तेथें लाडोजी नरसिंगराव देशमुख, यांचे बरोबर तिचा विवाह केला. त्याच प्रमाणें सखारामबापूही आपल्या मुलीचे लग्नासाठीं वाईस गेले होते. नाना वगैरे मंडळी पुरंदरावरच होती.

यानंतर सखारामबापूंचें पारिपत्य करण्याची मसलत चालली होती. रघुनाथरावापाशीं सखारामबापूंची फितुरीचीं अस्सलपत्रें सांपडलीं होतीं, परंतु त्याचें पारिपत्य करण्याची योग्य संधि अद्याप मिळाली नव्हती. पुढें बापू वाईहून परतले व शिंदेही रहिमतपूराहून परत पुरंदर येथें आले. बापूंस कैद करण्याची मसलत गुप्त रीतीनें चालली होती. एके दिवशीं महादजीनें बापूंस जाफतीस बोलाविलें. त्यावरून नाना, हरिपंत व बापू हे शिंद्याचे डेऱ्यांत गडाखालीं आले. तेथें नीट बंदोबस्त करून, पूर्व संकेताप्रमाणें त्यांनीं बापूंचीं अस्सल पत्रें त्यांस दाखविलीं, त्यावर बापू निरुत्तर झाले; तेव्हां त्यांस तेथेंच कैद करून सिंहगडावर पाठविलें. याप्रमाणें महाराष्ट्रांतील प्रसिद्ध मुत्सद्याचा शेवट झाला[1] व नानाफडणविसाचें वर्चस्व स्थापन झालें.

पुण्याच्या साडेतीन शहाण्यांत बापूंची गणना होती, परंतु त्याच्या मसलती सदोदित दुटप्पी असत. एका पक्षास धरून

---

१ याबद्दलची हकिगत नारायणरावाचे बखरींत वेगळ्यातऱ्हेनें दिली आहे. श्री. ना. पे. ब. १५।१६; पंत प्र. श. ३१।३२; पेशव्यांची ब. १३१।१३१ भा. रा. रा. च. ४९.

तो वागत नसे. तो फार हुशार कारकून व धूर्त मुत्सद्दी होता व त्याच्या सहाय्याखेरीज बारभाई, गर्भवासीसवाईमाधवरावाचें राज्य चालवूं शकले नसते. नारायणरावाच्या खुनानंतर त्यानें खरा पक्ष धरला होता, परंतु राघोबादादाकडे जें त्याचें थोरले माधवरावापासून सूत्र होतें, तें कमी होईना. त्या शूर पेशव्याच्या कारकीर्दीत सुद्धां जे बखेडे दादांकडून झाले त्यांत व नारायणरावास धरण्याच्या मसलतींत बापू होता, हें जगप्रसिद्धच आहे. परंतु लौकिकासाठींच त्यानें दादांचा पक्ष सोडला. या मुत्सद्याचें नांव सर्व महाराष्ट्रांत आबालवृद्धांचे तोंडीं आहे. पुरंदरचा तह होण्याचे पूर्वी सखारामबापूनें जीं पत्रें गव्हर्नर जनरलाला लिहिलीं, तीं इतकीं उत्तम आहेत कीं, युरोपांतील प्रख्यात कर्त्ते व मुत्सद्दी पुरुषांसही तीं शोभणारीं आहेत. स्नेही राष्ट्रांनीं परस्परांशीं कसें वागावें व राष्ट्रांची नीति ती कशी असते, हें यांत दाखविलें आहे. सिंहगडावर ठेवल्यावर थोडकेच दिवसांनीं या धूर्त, अनुभविक, देशाभिमानी, परंतु कपटी व आपमतलबी पुरुषाचा काळ झाला.

या वडगांवच्या पळाच्या वेळीं, इंग्लिशलोक थोडे असून चोहोंकडे पळापळ न करतां व्यवस्थेनें कसे परत जात होते, हें पाहून सर्व मराठे सरदारांस आश्चर्य वाटलें. हा कवायतीचा परिणाम आहे असें त्यांस दिसून आलें. मराठ्यांची फौज पराभव झाला असतां सैरावैरा दिशा फुटेल तिकडे पळून जाते व त्यामुळें फार नुकसान होतें, हें महादजीच्या लक्षांत येऊन त्यानें इंग्रजांप्रमाणें कवायती फौज तयार करण्याचा निश्चय केला व तो त्यानें सिद्धीसही नेला. वडगांवास इंग्लिशफौज लढतांना पाहून तो म्हणाला कीं, "ही फौज माझ्या पक्षाकडे असती तर किती उत्तम झालें असतें!"

यानंतर महादजी परत जांबगावीं गेला. तेथून पुढें चैत्र महिन्यांत परत आल्यावर, सर्वांनीं मोठ्या समारंभानें श्रीमंत सवाई माधवराव यांस पुरंदराहून पुणें येथें आणिलें, व राज्यव्यवस्था पुर्ववत् सुरू झाली. नारायणरावाच्या मरणानंतर, पुण्यांत पेशव्याची स्वारी प्रथमच आल्यामुळें चोहोंकडे आनंदीआनंद झाला. श्रीमंतांची मुंजही

जेन्हां मोठ्या समारंभानें पर्वतीवर झाली, तेन्हांही शिंदे पुण्यांत होते. पुढें त्यांनीं हिंदुस्थानांत जाण्याचा बेत केला.

इकडे नानानेंही नारायणरावाच्या मरणापासून जी जी मंडळी फितुरांत होती, त्या सर्वांस कडक शिक्षा देऊन, कृतसंकल्पाप्रमाणें श्रीमंत सवाईमाधवरावाचे नांवानें निर्भयपणें कारभार सुरू केला.

---

१ ह्या भागांतील मजकुराबद्दल Forrest's "Maratha Series, Vol. I" आणि "Fifth Report of the Parliamentary Committee on Indian affairs" यापुस्तकांचा फार उपयोग केला आहे.

# भाग ७ वा.

## इंग्रजांशीं पुनः लढाई.

### सालबीचा तह.

मागील भागांत इंग्लिश लोकांनीं केवळ स्वार्थबुद्धीनें, स्नेही राष्ट्राचा पूर्वापार तहनाम्यांनीं ठरलेला संबंध विसरून, व तें स्नेही राष्ट्र आपल्या अडचणींत पडलेलें पाहून, साष्टी बेटावर हल्ला करून तें कसें घेतलें, हें सांगितलें आहे. हें कृत्य अत्यंत नीच व आपलपोटेपणाचें होतें यांत संशय नाहीं. मराठ्यांचा जर कांहीं अपराध असता तर असें वर्तन न्यायदृष्टीनें चांगलें दिसतें, परंतु साष्टी वगैरे जागा आपणाला फार उपयोगाच्या आहेत व त्या आपण न बळकाविल्यास कदाचित् पोर्तुगीझ घेतील, या खोट्या सबबीवर त्या बळजोरीनें काबीज केल्या, ही गोष्ट खरोखरच दोषास्पद होती. अशा वर्तनानें राष्ट्रांच्या परस्परस्नेहसंबंधाची कांहीं किंमतच उरली नाहीं, व तहनामे ह्मणजे केवळ वेळ मारून नेण्याचीं साधनें आहेत, असें दिसून येतें.

एवढा अपराध करून जरी इंग्लिश लोक थांबते तरी पुरे होतें. परंतु ज्यानें आपल्या प्रत्यक्ष पुतण्याचा वध करण्यांत पुढारीपण घेतलें, ज्याचा सवाईमाधवराव जन्मल्यावर पेशव्याचे गादीवर कायद्यानें किंवा रुढीनें हक्क नव्हता, ज्याचा एकंदर महाराष्ट्रमंडळांतील लोक द्वेष करीत होते, ज्याला सातारचे महाराजांनींही बंडखोर असें ठरविलें व हिंदुस्थानांतील प्रमुख राजे, ह्मणजे निजाम, हैदर, भोंसले इत्यादिकांनींही ज्याचा योग्य तिरस्कार केला, अशा रघुनाथरावाचा पक्ष घेऊन मराठ्यांशीं लढाई सुरू केली, हेंही वर्तन इंग्लिशांच्या सरळ स्वभावास विरोध आणणारें झालें. प्रथमतः कलकत्ताकौन्सिलानें मुंबईच्या कौन्सिलाचा धिक्कार करून लढाई बंद करण्यास हुकूम दिला व पुरंदरचा तहही ठरविला, तथापि

त्या तहाविरुद्ध मुंबईकरांचें वर्तन चालूच होतें व त्यांनीं तोतया सदोवास सुद्धां मदत केली. राघोबा आपणास जास्त मुलुख देतो, या आमिषाखेरीज लढाई करण्यास खरोखर कोणतेंच कारण झालें नव्हतें. गादीचा मालक राघोबा किंवा सवाई माधवराव होता, हा विचार मराठे लोकांचा होता. पेशवाईचें पद सातारच्या महाराजांकडून मिळालें होतें व मराठे सरदारांच्या सहाय्यानें तें चाललें होतें. पर-राष्ट्राच्या अंतस्थ तंट्यांत शिरण्यास इंग्रजांस कांहींच कारण नव्हतें, परंतु स्वार्थापुढें राष्ट्रनीति काय करणार!

पुरंदरचा तह झाल्यावर पुण्यांतल्या कांहीं मंडळींनें राघोबास परत बोलाविलें. त्याला पेशवेपद तर मिळत नाहीं, निदान सवाईमाधवराव वयांत येईपर्यंत पेशव्याच्या राज्याचा त्यास पाळणकर्ता नेमण्याविषयीं प्रयत्न करावा, असा बेत इंग्रजांनीं केला. रघुनाथरावाला पुण्यांतले मुत्सद्दीच जर खरोखर बोलावित होते तर त्यानें खुशाल जावयाचें होतें, त्यांत पुनः इंग्लिशांनीं आपलें घोडें ढकलविण्याचें कांहीं कारण नव्हतें. पुरंदरचा तह कायम होता ह्मणून हें वर्तन त्या तहाविरुद्ध होतें, परंतु या सुमारास जरी कलकत्ताकौन्सिलानें मुंबईकरांस दोष दिला, तथापि ईस्टइंडिया कंपनीचे कोर्टऑफ्‌डैरेक्टर्स यांनीं त्यांची फार वाहवा केली! इतक्यांत नानाफडणविसानें सेंतल्युबीन नामक फ्रेंच सरदाराशीं कांहीं बोलणें चालविलें, एवढ्यावरून राईचा पर्वत करून, मुंबईकरांनीं वॉरन् हेस्तिंग्स् साहेबाचें मन दूषित केलें व हिंदुस्थानांतून येणारी फौज गुजराथेकडे नेली. पुढें पुण्यांत ज्या मुत्सद्यांनीं रघुनाथरावास बोलाविलें, त्यांचा नाश झाला होता तरी, राघोबास पुण्यास नेऊन कारभारी करावयाचाच, असा जो आग्रह इंग्रजांनीं धरला त्याचें कारण सुद्धां आपमतलबाशिवाय दुसरें नव्हतें. शिवाय राघोबाची मागील हकिगत जर त्यांनीं लक्षांत घेतली असती, तर तो सवाई माधवरावाच्या राज्याचें रक्षण करण्यास मुळींच अयोग्य होता, हें दिसलें असतें. इंग्लंदांतील तिसरा रिचर्ड हा ज्याप्रमाणें आपल्या पुतण्याचा पाळणकर्ता शोभता, तितकाच राघोबा शोभला असता!

राघोबाला पुण्यांत नेऊन स्थापन करण्याचा जो बेत झाला होता, त्याची

अखेर कशी लागली हें मागील भागांत सांगितलेंच आहे. त्याप्रसंगीं इंग्रजीफौजेस मराठ्यांनीं केवळ जीवदान दिलें, असें ह्मटलें तरी चालेल. हे उपकार व पुणें दरबाराचें सरळपणाचें वर्तन, हीं लक्षांत आणून तरी इंग्रजांनीं वडगांवचा तह पाळणें जरूर होतें. परंतु त्या तहावरील शाईसुद्धां वाळली नसेल इतक्यांतच त्यांनीं तो मोडिला. मूळ तो करतानांच कार्नाक साहेबानें महादजीस फसविलें होतें. आपला अधिकार किती हें त्याला माहीत असूनही, त्यानें आपली फौज सुरक्षित पार होण्याकरतां मात्र वडगांवचा तह केला. त्यावरील सही करतानां सुद्धां तो मोडण्याचे बेत त्याच्या मनांत होते ह्मटलें तरी चालेल; कारण त्या तहाप्रमाणें गोदर्द साहेबाची फौज परत नेण्याविषयीं लिहावयाचें सोडून, त्यानें त्या फौजेस मुद्दाम पुढें बोलाविलें. यामुळें तो तह प्रथम इंग्रजांनींच मोडला. इंग्लिशांचें पारपत्य केल्याशिवाय त्यांस परत जाऊं देण्यांत व वडगांवचा तह अमलांत आणण्यांत महादजीच जबाबदार होता, यामुळें गोदर्देची फौज पुढें येतांच नानालाही महादजीबद्दल शंका आली.

तात्पर्य, वडगांवचा तह झाल्यामुळें इंग्रजांची लढाई बंद पडली असें झालें नाहीं. बंगाल्याकडून जी फौज येत होती तिला तहांत ठरविल्याप्रमाणें मागें न बोलावितां पुढें जाण्यास हुकम दिला. कारण या तहाची बातमी समजतांच गव्हर्नरजनरल हेस्टिंग्स यानें लढाईची पुरी तयारी करून भोंसले वगैरे सरदार अनुकूळ करण्याची खटपट चालविली. या तहामुळें आपला फार अपमान झाला असें इंग्रजांस वाटूं लागलें. फत्तेसिंग गायकवाड तर त्यांचे तर्फेचाच होता. त्याप्रमाणें महादजी शिंदे आपल्या तर्फेस येईल ह्मणून त्यांनीं खटपट केली, परंतु त्यांत यश आलें नाहीं. इंग्रजांची फौज जनरल गोदर्दनें फारच जलदीनें ब्र्हाणपुरच्या रस्त्यानें सुरतेस नेली. मराठ्यांनीं कांहीं फौज त्यांस मार्गांत अडविण्याकरतां पाठविली होती, परंतु तिला चुकवून गोदर्दसाहेब सुरतेस गेला व त्यानें पुरंदरच्या तहाच्या धोरणानें नवीन तह करण्याविषयीं नानाशीं बोलणें लाविलें. कलकत्त्याहून गोदर्द साहेबाला मराठ्यांशीं दुसरा तह करण्याचा हुकुम मिळाला होता.

600 103138

वडगांव येथें रघुनाथराव स्वाधीन झाल्याचें वर सांगितलेंच आहे. त्यानें पुणें येथें राहूं नये असें ठरून, त्यास बुंदेलखंडांत झांशी परगणा वगैरे बारा लाखांचा मुलुख देण्याचा निश्चय झाला व त्याची तिकडे रवानगी केली. असें करण्यांत शिंद्याचा मतलब होता. हिंदुस्थानांत दादासाहेब राहिल्यास आपला कार्यभाग होईल व पुणेंदरबारांत आपला वचक बसेल हें त्याचे मनांत होतें. रघुनाथरावाला तिकडे पाठविलें तेव्हां त्याच्या बरोबर कांहीं तोफा व थोडी फौज होती व हरी बाबाजी ह्मणून एक शिंद्याच्या पदरचा सरदार चारशें स्वार घेऊन बरोबर दिला होता. वाटेंतच या मनुष्यानें दादांचा कांहीं अपमान केला, त्यामुळें दादांस शंका येऊन, शिंदे आपणास कैदेंत ठेवणार अशी जी बातमी त्यांस समजली होती, ती खरी वाटूं लागली. शेवटीं नर्मदेच्या तीरीं चोळीमहेश्वराच्या जवळ राघोबादादांनीं हरी बाबाजीवर एकाएकीं हल्ला करून त्याचा पराभव केला, आणि तेथून निसटले ते भडोच येथें इंग्रजांस जाऊन मिळाले.

राघोबाचा बंदोबस्त वाटेंने जितका ठेविला पाहिजे होता, तितका महादजीनें ठेवला नाहीं व त्यास पळण्यास मुद्दाम सवड दिली, असा संशय नानाफडणीसास आला होता. तो खरा असेल तर दादा पळून गेल्यानें लढाईला विशेष कारण होईल व तसें झाल्यानें आपली गरज नानाला फार लागेल हें ही धोरण शिंद्याचे मनांत असावें, असेंही ह्मटलें पाहिजे.

दादा इंग्रजांकडे गेल्यावर त्यांस त्यांनीं सुरतेस ठेविलें. इकडे नानाफडणीसाशीं तहाचें जमत नाहीं व शिंदे अनुकूळ होईल असा जो भ्रम होता तो नाहींसा झाल्यावर इंग्रजांनीं लढाईचा निश्चय केला. नानाही कांहीं स्वस्थ न बसतां, त्यानें हैदरखान, निजाम व भोंसले यांशीं मसलत सुरू करून हिंदुस्थानभर इंग्रजांशीं लढाई करण्याचा निश्चय ठरविला. हें होईपर्यंत शिंदे आपला इनामगांव जांबगांव येथेंच होते. गुजराथेंत पर्जन्यकाळ सरतांच, तहाबद्दल निराश होऊन

१ Forrest, Vol. I, P. 387; प. व या. १९७; धा. रा. च. ४५; म. सा. छो. ब. १००; नागपूर. भों. ब. १२३.

(Impression of fear .. 12 to elephant of the troublesome affairs); to bolt

गोदर्दानें लढाइला सुरवात केली. तेव्हां नानानें शिंदे व होळकरांस तिकडे जाण्याचा हुकूम दिला, परंतु ते नाखुष होते व जाण्याविषयीं नकारी सांगूं लागले. रघुनाथराव शिंद्याचे हातून पळून गेल्यापासून नाना व शिंदे यांचेमध्यें वितुष्टच पडलें व ते एकमेकांविषयीं संशय घेऊं लागले. शेवटीं या संशयांतून मुक्त होण्यासाठीं महादजीनें, दादासाहेबांस धरून आणून परत स्वाधीन करतों अशी प्रतिज्ञा करून, जातीनें इंग्रजांशीं लढाईस जाण्याचा निश्चय केला.

इकडे ता० १ जानेवारी १७८० रोजीं, गोदर्दसाहेब तापी उतरून गुजराथेंत पेशव्यांचे मुलखावर निघाला. ता० १८ रोजीं त्यानें डभोई घेतली व १० फेब्रुवारी रोजीं अहमदाबादेस वेढा दिला. या शहरांत मराठ्यांची फौज होती व तेथील ठाणेदारानें फारच निकरानें लढाई करून पांच दिवसपर्यंत टिकाव धरला, परंतु अखेरीस तें शहर इंग्रजांस मिळालें. हें शहर मिळाल्यामुळें सर्व गुजराथ इंग्रजांस मिळाल्या सारखी झाली. ही बातमी पुणें येथें समजतांच, नानानें गुजराथेंत मोठे सरदार व जास्त फौज पाठविण्याचा निश्चय केला. त्यानें कोंकणांत परशुरामभाऊंस रवाना केलें, घांटमाथ्यावर हरिपंताची फौज ठेविली व गुजराथेवर शिंदे व होळकर यांची योजना केली.[1]

रघुनाथराव जेव्हां शिंद्याचे हातांतून निसटला तेव्हां लोकांस वाटलें कीं महादजीचीच ही मसलत असावी व पुढें हुकुमाबरोबर जेव्हां शिंदे गुजराथेंत जाईना तेव्हां तर या संशयास बळकटी आली. नानाचें व शिंद्याचें यावेळीं कोणत्या कारणावरून बनेनासें झालें होतें याचा खुलासा होत नाहीं, तथापि एवढें खरें आहे, कीं या उभयतांमध्यें वैमनस्य आलें याची बातमी शत्रूंस लागली होती. पुण्यामध्यें वाटाघाटींत जो काळ गेला, त्यासंधींत गुजराथेंत गोदर्द साहेबास चांगलेंच फावलें व पेशव्यांची फौज तिकडे जाईपर्यंत त्यानें बहुतेक मुलुख काबीज केला. तशांतही याच वेळीं फत्तेसिंग गायकवाडानें तारीख

---

[1] प. व या. १९७-३०१. [2] See Goddard's Letter, Forrest, Vol. I, P. 391.

२८ जानेवारी, १७८० रोजीं गोदर्द साहेबाबरोबर तह करून, तो पुणें दरबाराविरुद्ध खटपटीस लागला. तात्पर्य, महादजी व होळकर यांनीं यावेळीं टंगळमंगळ केल्यामुळें शत्रूंचा पुष्कळ फायदा होऊन बहुतेक गुजराथ इंग्लिशांचे ताब्यांत गेली.

अहमदाबाद घेतल्यावर थोडक्याच दिवसांनीं, महादजी व तुकोजी मोठ्या फौजांसह कासारबारी उतरून बडोद्यापासून पत्रास साठ कोसांवर आल्याची बातमी गोदर्दला समजली. तथापि महादजी इंग्रजांस सामील होईल अशी त्यास आशा होती. परंतु महादजीनें इंग्रजांचें पारपत्य करण्याचे इराद्यानें तारीख ९ फेब्रुआरी रोजीं जांवगांव सोडिलें. त्यापूर्वीच त्यानें भगिरथराव शिंदे व दुसरे सरदारांची फौज गुजराथेंत रवाना केली होती. महादजीनें खानदेशांत असतांच फत्तेसिंग गायकवाडास, पेशव्यास अनुकूल होण्याबद्दल पत्रें लिहिलीं, परंतु त्यापूर्वीच गायकवाडानें इंग्रजांबरोबर तह केल्याचें वर्तमान त्यास समजलें नव्हतें. ता. २९ फेब्रुवारी रोजीं शिंदे होळकरांची फौज नर्मदापार होऊन गुजराथेंत उतरली व प्रथमतः शिंदे यांणीं ६००० स्वारांची एक तुकडी महीनदीचे कांठीं पाठविली आणि आपण बाकीच्या फौजेसह पांवागडाच्या रस्त्यावर डभोईचे आसपास तळ दिला. तेथून त्यानें आपलें जडसामान व बाडबिछाईत चंपानेर व पांवागडाकडे पाठवून तो सड्या फौजेसह इंग्रजांचे तोंडावर राहिला. इकडे गोदर्दसाहेबाचीही मोठी तयारी होती. या सुमारास इंग्रजांशीं लढाई न करितां जमल्यास सलोखा करण्याचें मनांत योजून, महादजीनें वडगांवच्या तहांत जे दोघे युरोपियन गृहस्थ ओलीस घेतले होते, त्यांची मुक्तता करून त्यांस आपल्या वकिलाबरोबर गोदर्द साहेबाकडे पाठवून दिलें; आणि त्याच प्रमाणें तहाचें भाषण करण्यासाठीं राघोबाकडेही एक वकील पाठविला.

महादजी शिंदे यानें आपल्या वकिलामार्फत गोदर्दसाहेबास कळविलें कीं, इंग्रजांप्रमाणेंच आपण स्वतःही नानाफडणिसाचे विरुद्ध

¹ Forrest, Vol. I, 399-410.

I Carelessness …

आहीं; नानाचे शत्रूंचें पारपत्य करण्यांत मदत करून त्याची कारभारावर स्थापना केली, तरी तो उपकार विसरून, भोंसले व निजाम यांचे मदतीनें आपले विरुद्ध मसलती करीत असतो, सबब मनापासून इंग्रजांशीं स्नेह करण्याचीच आपली इच्छा आहे. या गुळचट हकीगतीवर गोदर्द याणेंही तितपतच लक्ष दिलें व महादजीचा हेतु इंग्रजांवरही आपली छाप बसावी एवढाच होता, हें त्याचे लक्षांत आल्याशिवाय चुकलें होतें; व यासाठीं स्नेह कोणत्या रीतीनें करावा याबद्दल उलट महादजीलाच त्यानें खुलासा विचारिला. त्यावरून महादजीनें आपल्या वकिलाबरोबर पत्रें पाठवून पुनः कळविलें कीं, पूर्वीं तळेगांवीं जो प्रकार झाला, तेव्हां रघुनाथरावाचा व आपला करार झाला होता; त्या करारांत असें ठरलें होतें कीं, राघोबानें १२ लाखांचा वसूल घेऊन झांशी प्रांतीं रहावें व पेशवाई सवाई माधवरावाचे नांवें राहून, कारभार बाजीरावाचे नांवें चालावा; परंतु बाजीरावही लहान म्हणून खुद्द महादजीनें पुणें येथें सर्व कारभार पहावा. या कराराप्रमाणें वागण्यास कबूल असल्यास आपण तह करूं असें महादजीनें कळविलें. परंतु हें सर्व ढोंग आहे, यांत खरा प्रकार कांहीं नसून राघोबा, बाजीराव व इंग्रज यांचे नांवानें सर्व मराठे राज्याची सत्ता मात्र बळकवावी व पुणें येथील ब्राह्मण मुत्सद्यांस दूर करावे, एवढाच महादजीचा हेतु असावा असें गोदर्दसाहेबाला वाटून, त्यानें धिक्कार करून शिंद्याचे वकिलास परत लाविलें. शिंदे खरोखर नानाचा शत्रु नसून केवळ त्याचेवर आपली छाप ठेवावी व रघुनाथरावास परत हातीं घ्यावें, इतक्याकरितांच ही मसलत त्यानें चालविली होती, हेंही इंग्रज सरदाराचे ध्यानांत आलें.

खरोखर पहातां महादजीचे मनांतील सर्व बेत गोदर्द यानें तर्कानें ओळखिल्या प्रमाणेंच होते. त्याला मराठी राज्याची सर्व सत्ता हातीं घेण्याची इच्छा होती व अखेरीस मरेपर्यंत त्याचें एकंदर आयुष्य या महत्वाकांक्षेकडे लागलें होतें. अखेरपर्यंत नानाफडनविसाशीं त्याचें जें वर्तन झालें, त्याची रचना एव्हांपासूनच त्यानें

केली होती. यावेळीं महादजीचें मनाप्रमाणें जर घडून येतें, तर त्यानें नानाला दूर करून पेशवाई आपणच चालविली असती, परंतु नानाही त्याच्या तोडीचाच मसलती व धूर्त असल्यामुळें महादजीस यश आलें नाहीं. महादजीचे यावेळीं जे बेत होते, ते त्याचे स्वतःचे हिताच्या दृष्टीनें पहातां कांहीं वाईट नव्हते, परंतु असल्या विचारांनी व परस्परमत्सरभावानेंच, महाराष्ट्रराज्याचा नाश होत होता, हें त्यानें लक्षांत आणिलें नाहीं.

इंग्रज आपणाबरोबर तह करतील याबद्दल महादजीसही फारशी आशा नव्हती ह्मणून त्यानें लढाईची तजवीज चालविलीच होती. फत्तेसिंग मिळत नाहींसें पाहून त्यानें गोविंदराव गायकवाडास आपल्या तर्फेस आणिलें व या तहाच्या बोलाचालींत सांपडलेल्या वेळांत त्यानें आपल्या फौजेच्या टोळ्या टोळ्या चारी बाजूस पसरून, गनीमी काव्यानें लढाई देण्याचा बेत ठरविला. तोंडास तोंड न देतां, इंग्रजांच्या आसपास टोळ्या टोळ्यांनीं हिंडून व हल्ले करून, त्यांस जेरीस आणावें असा त्याचा बेत होता. परंतु हे बेत गोदर्द साहेबास कळले होते आणि त्यानेंच तारीख २ एप्रील १७८० रोजीं, एकाएकीं भागिरथराव शिंदे व पाराजीपंत यांच्या फौजांतून पार जाऊन, खुद्द महादजीच्या टोळीवर हल्ला केला. तेव्हां त्यानेंही लढाईस उभें न राहतां आपली फौज दूर नेली. त्यानें गोदर्दच्या फौजे सभोंवतालचा मुलूख बेचिराख करून शत्रूस दाणावैरण सुद्धां मिळू नये असें केलें. एकदोन प्रसंगीं तर लहानसान चकमकीही झाल्या, परंतु लढाईचें तोंड लागलें नाहीं. कांहीं उपाय केले तरी गोदर्दच्या फौजेची व महादजीची चांगली गांठ पडेना व अखेरीस महादजीनें आपली बहुतेक फौज माळव्याचे वाटेवर पांवागडाकडे नेली.[१]

या वेळीं शिंदेहोळकरांच्या जवळ असलेल्या फौजेची संख्या मनांत आणिली, तर खरोखर तिनें गुजराथेंत कांहींच केलें नाहीं ह्मटलें तरी चालेल; उलट तिचा एकदोन ठिकाणीं पराभव मात्र झाला. महादजीचे मनांतून लढाई लांबवावी असें होतें व यामुळें

१ Forrest, Vol. I, 408-412.

त्यानें गुजराथेंतील स्वारींत पेशव्याच्या फायद्याचें कांहीं, काम केलें नाहीं. कवाईत शिकलेल्या थोड्या फौजेपुढें खोगीरभरतीचा मराठ्यांचा सेनासमूह कसा विरघळून जातो, हेंही महादजींचे पुरें अनुभवास आलें. इतक्यांत लढाईचा हंगाम संपून पर्जन्यकाळ जवळ आला, व गुजराथेचा बंदोबस्त करून गोदर्द साहेबानें कोंकणांत जाण्याचा बेत केला. शिंदेहोळकर गुजराथेंत गेल्यावर नानानें परशुराम भाऊ, रास्ते, पानसे वगैरे सरदारांस कोंकणांत पाठविलें होतें, तिकडे इंग्रजांची कमसरशी पाहून गोदर्दनें कोंकण घेण्याचे इराद्यानें गुजराथ सोडली.

गुजराथेंतील लढाई जितक्या उत्सुकतेनें व्हावी तितक्या उत्सुकतेनें झाली नाहीं, व महादजींचें सारें लक्ष उज्जनीस परत जाण्याकडे होतें, याचें खरें कारण दुसरेंच होतें. ज्यावेळीं शिंदेहोळकरांची मोठी फौज गुजराथेंत उतरली, तेव्हां गोदर्दसाहेबालाही काळजी पडून, त्यानें वॉरनहेस्टिंग्स साहेबाला सुचविलें कीं, यावेळीं माळवा प्रांतावर भारी फौज पाठवावी ह्मणजे महादजींचें लक्ष गुजराथेंतून निघून, आपल्या प्रांताकडे लागेल, महादजी जरी पुण्याच्या गादीच्या तर्फें लढत होता, तरी स्वतःचा प्रांत घालविण्यास तो कबूल होणार नाहीं आणि गुजराथ सोडून तो माळव्यांत जाईल, असा गोदर्दसाहेबाचा अदमास होता, तो बरोबर होता. गोहदचा राणा व जयपूर, जोधपूर वगैरे रजपूत संस्थानिकांचें शिंद्याशीं वितुष्ट असल्यामुळें त्यांनांही मदत घेऊन, शिंद्याचे मुलुखावर जलदीनें स्वारी करावी, व मराठ्यांचे लढाईंत जो मुख्य व पुढारी महादजी शिंदे, त्याचेंच होईल तितकें जास्त नुकसान करावें, असा गव्हर्नरजनरल साहेबानें निश्चय ठरवून, गोहदच्या राण्याबरोबर स्नेह केला व मे. कॅमाक याचेकडे फौज देऊन माळव्यांत शिंद्याचे मुलुखावर स्वारी करण्यास हुकूम दिला. गोदर्द साहेबाचें ह्मणणें असें होतें कीं, शिंद्याविरुद्ध माळव्यांत मोठी फौज पाठविली ह्मणजे, गुजराथ मोकळी होऊन, कोंकणांतही पेशव्याच्या फौजेचा जोर चालणार नाहीं व सरतीं नानाफडणीस तह करण्यास कबूल होईल. शिंदेहोळकर

...lly & wealth of materials:- also unequal ... sources or valuable accidents '2 Dis agreeing ... terms

माळव्यांत गुंतले तर दक्षिणेंत मोठा सरदार हरिपंत फडकेच कायतो राहिला, त्याच्या एकट्याचे हातून इंग्रजांविरुद्ध निभाव लागणार नाहीं. इंग्रजांचे जे हे बेत चालले होते, त्यांची बातमी महादजीस लागल्यापासून त्यानें माळव्याकडे जाण्याचा बेत केला व गुजराथेंतून हळुहळु आपला पाय काढून इ. स. १७८० च्या पावसाळ्यांत तो उज्जनीचे मुक्कामास गेला.

शिंदेहोळकरांची फौज माळव्यांत छावणीला जाणार ही गोष्ट नानास मुळींच पसंत पडली नाहीं. दोघां मातबर सरदारांनीं गुजराथ इंग्रजांला मोकळी सोडून ते आपल्या घरीं गेले, हें नानानें इंग्रजांविरूद्ध जें काहूर उपस्थित केलें होतें, त्याला विलग झालें. नानानें या सुमारास हैदरखान, निजाम व भोंसलें यांच्याशीं सख्य करून, एकच वेळीं चोहोंकडे इंग्रजांस तंबी द्यावी, असा त्याचा बेत होता. शिंदेहोळकरांचें या लढाईकडे मुळींच लक्ष नाहीं, असा जाहिराणा झाल्यास हैदर, निजाम व भोंसले यांस संदेह उत्पन्न होऊन सर्व मनसबा बिनसेल, अशी नानास फार भीति होती. या सुमारास नानानें हैदरास वचन दिलें होतें कीं, इंग्रजांविरुद्ध जाण्याच्या मसलतीस महादजीची मान्यता असल्याबद्दल निभावणीचें पत्र आणवून देईन; व त्या वचनावर हैदरानें भर पावसाळ्यांत आपली फौज याच सालीं बाहेर काढली होती. त्याच प्रमाणें भोंसल्यानें बंगाल्याकडे चाल करण्याचा विचार ठराविला व निजामही चिकाकोलकडे फौज घेऊन निघाला. अशा प्रसंगीं शिंदेहोळकरांनीं गुजराथेंत इंग्रजांचे छातीवर मोठी फौज न ठेवितां ते माळव्यांत जाऊन बसले, ही गोष्ट साहजिकच नानास पसंत झाली नाहीं. त्याचे मनांतून दोघां सरदारांपैकीं एकानें हिंदुस्थानांत इंग्रजांचे तोंडावर रहावें, आणि एकानें गुजराथ व खानदेश यांचे दरम्यान कोंडाईबारीवर मोठ्या फौजेनिशीं रहावें असें होतें; कारण गुजराथेंतून मराठ्यांची फौज निघतांच गोदर्द यानें खानदेशावर स्वारी करून पेशव्याचे मुलुखांत शिरावें व मुंबईहून पुण्यावर दुसरी फौज पा-

१ Forrest's "Selections, Foreign Department," Vol II. P. 694, 700, 705, 742, 774.

ठवावी असाही इंग्रजांचा बेत झाला, हें नानास समजलें होतें. त्यासाठीं कोंडाईबारीवर मोठी फौज ठेविली ह्मणजे गुजराथेंत "इंग्रजांचे उरावर कटार राहील," व खानदेशाचें भय नाहींसें होईल, असा नानाचा अभिप्राय होता. शिंदे याचे मनांत बऱ्हाणपुरावर छावणी करावी असें होतें. यावेळीं नानास अशी बातमी लागली होती कीं, शिंदे यांनीं कलकत्तेकरांकडून पन्नास लाख रुपये घेऊन लढाईतून अंग काढलें. ही बातमी जरी खरी नव्हती, तरी यावेळीं महादजींचें धरसोडीचें व संशययुक्त वर्तन चाललें होतें, त्यामुळें त्या बातमीस खरेपणा आला होता. त्याचप्रमाणें उज्जनीस गेल्यावर तो फौज कमी करून तीस निरोप देत आहे, अशीही पुण्यास बातमी होती. ती बातमी हैदरासारख्या आपल्या स्नेह्यांस समजल्यास, शिंदे यांनीं लढाई सोडल्याचें त्यांस खरें वाटेल व आपण इंग्रजांविरुद्ध जो मोठा व्यूह रचला तो व्यर्थ होईल, असें नानास वाटून त्यानें महादजीस मोठ्या विनयपूर्वक व युक्तीनें वारंवार लिहिलें कीं, फौज कमी न करतां गुजराथ, खानदेश व माळवा हीं तिन्ही संधानें शिंदेहोळकरांनीं राखावीं; असें केल्यानें आपल्या स्नेही राजांस धीर व भरंवसा येऊन, चोहोंकडून इंग्रजांस ताण बसेल. यावेळीं नानाचें व शिंद्याचें मन परस्परांविषयीं मुळींच स्वच्छ नव्हतें, व त्यांतही शिंदे हे कांहींतरी संशय घेऊन कुरापत काढून राईचा पर्वत करीत, यामुळें यावेळीं या उभयतांमध्यें झालेला पत्रव्यवहार मोठा वाचण्यासारखा झाला आहे. त्यांच्या पत्रांवरून स्पष्ट दिसतें कीं, नानाचा बेत इंग्रजांचें पारपत्य करून तरूण पेशव्याची छाप बसवावी व सर्वांनीं एक विचारें वागावें असा होता. परंतु महादजींचे मनांत येई कीं, नानाचे हे बेत आपलें वैभव वाढविण्यापुरतेंच असून, शिंदेहोळकरांस केवळ गुलाम, नोकर करावे, अशी त्याची इच्छा आहे.

यावेळीं एक, आपण उचललेलें महत्कार्य केवळ शेवटास नेण्याच्या खटपटीस लागलेला, व दुसरा फक्त आपलें वर्चस्व कसें बसेल याची वाट पहाणारा होता, असें दिसतें. नानाचीं पत्रें एखाद्या मोठ्या अडचणींत

---

१ प. व या. २२७.

withdraw one's self from 2 Wavering fluctuating
scheme to entrap or beguile . Prepare

पडलेल्या गरजू मनुष्यासारखीं व शिंद्यावर सर्व मसलतीचा भार ठेऊन लिहिलेलीं दिसतात, व महादजीचीं उत्तरें कुत्सित, मर्मभेदी, संशययुक्त, खोंचून लिहिलेलीं व दुटप्पीपणाचीं दिसतात.

"पाटीलबावांस सर्व प्रकारें श्रीमंतांचे दौलतीची काळजी आहे व सर्व भारही त्यांवरच; मसलतीचे व दूरदेशींचे अर्थ पाटीलबावांनाही फार समजतात; कोणताही प्रकार करणें तो मसलतीस पेंच न पडे असाच करतील." "आजपावेतों सरकारच्या कामांत पाटीलबावांकडून कोठेंही विगलता पडली नाहीं. आणि हल्लीं उगेच संदेह मनांत आणून निमित्य ठेऊन पत्रांविषयीं विलंब लावितां." "श्रीमंत लहान, सर्व भार पाटीलबावांवर व दौलतेंत जीव काय आहे हें संभाळावयास योग्य कोण आहे, हे सर्व अर्थ त्यांस समजतात, त्याप्रमाणें समजून करतात." "पाटीलबावांचें वांकडें व्हावें हें चित्तांतही नाहीं. इंग्रजांच्या मसलतीचा अखत्यार पाटीलबावांवरच आहे. कोणेही प्रकारें मसलत चांगली शेवटास जावी, पाटीलबावांस यश यावें, भाऊपणा दिवसेंदिवस अधिक चालावा हीच इच्छा आहे." "सरकारचीं कामें जाहिराणा चांगलीं दिसे अशीं आहेत; तीं केलीं ह्मणजे सहजच लोकांचे संदेह जातील. घरांतील गोष्ट तर, एक भाईचीं लेंकरें, संदेह टाकले ह्मणजे स्वच्छताच आहे, नवें जडावें लागत नाहीं." "रा. पाटीलबावा श्रीमंतांच्या पायांशीं एकनिष्ठ, व आमचा भाऊपणा अकृत्रिम, बरें वाईट सांगावयास जागा इतकीच, सर्व सांभाळणें रा. पाटीलबावांकडे आहे व भारही त्यांवरच आहे." येणेंप्रमाणें गौरवाचीं पुष्कळ पत्रें नानानें पाटीलबावांला लिहिलीं. तरी त्यांचे पोटांतला संदेह मुळींच गेला नाहीं. महादजीचा स्वभाव कपटी, आपमतलबी व संशयखोर झाला होता. नानाच्या विरुद्ध जी बाजारबातमी उठे ती त्यास सर्व खरी वाटे व प्रत्येक वेळीं नानास एकही उत्तर सरळ व वेळेवर मिळेना. प्रत्येक पत्रांत कांहींना कांहींतरी विशेष शंका असावयाचीच, यामुळें त्रासून शेवटीं नानानें पुढील पत्र शिंद्याचे दरबारांतील आपल्या वकिलास लिहिलें; तें फार उत्तम

१ प. व या. ३०८-३०९; ३१७, ३२०-३२६.

Hateful, vile 2 Two sided, doubleface outrageous 3 of mind & affectionate mutually pleased upon one object 3 How[illegible]

bazaar rumour; more[illegible] [illegible]

पत्र असून, त्यावरून या प्रसिद्ध मुत्सद्याच्या स्वभावाची पारख चांगली होते.

राजश्री सदाशीवपंत स्वामींचे सेवेशीं.[1]

"विनंती उपरी, राजश्री पाटीलबावांचीं बोलणीं विक्षेपाचीं तेथें होतात, त्यांचीं लिहिणीं लोकांच्या घरीं इकडे येतात, तेव्हां इंग्रजांचेही घरीं वातमी जात असेलच. ही गोष्ट मसलतीस वाईट. हें ध्यानांत येतें कीं नाहीं? रती इतकी दरज पडली असतां शत्रूस बळ किती येतें याचा विचार करितात कीं नाहीं? त्यांतही कोठें वांकडें असलें तरी थोर आहेत, ते वांकडें दाखवीत नाहींत. मग येथें तर परस्परें भाऊपणा अकृत्रिम, वांकडें रतीमात्र नसतां उगेच कोते अंदेश माणसांच्या लिहिण्यावरून व सांगितल्यावरून, निःकारण विपरीत अर्थ करून बोलावें हें तर फारच विलग दिसतें. व या गोष्टीपासून उमेदही सरते. अगर बोलण्यानेंच संतोष होतो तर एकांतीं तुह्मांस बोलावून नेऊन जें बोलण्याचें असेल तें बोलत जावें. दुसऱ्यास कळूं नये असें तरी व्हावें. एवढे मोठे सरदार मसलतीवर गेले, त्यांस जेणेकरून उपयोग त्याच गोष्टी येथून घडत असतां, राजश्री पाटीलबावांचीं पत्रें व तुमचीं पत्रें येतात त्यांत एक पत्र तरी जाहिराणा दरबारांत सर्वांचे वकील बसले असतां वाचून पहावें आणि शत्रु व बाहेरील आहेत त्यांस एकत्वाचा व स्नेहाचा ऐकल्यावर दाब पडावा व इष्ट आहेत त्यांस गोड वाटावें, असें पत्र कधींच येऊन पाहिलें नाहीं. जीं पत्रें येतात त्यांत, मनांत कल्पना नाहींत व न यावयाच्या घेऊन व कित्येक रोपेंकरून व कित्येक विपरीत अर्थ करून लिहून येतात. तीं एकांतीं वाचावीं, त्याचे पाऱ्हेरे उत्तरें लिहून तुह्मांकडे पाठवावीं याखालींच दिवस गेले. पुढें ईश्वरी इच्छा असेल तसें घडेल. होळकराकडील मजकूर पत्रीं लिहितां, परंतु प्रस्तुत मसलतीचे दिवस, वाटेंत दुसरींही फिरतात, एखादें पत्र त्यांकडे गेल्यास तूर्त मसलतीस अपाय. याकरितां पत्र पाठविणें तें तजविजीनें पाठवीत जावें. पाटीलबावांचें

---

[1] प. व या. ३०३.

statesman. 2 After further ... 3 dispute ... suspicion or alteration ... scattered ... precaution ... 3 the seed ... Abrus ... average ... weight ... between ... layers

पारिपत्य जाहलें तरी सरकार काम, अशा गोष्टी जेव्हां पाटीलबावां-च्या मनांत येऊं लागल्या, त्या परिहार लिहितां कशा जातील? ईश्वरच त्यांच्या बुद्धीस काय साक्ष देईल ती खरी. अशीं विक्षेपाच्या मजकुराचीं पत्रें वाटेच्या गर्दीमुळें इंग्रजांकडे धरलीं गेलीं असल्यास काय मनांत आणितील याचाही विचार करावा. तुह्मांकडून जासूद पत्र घेऊन आला ह्मणजे आधीं लखोटे फोडण्यापूर्वी चित्तांत येतें कीं काय नवा विक्षेपाचा ग्रंथ रचला असेल, मग फोडून पत्रें पहावीं तों तेंच निघतें! बरें आहे! कितीही वाईट वाटावयाजोगें बोलले व लिहिलें तरी आह्मीं चित्तांत वांकडें काडीभर आणणार नाहीं, व करणार नाहीं. यास कारण एक तर आह्मीं शुद्धबुद्धीनें पाटीलबावांचे ठायीं चालतों. दुसरें खावंदाचे कार्यावर नजर, मग वाईट कशास वाटेल? रा॥ छ. २४ रविलाखर हे विनंति."

नानानें पाटीलबावांस शेवटीं असेंही उघड लिहिलें कीं, "परस्परें सुखदुःखाचे सोबती पाटील बावा आह्मीं. खावंद एक. त्यांत भाउपणा खावंदाच्या चाकरीवर एकनिष्ठ. यांत क्रियाही झाली. त्याप्रमाणें परस्पर करण्यांतही येतें. तेव्हां दंगाफटक्यांची शंका तुमचे चित्तांत कां!" तात्पर्य, यावेळीं नानानें शिंद्याची स्तुति केली, विनंति केली, गौरवाचे शब्दानें प्रतिष्ठेस चढविलें व त्याचें मन आपणाविषयीं शुद्ध होण्याबद्दल जितकें लिहावयाचें तेवढें लिहिलें, तरी महादजीचें मन स्वच्छ होत नाहींसें पाहून, अखेरीस नानानें महादजीला स्वतः भेटून निखालसता करण्याचाही बेत केला. ही भेट लवकर व्हावी अशी नानाची इच्छा होती, कारण पावसाळा संपल्यावर मसलत बिघडेल व इंग्रजांचा वेध महाराष्ट्रांत पुण्यावर व तिकडे माळव्यावरही होताच, त्यास जोर येईल. ही भेट खानदेशांत व्हावी अशी त्याची इच्छा होती. परंतु पुढें जी हकीगत घडली त्यामुळें महादजी दक्षिणेंत गेला नाहीं व कोंडाईबारीची मसलतही तशीच राहिली. खुद्द शिंद्याचे मुलुखावर स्वारी झाल्यामुळें लढाईचे बेत सर्व निराळे झाले व

१ प. व या. २२०-२६०.

विशेषतः हैदरानें मद्रासइलाख्यांत इंग्रजांविरुद्ध जे अनेक जय मिळविले, त्यामुळें इंग्रजांची इच्छा तह करण्याकडेसच वळली.

याच सुमारास होळकराचे संस्थानाचे संबंधानेंही नानाची व महादजीची वाटाघाट झाली. खुद्द होळकराचे प्रामाणिकपणाबद्दल मोरोबाचे बंडापासून नानाचे मनांत शंकाच होती. शेवटीं इंदूरास परत जाऊन पुढील सालच्या लढाईची कांहींच तयारी न करितां, होळकर स्वस्थ बसलेले पाहून नानाला राग आला. होळकरांच्या दौलतीचा कारभार खुद्द अहिल्याबाईच पहात होती, परंतु ती फौजेच्या खर्चास पैसा देईना. तिचा सर्व पैसा दानधर्मांत खर्च होई. यामुळें तिचें व तुकोजीचेंही जमेनासें झालें. फौज जितकी ठेवणें योग्य होतें तितकी न ठेवल्यानें पेशव्यांचे चाकरीस अंतर येतें, ही गोष्ट बाईच्या लक्षांत येत नव्हती. यासाठीं सर्व संस्थान ताब्यांत न ठेवितां तिनें आपल्या खर्चासाठीं पुरे एवढे महाल मात्र ताब्यांत ठेऊन, बाकी वसूल तुकोजीकडे द्यावा, असा नानाचा आग्रह होता; व त्याबद्दल बाईची समजूत करण्याबद्दल नानानें पाटीलबावांसही लिहिलें, परंतु पाटीलबावांनीं रीतीप्रमाणें कुतर्क काढून बाईची तरफदारी घेतली व नानाच्या मनास लागण्यासारखें पत्रही त्यांनीं लिहिलें.

"पाटीलबावांचें ह्मणणें कीं, खावंदाचे घरींहून जावसाल होणें ते यथायुक्त होत असावे, पूर्वींच्या चाली पहाव्या, तीं धोरणें पुढें चालवीत असावीं, न ऐकिलें त्यास समजून सांगावें. तें न होतां बाईस संपुष्टांत[1] घालावें अशीच साऱ्यांची मर्जी एकसा दिसते. याजवरून आश्चर्य आहे! अहल्याबाई होळकरांची सून, तिचा अपमान केला असतां लौकिकांत ठीक दिसेल कीं काय?" होळकर व शिंदे यांचे महाल बरोबरीचे असतां होळकरांचा वसूल कमी कां, याचाही विचार, "धनीपणाचा कारभार जिकडे असेल त्यांनीं करावा. एकाचाच पक्ष धरून लिहिणें, बोलणें युक्त नाहीं," असें महादजीनें नानास खोंचून विचारलें. त्याला नानानेंही स्पष्ट लिहिलें कीं,

"सर्वांचें मानस बाईस संपुष्टांत घालावें असें आहे ह्मणून बोलले,

१ प. व या. २१२.

त्यास बाईस संपुष्टांत घालावयाचें प्रयोजन काय आहे? सरकार काम व्हावें, मातबर सरदारी, दिवस मसलतीचे समीप आले, फौजेची तयारी झाली पाहिजे, विना पैक्या खेरीज फौज जमा कशी होते? याकरितां पूर्वीं तपशीलवार लिहिलें होतें, त्याचीं उत्तरें अशीं यावीं कीं काय? असो, तुम्हीं पूर्वीं लिहिलें आहे त्या अन्वयें पाटीलबावांशीं बोलावें आणि बाईस पाटीलबावांचें पत्र पाठवावें कीं, 'डौलाचे खर्चापुर्ती ऐवज बाईनीं ठेवून, तेथील वहिवाट बाईकडील महालकरी तिहीं माहलीं आहेत त्यांनीं करावी. बाकीचे महाल राहिले त्यास होळकरास मसलत संबंधें पैका लागेल तो बाकीचे महालांपासून घेतील.' असें बाईस पाटीलबावांनीं निक्षून लिहिल्याशिवाय तोड पडत नाहीं. असे पत्रोपत्रीं मजकूर वारंवार लिहिले असतां कांहीं काम होईल असें वाटत नाहीं. मसलतीचे दिवस जवळ आले. फौजेची तयारी होऊन चाकरीचे उपयोगीं पडली पाहिजे, याकरितां लिहिल्या अन्वयें तुम्हीं बोलून बाईस पत्र पाटीलबावांनीं पाठवावें म्हणजे तोड पडेल, नाहींतर पडावयाची नाहीं. फौज किती बाळगली? महाल खराब कां? चाकरी काय झाली? हें पुसावें तर इकडील आवघेच जाबसालास पाणी पडतें. सरकारची नुकसानी मात्र भारी हें खरें. दुई नसल्यास इतकेंही जाबसाल पुसावे, नीट करवावे, सरकार मसलतीस उपयोग पडावा, इतकेंही करितां येतें. असो, लिहिल्या अन्वयें बाईस लिहून पाठवावें, आणि अमलांत येई तें करावें. बाईस संपुष्टांत घालावी ही गोष्ट येथें नाहीं. असती तर ते मागें निराळे घडत जातें. पूर्वील सांप्रदायावर जावें तर दुई नसते तेव्हां कोठेंच पेंच पडत नाहीं. विरुद्ध पडल्यावर सरदारी कोणीकडे? त्याचें कसें व्हावें? याचा विचार करावा लागतो, हें सर्व मनांत आणावें."

नानाचे मनांत होळकराकडून जास्त फौज उभारून पुढील मोहिमेची जारी तयारी ठेवण्याचें होतें, परंतु या घरच्या बखेड्यानें तुकोजीला पैशाची मदत होईना. शेवटीं अहिल्याबाईस नानानें कडक रीतीनें ताकीद दिली व शिंद्याचे मध्यस्तीनें, होळकराची फौज तयार क

1 Positively 2 Compromise adjustment Settlement 3 Contending claims - 3 disagreement - 4 Pra

गिरी[1]. त्याचप्रमाणें खंडेराव पवारही महादजींचे आश्रयास जाऊन स्वस्थ बसले होते, त्यांसही लढाईवर पाठवून देण्यास महादजीला नानानें लिहिलें. त्याप्रमाणें पुढील मोहिमेंत होळकर व पंवार आपल्या सरंजामासह हजर होते.


पर्जन्यकाळ संपतो न संपतो इतक्यांतच इंग्रजांनीं कोंकणांत व घाटांत लढाई सुरू केली. मराठ्यांची फौज दसराकरून जमण्याचे अगोदर त्यांनीं कांहीं मुलुख देखील सर केला व कल्याणशहरही ताब्यांत घेतलें होतें. पुढें वसई घेण्याचा त्यांचा बेत होऊन खुद्द गोदर्दसाहेबाला वसईवर रवाना केलें व अखेरीस तारीख ११ दिसेंबर, सन १७८० रोजीं वसईचा किल्ला इंग्रजांनीं घेतला. त्यामुळें सर्व कोंकणच गेल्यासारखें झालें. नानाफडणिसांनीं कोंकणांत रामचंद्र गणेश, परशरामभाऊ, आनंदराव रास्ते वगैरे सरदारांस पाठविलें होतें, त्यांपैकीं रामचंद्र गणेश हे वसईच्या लढाईंत सरकारकामास आले. हा सरदार ब्राह्मण सरदारां पैकीं मोठा शूर व युद्धकलाभिज्ञ असल्यामुळें त्याच्या मरणापासून मराठ्यांचें मोठें नुकसान झालें. पुढें एकदोन महिनेभर कोंकणामध्यें लढाई चाललीच होती. शेवटीं इंग्रजांनीं पुण्यावर जाण्याची तयारी करून घांट चढण्यास आरंभ केला, त्यावेळीं तुकोजी होळकरही मोठ्या फौजेनिशीं नानाच्या मदतीस आले होते. त्यांनां व परशुरामभाऊ पटवर्धन यांनां इंग्लिशफौजेच्या पिछाडीवर रवाना केलें. इकडे गोदर्दसाहेब बोरघांट चढून आला, तेव्हां त्याच्या तोंडावर मराठ्यांच्या फौजेचे सेनापति, हरिपंत फडके हे गेले. त्यांचा मुक्काम वडगांव्याजवळ होता. त्यांनीं इंग्रजांवर वरचेवर हल्ले करून त्यांनां जेरीस आणिलें. यावेळीं इंग्लिशफौज हरिपंत फडके, होळकर व भाऊसाहेब यांनीं चोहोंबाजूनें कोंडून टाकिली व त्यांनां दाणावैरण मिळनाशी करून त्यांची बहुत खराबी केली. त्यामुळें गोदर्दसाहेब नाचार होऊन घांट उतरून परत जाऊं लागला. तेव्हां मराठ्यांनीं

---

[1] प व या. २१२, २७२, २८०, २८२, २७७. See also Forrest's "Selections, Foreign Department" Vol. III, P. 980.

Support, Shelter. 2. A mountainous range dividing ... a pass or difficult passage over a hill ...

त्याच्यावर हल्ला करून त्याची मुंबईकडे पीछेहट करविली. ह्या उन्हाळाभर कोंकणांत मराठ्यांच्या फौजेनें लढाया करून इंग्रजांची चांगलीच खोड मोडली. गोद्दर्दसाहेबानें नानाशीं तह करण्याबद्द भाषण लाविलें होतें, परंतु तो जमेलसा दिसलें नाहीं. मद्रासइलाख्यांतही हैदरानें व टिपूनें मोठा कहर उसळून देऊन, खुद्द मद्रास



ग्वाल्हेरचा किल्ला.

पर्यंत इंग्रजांच्या मुलुखाचा फडशा उडविला व नागपूरकर भोंसले यां ही कटकेकडे मोठी फौज रवाना केली, त्यामुळें तर इंग्रजांचें सुटलें व हेस्टिंग्स हा मराठ्यांशीं तह करण्याचे विचारास लागला.

शिंदेहोळकर गुजराथेंत गेले होते तेव्हां गोदर्दसाहेबाच्या सूचनेवरून इंग्रजांनीं शिंद्याचे मुलुखावर स्वारी करण्याचा बेत करून कांहीं फौज गोहदकर राण्याच्या प्रांताकडून रवाना केली. गोहदच्या राण्यानेंही इंग्रजांचा जोर पाहून त्यांशीं सल्ला करून मराठ्यांशीं विरोध मांडिला. प्रथमतः पोफाम साहेबानें महादजीचे मुलुखावर स्वारी करून ग्वाल्हेरच्या आसपास लाहोर वगैरे लहानसान गढ्या व ठाणीं काबीज केलीं. इतक्यांत मागें सांगितल्याप्रमाणें मेजर कॅामाकसाहेबाचीही रवानगी हेस्तिंग्सानें केली. त्यांची कुमक येण्याचे अगोदर, मराठ्यांनीं मागें फार श्रम करून ग्वाल्हेरकिल्ला मिळविला होता, तो पोफाम यानें घेतला. (ता. ४, आगस्ट १७८१.)

हा किल्ला माळव्याप्रांतांत फारच बळकट असा मानला आहे. हा एका उंच डोंगरावर बांधिला आहे. त्याचे सर्व कडे सारखे तुटलेले असून आसपास सर्व सखल मैदान असल्यामुळें ही जागा फार बिकट आहे अशी मराठ्यांची समजूत होती. हा किल्ला त्यांनीं गोहदकराकडूनच घेतला होता. ग्वाल्हेरचा किल्ला गेल्यामुळें नानालाही वाईट वाटलें व त्यानें दिल्लींतील उमराव व बादशहाशीं स्नेह करून इंग्रजांस तंबी पोंचविण्याबद्दल महादजीस सुचविलें. खुद्द माळव्यांत याप्रमाणें लढाई सुरू झाल्यामुळें नानानें महादजीला नर्मदेच्या आलिकडे बोलाविलें नाहीं.

इकडे महादजीनें स्वतः आपली तयारी खूप चालविली. त्यानें आपल्या सर्व सरदारांस व रजपुत राजे, बुंदी-कोटवाले वगैरे स्नेही यांस इंग्लिशांवर उठण्यास लिहिलें; जास्त फौज चाकरीस ठेविली व मोठ्या जलदीनें आपल्या सगळ्या फौजेनिशीं तो, उज्जनी सोडून बाहेर निघाला. या पूर्वीच जनरल कॅामाक यानें शिंद्याचीं पुष्कळ लहानसान ठाणीं काबीज केलीं होतीं. परन्तु महादजीचें व त्याचें अद्यापि तोंडास तोंड झालें नव्हतें. त्यानें आपला तळ सिरोज येथें दिला, तेव्हां महादजीनें भोंवतालच्या मुलुखास वेढा देऊन इंग्लिशांच्या फौजेस दाणापाणी, लांकूडफाटा वगैरे बंद केलें व त्यांच्या रसद पोंचविणाऱ्या टोळ्या लुटून फस्त केल्या. यामुळें

त्यांच्या फौजेचे फार हाल होऊं लागले. नंतर महादजीनें त्यांच्यावर तोफा सुरू केल्या. असा प्रकार सारखा सहा सात दिवस चालला तेव्हां इंग्लिशांचे फौजेनें पळ काढला. या लढाईंत अंबाजी इंगळे व राणाखान वगैरे सरदार असून, पेशव्यांकडील सरदार शिवाजी विठ्ठल, बळवंतराव धोंडदेव वगैरे होते. इंग्रजांचे पाठीवर शिंद्याची फौज असतां एक दिवस तिच्यावर परतून इंग्रजांनीं मोठा हल्ला केला, त्यांत शिंद्याचें फार नुकसान झालें. परंतु त्यानें न डगमगतां थोडकेच दिवसांत पुनः लढाई सुरू केली आणि त्याच्या स्वारांनीं इंग्रजांसही बरेंच जेरीस आणलें[1]. अशा तऱ्हेनें इकडे लढाई चालली असतां, कोंकणांत होळकर, परशुरामभाऊ वगैरे सरदारांनीं गोदर्द-साहेबाबरोबर जारीनें लढाई चालविली होती, हें वर सांगितलेंच आहे.

इकडे ठरल्याप्रमाणें मद्रास इलाख्यांत हैदरानें इंग्रजांशीं लढाई सुरू केली होती;त्यावेळीं हैदराची तयारी फार असल्यामुळें मराठ्यांशीं लढाई बंद करून,कर्नाटकाचा बंदोबस्तच अगोदर करण्याचा विचार इंग्रजांनीं करून पुणें दरबाराशीं तह करण्यासाठीं कलकत्याहून लिहून पाठविलें. त्यावरून मुंबईहून मि. वेदरस्टन, यास पुणें येथें पाठविलें. तो पुण्यांत असतांच हेस्टिंग्ससाहेबानें, मि. डे. अंडरसन याला मराठ्यांच्या बरोबर तह करण्याचा अधिकार देऊन शिंद्याकडे पाठविलें. महादजी शिंद्यावरं म्यूरसाहेबाची फौज आली होती, परंतु तहाचें बोलणें घाटूं लागल्यामुळें उभयपक्षीं लढाई बंद पडली आणि क. म्यूर यानें तारीख १३ आक्टोबर १७८१ रोजीं, शिंद्याबरोबर एक वेगळाच तह केला. त्यांत इंग्रजी फौजेनें यमुनेच्या पार जावें व महादजीनें उज्जनीस परतावें असें ठरलें. या तहांत इंग्रजांनीं यमुनेच्या पश्चिमेकडील घेतलेला एकंदर मुलुख शिंद्यास परत दिला व ग्वाल्हेर गोहदच्या राण्याकडे दिली. परंतु या तहानंतर नानानें पेशव्याच्या तर्फे सुद्धां तह करण्याचा अधिकार सर्व महादजीकडेसच सोंपविला व मि. वेदरस्टन साहेबास निरोप दिला. शिंद्याचे हातून तह के-

---

१ या माळव्यांतील मोहिमेबद्दल पुढील पत्रें पहा. (प. व या. २७१-२८६-३१५). See also G. Duff, P. 447-48 and Malleson, P. 142.

त्यानें जास्त फायदा होईल असें नानाला वाटत होतें. इंग्रजांशीं तह करण्याबद्दल नागपूरचा भोंसलाही नानाला आग्रह करीत होता. इंग्रजांविरुद्ध लढाई करण्याचे मसलतींत भोंसला होता व ठरल्याप्रमाणें कांहीं फौजही बंगाल व कटकप्रांतावर त्यानें पाठविली. परंतु त्याचा उद्देश इंग्रजांशीं खरोखर लढाई करण्याचा नसून स्वार्थच साधण्याचा होता असें दिसतें, कारण पुढें त्यानें इंग्रजांकडून रुपये घेऊन, लढाई बंद केली व नानास एक बहाण्याचें पत्र लिहिलें. हें सर्व ढोंग नानास समजलें होतें, परंतु उपयोग नव्हता. इंग्रजांस सामील होऊन भोंसले आपले विरुद्ध उठला नाहीं, एवढा तरी फायदा झाला, असें नाना ह्मणे.

शिंद्यानें इंग्लिशांशीं वेगळा तह केला व लढाई बंद केली, तसाच आपण वेगळा तह केल्यास पाटीलबावा व पेशवेसरकार वेगळे झाले असें दिसून, हिंदुस्थानांत पेशव्यांचें वजन कमी होईल व महादजीसारखा सरदार गेल्यानें आणखीं काय काय अनर्थ होतील, इत्यादि कारणांसाठीं तह महादजीच्या हातूनच करवावा अशी युक्ति नानानें काढली. पेशव्यांच्या राज्यासंबंधानें हा महत्वाचा तह त्याचे द्वारें केल्यानें त्याचें विशेष गौरवच केल्यासारखें झालें.

सालबीचा तह होण्यापूर्वीं गोदर्दसाहेबानें पुण्यास मि. वेदरस्टन (उदिस्टन) साहेबाला तहाचें बोलणें लावण्यासाठीं पाठविलें होतें, परंतु त्याचे बरोबर तह न करतां कलकत्त्याहून मिस्तर अंदरसन (इंडर्सन) साहेब तह करण्यासाठीं हेस्तिंगससाहेबानें महादजीकडे पाठविला होता, त्याचे मार्फतच बोलणें करण्याचा नानाचा निश्चय ठरला. यांत नानाचे दोन हेतु होते. पहिला असा कीं अंदरसन साहेब कलकत्त्याहून आल्यामुळें त्याला तहासंबंधीं निकालाचें भाषण करण्याचा विशेष अधिकार होता व त्याच्यापासून तहांत फायदाही जास्त होण्याचा संभव होता. दुसरें कारण असें कीं, महादजीनें इंग्रजांबरोबर स्वतंत्र तह केलाच होता, तेव्हां त्याचें इंग्रजांवर जास्त वजन होतें आणि पाटीलबोवाला हा मोठा अधिकार दिल्यानें त्याचें

---

१ पत्रें व यादी. २५९

गौरव केल्याचेंही श्रय मिळतें. "गाडराकडून उदिष्टीन येथें आला तो येथें बोलूं लागला, त्याचे बोलण्यापेक्षां पाटीलबावांजवळ अधिक होईल हें जाणून त्यास निरोप देऊन पाटीलबावानींच मुद्देमाफक तह करावा, पाटीलबावांस यश यावें आणि सरकार काम मातबर घडावें," असा नानाचा हेतु होता. त्यानें शिंद्याचे दरबारांतील आपल्या वकीलास लिहिलें कीं, "तुह्मीं राजश्री पाटीलबावाशीं एकांतीं बोलावें कीं, इंग्रजांचा तह आपले हातें होतो ही गोष्ट लहान नाहीं. यांत कस्त करून सरकारची कलमें जितकीं अधिक साधतील तितकीं साधावीं. हा लौकिक मोठा आहे. पाटीलबावाही दूरदेशीही आहेत. त्यांचेंही ध्यानांत यावयाजोगीं कलमें आहेत. या उपर त्यांचेंही थोरपणास व श्रीमंतांचे दौलतीस उपयोगी ते करतील." मि. अंदरसन यानें पुणें येथें स्वतः महादजीबरोबर यावें असाही प्रथम बेत होता, परंतु तो पुढें कायम झाला नाहीं. श्रीमंत पेशवे यांचे लग्नास महादजी शिंदे येण्याचा संभव होता, परंतु तो बेत रहित झाल्यामुळें तहाची वाटाघाट शिंदे यांचे लष्कराचे मुक्कामींच सर्व झाली.

मि. अंदरसनाचें ह्मणणें असें होतें कीं, 'पेशव्याचा जिंकलेला मुलुख अगोदर परत देतों, नंतर दादांस तुमचेकडे जाण्यास सांगूं.' परंतु दादांच्या संबंधानें नानानें फारच अट घेतली. दादाला कुटुंबसुद्धां पुण्यास आणिल्याखेरीज तह करण्यांत कांहीं फायदा नाहीं असें त्यानें दाखविलें. दादाला तसाच राहूं दिल्यास स्वारी पुनः कोणीकडे अनुसंधान लावील नकळे, ही भीति फार होती. ह्मणून नानानें लिहिलें कीं:—"आपले घरचें खूळ दादा येणार नाहींत, बहाणे हजार लावतील, बिनसल्यास, मसलतही फिरोन उभी राहील, याकरितां दादासाहेबांस इंग्रज कुटुंबसुद्धां निखालस हवालीं करीत असेल, तर तह करावा, नाहींतर करणें ठीक नाहीं याप्रमाणें सांगावें." किल्ले मुलुख घेतल्यावर दादासाहेब स्वाधीन होतील, असें ह्मणू

१ पत्रें व यादी २६६. २ पत्रें व यादी २२२, १९१.

लागल्यास ( इंग्रज ) परिच्छिन्न तह स्वच्छतेनें करीत नाहीं, असें समजावें."[1]

नानानें इंग्रजांची पूर्वीची कृती महादजीचे नजरेस आणिली. तह झाल्यावर इंग्रज दादांस स्वाधीन करतील किंवा नाहीं याची त्यास शंका होती. "हपटनचे तहासमयीं इंग्रजांनीं दादासाहेबांचा करार केला, अगोदर ठाणीं मुलुख घ्यावीं, मग दादाही कराराप्रमाणें येतील, त्यावरून मुलुख व ठाणीं घेतलीं, मग दादाच्या येण्यास नानाप्रकारच्या दिक्कती लाविल्या कीं, मुंबईकर लबाडी करतात; मुंबईकर ह्मणतात कीं कलकत्तेकर करतात, असें करून दादांस ठेऊन पुढें तळेगांवची मसलत केली." याकरितां दादांस अगोदर स्वाधीन करण्याबद्दल बोलावें, असें नानानें लिहिलें[2]. दादांस उज्जनीप्रांतांत ठेवावें, निदान पुण्याच्या दरबारचे स्वाधीन न करितां, शिंद्याचे स्वाधीन करावें, अशीही इंग्रजांची इच्छा होती व ती गोष्ट महादजीलाही आवडली असती. तथापि एकदां आपल्या हातून दादा गेले, यामुळें आतां महादजीस त्या गोष्टीबद्दल आग्रह करतां येत नव्हता; पण नानानें त्यास वाईट वाटेल ह्मणून मोठ्या युक्तीनें पण खोंचून लिहिलें कीं, "पाटीलबावांस मसलती करणें, तेव्हां बंदोबस्त रहाणार नाहीं, या करितां दादासाहेबांस पाटीलबावांनीं आपले विद्यमानें सरकारांत हवालीं करावें, ह्मणजे बंदोबस्त चांगला राहील व मागें सरकारचा शब्दही कोणावर नाहीं."[3]

महादजीच्या मार्फत सालबी येथें जो तह झाला त्यांत मुख्यत्वेंकरून असें ठरलें कीं, पुरंदरच्या तहानंतर इंग्लिशांनीं घेतलेला मुलुख आणि भडोच व त्याखालील इंग्रजांस देऊं केलेला तीन लक्षांचा मुलुख, हे सर्व मराठ्यांस मिळावें; गुजराथेंत व गायकवाडच्या संबंधानें पुरंदरच्या तहापूर्वीं ज्याप्रमाणें परस्परांचे हक्क होते ते कायम ठेवावे; राघोबादादानें दरमहा २५००० रुपये घेऊन आपल्या खुषीस येईल

---

[1] पत्रें व यादी १८७, १९२. [2] प. व या. २६४. [3] प. व या. २०२; याप्रमाणें १८७, १८८, १८९, १९२, १९७, २०३, २०८ हीं पत्रें पहावीं. यांत दादांबद्दल नानाचा किती आग्रह होता, हें स्पष्ट दिसतें.

तर शिंद्यापाशीं रहावें, परंतु सरकारच्या राज्यप्रकरणांत त्यानें बिलकुल हात घालूं नये व त्यास इंग्रजांनींही मदत देऊं नये; हैदरानें जो मुलुख इंग्लिशांपासून अगर कर्नाटकच्या नबाबापासून घेतला असेल तो त्यास परत देण्यास लावावें; पोर्तुगीझ लोकांशिवाय इतर युरोपिअन लोकांस मराठ्यांच्या राज्यांत वसाहत करण्यास देऊं नये; आणि खुद्द महादजीस भडोच शहर मिळावें. हा तह पेशव्यांच्या दरबारांत १७८२ च्या मे महिन्यापासून पसंतीकरितां बरेच दिवस भिजत पडला होता, अखेरीस तारीख २४ फेब्रुवारी १७८३ रोजीं, तो सह्या होऊन कायम झाला.

हा तह बरेच महिने घोळत होता. असें होण्याचें मुख्य कारण हें कीं, नानाचे मनांतून इंग्रजांविरुद्ध भोंसले, निजाम व हैदर वगैरे जी मंडळी उभी केली होती, त्यांचे संबंध सर्व लक्षांत घेऊन तह करावा असें होतें. परंतु महादजींचें ह्मणणें होतें कीं, भोंसले व निजाम यांणीं वचनाप्रमाणें इंग्रजांविरुद्ध लढाई सुरू केली नाहीं, "एक तर ( भोंसले) पैका घेऊन माघारे आले. एक घरींच स्वस्थ राहिले. मसलतीस षरीक असते तर त्यांस घेऊन करावें, तें नाहीं. मसलत सरकारावरच पडली. तेव्हां सरकारांतून तह केल्यास त्यांनीं वाईट कां मानावें." यासाठीं त्यांचा विचार करण्याचें कारण नव्हतें. परंतु त्यांस सोडल्यानें त्यांचे मनांत संशय येईल व पुढेंमागें उगीच राजकारणें वाढतील ह्मणून, तीं टाळण्यासाठीं त्यांच्याबद्दलचीं कलमेंही तहांत घालावीं, असें नानाचें ह्मणणें पडलें. इंग्रजांनीं निजामास व भोंसल्यास आजपर्यंत देत असल्याप्रमाणें मक्त्याचा पैसा व बंगाल्याची चौथाई द्यावी, एवढें तरी कलम तहांत घालावें, कारण "येणेंकरून नबाबास व भोंसल्यास गोड वाटेल. यांत इंग्रजांचेंही जात नाहीं. राजकारणास उपयोगीं पडेल," असें नानाचें धोरण होतें.

गायकवाडच्या संबंधानेंही बरीच वाटाघाट झाली. या लढाईंत गायकवाडानें पेशव्याशीं आपला पूर्वसंबंध कोणता होता तें विसरून गुजराथेंत इंग्रजांचे मदतीनें बंडावा केला; यासाठीं त्यानें सर्व पूर्वी-

१ प. व या. २३२.

माणें पेशव्याशीं वर्तन ठेवावें व त्याला इंग्रजांनीं आश्रा देऊंनये व मदत करूंनये असें ठरलें. अहमदाबाद पेशव्यांकडून गोदर्दसाहेबानें घेतली होती, तेवढी तरी गायकवाडाकडे राहावी, असा इंग्रजांचा आग्रह होता, परंतु तें बोलणें महादजीनेंही कबूल केलें नाहीं.

या लढाईत इंग्रजांनीं पेशव्याचा एकंदर घेतलेला मुलुख परत द्यावा असें नानाचें ह्मणणें होतें, परंतु शेवटीं पुरंदरच्या तहाचे धोरणानें, साष्टी व दुसरीं तीन बेटें इंग्रजांकडे कायम ठेवण्याचें ठरलें. भडोच परगण्याखालील तीन लक्षांचा मुलुख पुरंदरच्या तहांत इंग्रजांस देण्याचें ठरलें होतें, परंतु या तहांत तो देऊं नये असें झालें.

या सर्व प्रकरणांपेक्षां, दादासाहेबांच्या राहण्याबद्दल व हैदरच्या बद्दल जीं कलमें ठरावयाचीं होतीं, त्यांचीच फार वाटाघाट झाली. इंग्रजांविरुद्ध लढाई करण्यास नानानेंच हैदरास उत्तेजन दिलें, व त्याप्रमाणें त्यानें इंग्रजांस जबर तंबी पोंचविल्यामुळें इंग्रज मऊ आले, हें नानाचे लक्षांत होतें. त्याचें वर्तन भोंसले किंवा निजाम यांच्याप्रमाणें धरसोडीचें व मतलबाचें नव्हतें. असें असतां, त्याला सोडून तह करावा तर लौकिकासही वाईट दिसेल व कदाचित् हैदर व फ्रेंच हे जर एक झाले व इंग्रजांचें त्यांनीं पारपत्य केलें, तर मराठ्यांसही भीतीच होती. यासाठीं त्याचे मुद्धां तह करावा, अशी नानाची फार इच्छा होती. "हैदरखान सोबती व कौल करारवचन प्रमाण. त्याचा मुद्दा कांहीं न होतां तह करणें तेव्हां त्यासही वाईट वाटेल." असें नानानें लिहिलें.[1]

इंग्रजांचें ह्मणणें होतें कीं, पेशवे सरकारानें हैदराशीं तह केल्यामुळें त्यानें इंग्रजांवर स्वारी करून त्यांचा मुलुख घेतला. यासाठीं त्यानें जो मुलुख इंग्रजांचा किंवा त्यांचा दोस्त कर्नाटकचा नबाब महमद अल्लिखान, याचा घेतला असेल, तो परत देण्यास त्यास भाग पाडावें, तसें न केल्यास त्याच्यावर इंग्रजांनीं व पेशव्यांनीं मिळून स्वारी करावी. परंतु नानाचे मनांत एवढें जबाबदारीचें काम पत्करण्याचें नव्हतें, कारण हैदरासारख्या मनुष्याशीं वि-

[1] प. व या. १६०, २३८, [2] प. व या. १६१.

श्वासघातकीपणाचें वर्तन ठेवण्यास नानास धैर्य नव्हतें. त्याच्याशीं स्नेह ठेऊन सरकारतर्फे त्यानें मदत केली असतां, इंग्रजांशीं मिळून खानावर गेलें तर, "मराठ्यांचा इतबार नाहीं" असें होईल, यासाठीं त्याला समजून सांगावें व त्यानें ऐकिलें नाहीं व पेशवे सरकाराशीं विरोध मांडला, तर मात्र उभयतांनीं त्याच्यावर जावें असें पुणें दरबारचें मत होतें. नवाब, (निजाम), फ्रेंच व हैदर एक झाल्यानें मसलत भारी होण्याचा संभव होता. परंतु मध्यंतरीं हैदर व



हैदर. टिपू.

इंग्रज एक होण्याचीही बातमी उठली होती, यासाठीं तीही भीति होतीच; सबब तह लवकर आटपून घ्यावा असें नानास वाटूं लागलें. हैदरखान आणखीं कांहीं दिवस जिवंत राहता तर या संबंधानें फार घोंटाळा उत्पन्न झाला असता, परंतु इतक्यांतच तो मेल्यामुळें, या कलमाबद्दल पुढें जास्त वाटाघाट झाली नाहीं. हैदरखान मरण पाव-

१ पत्रें व यादी २०६.

त्यामुळें इंग्रजांस फार धीर आला, कारण त्याचा मुलगा टिपू जरी शूर होता, तरी त्याच्या आंगीं राजकीय मसलत व दूरदर्शी विचार नव्हते. टिपूनेंही फ्रेंचांशीं तह करून मोठीच मसलत आरंभिली, इतक्यांत मराठ्यांचा व इंग्रजांचा तह झाल्याचें त्यास समजलें होतें. तेव्हां त्याची जर सरशी झाली तर मात्र पंचाईत पडेल अशी नानास भीति उत्पन्न होऊन त्यानें टिपूवर पाठविण्याकरितां फौजही तयार केली होती.

याप्रमाणें बरेच दिवस वाटाघाट होऊन शेवटीं तहावर उभयपक्षांच्या सह्या १७८२च्या अखेरीस झाल्या व १७८३च्या फेब्रुआरी महिन्यांत तह कायम झाला. या तहांत पुरंदरच्या तहापेक्षां पेशव्याच्या नुकसानीच्या कोणत्या बाबी झाल्या, तें नानानें आपल्या एका पत्रांत थोडक्यांत दाखविलें आहे. त्यांत साष्टीवरील सर्व हक उडाला, कर्नाटकच्या नबाबाची चौथाई व चंदावरचें राज्य परत मिळविण्याचें साधलें नाहीं, अंतरवेद गेली, गायकवाडाकडील येणेंचा मागील ऐवज बुडाला, व "दुसरे टोपीकरांशीं स्नेह न करणें" ठरलें, ह्या गोष्टी विशेष होत्या. फ्रेंचांशीं स्नेह न करण्याचा करार चांगला झाला नाहीं, हें नानाचें ह्मणणें खरें होतें. इंग्लिशांनीं या कलमाच्या जोरावरच पुढें सर्व राज्यें कशीं घेतलीं, हें अनुभवास आलेंच आहे. फ्रेंचांची व इंग्लिशांची या वेळीं लढाई चालली होती, यामुळें फ्रेंचांचे स्नेहाचा इंग्रजांस जो बाऊ होता तो पुढें कमी झाला. परंतु यावेळीं फ्रेंचांचे स्नेहानें टिपूचीही सरशी होण्याची भीति होती. अशा तऱ्हेचें कलम खुद्द महादजींचे तहांत नसून याच तहांत घालण्याचें पाटीलबावानें कसें कबूल केलें समजत नाहीं. तसें कलम शिंद्याचे तहांत असतें तर पुढें जे त्यानें मोठे कंपू उभारून सर्व हिंदुस्थानास जिकण्यासारखी लढाऊ व कवायती फौज तयार केली, ती करतां आली नसती. पाटीलबावांनीं अगोदर आपणच स्नेह करून, पेशव्याचा व हैदराचा तह करून देवविण्याची हमी घेतल्यामुळें व भिडेसही पडून पेशव्यांचे तर्फे जास्त नफ्याचीं कलमें ठरविलीं नाहींत.

ह्या तहाचीं कलमें उभयपक्षांकडून पुरीं करण्याची जामिनकी

महादजीनें पत्करल्यामुळें त्याचें वर्चस्व किती झालें होतें, हें जास्त सांगण्याचें कारण राहिलें नाहीं.

सालबीचा तह झाल्यावर टिपूनें फ्रेंचांची मोठी फौज घेऊन भर पावसांतही लढाई चालवून मद्रासेपर्यंत शह पोंचविला, अशी बातमी नानास समजली. फ्रेंच, दच व पोर्तुगीझ हे सर्व एक झाले असून, सर्व इंग्रजांशीं लढाई करणार असेंही त्यास समजलें. इंग्रजांनींही आपली बंगाल्यांतील व मुंबईची फौज मद्रासेस जमा केली व तेथेंच जर एखाद्या मोठ्या लढाईंत इंग्रजांचा नाश झाला, तर कर्नाटक सर्व टिपूला मिळून, फ्रेंचही मुंबईस येतील, अशी नानाला चिंता पडून, त्यानें अशा वेळीं कसें वागावें ह्मणून शिंदे यांस विचारलें. परंतु पुढें जो प्रकार झाला त्यामुळें ही भीति मुळींच दूर झाली.

तह झाल्यानंतर मि. अंदरसेनास दीड लक्षांची जाहगीर द्यावी, असा पाटीलबावांचा आग्रह होता. परंतु वकीलास अशी जाहगीर देण्याची वहिवाट नाहीं व साष्टीबद्दलचें कलमही त्याचे-कडून पेशव्यांच्या तर्फें उलगडलें नाहीं,याकरतां त्याला जाहगीर कां द्यावी अशी शंका नानानें काढिली, तथापि शिंद्याचा आग्रहच असल्यास, पुढें देऊं असें उत्तर त्यानें दिलें.

हैदर मरण पावला तरी टिपूनें इंग्रजांशीं लढाई चालविलीच होती. परंतु सालबीच्या तहाप्रमाणें मराठ्यांनीं टिपूस लढाई बंद करण्यास लावण्याचें ठरविलें होतें, ह्मणून इंग्रजांशीं पुढें लढाई चालविल्यास आपण तुमचेवर स्वारी करूं, अशी भीति महादजीनें टिपूस दाखविली. परंतु अशा बाऊस टिपू भिणारा नव्हता. त्यानें सालबीच्या तहास न जुमानतां लढाई चालूच ठेविली.


तह झाल्यानंतर, ठरल्याप्रमाणें दादासाहेबांस कोपरगांवीं ठेऊन, बंदोबस्त केला व तेथें ते थोडक्या दिवसांतच मरण पावले. येणेंप्रमाणें या प्रसिद्ध विचित्रचरित्राचा शेवट झाला व यानें पेटाविलेल्या गृहकलहाग्नीनें कांहीं वर्षांनीं मराठ्यांच्या साम्राज्याचाही पण शेवट झाला !

१ प. व या. ३०९, ३१२.

# भाग ८ वा.

## दिल्लीचीं कारस्थानें.

### वकील-इ-मुतालिक.



सालबीचा तह आपले हातून झाला यांत पाटीलबावांस मोठा आनंद झाला. हा तह होण्याचे अगोदर निजाम व भोंसले यांनीं नानाला लिहिलें होतें कीं, इंग्रजांचा तह आमचे विद्यमानें झाल्यास, सर्व मुलुख व घेतलेला वसूल सुद्धां इंग्रजांस परत देण्यास आह्मी भाग पाडूं व तसें इंग्रजांनीं न केल्यास आपण तिघे मिळून इंग्रजांचें पारपत्य करूं. परंतु असें झालें तर आपलें महत्व वाढत नाहीं, असें पाहून पाटीलबावांनीं इंग्रजांबरोबर वेगळा तह करून, त्या तहांत हैदर व पेशवे यांचे तह करवून साम करण्याची हमी घेतली. ता. २६ फेब्रुवारी १७८३ रोजीं, इंग्रजांचा वकील मि. अंदरसन व पाटीलबावा यांची दरबारांत भेट होऊन परस्परांनीं तहांचे दस्त मोबदला केले. त्याप्रसंगीं महादजीनें भोंसले व निजामाबद्दल आपला तिरस्कार प्रदर्शित करून, 'इंग्रजांनीं इतउत्तर मराठ्यांच्या संबंधानें जें कांहीं बोलणेंचालणें करणें, हें आपल्या मार्फत करावें; आपण इंग्रजांचा खरा दोस्त; सालबीचा तह करण्यांत निजाम व भोंसले आडकाठी घालीत होते; पुण्याचे मुत्सद्दी परस्परांत भांडत असून, त्यांपैकीं हरिपंत व होळकर आपला द्वेष करतात; आणि पेशवे तर अल्पवयी असल्यामुळें पुण्यास सर्व घोंटाळेच होणार,' असें तो ह्मणाला. यासाठीं आपल्या सूत्रानें इंग्रज वागल्यानें परस्परांचें त्यांत हित आहे.

१ प. व या. १६१.

व प्रसंग पडल्यास पुनः जर पुण्यामध्यें कांहीं घोंटाळा झाला तर आपणा उभयतांस दक्षिणेवर जावें लागेल, असे त्याचे उद्गार निघाले. पुण्यास मुत्सद्यांनी गैरशिस्त प्रकार कांहीं केल्यास इंग्रजांनींही शिंद्यास मदत देण्याचें कबूल केलें. मि. अंडरसनचें ह्मणणें असें आहे कीं, या सर्व भाषणांत महादजीचा मुख्य मुद्दा सर्व स्वार्थपर असून, त्याच्या मध्यस्तीशिवाय मराठ्यांचा व इंग्रजांचा कांहीं व्यवहार होऊं नये, असा होता. या सर्व प्रकरणांत इंग्लिशांवर महादजीनें इतकी छाप ठेविली होती कीं, त्याच्याशिवाय महाराष्ट्रराज्यांत दुसरा कोणीच भला माणूस नव्हता, असा त्यांचा पक्का ग्रह झाला होता.

सालबीचा तह अमलांत आणण्याची जबाबदारी पाटीलबावांकडे असल्यामुळें, त्या संबंधानें बऱ्याच तक्रारी यावेळीं उत्पन्न झाल्या. प्रथमतः हैदराबद्दल जें कलम घातलें होतें, तें तो मेल्यावर टिपु कबूल करीना. यासाठीं ठरल्याप्रमाणें मराठ्यांची व इंग्रजांची फौज टिपूवर पाठवावी, अशी वाटाघाट सुरू झाली व मुंबईची फौज कांहीं दिवस पक्का निश्चय होईपर्यंत तेथेंच ठेवावी, ह्मणजे मिळून स्वारी करण्यास साधेल असें नानानें महादजीच्या सूचनेवरून कबूल केलें. परंतु टिपूशीं उघड वैर मांडण्याची नानाची इच्छा नव्हती. त्याच्या मनांतून निजामास सुद्धां या मसलतींत घ्यावें असें होतें, कारण इंग्रजांचा

1 Anderson's letter, in Forrest's selections "Foreign Department" Vol. III, P. 926-27. Mr. Anderson concludes his letter with the following remarks :—

"Before I conclude this narrative permit me to indulge myself for a moment, in the pleasing task of tendering a tribute of justice to Mahadaji Scindia. In the course of this long negociation, which has throughout been strongly tinctured with suspicion and distrust, many circumstances have passed to impress us with unfavourable opinions ; new and unreasonable propositions have frequently been started and withdrawn, and one doubt has scarcely been obviated when another has been suggested. Yet we may perhaps find much apology for Scindia's conduct when we reflect that he has been acting for a superior and probably been often obliged to give way to the dictates of Ministers,-by nature grasping and suspicious, from circumstances rendered arrogant, and many of them from peculiar views of selfish policy absolutely averse to the negociation. His conduct on the subject of Broach, where his own interests were only concerned, has formed a very agreeable contrast. Nothing can exceed the delicacy which he has shown in this affair."

...ला पराभव झाला, आणि निजाम, फ्रेंच व टिपू एक होऊन मराठ्यांवर घसरले, तर निभावणें कठीण होतें, हें भय त्याचे पोटांत होतें. टिपूवर पाठविण्यासाठीं रास्ते, व पटवर्धन यांच्या फौजा मात्र त्यानें तयार ठेविल्या, परंतु तो बेत मोठ्या युक्तीनें त्यानें दिवसगतीवर लोटला. पुढें टिपूनें तह केल्यामुळें तर भानगडच उरली नाहीं.

परंतु आपल्या सल्लयाच्या शिवाय टिपूशीं तह केला याबद्दल मात्र महादजीनें इंग्रजांची चांगली कान उघाडणी केली, तेव्हां वारनहेस्टिंगनेंही ती चूक कबूल करून शिंद्याची माफी मागितली.

तह झाल्यावर इंग्रजांचें "रेंजर" नांवाचें एक गलबत धुळपानीं पकडलें होतें, तें तहा विरुद्ध पकडलें अशी कागाळी अंदरसन साहेबानें महादजीकडे केली; परंतु तें गलबत तहाची माहिती नसल्यामुळें पकडलें गेलें व आता नानानें चौकशी करून तें सोडून दिलें आहे, असें पाटीबावानीं सांगून त्यागोष्टीचा निकाल केला. टिपूच्या वकीलास इंग्रजांविरुद्ध जय मिळविला ह्मणून आनंदाचीं वस्त्रें महादजीनें दिलीं, अशीही इंग्रजांची तक्रार निघाली, पण तीं वस्त्रें नवीन वकीलाच्या नेमणूकीमुळें दरबारशिरस्त्या प्रमाणें दिलीं, असें भाऊबक्षी याणीं सांगितलें. हा गृहस्थ इंग्रजांशी बोलण्यांत शिंद्याचे तर्फे पुढारी वकील होता. या वस्त्रांचे प्रकरणांत खुद्द पाटीलबावानां जाऊन अंदरसनसाहेबाची समजूत करावी लागली व या प्रसंगीं ...हां आपण इंग्रजांचे खरे दोस्त असून पुढें मागें आपणां उभयतांस ...येथील भानगडींत शिरावें लागेल, यासाठीं आपल्या वर्तनाबद्दल ...का घेण्याचें कारणही नाहीं, असें त्यानें सांगितलें. महादजीचा ...नानाचा जो संबंध पुढें दिसून आला, त्याचा ह्यावेळींच महादजीनें ...या रचिला होता. याप्रसंगीं महादजीनें अंदरसनाशीं जें भाषण केलें, तें ...च्या राजकीय मसलतीचें दर्शक ह्मणून दाखविण्यासाठीं अंदरसनसाहेबाच्या पत्राचा उतारा मुद्दाम टिपेंत दिला आहे. हल्लीं जी उपलब्ध

[1] पत्रें व यादी १९९, २६९, २७१. [2] Forrest's Selections, Vol. III, "Foreign Department" P. 1104. [3] पत्रें व यादी २२२, २१०, २११.

ऐतिहासिक माहिती मिळते त्यावरून एवढें स्पष्ट दिसतेंकीं, इंग्रजांशीं विरोध न करतां त्यांचे स्नेहाचे जोरावर आपला कार्यभाग व आपली महत्वाकांक्षा पुरी करावी, अशी महादजीची इच्छा होती.

रघुनाथरावाला आपल्या स्वाधीन करावें, असा नानाचा आग्रह होता व त्यानें तें काम शिंद्याचें मन न दुखवितां कसें साधलें तें मागील भागांत सांगितलेंच आहे. परंतु रघुनाथरावच खुषीनें आपल्याकडे येईल अशी जी इच्छा महादजीचे मनांत होती, तिची तो हरिपंताचे स्वाधीन होऊन पुण्याकडे जातो, असें त्यास समजतांच निराशा झाली; ह्मणून कसें तरी करून सरतेस इंग्रजांचा अधिकारी बोडमसाहेब होता त्याला अंदरसन कडून लिहवून रघुनाथरावास

1 Extract from Mr. Anderson's Diary dated 15th June 1783 :—

"15th June—Scindia paid me a visit. After he had conversed sometime in public, he retired with three or four of his confidential officers to a separate tent, where we held a long conference. He seemed extremely anxious to obliterate the impressions which I might have received from his having given cloths to Tipoo's Vakeel. He repeated all that Bow Bucksey had before said on the occasion, and he added that after having engaged so deeply in the interests of the English, it would be absurd in him to court the friendship of their opponent. He expatiated on the warmth of his attachment to the English, and to the Governor-General in particular, for whom he entertained so strong and unalterable a regard that if it were even possible, he said, that ever the Company should abolish the present connection, his sentiments of friendship for the Governor-General would remain invariably the same. He remarked how little he was subject to be influenced by temporary misfortunes to which in the corses of war all were liable ; that whilst Colonel Camac was acting against him he had received the news of different advantages gained by Hyder over the English, to which he had paid little regard ; that if such was the case at a time when he was engaged in hostilities against us, it was not likely that he would pay much regard to news of this kind now when he was connected with us by the closest ties of friendship. He remarked that the Peshwa was an infant, and that although he himself was entrusted with the charge of his interests with respect to the English, yet I must well know the disposition of some of the persons who had acquired an influence in the direction of his affairs. *He hinted that he trusted to our support to enable him at some future period to set matters to rights and he inferred that as he looked to us for support in his domestic concerns it would be absurd in him to forfeit our favour by any foreign connections.* He paid me some compliments and observed he was sure that a friendship that was established in our hearts would never be affected, at whatever distance I might be, by any misreprentations of external circumstances." Forrest's Selection Vol, III.1076-77.

आपल्याकडे येण्याबद्दल भीड घालावी, अशी महादजीनें खटपट केली. परंतु अंदरसन यानें त्या गोष्टीची बिलकुल कबुली दिली नाहीं. महादजीचें ह्मणणें होतें, कीं तहाच्या शर्तीप्रमाणें रघुनाथरावाला कोणताही अपाय होऊं नये असें आहे, या करितां तो जर मुत्सद्यांचे हातास गेला व कदाचित् त्यांनीं त्यास कांहीं बरें वाईट केलें तर आपणास दोष येणार, सबब रघुनाथरावानें पुण्यास न जातां आपल्या स्वाधीन व्हावें, असें बोडम कडून सांगवावें. हें सर्व ढोंग होतें यांत शंकाच नाहीं व पाटीलबावांचा खरा हेतू काय होता, हें मागील भागांत सांगितलेंच आहे.

इंग्रजाशीं तह झाल्यावर, महादजीनें इंग्रजाची सर्व फौज यमुना पार झालेली पाहून मागील लढाईत माळव्यांतल्या ज्या संस्थानिकांनीं मराठ्यां विरुद्ध शस्त्र उचललें त्यांचे पारपत्यास प्रारंभ केला. त्यानें गोहद, खेची, नरवार, दतिया, चंदेरी वगैरे संस्थानिक व मेवाशी, गिराशे वगैरे लोकांचें पारपत्य आरंभिलें. त्यांत त्याच्या फौजेनें कांहीं पेशव्यांच्या गढ्या होत्या त्यांसही उपद्रव देऊन पैसा वसूल केला, ह्मणून नानानें पाटील बावांस टपका दिला. या संस्थानिकांस कडक शिक्षा देऊं नये असें नानाचें मत होतें, परंतु महादजी पुढें कोणाचेंच चालेना.

गोहदच्या जाट संस्थानिकानें इंग्रजांशीं स्नेह संपादून महादजीशीं लढाई केली व इंग्रजांचे साहाय्यानें ग्वाल्हेरचा किल्ला दाबला, ही गोष्ट महादजीचे मनांत खात होती ह्मणून गोहदकराचा सूड घेण्याच्या विचारांत तो होता. ग्वाल्हेर त्याचेकडेच रहावी असा इंग्रजांनीं करार करून घेतलेला असतांही, तो महादजीनें बाजूस ठेवून, गोहद कराशीं लढाई सुरू करून, त्याच्या सालवी, आंत्री, गोहद व ग्वाल्हेर, वगैरे जागा काबीज केल्या व त्याला जेरीस आणिलें. गोहदचे राज्या पैकीं आतां ढोलपूर या नांवाचें संस्थान चंबळेच्या उत्तरेस आहे तेवढेंच उरलें आहे. ग्वाल्हेरचा किल्ला बरेच दिवस लढत होता, तो मिळाल्यामुळें महादजीस मोठा आनंद झाला. तथापि ग्वाल्हेर, विंचूरकरांचे सरंजामापैकीं असल्यामुळें ती त्यानां द्यावी लागली.

गोहदच्या राण्याचा महादजीनें पुष्कळ नाश केला, ही गोष्ट

१ प. व या. २९६.

नानास बरी वाटली नाहीं इतकेंच नव्हे, तर इंग्रजांनाही ती बरी दिसली नाहीं. परंतु त्याबद्दल वॉरनहेस्तिंग्ससाहेबानें महादजीस मुळींच दोष दिला नाहीं. त्याचें ह्मणणें असें होतें, कीं राण्याचें वर्तन सर्वांशींच बेमानपणाचें असल्यामुळें, महादजीनें त्याचें पारपत्य केलें, तें योग्यच केलें.

महादजीनें कांहीं फौज आपाखंडेरावाचे हाताखालीं देऊन त्यानें बुंदेलखंडावरही स्वारी केली, व तेथें त्याची सरशी झाली.

यासुमारास व सालबीचा तह होण्या पूर्वींही दिल्लीकडील प्रकरणांत महादजीनें मन घातलें. इ.स. १७७२ नंतर दिल्लीच्या मसलतींतून मराठ्यांचा हात निघाला; त्यानंतर अद्यापपर्यंत पुनः दिल्लीकडील बादशाही मसलतींवर लक्ष देण्यास मराठ्यांस सवड नव्हती. मराठ्यांचें व इंग्रजांचें युद्ध चालू होतें, तेव्हां नजफखानाची व बादशहाची मदत घेऊन इंग्रजांचें पारपत्य करण्याचा विचार चालू होता व नानाफडणविसाचेंही लक्ष यागोष्टीकडे लागलें होतें. बादशाहास व नजफखानास मिळवून, कांहीं मराठी फौजही मदतीस देऊन त्यांनीं इंग्रजाचे तोंडावर हिंदुस्थानांत रहावें, व गुजराथेंत शिंद्यानें खुद्द जावें असा १७८२ मध्यें नानाचा विचार होता. "बादशहा व नजबखान यांस मिळवून घ्यावें. इंग्रजाचे मसलतीस फार उपयोग पडेल" असे नानानें स्पष्ट लिहिलें होतें[२], परंतु तो योग जमून आला नाहीं.

मराठ्यांनीं दिल्ली सोडल्यापासून तिकडे कोणकोणत्या घालमेली झाल्या व त्यांत महादजीनें आपला प्रवेश कसा केला हें सांगण्याचे पूर्वी, यावेळीं महादजीनें आपला अंमल व दरारा कायम ठेवण्याचें मनांत आणून आपल्या फौजेंत मोठी सुधारणा काय केली व क-

---

१ पत्रें व यादी. ३२८, ३२९, २९६, २९३, २८८, २५१, २३३; व Forrest's, "Selection" Foreign Department 1089-90.

२ प व या. २४९, ३२२. नानाचे पत्रांत 'नजबखान' असें चुकून पडलें आहे. त्याचें नांव 'मिर्झानजफखान' असून, तो हल्लीं वजीर होता. पानिपतमध्यें प्रसिद्धीस आलेला नजिबखान रोहिला मागेंच मरण पावला होता. मागें पृष्ठ १०४ पहा.

बायती पायदळ तयार करण्याचा निश्चय करून फ्रेंचलोकांस चाकरीस ठेविलें, ही हकीगत सांगितली पाहिजे. हें जें मोठें खर्चाचें काम त्यानें आरंभिलें त्यामुळें पुढें त्याचा दिल्लींतील अंमल कायम झाला, व शिंद्याचें राज्य इंग्रजांचे तडाख्यांतून वांचलें.

युरोपियनलोकांच्या सहवासानें ज्या नवीन फौजा हिंदुस्थानांत हैदर, निजाम वगैरे राजांनीं तयार केल्या होत्या, त्यांचे बरोबर मैदानांत उभें राहून लढाई करण्याची मराठ्यांच्या फौजेंत शक्ति नव्हती. पूर्वीच्या मोंगली फौजेस मराठ्यांच्या स्वारांनीं जेरीस आणिलें, परंतु आतां इंग्रजांच्या किंवा फ्रेंचांच्या फौजांबरोबर लढण्याचे मराठ्यांस वरचेवर प्रसंग येऊं लागले आणि तें काम त्यांचे हातून होईना. त्याफौजांचीं शस्त्रें वेगळीं व लढाई करण्याचा प्रकारही वेगळा होता. मराठ्यांची लढण्याची पद्धत ह्मणजे, मागें ज्याचा अनेक वेळां आह्मीं उल्लेख केला आहे, तो गनीमीकावा! भाले, बरच्या, पट्टे, तरवारी हीं त्यांचीं हत्यारें, फक्त जेथें हातघाईचा प्रसंग येई तेथेंच उपयोगीं पडत. त्यांचे स्वार अकस्मात् हल्ले करण्यांत किंवा मोठमोठ्या मजला मारून छापे घालून लूट मिळविण्यांत कुशल असत, परंतु त्यांच्यामध्यें हुकूम कमी होता. प्रत्येक शिपायी, जोंपर्यंत नोकरी करण्याची इच्छा असेल किंवा लुटीची लालूच असेल तोंपर्यंत चाकरीस रहावयाचा, नाहीं तर तो स्वतंत्र असे. ही फौज ह्मणजे महाराष्ट्रांतील शेतकरी असत. त्यांनीं पावसाळा संपला व दसरा होऊन रस्ते मोकळे झाले ह्मणजे हत्यारें साफसुफ करून घोडीं भरणा करावीं व एखाद्या सरदाराजवळ पुढील बरसातीपर्यंत रहावें; हाच फौज उभारण्याचा नित्यक्रम असे.

घोड्यांच्या शक्तीवर किंवा स्वतःच्या अक्कलेवरच सर्व शिपायगिरीची मदार होती. त्यांस कवाईत ह्मणजे काय, व अंमलदारांचे हुकूम ह्मणजे काय, हें माहीत नव्हतें. यामुळें या फौजेची नांवाला संख्या मात्र भरपूर असे, पण त्यांत मनापासून लढणारे थोडेच लोक असत; सर्वांची नजर लुटीवर असे, व प्रसंग बेतलाच तर सर्व जिकडे वाट फुटेल तिकडे जात व दुसऱ्या मुक्कामास गोळा होत. या प्रकारांमुळें

मराठ्यांचें किती नुकसान झालें याचें वर्णन मागें अनेकवेळां आलें आहे. शिपाई कोणी व्हावें व अंमल कोणाचा चालवावा ह्याचा निर्बंधच राहिला नव्हता. ज्या काळाचें आह्मी वर्णन लिहित आहों, त्यावेळीं, ज्याच्या मनगटांत तरवार धरण्यापुर्ता जोर होता व ज्याला लुटीची आशा होती, ते सर्व शिपाई बनत. हे शिपाई एकाच राजाच्या पदरीं रहात असें नाहीं, तर आज याची चाकरी कर, उद्यां दुसऱ्याची कर हाच क्रम चाले. हिंदुस्थानांत यावेळीं लहानमोठीं हजारों राज्यें होतीं व सदोदित परस्परांच्या लढाया चालल्या होत्या, यामुळें या धंद्यास मोठीच तेजी आली होती; त्यांत भांडवल नको, विद्या नको व जबाबदारी मुळींच नव्हती. या राज्यांत सोय जमली नाहीं, तर तेथून उठलें, दुसरीकडे गेले! असा हा धंदाच बनला होता.

फौज कोणी बाळगावी व ती कोठें हिंडवावी, याचाही निर्बंध नव्हता; त्यांत ज्याचे घराण्यांत थोडी सरदारी होती, ते तर मुद्दाम लोक चाकरीस ठेऊन जागोजागीं पुंडाई करीत. मराठ्यांच्या राज्यांतील सरदारांनीं महाराष्टांतच फौज उभारावी व निजामाकडे जाऊन मराठ्यां विरुद्धच उठावें! अशीं उदाहरणें मागें दिलींच आहेत. देशाभिमान, जात्याभिमान, किंवा स्वामिचा अभिमान मुळींच राहिला नव्हता. या प्रकारामुळें भिल्ल, रामोशी, गिराशे, मिंया, वागेर, पेंढारी व वैरागी सुद्धां हत्यार बंद होऊन, टोळ्या टोळ्यांनीं सर्व प्रांत हिंडूं लागले. यांस कोणी धनी नव्हता! गोसाव्यांनीं तर मोठ्या फौजाच तयार केल्या होत्या! महादजीचे ताब्यांतही गोसावी व पेंढारी असत. ह्या फौजा मनाला वाटेल तेव्हां चाकरी करीत, वाटेल तेव्हां निघून दुसरीकडे जात! तात्पर्य मराठ्यांच्या चाकरींत कवाइत शिकलेली, जय्यत तयार, व सरदारांच्या आज्ञेंत वागणारी फौज फार थोडी होती. प्रसंग पडेल त्या वेळीं आगाऊ पैसा देऊन लोक चाकरीस ठेवीत, व यासच नालबंदी देणें-ह्मणत.

या फौजेंत दुसऱ्या पुष्कळ लढाईच्या कला कमी होत्या. बंदुका वापरणें प्रचातांत नव्हतें, व कोणतें शस्त्र कोणी चालवावें याचाही

नियम नव्हता. एकाच पथकांत निरनिराळीं हत्यारें वापरीत! पोषा-खाबद्दल तर विचार नव्हताच. तोफखाना वेताचा असून तोफा ओ-तण्याची विद्या व गोलंदाजी माहीत नव्हती. मोर्चे बांधणें वगैरे ज्यास "मिलिटरी एंजिनिअरींग" ह्मणतात, त्याचा बहुतेक अभावच होता. किल्ला घेणें तर मराठ्यांस फार जोखमीचें वाटे व किल्ल्यांवर तो-फांची मारागिरी करणें त्यांस साधत नसे. यामुळें किल्ले, गढ्या घेण्यास महिनेच्या महिने लागत. आंतले लोकांचा अन्नाचा पुरवठा संपल्या शिवाय किल्ला हातीं येत नसे. यामुळें महादजीस माळव्यांतील रजपुत संस्थानिक, भिल्ल, गिराशे वगैरे लोकांच्या गढ्या घेणें विकट गेलें.

कवाईत शिकलेली फौज घाबरत नाहीं, व सरदारांचे हुकुमाशि-वाय पाऊलही हालवित नाहीं, सर्व फौज एकविचारानें हालते, ह्याचा लढाईच्या प्रसंगीं काय उपयोग होतो तें महादजीनें अनेक वेळां पाहिलें होतें. थोड्याशा इंग्रजी फौजेनें खुद्द त्याच्या प्रचंड फौजेची दुर्दशा दशा उडविली व हांहां ह्मणतां ग्वाल्हेर सारखे किल्ले सर केले, हें युरोपियन युद्धकलेचें बीज त्याला समजलें होतें. यासाठीं आतां फुरसद मिळतांच तशी कवाइती फौज उभारण्याचा त्यानें विचार केला.

याच सुमारास युद्धकलेवर पोटभरण्याच्या उद्देशानें हजारों फ्रेंच वगैरे युरोपियनलोक हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांकडे नोकरीस राहिलेले होते. गोहदच्या राण्याकडे सुद्धां फ्रेंचांनीं शिकवलेली एक पलटण होती. त्याचप्रमाणें शहाअलम, अयोध्येचा नबाब, भरतपूर-कर, जयपूरकर, इत्यादिकांपाशीं अशा फौजा थोड्याबहुत तयार केल्या होत्या. त्यांप्रमाणें आपल्यापाशींही फौज असावी असा पाटीलबावानीं निश्चय करून त्याच सुमारास डिबॉईन नामक एक फ्रेंच शिपाई त्याच्या लष्करांत चाकरीच्या आशेनें आला होता, त्याला त्या कामावर नेमिलें.

हा डिबॉइन मोठा शूर व अनुभविक सरदार असून युद्धकलेंत फार निष्णात होता. त्यानें वा. हेस्तिंगससाहेबाकडून शिफारस पत्र ही आणिलें होतें. त्याला महादजीनें एकहजार रुपये पगार ठरविला,

व दर शिपायामागें ८ रुपये प्रमाणें देण्याचें ठरवून प्रथम दोन पलटणी तयार केल्या. या प्रत्येक पलटणींत साडेआठशें लोक ठेविले. या पलटणींशिवाय तोफखानाही त्यानें नवीन उभा केला व हत्यारें तयार करण्याचा कारखाना काढून, त्यांत साँगस्टरनामक एका स्कॉटमनुष्याची नेमणुक केली. हा प्रथम गोहदकरापाशीं नोकरीस होता. असो याप्रमाणें हा शिंद्याचा पहिला कंपू तयार झाला. ही नवीन फौज तयार होतांच तिला आपा खंडेरावाच्या मदतीस बुंदेलखंडांत पाठविली व तेथें कालिंजरच्या वेढ्यांत या फौजेनें मोठें शौर्य दाखविलें. यापुढें वेळोवेळीं डिबॉइनानें पुष्कळ नवीन कंपू उभे केले. या कवायती मुळें शिंद्याची फौज कांहीं वर्षे हिंदुस्थानांत फारच प्रसिद्धीस आली[१].

पुढील इतिहास सुरू करण्याचे अगोदर मराठ्यांनां लहानशा रजपुतसंस्थानिकांशीं लढण्यास किती बिकट जात होतें, हें दाखविण्याकरितां थोडीशी हकीगत देतों. या हकीगतीवरून असेंही स्पष्ट दिसेल कीं माळव्यांतील रजपुत जमेदारांवर मराठ्यांचा चांगला अंमल बसला नव्हता; त्यांचेवर वरचेवर फौजफांटा पाठवावा लागे व कित्येक प्रसंगीं मराठे फार क्रूर रीतीनेंही त्यांच्याशीं वागत. रजपूत लोक जात्या अभिमानी व शूर, ह्मणून तेही मराठ्यांची नानातऱ्हेनें खोड काढीत.

माळव्यांत राघवगड ह्मणून एक बळकट ठिकाण आहे. इतिहासांत 'खेची' ह्या नावानें हा भाग प्रसिद्ध आहे. या खेचीवाड्यांत प्राचीन व फार कुलीन अशीं चव्हाण रजपुतांचीं पुष्कळ घराणीं आहेत, त्यांत राघवगडचें घराणें फारच प्रसिद्ध होतें. मोंगल बादशहांचे दरबारांत सुद्धां या घराण्यास फार मान होता. बाजीरावाच्या स्वारीचे वेळीं या संस्थानांत बलभद्रसिंग राजा राज्य करित होता. त्याचा व बाजीरावाचा मोठा स्नेह जमून, पुढें तो शिंदेहोळकराच्या स्वारींत फौज बाळगून फिरे. त्याच्यामागून त्याच्या गादीवर बळवंतसिंग आला. त्याचा व महादजीशिंदे याचा नजराण्यासंबंधानें कांहीं तंटा झाला व शेवटीं त्यानें मागल्या लढाईंत इंग्रजांस मदत केल्यामुळें महाद-

१ Compton, "De Boigne,' P. 24, 30-32.

जीनें त्याच्यावर फौज पाठवून त्याला व त्याचा मुलगा जयसिंग यांस कैदेंत टाकिलें व त्याचें एकंदर वित्त घेऊन मुलुख खालसा केला.

परंतु हें कृत्य त्या मानी रजपुतांस सहन न होऊन, त्यांच्या कुळांतलाच एक शिरसिंग ह्मणून ठाकूर पुढें सरसावला व त्यानें पुष्कळ रजपूत बंडवाले तयार केले. त्यांनीं मराठ्यांशीं लढाईवगैरे न करतां त्यांच्यावर छापे घालावे, वाटा माराव्या, दरोडे घालावे असा क्रम सुरू केला. परंतु त्यांचा मुख्य हेतू राजास मुक्त करण्याचा होता. त्यानें राघवगड प्रांतांतून एक छदामही महादजीस वसूल मिळूं नये असा निश्चय करून सर्व रयत पिटून दिली व जमीन ओस पाडली, तथापि महादजीच्या इतर मुलुखास त्यानें त्रास दिला नाहीं. तसेंच तो माळव्यांतील रहिवास्यांस त्रास देत नसे, पण जेव्हां दक्षिणेंतील ब्राह्मण किंवा मराठे सांपडत, तेव्हां त्यांचे नाककान कापून टाकी व त्यांची बायकामुलें हालहाल करून मारी. ही पुंडाई करणारे शें पांचशें लोकच कायते होते, परंतु त्यांचा इतका दरारा बसला कीं, त्या प्रांतांतून कोणी जाईनासा झाला. महादजीची स्त्री दक्षिणेंतून समाजानिशीं येत होती, तिला सुद्धां सुरक्षित पोंचणें कठीण वाटून ती भोपाळच्या दिवाणाच्या मदतीनें शिंद्याचे लष्करांत पोंचली. दिवाणाच्या सांगण्यावरून शिरसिंगानें तिच्या लवाजम्यास उपद्रव दिला नाहीं.

महादजीनें बळवंतसिंगास व त्याचा मुलगा जयसिंग यांस वेगळाल्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें. जयसिंग भेलसें येथील किल्यांत होता, त्याला सोडविण्यासाठीं शिरसिंग फारच खटपट करीत होता. शेवटीं त्यानें कांहीं वागरी चोरांच्या सहाय्यानें त्या तरुण राजपुत्राची सुटका केली. त्या चोरांपैकीं एकानें त्या राजपुत्रास पाठीवर घेऊन किल्ल्याच्या भिंतीवरून पार उडी मारली. तेथें बाहेर घोडा होताच, त्यावर स्वार होऊन राजपुत्र जयपूर संस्थानांत गेला व तेथील राजाच्या मध्यस्तीनें त्यानें आपल्या बापाची सुटका केली. त्यानें खंडणी व नजराणा दिल्यास त्याचा मुलुख त्यास परत देण्याचें शिंद्यानें ठरवून, बाळाराम इंगळे यास त्या कामगिरीवर पाठविलें. परंतु तो पैसा त्या ओस पडलेल्या संस्थानांत एकदम

मिळेना, तेव्हां बळदेवराजा पुनः जयपुराकडे गेला. परंतु त्यानें मागें आपला स्नेही दुर्जनलाल यास महादजीशीं पूर्ववत् बंडावा सुरू करण्यास सांगितलें. त्यानेंही शिरसिंगाचा क्रम चालविला, त्यामुळें त्याचें पारपत्य करण्यास महादजीनें इंगळे, जिवबादादा, गोपाळभाऊ वगैरे सरदारांस वरचेवर फौजा देऊन रवाना केलें. त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केल्यावर जेव्हां दुर्जनलाल सागरप्रांतांत पळाला, तेव्हां राघवगड शिंद्यास मिळाला. या लहानशा किल्ल्याच्या स्वारींत मराठ्यांची फारच नुकसानी व काळहरण झालें. इंग्रजांचा अंमल हिंदुस्थानांत कायम होऊन शिंदेहोळकरांचे व या रजपूत राजेरजवाड्यांचे करार ठरे तों पर्यंत मराठ्यांचा अंमल याच अव्यवस्थित स्थितींत होता. प्रत्येक सालीं लढाईचा प्रसंग आणल्या खेरीज सामोपचारानें वसूल कधींच आला नाहीं.

पानिपतच्या भयंकर समरांत मलीन झालेलें महाराष्ट्र-राज्यवैभव पुनः उजळ करण्या करतां तरूण पेशवा माधवराव याणें विसाजी कृष्णाचे हाताखालीं जी मोठी फौज हिंदुस्थानांत रवाना केली होती, तिनें बादशहा शहाअलमास तक्तारूढ कसें केलें, झबेताखानादि रोहिल्यांचा मुलुख कसा उद्ध्वस्त पाडिला, त्याच्याशीं सख्य करून मिर्झानजफच्या पदवीवर त्याला कसें चढविलें व पुष्कळ तरवार-बहादुरीचीं कामें करून शेवटीं आपल्या पेशव्याच्या अकालिक मृत्यूचें व नारायणरावाच्या क्रूर वधाचें वृत्त ऐकून, जिंकलेल्या देशाचा अपुर्ताच बंदोबस्त करून, ती फौज गडबडीनें दक्षिणेकडे कशी आली, ही हकीगत मागें प्रसंगोपात सांगितलीच आहे. या प्रसिद्ध मोहिमेच्या शेवटीं ही फौज मिर्झानजफ यास बरोबर घेऊन रोहिलखंडांत शिरली व अयोध्येचा नबाब व इंग्रजांची फौज पुढें येईपर्यंत, तिनें सर्व मुलूख लुटून फस्त केला. पुढें इ.स. १७७३च्या मे महिन्याचे अखेरीस मराठी फौजेचें अखेर ठाणें इटाव्यांत होतें. इतक्यांत सुजाउद्दौल्याचें व मिर्झा नजफ यांचें सख्य होऊन, वजीरानें मिर्झास आपला नायबवजीर करून दिल्लीच्या अधिकारावर कायम केलें. यांचें सख्य झाल्यामुळें, मिर्झाला मराठ्यांची गरज उरली नाहीं व दक्षिणेंतून ज्या

बातम्या येत होत्या, त्यांवरून मराठे पुनः जमावानें येतील अशी भीति नाहींशी होऊन, मिर्झानें मराठ्यांच्या ठाण्यांवर हल्ला करून त्यांस दुआवांतून पिटून लाविलें. पुढें मिर्झाचेंच दिल्लींत प्राबल्य झालें. त्यानें मुख्य कारभार व फौज आपल्या ताब्यांत घेऊन, आपल्या स्नेह्यांस मोठीं पदें सांगितलीं. मजादउद्दौला यास खानगीवर नेमिलें व आग्र्याचे किल्ल्याचा अधिकार महमदबेग हमदानी यास सांगितला. पुढें त्यानें जाटांशीं कुरापत काढून त्यांशीं लढाई चालविली; इतक्यांत उत्तरेकडून बादशाही प्रदेशावर शिखांनीं स्वाऱ्या केल्या. त्या स्वाऱ्यांत झबेताखानाचें अंग होतें. मराठ्यांचें बळ कमी होतांच त्यानें शिखांशीं अनुसंधान बांधिलें होतें. ह्या वेळीं मोंगलांची कमसरशी होतांच शीख लोक फार प्रबळ झाले होते. पूर्वी मुसलमानांनीं जो त्रास दिला त्याचा सूड मुसलमानांच्या उतरत्या काळांत ते घेत होते. त्यांनीं अहमदशहाचे फौजेवर सुद्धां हल्ला केला हें मागें सांगितलेंच आहे. झबेताखानाचे बोलण्यावरून शीख लोकांची फौज यमुनापार होऊन त्यांनीं घोसगड ठाणें घेतलें. त्यांच्यावर मिर्झा नजफ यानें एक दोन वेळां फौज पाठविली परंतु त्यांत कांहीं यश मिळालें नाहीं. पुढें बादशहा सुद्धां खुद्द झबेताखानावर गेला व त्याचे बरोबर मिर्झा सुद्धां होताच; उभयपक्षांचा सामना प्रख्यात पानिपतच्या मैदानांतच झाला, परंतु यावेळीं, याठिकाणीं पूर्वी ज्या तीन प्रसिद्ध लढाया झाल्या त्यांसारखा कांहीं परिणाम झाला नाहीं; जय कोणत्या पक्षास आला याचाच संशय होता. पुढें झबेताखानानें तह करून आपल्या जहागिरींत जाऊन स्वस्थ रहाण्याचें कबूल केलें. यानंतर बादशहाची फौज कांहीं दिवस शीख व जाट लोकांशीं लढाया करीत होती. यावेळीं दरबारांत मिर्झानजफ पेक्षां मजादउद्दौल्याचें वजन फार होतें. इ०स० १७७५ मध्यें अयोध्येचा प्रसिद्ध नबाब सुजाउद्दौला मरण पावला व त्याचा मुलगा असोफउद्दौला गादीवर बसला होता. हा मनुष्य सुजा सारखा दीर्घ उद्योगी, कपटी व कारस्थानी नवतां. त्याला विलासांत कालक्रमण करण्याची आवड असल्यामुळें त्यानें पुढें दिल्लीच्या मसलतीकडे मुळींच दुर्लक्ष केलें.

यापुढें दिल्ली प्रकरणांत अयोध्येच्या नवावानें, ह्मणजे पिढीजाद वजीरानें, कांहीं संबंध ठेविला नाहीं.

इ० स० १७७९ मध्यें मिर्झानजफ यानें मजाद उद्दौल्यास कैद करून सर्व राज्यसूत्रें आपल्या हातांत घेतलीं व त्यानें मिर्झाशफी यास शीख लोकांवर रवाना केलें. शफीनें मिरतेजवळ शिखांचा पराभव करून, बादशाही फौजेस हा अखेरचा विजय संपादिला. पुढें दोन चार वर्षांत विशेष महत्वाची हकीगत कांहीं घडली नाहीं, परंतु इ० स० १७८२ च्या एप्रील महिन्यांत, मिर्झा-नजफ मरण पावल्यामुळें पुनः कलह व खून सुरू झाले. मिर्झानजफ हा मुसलमानांतला अखेरचा मुत्सदी झाला, तो असेपर्यंत बादशाहीची कांहीं दिवस अब्रू राहिली, परंतु हा शेवटला खांब पडतांच, जुनाट मोंगल राज्याची इमारत खालीं आली.

नजफखानाचें वजन व शहाणपण मराठे मुत्सदी चांगले ओळखून होते. तो असेपर्यंत दिल्लींत मराठ्यांचा रिघाव चांगला होण्याची आशा नव्हती. उलट इंग्रजांच्या लढाईंत दिल्लीच्या बादशहाची मदत नानास मागण्याचा प्रसंग आला होता, हें मागें सांगितलेंच आहे. मराठ्यांस बादशहाची व मिर्झाची मदत मागण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. सुदैवानें जर तो योग जमला असता तर कदाचित् बादशाहीचें वैभव जास्तही वाढलें असतें. खरी बादशाही मागेंच नाहींशी झाली होती, परंतु तिच्या नांवावर अद्यापि पुष्कळ गोष्टी होण्यासारख्या होत्या. असो.

नजफखान मरण पावतांच बादशाहाच्या दरबारांत कोण पुढें सरसावतो हा प्रश्नच होता. आतां मुसलमान सरदार कोणीच नाहींसे झाले. निजाम किंवा वजीर मदत करतील ह्मणण्याची आशा नव्हती; तेव्हां आतां बाहेरचे कोणीतरी आलेच पाहिजेत असें झालें. या बाहेरच्या मंडळींत या मोडक्या बादशाहीबद्दल चढाओढ करणारे ह्मणजे मराठे, शीख व इंग्रज हेच राहिले. कारण रजपूत किंवा जाट जोरदार नव्हते. शिखांचाही मुसलमानलोक जात्या फार द्वेष करीत होते, यामुळें दिल्लींत अगर आग्र्यांत त्यांचें येणें कोणालाही आवडलें न-

सर्ते. बाकी इंग्रज व मराठे राहिले, त्यांत मराठ्यांचा पूर्वापार संबंध असल्यामुळें त्यांचाच रिघाव होण्याचा जास्त संभव दिसला व त्याप्रमाणें महादजीचा व दिल्लीदरबारचा पत्रव्यहवारही सुरू झाला. हें समजतांच इंग्रजांनीं सुद्धां आपला वकील, मि. ब्रौन यास बादशहाकडे मसलतीस पाठविलें. परंतु या सुमारास मराठ्यांचा व इंग्रजांचा तह होऊन, पाटीलबोवा तर हेस्टिंग्ससाहेबाचे गळ्यांतले ताईत झाले होते, तेव्हां त्यांच्या कारस्थानांच्या आड येणें इंग्रजांस पसंद वाटलें नाहीं. नाना पुण्यास होता तरी त्याचा डोळा दिल्लीवर होताच व त्याचें दिल्लीच्या कारस्थानांतही लक्ष होतेंच, ह्मणून नजफखान मेला समजतांच त्यानें आपल्या वकीलास लिहिलें कीं, "नजफखान मेल्याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. त्यास येथें वर्तमान येतांच राजश्री पाटीलबावांस व तुह्मांस पेशजी लिहून पाठविलें कीं, खान मेले, तेव्हां इंग्रज बादशहाकडे अनुसंधान लावून, लोभ भारी दाखवून बादशहास हाताखालीं घालून, आगरें वगैरे जागा दाबावयास चुकणार नाहींत. त्यास पाटीलबावा ग्वाल्हेरी जवळ आहेत, तेथून दिल्लीचा पल्ला जवळ आहे, तेथपर्यंत जाऊन बादशहाचें अनुसंधान दुसरीकडे न लागतां आपले हाताखालीं घातल्यास मोठीच गोष्ट आहे, व समय हाच आहे, ह्मणून विस्तारें करून पत्र पाटीलबावानां पाठविलें आहे. बादशहास ममतेंत घेऊन बंदोबस्त आपले लगामीं लावून घेतल्यानें मोठीच गोष्ट आहे. दूर देशीनें पाहिल्यास ध्यानांत येईल. जरूर करावेंच करावें, पैकाही तिकडे मिळेल. सर्वही केल्यास घडावया जोगें आहे. पुढें ईश्वरीइच्छा.[1]"

याप्रमाणें नानाचा आग्रह दिल्लीच्या मसलती बद्दल होता व त्याप्रमाणें पाटीलबावाही त्याच खटपटींत होते. परंतु इंग्रजांशीं गोडी राखून काम करावें हें त्यांचें मुख्य धोरण होतें, त्यांशीं चढाओढ लावून वितुष्ट करून घेण्यापेक्षां त्यांच्या संमतीनेंच दिल्लींत शिरावें अशी पाटीलबावाची मसलत होती.

परंतु या सुमारास इंग्रजांचा वकील, मिस्तर ब्रौन दिल्लीस गेला

१ प. व या. २३३-२९३

होता, हें सांगितलेंच आहे. वॉरन हेस्तिंग्स साहेब सुद्धां लखनौ येथें होता, त्यामुळें इंग्रजांची फौज ही फार दूर नव्हती, प्रसंग पडताच तर तेही दिल्लीवर गेले असते. परंतु नवीन मुलुख संपादन करण्यांत हेस्तिंग्स साहेब फारशी खटपट करीत नव्हता, ह्मणून त्यानें शिंद्याला दिल्लीकडे पाहिजे तसें करण्याची संमती दिली.

नजफखान मेल्यावर दिल्लींतील सरदारांत वजीरीबद्दल परस्परांत दंगे सुरू झाले. प्रथम अफ्रिसिआबखान वजीरीबद्दल खटपट करूं लागला, परंतु त्याला मिर्झाशफी हा एक प्रतिस्पर्धी उभा राहिला. त्यामुळें त्यांच्यामध्यें द्वेष उत्पन्न होऊन अखेरीस मिर्झाशफी हा आग्र्यास महमदबेगास भेटण्यास गेला होता. तेथें हत्तीवरून भेट होत असतांच त्याला एक गोळी लागली, त्यामुळें त्यानें हौद्यांतच प्राण सोडिला. हा खून अफ्रिसिआबखानाच्या सांगण्यावरून महमदबेगाचा पुतण्या इस्माइलबेगानें केला. ही बातमी समजतांच शिंद्यानें आपल्या स्नेह्याच्या खुनाबद्दल सूड उगविण्यासाठीं फौज पाठवितों ह्मणून बादशहास कळविलें. पुढें महादजीनें गोहदच्या राण्यास कैद करून ग्वाल्हेरच्या किल्यांत ठेविल्यावर आपली फौज ढोलपूर- आग्र्याच्या रस्त्यानें पुढें पाठविली. परंतु आपण लढाईस किंवा मसलतींत जातों अशी बातमी बाहेर पडूंनये ह्मणून त्यानें आपण शिकारीस निघणार असा बोभाटा केला. हीं शिकार कोणती होती तें पुढें लवकरच कळून आलें.

याच सुमारास शहाजादा जवानबख्त हा दिल्लींतून गुप्त रीतीनें पळून गेला व लखनौ येथें खुद्द वॉरनहेस्तिंग्स साहेब गेला होता त्याला जाऊन भेटला. त्याचा जाण्याचा उद्देश एवढाच होता, कीं

---

१ पाटील बावांच्या हालचालीकडे सर्वांचे लक्ष होतें, त्यामुळें 'कलकत्ता ग्याझेटांत' कांहीं बातम्या प्रसिद्ध होत. पुढील उतारा त्यांतून घेतला आहे.
April 29th 1784 "By intelligence received from Sindia's Camp dated the 12th, we learn that he is going on a hunting party with Ranakhanbhai and some other Chiefs, and there is also a report that he will march towards Bundelkhand."

दिल्लींत सर्व बंडावे सुरू झाले आहेत यासाठीं इंग्रजांनीं मदत देऊन बादशहाचा अंमल मजबूद करावा.

राघोबाला इंग्रजांनीं मदत दिली होती हें त्याला माहीत होतेंच; त्या प्रमाणें आपणालाही मदत देण्यास ते कबूल होतील, असा त्याचा अदमास होता. परंतु राघोबाला मदत देऊन मराठ्यांशीं निष्कारण वैर मांडिलें असा ज्याचा अभिप्राय होता, त्याच साहेबाकडे शहाजादा गेल्यामुळें त्याला मदत मिळाली नाहीं, हें उघडच आहे. वारनहेस्तिंग्स साहेबानें त्याला स्पष्ट सांगितलें कीं, महादजी पाशीं मदत मागावी ह्मणजे ती लवकर मिळेल; व तीं मदत देण्यास आपणही महादजीस लिहिण्याचें त्यानें अभिवचन देऊन शहाजाद्यास निरोप दिला. यावेळीं महादजीनेंही आपला एक वकील गवरनर जनरल साहेबाकडे पाठविला होता. महादजीचा व हेस्तिंग्स साहेबाचा फारच स्नेह जमला होता व त्याला संधी मिळाली असतांही आपण दिल्लीची मसलत करण्याचें सोडून, उलट शिंद्यालाच मोकळीक दिली, त्याबद्दल मिल्ल वगैरे इतिहासकारांनीं हेस्तिंग्स साहेबास फार दोष दिला व पुढें बर्कसाहेबानें पार्लमेंतापुढें हेस्तिंग्सवर जें प्रकरण उपस्थित करून चौकशी चालविली, त्यांत शिंद्यापासून पैसे घेऊन ही मसलत त्यानें केली, असा एक दोषारोप त्याच्यावर आणिला होता.

या सुमारास महमदबेग हमदानी व अफ्रिसिआबखान यांच्यामध्यें द्वेष उत्पन्न झाल्यामुळें, खानानें मेजर ब्रौनच्या मध्यस्तीनें वॉरन हेस्तिंग्स साहेबाशीं तहाचें बोलणें लाविलें. परंतु त्यानें शिंद्याबरोबर ही मसलत चालविलीच होती. ब्रौनसाहेबानें या मसलती बद्दल हेस्तिंग्सला सर्व मजकूर कळवून, त्यांत महादजी इंग्रजां विरुद्ध मसलत करित आहे असें लिहिलें. इतकेंच नव्हे, तर सालबीच्या तहाच्या व स्नेहसंबंधाच्याही विरुद्ध, अशीं पत्रें महादजीनें दिल्लीच्या मुत्सद्यांस लिहिलेलीं आपण पाहिलीं आहेत असेंही लिहिलें. त्याच्या पत्रावरून शिंदे, हिंमतबहादूर गोसावी, व अफ्रिसियाबखानाचा वकील कोतलखान, शिंद्यापाशीं होता तो, असे सर्व मिळून त्यांनीं

इंग्रजां विरुद्ध मसलत चालविली होती असें दिसतें. असली पत्रें येतांच गवरनर जनरलला शिंद्याबद्दल राग येणें साहजिक होतें. परंतु हेस्तिंग्सचा शिंद्यावर इतका विश्वास होता कीं, त्याच्यावर जे जे आरोप ब्रौन यानें आणिले होते, ते सर्व त्यानें खोडून टाकिले.

---

१ मेजर ब्रौनच्या पत्रांची हकीगत कळवितांनां, हेस्तिंग्स साहेबानें आपल्या कौन्सिलाला जो खलिता लखनौ येथून लिहिला, त्यांत त्यानें महादजी बद्दल फारच चांगलें अभिप्राय दिला आहे. त्यांतून कांहीं भाग वाचकांसाठीं खालीं देतों.

"Much has been said of Sindia's duplicity and falsehood, and inferences have from thence been drawn of his future dangerous designs against the English and their ally the Nabob of Oude. Sindia does not at least deserve this character from us. In all his transactions with the English, I believe I might say in all his transactions that have come to our knowledge, he has shown an uncommon degree of steadiness and sincerity. Of the circumstances alluded to regarding the Rana of Ghode I have yet no information, but I know the Rana himself to deserve the worst that can be said of his political character. His conduct to our Government has been invariably marked with deception, infidelity, and ingratitude, and if we may credit the assertions of Mahadajee, the notoriety of his want of faith was the cause of Sindia's perseverance in pursuing the war to his utter deprivation. I cannot admit of any plea which the partizans of the Rana may use to charge Mahadajee Sindia with a blemish which was so apparent in himself.

"Great distress has been laid on the correspondence with the Sardars at Delhi, and if the letters written by Himmut Bahadur and Cotul Cawn are genuine, and are actually written by Sindia's authority, they prove a great deal, but there is an acrimony in the style of these letters that seems more calculated to irritate us than to pursuade those to whom they are addressed; and when we consider that they have been produced to Major Brown by persons who are strongly interested in effecting a misunderstanding betwixt us and the Mahrattas, we cannot help doubting their authencity. The same reason throws a degree of distrust on every information communicated by Afrasiab Cawn. I have no reason to credit what he has asserted of the Rohillas. Of the fidelity of Fyzulla Cawn I have received a strong proof in the deputation of one of his sons,

याचवेळीं टिपूबरोबर, मराठ्यांच्या मदतीवर इंग्रजांचा तह झाला, तेव्हां महादजीबद्दल इंग्रजांस संशय येण्याचें कारण नव्हतें. इंग्लिशांकडून मदत मिळण्याचें तूर्त लक्षण नाहींसें पाहून बादशहानें महादजीस आग्रा येथें बोलाविलें, व आपण ही तेथें जाण्याचें ठरविलें.

---

who is now arrived at this place, and of the allegiance of the rest of the Rohilas residing within the Vizier's dominions, I do not find that the smallest suspicion is entertained. It is impossible to say what effect an extraordinary or unexpected acquisition of power might have on the firmest mind, but if I may judge from all that has lately passed betwixt us and Sindia, from a general review of his conduct and character, and from every insight I have been able to acquire regarding the state of politics at Poona, I am warranted in believing that Sindia has firmly connected his interests with ours, and looks to his alliance with the English as the surest means of preserving undiminished the power and independence which he now possesses. We must be cautious how we give way to suspicions. There are some situations in which precautions are necessary, but there are others, and this is perhaps one of them, in which the apprehension of danger often leads to measures which prove the means of drawing it on.

I think it necessary therefore to repeat in the most pointed manner that I do not entertain the smallest apprehension of the sincerity of Mahadajee Sindia, but on the contrary I have the most thorough conviction that he has closely connected his views and interests with our own. Even whilst the papers are transcribing that are to accompany this address, an event has happened which contradicts one part of Afrasiab Khan's representations, I mean the conclusion of peace with Tippoo Saheb.

I think it incumbent on me to forward to you an extract of a letter from Lieutenant James Anderson which contains the latest and most authentic information regarding the transactions with Sindia, and the Ranah of Ghode, which sets the conduct of Mahadajee Sindia in a different light from that in which it has been represented at Delhi.

LUCKNOW, 22 nd April 1784. } WARREN HASTINGS.

Forrest's Selections 'Foreign Department' Vol. III p. 1090.

परंतु पुढें ठरल्याप्रमाणें बादशहा न जातां अफ्रिसिआबखान एकटाच आग्र्यास गेल्यावर, शिंदे फत्तेपूर येथें होते तेही त्यास जाऊन मिळाले. तेथें त्या उभयतांनीं मिळून महमद बेगावर हल्ला करण्याचा बेत केला. परंतु तीन दिवसांनींच, ता० २ नवंबर १७८४ रोजीं, मिरझाशफीचा भाऊ झैन-उलअबदीन यानें अफ्रिशियाबखानास त्याच्या डेऱ्यांतच ठार मारिलें! ह्या कामांत महादजीचें आंग होतें, असें ह्मणतात; पण त्यांत कितपत तथ्य आहे हें कांहीं सांगवत नाहीं. कदाचित् या खुनापासून तात्काळ खरा फायदा शिंद्यास झाल्यामुळें लोक ह्मणत असतील, परंतु दिल्लीच्या त्या वेळच्या स्थितीवरून पहातां महादजीला असें नीच कर्म करून अधिकार मिळविण्याची जरूर नव्हती व त्याच्या महत्वाकांक्षेला अडथळा करण्याची शक्ति कोणासही नव्हती. बादशहालाही अफ्रिसिआबखान आवडत नव्हता, तेव्हां त्याचीही शंका घेण्यास जागा आहेच. हें कृत्य होतांच मोठमोठे सरदार व उमराव शिंद्यास येऊन भेटले. त्यांतच राजा हिंमतबाहाद्दर गोसावी हाही फौजेसह येऊन मिळाला. शिंद्याचा स्नेह करण्याच्या हेतूनें अफ्रिसियाबखान हा आग्रा येथें आला होता. कारण तो किल्ला महंमदबेग हमदानी याचेकडे असून, तो स्वतंत्र होऊन किल्ला खालीं करीना, तेव्हां त्याचें पारपत्य करण्यासाठीं शिंद्याची मदत घेण्याचे हेतूनें तो आला असतां त्याचा एकाएकीं खून झाला व खून करणाऱ्यानें मराठ्यांच्या गोटांत आश्रय धरलेला पाहून महादजीवरही पर्यायानें त्या खुनाचें किटाळ आलें. परंतु त्यांत खरेपणा नव्हता हें वर सांगितलेंच आहे[1]. महादजीला जेव्हां हिंमतबहाद्दर गोसाव्या सारखे बादशहाचे सरदार येऊन मिळाले, तेव्हां ती उत्तम संधी न दवडतां तो दिल्लीस गेला व बादशहास भेटला.

1 "The conduct of the Maratha Chief in countenancing Zein-ulabdin after the perpitration of so foul a crime, calls loudly for the severest apprehensions; it is a strong presumptive proof that he was accessory to the deed. In recording the transactions of a wicked and dissipated court, the impartiality of history demands the strictest scrutiny." Franklin's Shahalum p. 130.

महादजींचें यावेळीं मोठेंच प्रस्थ झालें होतें व त्याच्या शिवाय दुसरा कोणीही वजनदार, मसलती व फौजबंद सरदार बादशहाजवळ नव्हता. त्याच प्रमाणें इ० सन १७७१ मध्यें बादशहास दिल्लीस आणण्यामध्येंही पाटीलबाबाच पुढारी होते, हेंही लक्षांत आणून बादशहानें मोठ्या आनंदानें त्यास वजीरी देण्याचें योजिलें. महादजीला अधिकार पाहिजे होता, परंतु पोंकळ नांव नको होतें, आपला कर्मीपणा बाह्यात्कारें दाखवून राज्याचीं सर्व सूत्रें मात्र आपल्याकडे ठेवण्याची त्याची इच्छा होती. याकरितां बहुमानाच्या पदव्यांपेक्षां त्याला जाडेंभरडें 'पाटील बाबा' हेंच पद फार आवडत होतें. असो, या त्याच्या स्वभावाला अनुसरून व आपण खरोखर स्वतंत्र, परंतु दर्ज्यानें पेशव्यांचे सेवक पडलों हें मनांत बाळगून त्यानें बादशहाकडून 'वकील-इ- मुतालक' हें थोरपद श्रीमंत सवाई माधवरावासाठीं संपादन केलें व आपण पेशव्याच्या तर्फे 'नायब' ह्मणवून बादशाहीचा कारभार हातीं घेतला. याच प्रसंगीं त्यानें बादशहाचे राज्यांत गोवध बंद करण्याचा हुकूम शहाअलमाकडून मिळविला. बादशहानें महादजीस अमीर-उल्-उमराव हा किताब दिला व हें पद मिळतांच त्यानें बादशहास सांप्रदायाप्रमाणें पांच लाख होन नजर केले.

हा मोठा अधिकार हातीं येतांच महादजीनें प्रथम बादशहाचे खासगी खर्चाची चांगली व्यवस्था करण्यासाठीं त्याला दरमहा पांसष्ट हजारांची नेमणूक करून दिली व बादशाही फौजेची व्यवस्था आपल्या हातीं घेतली. त्याचप्रमाणें आग्रा व दिल्ली प्रांताचा बंदोबस्त सुद्धां आपल्याकडेच ठेविला. आपल्या हातीं अधिकार आला तेव्हां या मोडकळीस आलेल्या बादशाही दरारा व अंमल वाढवावा ह्मणून त्यानें दरबारींतील लुच्चे व बंडखोर लोक दूर करून त्यांच्या जाग्यावर चांगलीं माणसें नेमिलीं व रजपुतान्यांतील राजांकडून ज्या खंडण्या व करभार बादशहास येण्याचे होते त्यांबद्दल मागण्या केल्या. त्याप्रमाणें कांहीं वसूलही आला, परंतु पुढें याच कारणानें

सर्व रजपूत राजे एकत्र होऊन महादजी विरुद्ध बंड करून उठले, हें पुढील भागांत सांगितलें आहे.

पाटील बावांचा दिल्ली येथें अंमल बसतांच त्यांनीं आपल्या फौजेसह पुण्यक्षेत्र मथुरा येथें तळ दिला. हें स्थळ महादजीला फारच प्रिय होतें व पुढें कांहीं वर्षें त्याचा येथेंच मुक्काम होता. त्यानें दिल्लीच्या किल्ल्याच्या बंदोबस्तास आपला जामात नरसिंगराव देशमुख यास नेमिलें. पुढें महंमद बेगानें (मार्च १७८९) आग्र्याचा किल्लाही स्वाधीन केला. थोडक्याच दिवसांत त्यानें अल्लिगड हें शहर घेऊन, तेथें अफ्रासिआबखानाचा मुलगा होता त्यास वर्षासन देऊन ग्वाल्हेरीस ठेविलें. याप्रमाणें बादशहाचा जो थोडासा मुलुख राहिला होता त्याचा बंदोबस्त केला व जे मुसलमान सरदार कांहींच चाकरी न करितां गैरहक्कानें महाल व तालुके बळकावून बसले होते त्यांना दूर करून, कोणास नेमणुका, कोणास चाकरी वगैरे देऊन मुलुख परत घेतला. झबेताखान यावेळीं मरण पावला होता परंतु त्याच्याकडेस जे महाल चालत होते, ते त्याचा मुलगा गुलाम कादर याच्याकडे चालविले व महंमद बेगाकडे असलेली बादशाही फौज कायम ठेऊन त्यास मुद्दाम दूर पाठवावें ह्मणून खेचीवाड्यांत राघवगडावर पाठविलें. त्याचप्रमाणें शहाजादा जवानबक्त, ज्याला अहमदशहा अबदालीनें गादीवर बसविलें होतें व जो लखनौ येथें इंग्रजांचे आश्रयास जाऊन राहिला होता, त्यालाही पाटीलबावांनीं परत बोलाविलें परंतु तो आला नाहीं.

याच सुमारास ह्मणजे इ० सन १७८५ च्या फेब्रुवारी महिन्यांत, महादजीचा परमस्नेही वॉरनहेस्तिंग्स साहेब विलायतेस गेला व त्याला तेथें पाटीलबावांच्या विशेष स्नेहाबद्दलही पार्लमेंटात जबाब द्यावा लागला. शहाअलमास मुद्दाम मराठ्यांचे हातांत दिलें असा त्याच्यावर आरोप होता, परंतु त्याला त्याचें असें उत्तर होतें कीं, बादशहा स्वतःचे खुषीनें मराठ्यांशीं स्नेह करीत असतां, जर आपण अडथळा केला असता, तर पुनः मराठ्यांबरोबर लढाई करण्याचा प्रसंग येऊन कंपनीला मोठा खर्च पडला असता. महादजीचें व बा-

दशहाचें बोलणें सुरू झालें तेव्हां टिपूनें इंग्रजांशीं तह केला नव्हता आणि निजाम, पेशवे व टिपू हे प्रसंगीं एक होण्याचीही भीति होतीच, हें लक्षांत आणिलें तर हें उत्तर योग्य होतें असें दिसून येईल.

हेस्टिंग्स साहेब गेला ही संधी राखून महादजीनें इंग्रजांकडून बंगाल प्रांताबद्दल येण्याच्या खंडणीची मागणी केली. शहाअलम बादशहानें क्लैवसाहेबाला दिवाणीची सनद दिली तेव्हां बादशाही हक्क ह्मणून कांहीं रक्कम दर वर्षास बादशहास देण्याचा इंग्रजांनीं करार केला होता. परंतु आपल्या येण्याविषयीं जितकी खबरदारी इंग्रजांची असते तितकी दुसऱ्याचें देणें देण्याविषयीं नसल्यामुळें त्यांनीं आलिकडे बरींच वर्षें टाळाटाळी करून खंडणीचा पैसा चुकविला. तें महादजीनें पाहून मागील बाकीसह पैसा देण्याचा तगादा लाविला. परंतु अंदरसनसाहेबाच्या मध्यस्तीमुळें व इतर सर्व धोरणें लक्षांत आणून ती मागणी त्यानें पुढें चालविली नाहीं. यासुमारास उत्तरेकडे शीख लोकांनीं पुनः स्वारी केल्यामुळें पाटील बावानां त्यांच्यावरही फौज पाठवावी लागली, त्यामुळें त्यांचाही बंदोबस्त झाला. एका प्रसंगीं खुद्द बादशहाही फौजेबरोबर गेला होता.

आलिकडे बरींच वर्षें पर्यंत हिंदुस्थानांतील लोकांची खरोखरच ग्रहदशा फिरली होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. बिचाऱ्या शेत भात करणाऱ्या प्रजेस वर्षांतून चार महिने सुद्धां सुखाचे जात नसत. आज एका संकटांतून पार व्हावें, तोंच दुसरें तयार! याप्रमाणें एकामागून एक अशीं अनेक अरिष्टें लोकांवर येऊं लागलीं. देशांत स्वस्थता ह्मणून घटकाभर सुद्धां मिळेनाशी झाली. चोहोंकडे व विशेषतः माळव्यांत व बादशाही मुलखांत सदोदित लढाया, खून, रक्तपात, बंडें व लुटी चालू होत्या. अंमल असा एकाचाही कायम होईना, आज एकानें लुटावें व दुसरे दिवशीं दुसऱ्या जबरदस्तानें येऊन बुचाडावें, असा क्रम चालला होता. जो येईल त्यानें रयतेस लुटावें, त्यांचीं घरें दारें जाळावीं व थोडीशी हरकत केल्यास देहांत प्रायश्चित्त द्यावें. राजा नांवाचाच असून, प्रत्येक अधिकारी ह्मणजे पेंढाऱ्यांचेच नायक बनल्यावर प्रजेचें सुख काय विचारावयाचें

आहे ! त्यांत या काळांत चोहोंकडे लढाया चालू असत, तेव्हां सर्व मुलुखभर फौजा फिरत व टोळांची धाड गेल्यावर जसें हिरवें पान सुद्धां राहत नाहीं, त्यापेक्षांही थोडी जास्त अशी रयतेच्या पिकांपाण्याची नासाडी ह्या फौजा करीत. टोळधाडीचा फक्त हिरव्या झाडपाल्यालाच उपद्रव असे, परंतु या फौजेतील लोक सर्पणासाठीं घरांचीं लांकडें ओढून घेत, धान्य लुटीत व घोड्यांजनावरांसाठीं पिकांचा समूळ फडशा करीत. तात्पर्य ज्या वाटेनें फौजा जात तो सर्व प्रदेश ओसाड होई. या फौजांनां बाजारांत विकत माल घेण्याचें कारण नव्हतें व बरोबर मोदीखाना केवळ नांवासाठीं असे. तशांत मराठ्यांच्या लढाईच्या पद्धतीप्रमाणें,ते तर आसपासचा मुलुख मुद्दाम बेचिराख करीत. एखाद्या सरदाराची फौज फलाण्या प्रांतांतून येते आहे असें समजलें ह्मणजे तिनें लूट करूं नये ह्मणून प्रथमच काळजी घ्यावी लागे, नाहीं तर निदान पैसा तरी द्यावा लागे. ज्या ठिकाणीं थोडीबहुत स्वस्थता होती, त्याठिकाणीं सालोसाल येणारे नवे कमाविसदार आपली थैली भरण्यासाठीं प्रजेला दुःख देत. यामुळें शेतकीच्या गरीब धंद्यापेक्षां वाटमाऱ्यांचा धंदाच सुखकारक झाला होता ! शेतकीकडे दुर्लक्ष होऊन लुमुखांचे मुलुख ओस पडले होते व अशा प्रसंगींच मेघराजानेंही अवकृपा केल्यामुळें, इ. स. १७८४।८५ मध्यें उत्तरहिंदुस्थानांत भयंकर दुष्काळ पडला होता. हा दुष्काळ दोनवर्षें सारखा असून प्रजेच्या पोषणाकडे लक्ष देणारें स्थानिकराज्य एकही नसल्यामुळें मोठा कहर उसळून गेला. गुरें व माणसें पाण्याच्या तोट्यानेंच मरूं लागलीं, हजारों लोक आसपासच्या सुपीक प्रदेशांत अन्नासाठीं गेले व लाखों लोक अन्नान्न करून जागच्या जागीं मेले. मॉलेटसाहेब हा याच सुमारास माळव्यांतून महादजी शिंदे यांस भेटण्याकरितां मथुरेस जात होता, त्यानें आपल्या रोजनिशींत लिहिलें आहे कीं, तो ज्या प्रांतांतून गेला तो प्रदेश सर्व निर्जन झाला होता,व

१ ह्या वर्णनाचे सत्यते विषयीं खात्री करून घेणें तसल्यास वाचकांनीं Brouehton's "Letters from a Marahttia Camp" आणि Malet's Diary' हीं पहावीं.

1 ... anne, molestation 2 Consump/ exhaustion

लहानमोठ्या शहरांचे आसपास मेलेल्या मनुष्यांचे हजारों सांगाडे पडलेले दृष्टीस पडत। हा भयंकर दुष्काळ संवत १८४० मध्यें पडला त्यावरून त्याला 'चाळिसा' हें नांव पडलें. तें अद्यापि लोकांचे बोलण्यांत येतें*.

इंग्रजांशीं स्नेह होऊन, माळवा, गुजराथ वगैरे गेलेले प्रांत परत आल्यावर हिंदुस्थानांत पाटीलबावांचीही मसलत फत्ते होऊन दिल्ली हातीं आली, हें वर्तमान दक्षिणेंत समजतांच पुण्यांत फार आनंद झाला. यशस्वी सवाईमाधवरावाचा अंमल सुरळित चालू होऊन पेशवाईची पुनः छाप बसली, ह्या गोष्टीचा मुत्सद्यांस मोठा अभिमान वाटूं लागला. परंतु परराष्ट्रांबराबर बोलणें चालणें ठेवण्याचा अधिकार पाटीलबावांनीं आपल्या हातांत ठेऊन इंग्रजांची खासगी दोस्ती संपादली व हळूहळू पुणें दरबारास ते विचारीत नाहींसे झाले, हें वैषम्य नाना, होळकर, फडके इत्यादिकांच्या पोटांत होतेंच. पाटील बावांनीं हुजूरची आज्ञा मानण्याचें सोडून स्वतंत्रतेचा बाहुटा उभारिला, ही गोष्ट पेशवाईस कमजोर करणारी होती, हें नानाच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. सालबीच्या तहापासून पुणें दरबाराला पाटीलबावा ह्मणजे एक मोठी अडचण भासूं लागली. पाटीलबावांनीं पुण्यापासून आठशें कोसांवर राहून पुणेंदरबारतर्फे (फॉरेन डिपार्टमेंट) परराष्ट्राची वकीली करावी, हें खरोखरच अडचणीचें काम होतें. पुणें मराठ्यांच्या राज्याची मुख्य जागा पडल्यामुळें, भोंसले, निजाम, टिपू व इंग्रज यांचे संबंधानें वारंवार कांहींतरी भानगडीचे प्रश्न उद्भवत परंतु त्यांची तोड महादजीचे मध्यस्तीनें होण्याची असल्यामुळें, द्राविडी प्राणायामाचा प्रसंग येई. ही गोष्ट इंग्रजांच्या व नानाच्या मनांत येऊन पुणें येथेंच इंग्रजांचा स्वतंत्र वकील ठेवावा अशी मसलत त्यांनीं केली. इंग्रजांचा पुण्यास वकील ठेवल्यानें नानानें मोठी राजकीय चूक केली, असा कांहीं लोकांचा त्याच्यावर आरोप आहे, कारण ह्या वकीलामुळेंच पुढें इंग्रज पुण्यांत आले असा समज आहे. पण हा समज फारच चुकीचा आहे, कारण

---

* See Forrest's Selections 'Maratha series' P. 505 and Keene's 'Fall of the Moghal Empire.' P. 145-148.

स्नेहीराष्ट्रांचे परस्परांकडे वकील असण्याची पद्धति सर्व देशांत चालू होती, त्या प्रमाणेंच हिंदुस्थानांतही होती. याचवेळीं पेशव्यांचे वकील कलकत्ता, नागपूर, पांदेचरी, गोंवें, मुंबई, हैदराबाद, श्रीरंगपट्टण येथें होते व तेथील वकील पुणें दरबारांत होते. इंग्रजांचा वकीलही मागील लढाईच्या अगोदर पुणें येथें होताच, फक्त आतां तो पुणें येथें नसून मथुरेस महादजी जवळ होता. परंतु पुणें येथें वकील राहिल्यानें आपलें वजन व महत्व कमी होईल हें महादजीस माहीत होतें ह्मणून ती गोष्ट त्यास पसंत होईना.

हिंदुस्थानांत इंग्रजावर आपला दाब ठेऊन महादजी मोठमोठ्या मसलती करीत होता, ही गोष्ट पुढें पेशवाईस धोक्याची होणार हें लक्षांत आणून, नानानें पुणें दरबाराचें वर्चस्व पुनः स्थापन करण्याची सुरुवात केली व प्रथम श्रीमंत पेशवे यांचे लग्नाच्या समारंभासाठीं ह्मणून हिंदुस्थांतील एकंदर मराठे सरदारांस व निजाम व टिपु यानां सुद्धां पुणें येथें बोलाविलें. यावेळीं सातारचे महाराजसुद्धां पुणें येथें गेले होते, फक्त निजाम व टिपु स्वतः गेले नव्हते, परंतु त्यांनींहीं आपले लोक समारंभास पाठविले होते. लग्नाचा समारंभ व दरबार नानानें एवढ्या थाटानें केला कीं, पेशव्याच्या वैभवानें त्यानें एकंदर पाहुण्यांचे डोळे चकित करून सोडिले. या समारंभामुळें राजकीयदृष्ट्या पुणें दरबाराचें फारच वजन वाढलें व पेशवाईची छाप सर्वत्र बसली. हा समारंभ झाल्यावर कांहीं दिवसांनीं मुधोजी भोंसले मोठ्या लव्याजम्यासह पेशव्याचे भेटीस आले. या भेटींत राजकीयहेतु हाच होता कीं इंग्रजांच्या मसलतींतून आंग काढल्यामुळें पुणें दरबाराची त्याच्यावर वक्रदृष्टि होती, यामुळें त्यांच्याशीं स्नेह करून त्यांचा राग कमी करावा, ह्या विचारानें भोंसले पुण्यास आले. पुढें भेटीच्या प्रसंगीं भोंसले यांनीं सांगितलें कीं, कटक प्रांतामध्यें फौज अजारी पडून फार जायां होऊं लागल्यामुळें आपणास परतावें लागलें. या उत्तरांत खरेपणा कितपत होता तें नानाला माहीतच होतें, तथापि त्यानें सांगितलें कीं, या मोहिमेंत नाहीं आलां तरी आतां लवकरच दुसऱ्या मोहिमेचा प्रसंग आहे, त्यावेळीं आलेत ह्मणजे मागील तक्रार राहिली नाहीं. तात्पर्य


पेशव्याचे हुकुमानें भोंसले लढाईला बोलावितांच येतात एवढेंच नानाला दाखवावयाचें होतें. या सुमारासच टिपूचा व इंग्रजांचा तह झाल्यामुळें, तो मोकळा होऊन त्यानें नरगुंदकर व कित्तुरकरांवर स्वारी केली. कृष्णेच्या दक्षिणेकडील प्रदेश मागील तहापासून हैदराच्या ताब्यांत होता, परंतु पेशव्यांची खरी हद्द तुंगभद्रेपर्यंत पूर्वी होती तेथपर्यंत पुनः पोंचवावी हें नानाचे मनांत होतें. हैदर जिवंत असे पर्यंत त्यानें नरगुंदकर, कित्तुरकर किंवा सावनूरकर यांना त्रास न देतां, तो त्यांच्याकडून नियमित पैसा घेत होता, परंतु टिपूनें त्यांच्यावर जुलूम मांडिला; तेव्हां ही संधी चांगली आहे असें पाहून नानानें टिपूवर जाण्याची तयारी चालविली. शिंदे यांनीं आग्र्याचा किल्ला घेतला त्या सुमारासच टिपूनें नरगुंदावर हल्ला करून नरगुंदकरांस कैद केलें व त्यांच्या बायकांस बाटवून आपल्या जनान्यांत ठेविलें. नरगुंदकर पटवर्धनाचे आप्त पडल्यामुळें लढाईचा प्रसंग सहजच आला. त्याचप्रमाणें कृष्णेच्या दक्षिणेकडील ब्राह्मणांवर टिपूनें जुलूम करून तो त्यांस बाटवूं लागला, तेव्हां दोनहजार ब्राह्मणांनीं त्रासून जीव दिले !

या कारणांमुळें पुणें येथील ब्राह्मणदरबारास टिपूची फारच चीड आली. त्यावरून नानानें टिपूवर जाण्याची तयारी करून मोठी फौज उभारली व त्या स्वारींत निजाम व भोंसले यांनींही मदत देण्याचें कबूल करून फौजा पाठविल्या. इतकेंच नाहीं तर खुद्द नबाब साहेब व मुधोजी भोंसले स्वारीसाठीं बाहेर निघाले. या मोहिमेंत इंग्रजांनींही मदत करावी म्हणून नानानें महादजीचे मार्फत इंग्रजांस विचारिलें, परंतु त्यांनीं ती गोष्ट कबूल केली नाहीं. या मोहिमेंत होळकर व फडके असून, शिंद्याकडील जिवबादादा हे प्रसिद्ध सरदार होते. नानानें फ्रेंचांबरोबरही सलुख्याचीं बोलणीं चालविलीं व त्यांनीं टिपूस मदत न दिल्यास रेवदंडा बंदर त्यांस देतों असें सांगितलें. त्यानें पोर्तुगीझ लोकांबरोबर सुद्धां सल्ला करून त्यांचीही प्रसंग पडल्यास मदत मिळविण्याचें संधान राखिलें. ह्या नानाच्या एकंदर मसलती जरी चालबीच्या तहा विरुद्ध नव्हत्या, तथापि एकंदरींत इंग्रजांचें महत्व



to pollute or defile ...

पुणें दरबारांत कमी होण्याची भीति होती. ह्यासाठीं पुणें येथें आपला वकील ठेवावा अशी मुंबई सरकारची इच्छा झाली. नानाला तर ती गोष्ट पाहिजेच होती; ह्मणून त्यानेंही त्या विचारास आपलें अनुमोदन आनंदानें दिलें. ह्या वकीलीचे कामावर चार्लस मालेट याची योजना मुंबई सरकारानें करून त्याला इ० स० १७८९ चे जानेवारी महिन्यांत कलकत्त्यास पाठविलें. परंतु महादजीच्या सल्ल्या शिवाय हें काम होणें कठीण होतें. तेव्हां त्याला प्रथम भेटून, त्याची समजूत काढून नंतर मालेट यानें कलकत्त्यास जावें, असा मुंबई सरकारचा त्यास हुकूम होता. त्याप्रमाणें तो १७८९ च्या जानेवारी



ताजमहाल. ( आग्रा. )

महिन्यांत सुरतेकडून चंपानेर व पांवागडाच्या वाटेनें माळव्यांत गेला. त्याला जागोजागच्या रजपुत व मराठे अधिकाऱ्यांनीं मदत दिली. उज्जनीहून तो पुढें सारंगपूर, राजगड, ग्वाल्हेर या शहरांवरून जाऊन ता० ९ मे १७८९ रोजीं, आग्र्यास दाखल झाला त्यानें आपल्या प्रवासाची रोजनिशी लिहिली आहे, तीवरून मराठ्यांचा रजपूत जमीनदारांवर पक्का अंमल बसला नव्हता असें स्पष्ट दिसतें. माळवाप्रांत व गुजराथ मात्र त्याला सुपीक आढळले, परंतु इतर सर्व ठिकाणीं दुष्काळाचीं चिन्हें दिसत होतीं. तसेंच उज्जनी शिवाय त्यास एकही

शहर भरभराटींत आढळलें नाहीं; या शहरांत मात्र शिंद्याची गादी असल्यामुळें तेथें पुष्कळ संपन्न लोक असून व्यापारही मोठा चालत होता. त्याचप्रमाणें वाटेंत चोरांचा व लुटारूंचाही उपद्रव होता असें त्याच्या अनुभवास आलें. रायजी पाटील ह्मणून शिंद्याचा सरदार आग्रा येथें होता, त्यानें मालेट साहेबाचा आदर सत्कार करून त्यास उतरण्यासाठीं ताजगंजांत जागा दिली होती. तेथें हिंदुस्थानांतील अति सुंदर इमारत जी ताजमहाल ती पाहून त्यास फार आनंद झाला व मराठ्यांनीं सुद्धां त्या इमारतीची व्यवस्था चांगली ठेविली होती, ह्याचें त्यास आश्चर्य वाटलें!

आग्र्याहून मॉलेट साहेब मथुरेस गेला, तेथें त्याला भेटण्यासाठीं महादजीनें आपले सरदार सामोरे पाठविले व बाह्यात्कारें मोठा आदर केला; परंतु ज्या कामासाठीं तो आला होता, तें काम महादजीच्या इच्छे विरुद्ध होतें ह्मणून त्याचें येणें त्याला आवडलें नाहीं. रीतीप्रमाणें त्यानें त्याची भेट वगैरे घेतली, परंतु पुण्यास वकील ठेवण्या विषयीं पुण्याच्या दरबारची व गव्हरनर जनरल साहेबांची इच्छा समजल्यावर काय तें कळवूं, असें उत्तर देऊन त्यास निरोप दिला. पुणें येथें वकील ठेवण्यास आपली खुषी आहे परंतु मुत्सद्यांस ती गोष्ट पसंत पडणार नाहीं असें महादजीनें त्यास समजाविलें; कारण आपल्यावरचा दोष काढून तो पुणेंकरांवर लादावा असा त्याचा विचार होता व नाना सुद्धां आपण सांगितल्यास पुणें येथें वकील ठेवण्याविषयीं आग्रह धरणार नाहीं, अशी त्याची समजूत होती. परंतु महादजीनें बंगालच्या चौथाईचा पैसा व सुरते वरील मोंगलाईचा हक्क मागितल्यामुळें, ग. जनरल म्याकफर्सन साहेबाला शिंदे गर्विष्ट झाले असें वाटून आपला स्वतंत्र वकील पुण्यासच ठेवण्याची जरूरी वाटली. त्याचप्रमाणें नानांनेंही आपली कबूली दिलीच होती. पुढें निरुपायास्तव महादजीनें पुण्यास वकील ठेवण्याची कबूली दिली[1].

---

1 Forrest's Selections from State Papers. Bombay, Vol. I-Malet's Diary, pp 485-526. See also परिशिष्ट व.

पुणें येथें इंग्रजाचा वकील ठेवण्याचें ठरल्यावर तो १७८६ मध्यें नानाफडणिसास बदामीजवळ भेटला. १७८५ मध्यें परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे सरदारांनीं जरी नरगुंदकरांचा पक्ष उचलून टिपूच्या फौजेशीं लढाई दिली, तरी त्या पावसाळ्यांत नानानें टिपूवर मोहिम सुरू केली नाहीं व जमल्यास तह करण्याचींही बोलणीं चालू ठेविलीं होतीं. परंतु १७८५ चा पर्जन्य काळ संपतांच नानाफडणीस, भोंसले व निजाम हे फौजांसह टिपूवर निघाले. नानाबरोबर होळकर, फडके, रास्ते, पटवर्धन वगैरे पेशव्यांचे सरदार होते व भोंसल्याकडील रघूजीबावा होते. यास्वारींत बदामीचा किल्ला वगैरे टिपूचा मुलुख काबीज केल्यामुळें व इंग्रजांचीही मदत पेशव्यास आहे असें मालेट साहेबाच्या येण्यावरून त्यास वाटून, १७८७ मध्यें टिपूनें पेशव्यांशीं युद्ध बंद करून कांहीं प्रांत व नजराण्याबद्दल मोठी रकम देऊन सामना केला.


पूर्वींपासून हिंदुस्थानच्या मोहिमेवर फौजा निघाल्याह्मणजे खुद्द पेशव्याची फौज थोडीबहुत तरीं शिंदेहोळकरांच्या फौजा बरोबर जात असे. तशी फौज पुष्कळ वर्षांत नर्मदा पार झाली नव्हती व एकट्या पाटीलबावांनीं हिंदुस्थानची मसलत आपल्या फायद्यासाठींच आटपविण्याची तजवीज केल्यामुळें, पेशव्याचा पूर्वापार अधिकार चालविण्यासाठीं, थोरले बाजिरावाचा मस्तानीच्या पोटचा मुलगा समशेरबहाद्दर पानिपतच्या लढाईत मरण पावला होता, त्याचा मुलगा अलिबहाद्दर यास फौज व जरिपटका देऊन, शिंद्याचे मदतीस व पेशव्याचा हक्क स्थापन करण्यासाठीं नानानें हिंदुस्थानांत रवाना करण्याचें योजिलें. ही गोष्ट महादजीस पसंत नव्हती परंतु त्याला उघडपणें अडथळा करतां येत नव्हता. त्याचप्रमाणें मालेटसाहेबास पुणें येथें राहूं देण्याची कबूली जरी महादजीनें दिली, तरी कलकत्ता सरकाराशीं जो पत्रव्यहवार ठेवणें, तो सर्व महादजीच्या दरबारांत मिस्तर अंदरसनसाहेब वकील होता त्याचे मार्फत ठेवण्याची वहिवाट चालू ठेविली. एवढी व्यवस्था महादजीचें मन दुखवूं नये ह्मणून केली होती; परंतु राघोबादादा मेला, टिपूची भीति नानाला नाहींशी झाली, होळकराचें

व नानाचें मित्रत्व जमलें, इंग्रजांचाही ओंढा आपल्याकडे कमी झाला व त्यांचा स्वतंत्र वकील पुणें येथें राहूं लागला, इत्यादि गोष्टीं मुळें आपले वर्चस्वास धक्का बसणार, हें पाटीलबावांचे लक्षांत येऊन चुकलें होतें, व दक्षिणेंत आपला पगडा बसविण्याविषयीं ते खटपट करणार होते; परंतु इतक्यांतच त्यांच्या सत्तेस नाराजी होऊन रजपूत व मुसलमान सरदारांनीं त्यांचे विरुद्ध मोठें बंड केलें व नुक्तेंच मिळविलेलें हिंदुस्थान पुनः हातचें जाण्याचा प्रसंग येऊन ठेपला. तेव्हां पाटीलबावानां कुमकेसाठीं उलट नानाचेंच आर्जव करण्याचा प्रसंग आला, ह्यामुळें त्यानां दक्षिणेंतील कारस्थानांत मन घालण्यासच फुरसद नाहींशी झाली. ही हकीगत पुढील भागांत साद्यंत दिली आहे.

# भाग ९ वा.

## रजपुतांचें बंड.

### गुलामकादराचीं अघोर कृत्यें.



मागील भागांत महादजीनें वजीरीचा कारभार हातीं घेऊन मोडलेल्या बादशाहीचें पुनरपि वर्चस्व स्थापन करण्याचे हेतूनें कायकाय कामें प्रथम हातीं घेतलीं, हें सांगितलेंच आहे. तसेंच त्याच्या राज्यव्यवस्थेमुळें रजपूत व मोंगल सरदार कसे बिथरले याचाही थोडा उल्लेख केला आहे. महादजीच्या अधिकाराविरुद्ध होणाऱ्या बंडाचीं चिन्हें जीं दिसूं लागलीं होतीं, त्यांचें स्वरूप १७८६।८७ सालांमध्यें फार वृद्धिंगत होऊन, चोहोंकडे उघड बंडावे सुरू झाले. महादजी जातीनें मराठा व दक्षिणचा रहिवासी होता असें असतां त्याच्या कडकडीत अंमलाखालीं हिंदुस्थानांतील अभिमानी मोंगल, पठाण, रजपूत वगैरे लोक चार वर्षे तरी स्वस्थ कसे राहिले, याचेंच सर्वांस आश्चर्य वाटत होतें. त्याचप्रमाणें बादशाहीच्या उतरत्या काळांत या लोकांतील बडे लोकांस स्वातंत्र्य मिळून ते मन मानेल तसे वागत, यामुळें ही जडलेली सवंय सुद्धां आतां एकाएकीं दूर होणें कठीण होतें. तसेंच या लोकांत जरी आतां फारशी एकी नव्हती, व त्यांचें आकलन करून पुढारीपणानें मराठ्यांशीं टक्कर देण्याचें शहाणपण व सामर्थ्य असलेलीं माणसेंही पण उरलीं नव्हतीं, तरी मराठ्यांबद्दल सर्वांला तिरस्कार वाटे. त्या लोकांमधील जात्याभिमान व देशाभिमान अगदीं लोप पावलेला

नव्हता व दक्षिणेंतील मराठ्यांविषयीं जो द्वेष फारां दिसांचा होता तोही धुमसतच होता. पानिपतच्या विजयी रणांतून लूट मिळवून आलेले पुष्कळ वृद्ध मुसलमान आग्रा, दिल्ली व दुआब या भागांत होते व त्यांच्याही मनांत मुसलमान बादशाही व्हावी अशी इच्छा फार होती. या कारणांमुळें व महादजींनें मुसलमान सरदारांच्या जहागीरी जप्त केल्यामुळें हा धुमसत असलेला द्वेष, प्रचंड स्वरूप पावून त्यामुळें पुढील दोनवर्षें महादजींच्या हातून दिल्लीची वजीरी जाऊन त्याचा पराभव झाला,व त्याला चंबळेपार आत्मसंरक्षणासाठीं पळून जावें लागलें.

महमदबेग हमदानी हा एकटाच काय तो मोठा सरदार बादशाही पैकीं राहिला होता. त्याचे जवळ फौज पुष्कळ असून तींत कांहीं कवाईत शिकलेले कंपूही होते; बादशाही मुलखांत त्यानें दंगामसलत करूं नये ह्मणून महादजींनें त्याची रवानगी राघवगडावर केली होती. तेथून तो परत येतांच महादजींनें त्याची फौज कमी करण्याबद्दल त्याला सांगितलें, परंतु त्यानें तो हुकूम न मानतां कांहीं दिवस टाळाटाळीच चालविली व गुप्तपणें त्यानें रजपूत व मुसलमानांत बंड करण्या विषयीं खटपट सुरू केली. राजा हिंमतबहाद्दरानेंही बुंदेलखंडांत दंगा मांडिला व याच वेळीं दिल्लींत कांहीं नेमणुका महादजींनें नवीन केल्या त्यांमुळेंही लोक बेदील झाले होते.

रजपुतांवर मराठ्यांचा खंडणी बद्दल दुहेरी हक्क होता. एकतर पूर्वीं शिंदे होळकरांनीं उदेपूर, जोधपूर व जयपूर वगैरे संस्थानांवर पूर्वींच स्वाऱ्या करून चौथाईचा हक्क स्थापिला होता, व दुसरा आतां बादशहाची वजीरी हातीं आल्यामुळें मोंगलाईचा हक्क ह्मणून जी खंडणी बादशहास पोंचावयाची तिच्या बद्दलही महादजीनें मागणी केली, तो होता. परंतु मागें सांगितलेल्या हकीगती वरून वाचकांच्या लक्षांत आलें असेल कीं रजपूत लोक कराराप्रमाणें ऐवज देत नाहींसे झाले व सवड सांपडेल तेव्हां ते मराठ्यांच्या विरुद्धही खटपट करीत. मराठ्यांचे अमलाचें जूं तोडून टाकावें ह्मणून ते वेळोवेळीं प्रयत्न करीत परंतु अखेरीस त्यांना यश कधींही आलें नाहीं. या

सुमारास महादजीनें जयपूर संस्थानावर पैशाची मागणी केली व १७८६ मध्यें तर तो खुद्द जयपुरास गेला होता. त्या वेळीं ऐवजाची रक्कम ठरून ती दोन हाप्त्यांनीं देण्याचा करार झाला. परंतु दुसऱ्या हाप्त्याच्या वेळेस जयपूरकरांनीं कुरकुर लाविली राघवगडासारख्या छोटेखानी संस्थानानें जर महादजीची त्रेधा [1] उडवून दिली तर सर्व रजपुतान्यांतील संस्थानें एक विचारें करून जर लढण्यास सिद्ध झालीं व त्यांनां जर आंतून महंमदबेगाचीही मदत होती, तर अशा उत्तम संधीचा योग जयपूरकरांनीं घेणें साहजिक होतें. त्यासाठीं या उघड बंडाच्या संकेतानें, महादजीनें पाठविलेल्या रायजी पाटलास रजपुतांनीं खंडणी बाबत कांहीं एक पैसा न देतां, त्याच्या फौजेचा पराभव करून त्यास जयपुराहून हांकून लाविलें. हा अपमान झाल्यामुळें महादजीनें मोठ्या निरुपायास्तव आपल्यां नूतन अधिकाराची जबाबदारी लक्षांत आणून रजपुतांवर स्वारी करण्याचा निश्चय केला. या वेळीं त्याला पैशाची मोठी अडचण होती व बादशाही फौजेचा पगारही बराच तुंबला होता. याच सुमारास शीख लोकांनींही बादशहाच्या प्रांतावर उत्तरेकडून स्वारी केली, तेव्हां त्याचें पारपत्यास शिंद्यानें हैबतराव फाळके व अंबाजी इंगळे यांचे हाताखालीं, फौजा देऊन त्यांस तिकडे पाठविलें, यामुळें तर फौजेचा जोरही कमी झाला. अशा अडचणींत पडला तरी व खुद्द बादशहापासून खालपर्यंत सर्व मुसलमान आपल्या विरुद्ध आहेत हें माहीत असतांही आपलें वर्चस्व कायम राखण्याकरतां महादजीनें रजपुतांवर जातीनें स्वारी करण्याचा निश्चय करून, तो मराठी व मोंगली फौज बरोबर घेऊन १७८७ च्या भरउन्हाळ्यांत जयपुरावर निघाला. त्याचेबरोबर राणाखान, डिबाइन, आपाखंडेराव, इंगळे वगैरे सर्व प्रसिद्ध सरदारांच्या फौजा असून, महमदबेग हमदानी व त्याचा पुतण्या इस्माइलबेग यांची सुमारें २९ हजार फौज, कवायती पलटणें व तोफखानाही होता. ही स्वारी बादशाही कामासाठीं असल्यामुळें मोंगलांची फौजही बराबर घेतली होती.

महादजीची तयारी ऐकून रजपुतांनींही मोठीच फौज उभारली.

1 Terrified & confounded state — a ...

यावेळीं जयपूरच्या गादीवर राणा प्रतापसिंग होता व अंबरचें घराणें रजपुतांमध्यें पुढारी असल्यामुळें त्याचे मदतीस एकंदर लहानसान रजपूत संस्थानिक आले होते. त्याचप्रमाणें शिंद्याचे घराण्याचा पुरातन शत्रु, ज्यानें जयाजीचा खून केला व ज्याचा अखेर महादजीनें सूड घेतला, तो राठोर लोकांचा अधिपति जोधपूरचा राणा, महाराज विजयसिंगही आपल्या शूर राठोर लोकांसह येऊन मिळाला होता. त्याचप्रमाणें उदेपूरची फौजही मदतीस आली होती. यावेळीं रजपुतांजवळ एकलाख फौज व चारशें तोफा होत्या. अशा जय्यत तयारीनें रजपूत लोक मराठ्यांची वाट पहात होते. उभय फौजांची भेट इ० स० १७८७ च्या मे महिन्याचे अखेरीस जयपूरच्या पूर्वेस ४३ मैलांवर लालसोट गांवाजवळ पडली व तेथें तीन दिवस पर्यंत फारच मोठी लढाई झाली. लढाईला सुरवात होण्याचे अगोदरच मोंगली फौजेनें पगाराबद्दल तगादा लाविला व शेवटीं महंमदबेग हमदानी व इस्माइलबेग हे आपल्या फौजांसह उघड रीतीनें शत्रूस जाऊन मिळाले. या मुळें तर सर्व लढाईचा प्रसंग शिंद्याच्या शिल्लक राहिलेल्या फौजेवर पडला, परंतु या प्रसंगीं डिबाइनाचे पलटणींनीं फारच शौर्य करून टिकाव धरला, यामुळें मराठ्यांचा कांहीं बचाव झाला. ही लढाई चालली असतां प्रथमच महमदबेग तोफेचा गोळा लागून ठार झाला, तोंच इस्माइलबेगानें त्याची जागा घेऊन मराठ्यांवर मोठा हल्ला केला, परंतु त्याला मागें हटावें लागलें. तें पाहून जोधपूरच्या राठोर लोकां पैकीं सुमारें दहाहजार चिलखतें घातलेल्या राठोर स्वारांनीं मराठ्यांवर हल्ला केला. परंतु ही प्रचंड फौज अंगावर येते असें पहातांच डिबाइनानें आपल्या फौजेचा पोकळ चौरस व्यूह रचून त्याच्या पुढें तोफा लाविल्या राठोरांचे स्वार जवळ येतांच त्यानें तोफांची सरबत्ती केली, त्याबरोबर त्या शूर राठोर लोकांचे शेंकडो लोक ठार झाले. परंतु तशा प्रसंगींही न डगमगतां त्यांनीं सारखी तोफखान्यावर चाल करून गोलंदाजांची कत्तल उडविली! परंतु तोफखाना बंद होतांच डिबाईनाच्या पलटणींनीं बंदुकांचा जबरदस्त मारा करून राठोरांस मागें परतविलें. तथापि या प्रसंगीं रण

शूर राठोरांनीं जें शौर्य केलें त्याबद्दल अद्याप पर्यंत इंग्लिश इतिहास-कार त्यांची तारीफ करतात; खुद्द डिवाईन सुद्धां त्यांच्या शौर्यापुढें थक्क झाला. डिवाईनाच्या दोन पलटणींनें ज्या वेळीं या लोकांचा हल्ला परतविला तेव्हां जर बादशाही फौज रजपुतांवर घसरली असती तर त्या लढाईत मराठ्यांस जय मिळाला असता, परंतु त्याच आणिबाणीच्या वेळीं ती फौज शत्रूंस मिळाल्यामुळें महादजीचा पूर्ण पराभव झाला. या लढाईत जरी अखेर विजय रजपुतांस मिळाला तरी उभयपक्षांची सारखीच हानि झाली.

या लढाईनंतर एकदोन दिवस महादजीची फौज तेथेंच आसपास होती व पुनः रजपुतांवर हल्ला करण्याचा विचार होता; परंतु बहुतेक तोफखानाही शत्रुस मिळाला, मराठ्यांचे फौजेंत अन्नाची तूट पडली व रात्रंदिवस त्यांच्यावर शत्रूंचे छापे येऊन त्यांची फारच नुकसानी होऊं लागली. असा बिकट प्रसंग पाहून रजपुतांच्या हातीं लागण्यापेक्षां पार व्हावें या हेतूनें महादजीनें आपली फौज अलवारकडे परत आणून, तेथील व भरतपूरच्या जाट राजांचे मदतीनें आपला बचाव केला. रजपुतांनीं लालसोटच्या विजयांतच गुंग होऊन पुढें मराठ्यांचा पाठलाग केला नाहीं व आपला गेलेला प्रांत हातीं आला एवढाच

---

१ या लढाई संबधानें कीनसाहेबानीं आपल्या "Fall of the Moghul Empire" P.154, या पुस्तकांत "तारिख-इ-मुजफरि" या ग्रंथाचे आधारानें कांहीं हकीगत वेगळी दिली आहे. ते ह्मणतात कीं, लढाईला प्रथम सुरुवात मराठ्यांच्या तर्फेनें इस्माइलबेगानेंच केली. पहिल्या दिवशीं पुनः बादशाही फौजेनेंच रजपुतांवर हल्ला केला, त्यांत महमदबेग ठार झाला. तिसरे दिवशीं संध्याकाळचे सुमारास (ता. १ जून १७८७.) सुमारें १४००० बादशाही फौजेनें शिंद्याचे तंबू भोंवती गराडा घालून पगाराबद्दल धरणें धरलें तें ऐकून रजपुतानीं त्यांस २ लाख रुपये रोख देण्याचें करून ती सर्व फौज फितूर केली. पुढें जेव्हां शिंदे परतून अलवार येथें गेला तेव्हां इस्माइलबेगही त्याला सोडून गेला. परंतु खद्द याच कीनसाहेबानीं आतां आपल्या महादजीशिंदे यांचे चरित्रांत दिलेलें वर्णन भिन्न आहे व तें इतर ग्रंथांस अनुसरून आहे; त्या आधारांवरून पहातां मोंगल फौज पहिलेच दिवशीं फितूर होऊन गेली असें ठरतें ( See G. Duff. 474; Compton's DeBoigne 34-35, Keene's "Madhavrao Sindia" P. 124. Selections from Calcutta Gazette, 23 rd August 1787-P. 205.)

संतोष मानून ते स्वस्थ बसले. जर ते यावेळीं महादजीच्या पाठीवर गेले असते तर फारच भयंकर प्रसंग आला असता. कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, रजपुतांस महादजी विरुद्ध उठण्यास आंतून पुणें दरबाराची फूस होती, परंतु त्याचा गर्व मात्र उतरावा, नाश करूं नये असा नानाचा मतलब असल्यामुळें त्यानें जयपूरकरांस दाबांत ठेविलें होतें. यावेळीं पेशव्यांची कांहीं फौज शिवाजी विठ्ठल याचे हाताखालीं होती, तींही महादजीच्या मदतीस न जातां अलग रहात असे. ही गोष्ट या इतिहासाचा पुढील संदर्भ लक्षांत आणितां संभवनीय दिसते, परंतु योग्य आधारा शिवाय असला आरोप नानावर आणणें बरोबर होणार नांहीं.

या अपजयामुळें एकाएकींच महादजीची सर्व सत्ता लोप पावल्या सारखी झाली परंतु त्यानें न घाबरतां तावडतोब आग्रा, अल्लिगड, वगैरे ठाणीं मजबूद केलीं व जाटांस दीगचा किल्ला परत देऊं करून त्यांचा स्नेह संपादिला. त्यामुळें त्याच्या फौजेस भरतपूर वगैरे किल्ल्यांचा आश्रय मिळाला व इस्माईलबेगाच्या तडाक्यांतून तिचा बचाव झाला. आग्र्याच्या आसपास महादजीच्या व इस्माइलबेगच्या आठ दिवस सारख्या चकमकी झडत होत्या, इतक्यांत गुलामकादरानें बंड केलें व तोही मुसलमानांच्या मदतीस येतो असें समजतांच महादजीनें आपली पराभव पावलेली फौज गोळा करून तो चंबळनदी उतरून अलीकडे आला. तथापि मराठ्यांची फौज आग्र्याचा किल्ला, अल्लिगड, दिल्लि, वगैरे ठिकाणीं होती, तरी गुलामकादरानें अल्लिगड घेतलें व दिल्लींत झेंडा लाविला. फक्त आग्रा मात्र प्रसिद्ध लखबादादानें मुसलमानांस दाद न देतां मराठ्यांच्या ताब्यांत ठेविला होता. महादजीचा एवढा पराभव झाला तरी यावेळीं त्यानें जें प्रसंगावधान दाखविलें, त्याबद्दल डिबाइन सारखे परकीय देशांतील पुरुषांस सुद्धां त्याच्या धारिष्टाचें आश्चर्य वाटलें. त्यावेळीं तो मुळींच न गडबडतां, परत गेलेला मुलुख कसा पुनः संपादन करावा ही तजवीज मोठ्या धिमेपणानें करण्यास लागला.

१ चिनूरकर घ. इतिहास. पान १०५.

ह्या सर्व बंडाव्यांत व फितुरींत राजा दयाराम ह्याचें आंग होतें व तोच महमदबेगाचें व रजपुतांचें सूत जमविणारा होता हें महादजीस कळतांच त्यानें, शहानिजामला त्याचें पारपत्य करण्याविषयीं लिहिलें.

त्याबरोबर शहानें दयारामास धरून आणून हत्तीच्या पायांशीं बांधिलें व शिंद्याचे पराभवाचें वर्तमान ऐकून दिल्लीच्या बंदोबस्तास तो लागला. याच सुमारास एक अति दुष्ट पुरुष पुढें आला व त्यानें आपला तळ दिल्लीसमोर यमुनातीरीं दिला. हा मनुष्य पानिपत येथें प्रख्यातीस आलेल्या नजीबखानाचा नातू व झबेतखानाचा मुलगा गुलामकादर हा होय. ह्यानें झबेताखान मरतांच आपल्या चुलत्यास घरांतून घालवून देऊन, आपण जहागिरीचा मालक झाला. पण असें करण्यास त्यानें रीतीप्रमाणें बादशहाची परवानगी घेतली नाहीं, यामुळें बादशहा आपलें पारपत्य करील या भीतीनें त्यानें आपल्या घोसगड किल्ल्याच्या रक्षणाचे व मजबुतीचे उपाय चालविले. पुढें रजपुतांच्या बंडाची हकीगत ऐकून व मराठी फौजही गुंतलेली पाहून लूट व मिळाल्यास झबेताखानाचा अधिकार मिळविण्या विषयीं इच्छा धरून, त्यानें फौजेसह थेट दिल्लीवर चाल केली. ह्यानें आपणास नजीब उद्दौला होशारजंग हें थोर उपपद घेतलें होतें!

एक दोन दिवसांत त्यानें राजधानीवर हल्ला केला व मोंगल शिपायांस लांच देऊन फितूर केलें. दिल्ली येथें शिंद्याचा जामात बंदोबस्तास होता तो व शहानिजाम ह्यांनीं आपली धडगत दिसत नाहीं असें पाहून ते जवळच बालमगड येथें गेले आणि तेथून पुढें देशमुख ग्वाल्हेर येथें शिंद्याचे फौजेस जाऊन मिळाला.

गुलामानें एका उमरावास आपल्याकडचा करून दरबारांत प्रवेश केला व आपला तळ बालेकिल्ल्यांत दिला. इतक्यांत बादशहाचे पदरीं असलेल्या बेगम सुमरु नांवाच्या एका शूर स्त्रीनें आपली फौज त्याचेवर आणिली. त्याबरोबर गुलामकादर भिऊन पुनः यमुने पलिकडे गेला, परंतु याच सुमारास अंबाजी इंगळे हा आपले थोडे लोक घेऊन दिल्लींत येतांच, सर्व मुसलमान भराभर गुलामास मिळाले व

बादशहानें त्यास वजीर-उल उमराव हें पद दिलें! असें होण्याचें कारण मराठ्यांचा द्वेष हें उघड होय.

अशा अडचणींत सांपडल्यावर शिंद्यानें वरचेवर दक्षिणेंत नानाकडे फौजेची मागणी केली. त्यानें लिहिलेंकीं "अशा बंडाव्यानें केवळ माझें स्वतःचें विशेष नुकसान होण्याजोगें नसून सर्व मराठ्यांच्या राज्यालाच मोठा धक्का बसणार आहे; कारण इंग्रजलोक रजपूत लोकांशीं व बादशहाशीं संधान बांधणार आहेत; आणि तसें झाल्यानें इंग्रजांचा हिंदुस्थानांत अम्मल व योग्यता वाढून मराठ्यांनां सर्व लोक पाण्यांत पाहूं लागतील. तसेंच तुमचे विषयीं माझ्या मनांमध्यें मत्सरभाव आहे असा जो लोक मजवर आरोप करितात, त्यामुळें मजविषयीं आपलें मन दूषित झालें असल्यास स्वच्छ करावें व मनांत कोणताही किंतु बाळगू नये; त्याचप्रमाणें होळकर, हरिपंत व परशुरामभाऊ ह्यांच्या कोणत्या कृत्यांत मीं अडथळा केला असल्यास त्यांचें त्यानांच विचारून पहावें. ह्मणजे तेही सांगतील कीं माझा उद्देश फक्त मराठी राज्याचा विस्तार करण्याचाच आहे. आह्मीं दोघेही एकाच धन्याच्या पायाजवळचे चाकर; ह्या करितां आपसांतले द्वेष एकीकडे ठेऊन श्रीमंत पेशव्यांची चाकरी करणें हेंच आमचें कर्तव्यकर्म आहे. आपल्या मनांमध्यें जर शंका असेल तर, फितूर मोरोबाचें पारपत्य करण्यास कोणी साहाय केलें; सखाराम बापू यास तुमच्या ताब्यांत कोणी दिला; तोतयाचे बंड कोणी मोडिलें; टोपीवाल्यांची तळेगांव मुकामीं कोणी खोडकी जिरविली; त्याचप्रमाणें पुढें त्यांच्याशीं लढाई करण्यामध्यें कोणी विशेष मदत केली; व मराठ्यांना हितकारक असा तह त्यांच्याशीं करविला या गोष्टींचा विचार करावा आणि मजविषयीं काडीभरही मनांत किंतु बाळगूं नये. आह्मां दोघांचे शत्रु एकच आहेत याचाही विचार करावा; व मराठ्यांचें राज्य राखणें व वाढविणें ह्या गोष्टींकडे पूर्ण लक्ष द्यावें." अशा अर्थाचें पत्र पाहतांच नानाला महादजीचीं कृत्यें आठविलीं असतील व त्याचा उद्देशही कळलाच असेल. महादजीनें लिहिलेल्या

ह्या गोष्टी खऱ्या होत्या किंवा कसें व नानाशीं त्याचा संबंध कसा होता, हें मागील इतिहासावरून वाचकांचे ध्यानांत आलेंच असेल.

महादजीनें कुमक मागितली एवढ्यावरूनच नानाचा बेत हिंदुस्थानांत फौज पाठविण्याविषयीं झाला असें नाहीं, तर आजपर्यंत चालत आलेल्या वहिवाटी प्रमाणें हिंदुस्थानांतील मोहिमांत पेशव्यांची फौज जरिपटका घेऊन मुख्यत्वें करून निघे व बरोबर सरदारांच्या फौजा मदतीस निघत. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत जो मुलुख मराठ्यांस मिळे किंवा खंडण्यांचा पैसा वसूल होई त्यांत पेशवे, शिंदे व होळकर यांचे हिस्से असत. ह्या वाटणीबद्दल सरदारांत फारशी तक्रारही नव्हती. सालबीच्या तहाच्या पूर्वी होळकरांच्या वाटणी संबंधानें खुद्द महादजीनें सुद्धां नानास लावून लिहिलें होतें, हें मागें आलेंच आहे. विसाजी कृष्णाची अखेरची मोहीम होई पर्यंत पेशव्यांची फौजच पुढारी होती; परंतु आलिकडे महादजीनें दिल्लीकडे जो मुलुख संपादन केला, तो स्वतंत्रतेनें करून त्यानें होळकर व पेशवे यांच्या हक्कांकडे थोडें दुर्लक्षच केलें. पेशव्यांच्या गृहकलहाचा फायदा पाटीलबोवांनीं घेऊन बहुतेक व्यवस्था आपलें स्वातंत्र्य व वर्चस्वस्थापण्याच्या धोरणानें चालविली ही गोष्ट पेशवाईचें पाठबळ करणाऱ्या नानासारख्या मुत्सद्याच्या लक्षांत येऊन गेली होती. सालबी नंतर पेशव्यांच्या खासगी फौजां पैकीं कांहीं पथकें विंचूरकर वगैरे सरदारांचे हाताखालचीं शिंद्याचे फौजे बरोबर असत, परंतु त्यानां महादजी जुमानीत नसे, हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां महादजीचा गर्व कमी झाला हें पुणेंकर मुत्सद्यांस इष्ट होतें, इतकेंच नाहीं तर सालबीच्या तहापूर्वीची महादजीची भाषा व हल्लीं त्यानें पाठविलेल्या पत्रांची भाषा यांत जो फरक पडला तेवढ्यानेंच पुणेंकरांस थोडें बरें वाटलें. तथापि महादजीची वजीरी जाऊन, मराठ्यांचे हातांतील बादशाही जाणें नानास मुळींच रुचलें नाहीं, व दिल्लीची मसलत करण्यांत महादजीला नानाचें पूर्वी पासूनें पाठबळही होतें. ह्या साठीं अशा प्रसंगीं उशीर न करतां नानानें ताबडतोब होळकर व अलिबहाद्दर यांची रवानगी हिंदुस्थानांत केली. पहिल्यापासून पेशव्यांची

अशी वहिवाट होती कीं हिंदुस्थानच्या मोहिमेंत त्यांच्या कुटुंबांतील एका खाशानें जावें, त्याला अनुसरूनच यावेळीं समशेर बहाद्दराचा मुलगा अलिबहाद्दर याला जरिपटक्याचा अधिकारी नेमून पेशव्यांच्या फौजेचा सरदार करून पाठविलें. या स्वारींत पेशव्यांच्या खास फौजेवर मुसलमान सरदार नानानें पाठविला या वरून त्यावेळीं मराठ्यांचा मुसलमानाशीं कसा संबंध होता हें ही वाचकांनीं लक्षांत घेण्यासारखें आहे.

दक्षिणेंतून कुमक येईपर्यंत महादजी स्वस्थ बसला नव्हता. त्यानें आपलें जड सामान सर्व ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत ठेविलें व इस्माइलबेगानें शूर लखबादादास आग्रा येथील किल्ल्यांत कोंडून टाकिलें होतें, तो वेढा उठविण्यासाठीं त्यानें मुसल्मानांवर लहानलहान टोळ्या पाठविल्या आणि वेढा घालणारे लोकांवर छापे सुरू केले. त्याला जाटांचीं मदत असल्यामुळें या वेळीं फारच उपयोग झाला. इतक्यांत गुलामकादरही इस्माइलबेगाचे साहाय्यास आला व त्या दोघांनीं पुष्कळ महिने पर्यंत आग्र्याच्या किल्ल्या भोंवती वेढा घालून मारा चालविला परंतु या प्रसंगीं तेथील किल्लेदार लक्ष्मण अनंत उर्फ लखबा दादा हा शेणवी गृहस्थ असून त्याच्या अपूर्व शौर्यामुळेंच किल्ल्यांतील लोकांनीं शत्रूंस दाद न देतां कांहीं महिने टिकाव धरला. परंतु त्यांच्या संकटांतून त्यांस सोडविण्याबद्दल महादजीनें मोठी फौज पाठविण्याचा निश्चय करून तो चमेली उतरून धोलपूर येथें राहिला व राणाखान, डिबॉइन, आप्पाखंडेराव यांच्या फौजा त्यानें पुढें पाठविल्या. या सुमारास दक्षिणेंतूनही मोठी फौज कुमकेस पाठविलेली पोंचली. राणाखान हा पुढें पाठविलेल्या फौजेवर मुख्य सरदार होता; त्याला इस्माइलबेग व गुलाम कादर हे आग्र्याचा वेढा उठवून आपल्यावर चाल करून येतात असें समजतांच, तो भरतपुरास गेला व तेथील जाटांची कवायती फौजही बरोबर घेऊन त्यानें पुढें चाल केली. महादजीही पुढें जाणार होता परंतु इस्माइलबेगाच्या चिथावणी वरून रजपुतांनीं पुनः उचल खाऊन महादजीचे वाटेवरच फौज पाठविली; त्यामुळें तो मागेंच कुचंबत राहिला. राणाखानाची व शत्रूंची गांठ

भरतपुरापासून ८ मैलांवर चकसान नांवाच्या खेड्यापाशीं पडली. तेथें डावेकडे जाटांचे कंपू, उजवेकडे डिबायनच्या पलटणी व मध्यें मराठी फौज याप्रमाणें फौजेची व्यवस्था करून राणाखान तयार राहिला. प्रथम इस्माइलबेगानें तोफखाना सुरू केला व दोघांही मुसलमान सरदारांनीं मराठ्यांच्या उजव्या व डाव्या फळीवर हल्ले केले. परंतु कवायती शिपायांनीं फार शौर्य करून टिकाव धरला. परंतु मराठ्यांच्या स्वारांनीं चांगली करामत न करतां कच खाऊन ते मागें परतल्यामुळें सर्व मराठ्यांची फौज पराभव पावून रात्रीच्या सुमारास भरतपूरच्या आश्रयास गेली. ही मोठी निकराची लढाई ता० २४ एप्रील१७८८ रोजीं झाली.

हा जय होतांच मुसलमान सरदार शेफारून जाऊन अखेरीस त्यांच्या परस्परांमध्यें मत्सर वाढून वैमनस्य पडलें आणि इतक्यांतच शीख लोकांनीं राणाखान याच्या सूचनेवरून गुलाम कादराच्या सहरानपूर प्रांतावर स्वारी केली. शिखांची स्वारी या वेळीं मराठ्यांस फारच उपयोगीं पडली, व त्यांच्या मदतीस मराठ्यांचीही कांहीं फौज गेली. शिखांनीं आपल्या मुलखावर स्वारी केल्याचें कळतांच गुलामकादर तिकडे निघून गेला व आग्र्याच्या वेढ्याचें काम एकट्या इस्माइलबेगावर पडलें. लखबा दादानें न डगमगतां आज मदत येईल, उद्यां येईल अशा आशेवर शिपायांस उत्तेजन देऊन किल्ला हातीं ठेवलाच होता. अखेरीस गुलामकादर गेलेली संधि पाहून ता० १८ जून १७८८ रोजीं, राणाखान वगैरे सरदारांची प्रचंड फौज इस्माइलबेगावर पडली. यावेळीं भरउन्हाळा असून आग्र्याचें मैदान रखरखत होतें, परंतु हिमालयाच्या बर्फाचे वितुळण्यामुळें यमुनेस मात्र पूर येऊन ती नदी भरून चालली होती. लढाईस सुरवात होतांच उभय पक्षांनीं जिवावर उदार होऊन तरवार चालविली; शेवटीं डिबाईनाच्या बंदुकांच्या गोळ्यांच्या वर्षावानें शत्रूचे स्वार मागें फिरले व त्यांचा पराभव झाला. स्वतः इस्माइलबेगास दोन मोठे वार लागले असून त्यानें जीव संरक्षणासाठीं यमुनेंत उडी घातली व पोंहत जाऊन पलिकडचा तीर गांठला. त्याचें हजारों लोक नदींत

बुडाले व जे थोडे बहुत राहिले त्यांसह तो गुलामकादरास जाऊन मिळाला. या लढाईमुळे आग्र्यांतील कोंडलेली फौज मुक्त होऊन महादजीचा अंमल पुनः चालू झाला. इस्माइलचा पराभव होतांच, महादजीनें आग्र्याचा विशेष बंदोबस्त करून आपल्या फौजेचा तळ आपली आवडती जागा मथुरा येथें दिला.

महादजीला, तावडतोब दिल्लीस न जातां मथुरेस राहण्याचें कारण झालें होतें. इस्माइलबेग व गुलामकादर यांची फौज दुआबांत फिरोझाबाद येथें एकत्र झाली होती व तिचा दिल्लीवर जाण्याचा विचार होता, शिवाय महादजीचा लालसोट येथें पराभव झाल्यापासून बादशहाही त्याचे विरुद्ध वागूं लागला. शिंद्याची फौज चंबळेपार झालेली पाहून इस्मायलबेगाचे सांगण्यावरून रजपुतांनीं बादशहाचा सन्मान करण्यासाठीं त्यास अजमीर देण्याचें ठरवून त्या शहराची सोन्याची किल्ली वकीलाबरोबर बादशहाकडे पाठविली. तें शहर समारंभानें आपल्या ताब्यांत घेण्याचे इराद्यानें हा दुर्बल बादशहा आपली कांहीं फौज घेऊन दिल्लीहून निघाला. त्याचेबरोबर हिम्मत बहादर, बेगम सुमरु व इस्माइलबेग यांचीही थोडीबहुत फौज होती. अजमिरास पोंचण्याचे पूर्वींच वाटेंत नजफकुलीखान ह्मणून एक बंडखोर मोंगल सरदार होता त्याचें पारपत्य करण्याचा प्रसंग आला. यावेळीं जी लढाई झाली तींत बादशहाचा पराभव होऊन तो कैद होण्याचें मोठ्या शर्तीनें चुकलें. बादशहाचें रजपुतांबरोबर व त्याचा मुलगा जवानबख्त याचें इंग्रजांबरोबर गुप्त भाषण चालू झालेलें महादजीस समजलें होतें व आपण वजीर या नात्यानें रजपुतांशीं लढत असतां बादशहानें त्यांचेबरोबर स्नेह केलेला ऐकून महादजीस त्याच्या पडपोशी स्वभावा बद्दल फार राग आला. शेवटीं शिंद्याची फौज पुनः विजयी होऊन भरतपुराजवळ आलेली समजतांच, भीतीनें ता० १९ एप्रिल १७८७ रोजीं तो दिल्लीस परत गेला. ह्या त्याच्या दुटप्पी वर्तनामुळें तो गुलामकादर व इस्मायलबेग यांस सामील होईल अशी पाटीलबावांस भीति होती, ह्मणून त्यांनीं तावडतोब दिल्लीवर चाल केली नाहीं आणि पुढें काय प्रकार होतात ते पाहून तसें

वागावें ह्या हेतूनें त्यानीं मथुरेस स्वस्थ मुक़ाम केला. परंतु या वेळीं महादजी दिल्लीस न गेल्यामुळें गुलामकादरानें पुढें लवकरच दिल्लीस जाऊन फारच दुष्ट व क्रूर कृत्यें केलीं. शिंद्याचा आग्रा प्रांतांत अंमल बसलेला पाहतांच गुलामकादर व इस्मायलबेग हे अखेरची धडपड करण्यासाठीं दिल्लीस गेले. तेथें जाण्यांत त्यांचा उद्देश दुसरा कांहीं नसून मराठे येण्याचे अगोदर त्या शहराची लूट करावी हाच होता.

महादजी शिंदे यांचे फौजेनें आग्र्याचे किल्ल्याखालीं इस्माइलबेगाचा पराभव केला तेव्हां दक्षिणेंतून मराठ्यांच्या फौजा कुमकेस पोंचल्या होत्या, असें इंग्लिश ग्रंथकारांच्या माहितीवरून वर लिहिलें आहे, परंतु तें बरोबर दिसत नाहीं. दक्षिणेंतून फौजा रवाना होण्याचे अगोदरच महादजीनें आपली फौज मजबूद करून जाटांचे मदतीनें किल्ला घेतला, असें खुद्द त्यानें आपल्या माळव्यांतल्या कमाविसदारास ऐवज पाठविण्याविषयीं लिहिलेल्या पत्रा वरून स्पष्ट दिसतें. हें पत्र आजपर्यंत प्रसिद्ध झालें नसल्यामुळें येथें साद्यंत देतों.

"राजश्री बाळाजी लक्ष्मण गोसावी यांस—

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य, स्ने० महादजी शिंदे, दंडवत सु० समानैनमयाव अलफ, राणेखानभाई यांची रवानगी फौजसुद्धां चमेल पार केली, त्यांणीं पार उतरून प्रतिपदेचे दिवशीं धाऊन जाऊन आगऱ्यास इस्माइल्याकडील मोर्चे होते ते मारून उमराव गीर गोसावी यांस पाडाव आणिले. सहा हत्ती व घोडे सवातीनशें वगैरे उंटें, लूट आणिली हें वर्तमान पेशजी तुह्मांस लिहिलेंच आहे. इस्माइल्या व गुलामकादर एक जाहले आहेत. त्यांचे मोकाबल्यास भाई फौज मुद्धां व जाटाकडील जमेयत एक होऊन रुबकार आहेत. त्यांणीं इस्माइल्याकडील लोकांची फोडतोड केली आहे. त्यास तूर्त ऐवज पाहिजे त्याजवरून येथील सावकारांसी बोलावून बहुत तजविज लाविली, परंतु ऐवजाची तरतुद न होय. मसलत तों सिद्धीस गेली पाहिजे. याकरतां हें पत्र तुह्मांस लिहलें आहे तरी तुह्मीं व राजश्री सदाशिवबापुजी व भवानी शंकर यादव मिळोन जसें कळेल तसें तजवीज करोन दोनलाख रुपये पारेयंत पाठऊन देणें. पाऊण

लक्षरुपये दरसाल सावकारांकडून येतच आहेत, आणखी सवालक्षाची तजवीज करून दोनलाख रुपये पाठऊन देणें. ह्मणजे मसलत शेवटास ज़ाऊन उलगडा होतो. गेलेली गोष्ट होळकर वगैरे कोणी आले नाहींत त्यापूर्वी सुधरती. कोणाचाही उपकार होत नाहीं. तरी ज्या गोष्टीनें लिहले अन्वयें तजवीज काय ते करणें. लिहले अन्वयें जरूर ऐवजाची तोड लाऊन पाठविणें जाणीजे. छ. ९ रजब. बहुत काय लि० हे विनंति. मोर्तब."[1]

या पत्रावरून होळकर वगैरे येण्याचे अगोदर गेलेला मुलुख संपादण्याची महादजीची फार इच्छा होती असें स्पष्ट दिसतें. आपला गेलेला अंमल दक्षिणेच्या मदतीशिवाय स्थापन करावा व पुणेंकरांचा ओशाळा होऊं नये एवढेंच त्याला साधावयाचें होतें.

या पुढें गुलामकादर व इस्मायलबेग हे दिल्लीस पोंचल्यानंतर त्यांनीं काय काय कृत्यें केलीं, हें इतिहासकार ह्मणून आमचे नशीबीं लिहिण्याचें आलें आहे, नाहींतर त्या दुष्ट कृत्यांच्या स्मरणानें लेखणी विटाळणें आह्मांस रुचलें नसतें. परंतु आमच्या कित्येक वाचकांस भयानक व क्रूर कर्मे वाचण्याची इच्छा असल्यास त्यांनीं पुढें जी हकीगत आह्मीं लिहिली आहे ती वाचून मनाची तृप्ति करावी. या हकिगतीचा महादजीचे चरित्राशीं निकट संबंध असल्यामुळें व पुढें मराठ्या सरदारांनीं गुलामकादरास जी अघोर शिक्षा दिली तिचे यथार्थतेसाठीं त्या दुष्टांचीं कृत्यें आह्मीं सविस्तर वर्णन करण्यास आरंभ करतों.

आग्रा येथें पराभव झाल्यावर गुलामकादर व इस्माइलबेग हे फिरोझाबाद येथें जमले, परंतु त्यांचा मराठ्यांनीं पाठलाग न केल्यामुळें, त्यांनीं पुढें दिल्लीस जाण्याचा निश्चय केला. दिल्लीस जाण्यांत आतां पुनः मराठ्यांचा पराभव करूं अशी त्यांनां आशा नव्हती, परंतु त्यांचा मुख्य हेतु लूट मिळविण्याचा होता. गुलामकादराची इच्छा इस्माइलबेगाहून वेगळी असावी असें दिसतें. बादशाहानें जरी त्याला वजीरी दिली होती तरी शहाचें वर्तन संशय घेण्यासारखें

१ हें पत्र रा. रा. बाळकृष्णराव मंदोसरवाले यांचे कडून मिळालें.

होतें. मराठ्यांचा जोर पुनः होतो असें समजतांच बादशाहानें शिंद्या-बरोबर पुनः लाडीगोडीचें बोलणें लाविलें, ही गोष्ट त्याला समजली होती. आतां ही जी वृद्ध शहाचे वर्तनांत चलबिचल होत असे, त्याबद्दल त्याला दोष देतां येत नाहीं, कारण शहाअलम जात्या भित्रा व नामर्द असून आतां तर सत्तरांजवळ त्याचें वय पोंचलें होतें. गुलामकाद-रच्या मनांत दुसरा नवीन बादशहा ताबडतोब बसवून हा जीर्ण व निरुपयोगी शहाअलम पदच्युत करावा व मिळेल तितकी लूट मि-ळवून फौज उभारावी, असे बेत होते आणि याप्रमाणें त्यानें बरेच दिवस मसलत चालविली होती. पूर्वी गाझीउद्दीनानें ज्याप्रमाणें नवीन नवीन बादशहा करावे व मारावे असा क्रम चालविला होता, त्याचेंच अनुकरण या दुष्ट पठाणानें करण्याचें योजून मलकाझमानी वगैरे मसलती बायांशीं बोलणीं चालविलीं. ही बाई अहमदशहा बादश-हाची राणी असून मराठ्यांशीं हिचें वैमनस्य फार होतें[1]. हिनें आ-पला मुलगा बेदरबख्त यास गादीवर बसविल्यास गुलामास दहा लाख रुपये देण्याचें कबूल केलें[2] व त्या हेतूनें गुलामानें दिल्लीस जाण्या-चें ठरवून, आपल्या बरोबर शेकडों क्रूर व दुष्ट पठाण व रोहिले घेऊन तो दिल्लीस गेला. इस्माइलबेग आपली फौज घेऊन त्याचे अगोदरच दिल्लीस गेला होता, परंतु गुलामकादराचे दुष्ट बेत त्यास माहीत नव्हते. त्यानें फंद फितूर करून दिल्लींत प्रवेश केला, इत-क्यांत पठाणही आपल्या लुटारू लोकांसह दाखल झाला. प्रथमतः त्यांनीं शहाअलमाची भेट घेऊन बाह्यात्कारें बादशाहाविषयीं मोठी राजनिष्ठा दर्शविली व आपला उद्देश मराठ्यांचा नाश करून बा-दशाहीचें वर्चस्व स्थापन करण्याचा आहे असें सांगितलें. इतक्यांत शिंद्याचे कांहीं लोक येऊन त्यांनीं राजवाड्यांत तळ दिला. त्याव-रून हे दोघे सरदार नदीपलीकडे शहादरा येथें उतरण्यास गेले. तेथें अन्नाची टंचाई पडून त्यांच्या फौजेंतून पुष्कळ लोक निघून गेले आणि आतां आपली विशेष दाद लागत नाहीं असें पाहून, अखेरचें दुष्ट कर्म

---

१ मागें पृष्ट २९ पहा. २ Elliot, Vol. VIII P. 244-45, Ibrat-nama."

करण्याच्याच इराद्यानें, गुलामकादरानें आपलें सर्व जड सामान घोसगडास पाठवून, तो सडा होऊन राहिला. पुढें त्यांनीं बादशहास शिंद्याविरुद्ध खटपट करण्याबद्दल निरोप पाठविला, परंतु त्याचें मन तिकडे वळेना. इतक्यांत हिंमतबहाद्दराची फौजही मराठ्यांच्या तर्फे दिल्लीचे बंदोबस्तास आली.

यामुळें निरुपाय होऊन अखेरीस त्यांनीं राजवाड्यावर तोफांचा भडिमार सुरू केला; तेव्हां बादशहानें मदत पाठविण्याविषयीं मथुरेस शिंद्याकडे जासूद पाठविले, त्यावरून महादजीनें बेगमसुमरू हिला तिकडे पाठवून रायजीपाटलाचे हाताखालीं दोनहजार स्वार रवाना केले व जाटांचेही कांहीं लोक पाठविले. परंतु जर महादजीनें यावेळीं मोठी फौज पाठवून दिली असती व स्वतःही तो गेला असता तर गुलामकादरानें जीं कृत्यें केलीं तीं घडलीं नसतीं. अशा प्रसंगीं वजीर या नात्यानें गादीचें संरक्षण करण्याचें पाटीलबावांचें कर्तव्य होतें, तथापि एकदम न जाण्याचीं हीं कांहीं कारणें होतीं. एकतर यावेळीं महादजी आपली गेलेली सत्ता हळुहळु स्थापन करीत होता व त्याला पक्कें माहीत होतें कीं, इस्माइलबेगासारख्या धाडशी शिपायाबरोबर तोंडास तोंड देऊन लढाई करण्यापेक्षां, त्याला चोहोंकडून कोंडून जेरीस आणणें चांगलें होतें. यांत लढाईचा खर्च न होतां आपलें माणूसही जाया होण्याचें भय नव्हतें. दुसरें कारण, अद्यापि बादशहाच्या प्रामाणिकपणाबद्दलही त्यास संशयच होता व दिल्लीस मुसलमानांचा एक विचार होऊन मोठा जमाव होण्याचीही भीति होतीच. शिवाय दक्षिणेंतून जी फौज येत होती तिची अशी अट होती कीं, जिंकलेल्या मुलखांत वांटणी दिली तरच मदत द्यावयाची, नाहीं तर तटस्थ रहावयाचें. अशा प्रसंगीं होळकरासारखे विरुद्ध सरदार शत्रूस मिळण्याचीही मनांत शंका होतीच. एकट्यानें दिल्लीवर जाऊन विजय मिळाला तर बरें, प्रसंगविशेषीं पराभव झाला तर परत जिंकलेलाही प्रांत जाण्याचें भय होतें. तात्पर्य, महादजीनें यावेळीं जें वर्तन केलें तें खरोखर दूरवर दृष्टि देऊनच केलें. शिवाय गुलामकादर राजवाड्यांत शिरून अनन्वित कृत्यें करील अशी

शंका येण्याचें कांहीं कारण नव्हतें. गुलामकादर मोठ्या घराण्यांतला जमेदार असून त्याचा बाप व आजा दोघेही वजीर होते व त्यांनां बादशहाविषयीं पूज्यबुद्धि अगदींच नव्हती असें नाहीं. तसेंच इस्माइलबेग जरी महादजीविरुद्ध लढाई करीत होता तरी तोही स्वभावानें निष्कपटी व शूर असल्यामुळें त्याच्या हातून किंवा त्याच्या समक्ष मोंगल बादशाहीची अमर्यादा होण्याचा संभव नव्हता.

राजवाड्यावर तोफा सुरू करून इस्माइलबेगानें एकंदर मुसलमान फौज आपल्या पक्षास आणिली. इस्माइलबेग हा काफर हिंदूविरुद्ध लढत असून बादशहाचा नाश करण्यांत त्याचें अंग नाहीं, अशा सरळ समजुतीनें व आपण हें एक आपल्या धर्माचेंच काम करीत आहों अशा हेतूनें ते सर्व लोक मराठ्यांविरुद्ध उठले. बादशहाच्या आसपास फक्त हिंदूंची मात्र थोडीशी फौज होती, परंतु ती फौज, इस्माइल व गुलामकादर नदी वलांडून पुनः परत आल्यामुळें, आपला टिकाव शत्रूच्या जमावापुढें होण्याचें कठीण समजून निघून गेली. त्यामुळें शहर तर शत्रूंस मिळालेंच, फक्त वाड्यांत मात्र प्रवेश होण्याचा राहिला. वाड्यांत बादशहाजवळ मनसूरअल्लि हा मुख्य इसम होता, तोही फितूर होऊन त्याचे मार्फत गुलाम कादर व बेग यांनीं बादशाहाची भेट घेण्याबद्दल परवानगी घेतली. त्यांच्या भेटीचे वेळीं त्यांनीं बादशहाचा रीतीप्रमाणें सन्मान करून गादीची सेवा करण्याचें कबूल केलें! त्यामुळें बादशहानेंही दरबार करून त्यांस सांप्रदायाप्रमाणें वस्त्रें व अलंकार दिले. गुलाम कादराकडे वजीरीचें पद कायम केलें व त्यानेंही बादशहाचें संरक्षण करण्याची कुराणावर शपथ घेतली! या व्यवस्थेंत फौजेचा अधिकार अर्थात्च इस्माइलबेगाकडे आला. पुढें महादजी मथुरेंत होता, त्याचेवर स्वारी करण्यासाठीं खर्चा करितां त्यांनीं बादशहाकडे पैशाची मागणी केली व आजपर्यंत वर्ष दोन वर्षें जी लढाई चालविली तीही बादशहाचे हिताकरितांच, यासाठीं मागील खर्चाचा ऐवजही मागितला. त्यांची समजूत अशी होती कीं बादशहाकडे पुष्कळ पैसा आहे व त्यानें तो या प्रसंगीं देणें ही रास्त होतें. ह्या समजुतीवरच गुलामकादरानें पुढें अनर्थ केला.

पुढें ता., २९ जुलै १७८८ रोजीं, गुलामकादर हा एकटाच बरोबर कांहीं बदमाष द्रांडगे पठाण घेऊन बादशहाकडे गेला व लढाईचे खर्चासाठीं रुपये मागूं लागला. तेव्हां आपल्या खजिन्यांत पैसा नाहीं व असला तरी शिंद्याशीं लढाई करणें इष्ट नसून त्याबद्दल मदत करतां येत नाहीं असें त्यास बादशहानें उत्तर केलें. हे शब्द कानीं पडतांच गुलाम कादरानें सभ्यपणाचें पांघरूण फेंकून देऊन, तो पिसाळलेल्या कुत्र्यासारखा बादशहाचे आंगावर धांवून गेला व त्यानें आपल्या खिशांतून एक बनावट पत्र काढून तें त्यास वाचून दाखविलें. या पत्रांत बादशहानें महादजीस मदतीस बोलाविल्याचा मजकूर होता. तो ह्मणाला कीं, मराठ्यांस सहाय्य करण्याचे हेतूनेंच शहाअलम पैसे नाहीं ह्मणून सबब सांगतो. त्याच रागाच्या आवेशांत त्यानें बादशहाला त्या प्राचीन व पूज्य तक्तावरून खालीं ओढून त्यास लत्ताप्रहार केला! नंतर त्यानें थोड्या वेळानें बेदरबख्तास झनान्यांतून आणून गादीवर बसविलें. बादशहास गादीवरून खालीं ओढतांच दरबारांत एकच गोंधळ झाला व कित्येक इमानी न्वाकरांनीं आपल्या समशेरींस हात घातला, परंतु इतक्यांत गुलामाचे क्रूर व कठोर हृदयाचे पठाण आंत आले, तेव्हां बादशहाच्या जिवास अपाय होऊं नये ह्मणून ते स्वस्थ बसले.

पुढें गुलामकादरानें पदभ्रष्ट झालेल्या वृद्ध बादशहास व त्याच्या मुलांस शस्त्रहीन करून, त्यांच्याकडील एकंदर मौल्यवान चीजवस्त घेऊन त्यांस कारागृहांत कोंडलें व त्यांनां अन्नपाणी न देण्याविषयीं ताकीद दिली. नंतर तेथून उठून बेदरबख्ताचे सहाय्यानें त्यानें झनानखाना व राजपुत्रांचे महाल सर्व लुटून फस्त करून एकंदर भांडीं, वस्त्रें, हत्यारें सुद्धां लुबाडून घेतलीं. शहाअलमास मोती महालांत कोंडलें होतें, त्याच्या समक्ष त्यानें शहाजादे अकबर व शेखो यांस प्रखर उन्हांत उभें करून बेदम मार दिला, तरी पैसा मिळेना. पुढें झनानखान्यांतील दासींनांही मरे मरे पर्यंत मारून आपल्या लोकांकडून त्यांची अत्यंत अमर्यादा केली! अखेरीस जेव्हां मुबलख पैसा मिळण्याविषयीं त्याची इच्छा सफल होईना, तेव्हां त्या दुष्टाला असें सुचलें कीं, पुरलेलें द्रव्य असेल व तें कोठें आहे तें

बादशहासच माहीत असलें पाहिजे; ह्मणून त्यानें शहाला दिवाण-इ-खासांत ओढून आणून त्याला चाबकानें मारिलें, तेव्हां त्या बादशहानें काकुळतीस येऊन सांगितलें कीं, "बाबारे मजपाशीं द्रव्य मुळींच नाहीं व कोठें पुरलेलेंही नाहीं! आतां मला छळूं नको! एकदां माझी आंतडी तरी फाडून घे, पण या यातनेंतून सोडीव!" परंतु तिकडे त्या राक्षसानें लक्ष दिलें नाहीं. बादशहा बेहोष होऊन पडल्यावर गुलामानें झनानखान्यांतल्या खाशा स्त्रियांस आणून त्यांचेही नानाप्रकारें छळ केले. हें चाललें असतां कोंडून ठेवलेल्या माणसांपैकीं लहानलहान कोमल मुलें पाण्यावांचून व्याकूळ होऊन मरण पावलीं! तरीही त्या दुष्ट, महानीच, अधमाधम पठाणास दयेचा पाझर फुटला नाहीं व तीं जेथें मेलीं तेथेंच त्यांस गाडण्याचा त्यानें हुकुम दिला!

हे त्यांचे हालहाल ऐकून बेदरबख्तानें मात्र त्यास थोडें पाणी व अन्न पोंचविलें. पुढें गुलामकादरानें मलकाझमानीजवळ पैशाची मागणी केली, व तिनें होतें नव्हतें तें सर्व दिल्यानेंही तृप्त न होऊन, त्यानें त्या वृद्धबाईला वाड्यांतून ओढून आणून तिच्या महालांत खणती लावली. त्यानें बेदरबख्ताचाही फार अपमान केला व पैशासाठीं तर त्याच्या लोकांनीं सर्व राजवाडा पोंखरून टाकिला! इकडे इस्माइलबेग शहराबाहेर होता, त्याला वाड्यांतलें वर्तमान कांहींच समजलें नव्हतें. गुलामकादरानें सुमारें पांचलाख रुपये त्याचे कडे पाठवून, जास्त भरतीसाठीं शहर लुटावें ह्मणून त्यास निरोप पाठविला!

एक दिवस त्यानें शहाअलमच्या सर्व राजपुत्रांस आणून त्यांना आपणापुढें गाण्यास व नाचण्यास लाविलें. शेवटीं थकल्याचें मीष करून शहाजादा अकबर याचे मांडीवर डोकें ठेवून जवळच तरवार व सुरा ठेऊन तो निजला! पुढें कांहीं वेळानें जागा होऊन त्यानें त्या राजपुत्रांची फार निर्भत्सना केली. तो ह्मणाला कीं, मीं शस्त्र ठेऊन तुमच्या समक्ष निजलेला असतांहीं तुह्मीं माझें शीर उडविलें नाहीं, इतके नामर्द तुह्मीं राज्य कसें कराल! एकदां तर तो तख्तावर हुक्का ओढीत बसला व त्यानें वृद्ध बादशहास आप-

णापुढें आणून, ठेवा कोठें आहे तो दाखीव असें त्याला पुनः विचारिलें. त्या बिचाऱ्यानें माहीत नाहीं, असें उत्तर करतांच गुलामानें तख्ता खालीं उडी टाकून बादशहास खालीं पाडलें व त्याचे उरावर बसून 'ठेवा कोठें आहे तो दाखवितोस कीं डोळे काढूं' ह्मणून विचारलें !! त्यावरून बादशहानें मोठ्या काकळुतीस येऊन डोळ्यांत अश्रु आणिले व विनविलें कीं 'माझ्या डोळ्यांनीं थोडेंच सुख आतां पहाण्याचें आहे, परंतु मला कुराण वाचण्यास त्यांचा उपयोग होतो, येवढ्याकरता तरी ते कायम ठेव'!! परंतु त्या दुष्टानें तिकडे हीं दुर्लक्ष करून पेषकबजानें त्याचे दोन्ही डोळे फोडले!! हें अघोर कृत्य पाहून बादशहाच्या आप्त बायकामुलांनीं हाहाःकार केला व मोंगलाईच्या गतवैभवाचा दर्शक असा तो प्रसिद्ध दिवाणखाना स्त्रियांच्या आक्रोशानें गजबजून गेला. नंतर त्या दुष्टानें बादशहास तसाच फराफरा ओढीत नेऊन कारागृहांत टाकिलें व शहाजाद्यांचेही डोळे फोडतों ह्मणून उठला; परंतु लाला सीतलदास या हिंदु खजानवीसाचे मध्यस्तीनें त्यानें तें कर्म केलें नाहीं. पुढें एक दिवस त्यानें जनानखान्यांतल्या तरूण व सुंदर स्त्रियांस आणून बेदम मारलें, आणि ज्यांचें नखही परपुरुषांचे दृष्टीस पडलें नव्हतें त्यांस विवस्त्र करून, आपल्या लोकांकडून त्यांची विटंबना केली!

हीं दुष्ट कृत्यें करण्यांत त्याचा कांहींच हेतु राहिला नव्हता; त्याला यावेळीं मनुष्यांत गणण्याचीही त्याची स्थिती उरली नव्हती, तो केवळ पशु बनला होता, आपण जें करतों तें पूर्वी बादशहानें आपल्या घराण्याची जी दुर्दशा केली त्याचा सूड घेण्यासाठीं करतों, असेंही तो केव्हां केव्हां बोले. त्यावेळीं त्याचा जात्याभिमान, धर्माभिमान, किंवा मराठ्यांविषयीं द्वेष हीं सर्व नष्ट झालीं होतीं. राजवाड्यांत जीं हीं अनन्वित कृत्यें चाललीं होतीं त्यांची बातमी शहरांत पसरतांच मोठा हाहाःकार झाला व वृद्ध लोकांस नादीरशहाचे दिवसांची आठवण झाली. मुसलमानाकडून या पुराण व प्रसिद्ध मोंगल बादशाहीची अमर्यादा व्हावी हेंच सर्वांस आश्चर्य वाटलें. नादीरशहा, अहमदशहा किंवा तैमूरलंग या नरस्वरूपी रा-

क्षसांनीं प्रजेस लुटलें व जाळलें, परंतु बादशाहीचा इतका उपमर्द केला नाहीं. मराठे, रजपूत किंवा जाट, या परधर्मी लोकांसही ज्या गादीबद्दल स्वाभाविकपणेंच पूज्यभाव होता, तिची अशी हवहेलना स्वधर्मी वजीराकडून झाली हा खरोखरच कालचक्राचा महिमा समजावयाचा. मागें गाझीउद्दीनानेंही बादशहांस वाईट रीतीनें वागविलें परंतु त्यानें, क्रूरकर्मात इतकें नैपुण्य दाखविलें नाहीं. प्रस्तुत हा दुष्ट मराठ्यांचा शत्रु व गादीचा विश्वासू सेवक असें ह्मणून हीं कृत्यें करीत होता! गाझीचीं कृत्यें मराठ्यांच्या तरफदारींचीं तरी असल्यामुळें एका दिशेनें पहातां समजण्यासारखीं होतीं.

याप्रमाणें मोंगलबादशाही अपकर्षाच्या सीमेपार गेली व आतां बादशहा शब्दांत कांहींही अर्थ उरला नाहीं. परंतु इस्माइलबेगास हीं गुलामकादराचीं क्रूर कृत्यें समजतांच त्यांचा त्याला तिटकारा येऊन, त्यानें मराठ्यांची फौज घेऊन राणाखान हा दिल्लीचे आसपास होता, त्याच्याशीं आपसांतीत बोलणें सुरू केलें. ता० १४ आगष्ट १७८८ रोजीं मराठ्यांची फौज दिल्लीजवळ पोंचली. त्यानीं गुलामकादराकडे घोसगडाहून रसद येत होती तीजवर छापा घालून शेंकडों पठाण कापून काढले व शत्रूकडे अन्नाची महर्गता पाडली. याप्रमाणें महिना दोन महिने गेले, तितक्या काळांत गुलामकादरानें आपलीं कर्में चालूच ठेविलीं होतीं व मिळवलेली बहुतेक लूट त्यानें घोसगडाकडे पाठविली होती. इतक्यांत दक्षिणेंतून होळकर व अलिबहादर यांची कांहीं फौज आली, व ती दिल्लीचे आसपास येतांच इस्माइलबेगानें राणाखानाशीं तह केला. पुढें एक दिवस संध्याकाळीं गुलाम कादरानें राजघराण्यांतील माणसांची जळून खाक व्हावी व आपणास पळून जाण्यास सवड सांपडावी ह्मणून किल्यांतील लालबुरजांत दारू भरून तिला बत्ति दिली! त्याबरोबर मोठा भयंकर आवाज होऊन सर्व दिल्ली दणाणून गेली व लोक भयग्रस्त झाले. या संधींत तो दुष्ट आपल्या साथीदारांसह वाड्याच्या एका चोरदारानें बाहेर पडून पळाला. हा प्रकार होतांच राणाखानानें आपली फौज तात्काळ वाड्यांत नेली व प्रथम आग शांत करून, कारागृहांतील लोकांस मुक्त

केलें आणि त्यांचे खाण्यापिण्याची व वस्त्रांची चांगली व्यवस्था केली. गुलामकादर जातांच दिल्लींत पुनः स्वस्थता झाली व मराठ्यांची मोठी फौज त्याचा पाठलाग करण्यास निघाली.

गुलामकादरानें दिल्लीहून पळ काढल्यावर आपल्या जहागिरीकडे न जातां, तो उत्तरेकडे मीरतच्या किल्ल्याच्या आश्रयास जाऊन राहिला. तेथें राहिल्यानें रामपूर व फरुकाबादचे रोहिले सरदार मदत करतील अशी त्यास आशा होती. घोसगड येथें सर्व लूट होती तेव्हां तिकडे मराठ्यांनीं जाऊंनये ह्मणून तो मीरतेस राहिला. त्याच्या बरावर फक्त निवडक स्वार व शिपाई मात्र होते. तो दिल्लीहून गेल्यावर त्याचा पाठलाग करीत जाऊन अखेरीस मराठ्यांनीं मीरतच्या किल्ल्यास वेढा दिला. असा वेढा दोन महिने होता तथापि त्याचे लोकांनीं मोठ्यां शौर्यानें त्याच्या बचाव केला; अखेरीस अन्नाची तूट पडतांच एक्या थंडीच्या पहांटेस, (ता२१ दिजंबर १७८८.) तो सुमारें पांचशें निवडक स्वारांसह किल्ल्यांतून निघाला व मराठ्यांची फळी फोडून पार झाला! त्याचा हेतू उत्तरेकडे जाऊन शिखांचा आश्रय करावा असा होता. परंतु पापाचा पूर्ण घडा भरल्यामुळें तो बेत त्याचा सिद्धीस गेला नाहीं, कारण तो पळून जात असतां अंधारांत रस्ता चुकून शेतांतून जाऊं लागला त्यावेळीं त्याच्या घोड्याचा पाय एका मोटवणांत निसटून तो खालीं पडला व त्याला इजाही बरीच झाली होती. पुढें उजाडतांच त्या शेताचा मालक एक कायस्थ ब्राह्मण, त्या गांवचा पटवारी होता, त्यानें त्याला पाहिला. त्याला प्रथमच संशय आला कीं हा कोणी मोठा गृहस्थ असावा, शिवाय ब्राह्मणाचेंही घर पूर्वी त्यानें लुटलें होतें यामुळें घोसगडाचें त्यानें नांव ह्या घेतांच हा गुलामकादरच अशी त्याची खात्री होऊन, त्यानें पुकारा करून राणाखानाचे स्वार आसपास येत होते, त्यांच्या स्वाधीन त्याला केलें. याबद्दल त्या ब्राह्मणास पुढें बादशहानें इनाम दिलें. गुलामकादराबरोबर त्यानें केलेला बादशहा बेदरबख्त, व ज्यानें त्याला वाडयांत येऊं दिलें तो मनसूरअल्लि, हे व इतर लोक पळून गेले होते ते सांपडले व त्या सर्वांस पुढें मोठ्या कडक शिक्षा मिळाल्या.

बेदरबख्तास व मनसूरअल्लि यांस तर देहांत प्रायःश्चित्त मिळालें. इकडे मराठ्यांनीं गुलामाचा सर्व प्रांत काबीज करून घोसगड किल्ला पाडून जमीन दोस्त केला.

गुलामकादरानें आपल्या घोड्याच्या खोगिरांतून मौल्यवान जवाहिर लपवून नेलें होतें, तें सर्व डिबॉईनाचे कंपूवर हल्लीं लेस्तॅनो नांवाचा फ्रेंच सरदार होता, त्यानें घेऊन पलायन केलें. गुलामकादरास कैदकरून प्रथम मथुरेस आणिला. अगोदर शिपाईलोकांनीं कांहीं अधिक उणें बोलल्यावरून त्याला मऊ केलेंच होतें, पुढें तर महादजीनें त्याची मथुरेमध्यें गाढवावर उलटा बसवून धिंड काढली, व मागाहून त्याचे डोळे काढले. पुढें तो शिव्या देऊं लागला ह्मणून जीभ तोडली व अखेरीस त्याचें नाक, कान, हात, पाय तोडून, तसा तो गोळा बादशहाचें सांत्वन करण्यासाठीं दिल्लीस पाठविला! परंतु तेथें पोंचण्याचे अगोदरच ता. ३ मार्च १७८९ रोजीं, त्याचा अंत झाला!

---

१ प. व. या. ३३९,४००; Keene 187-188; Compton, 43; Elliot, Vol VIII, 244-253. गुलामकादराच्या वधासंबंधानें कलकत्ता ग्याझेटांत वर्तमानें प्रसिद्ध होत; पुढील उतारा त्यांतून घेतला आहे.

Calcutta Gazette, 19th March 1789. "Late letters from Delhi mention the death of Gulam Kadir, on the 3rd. However one may be pleased to hear that a monster who in cool-blood was capable of inflicting such a cruel torment on the old king Shahalum, has met his fate, yet the mode of his punishment must be regarded with horror and disgust.

After being dragged from the place of his confinement his eyes were first ordered to be torn out and then his ears and nose to be cut off. In this situation he was carried seven coss from Muthura, where having under-gone a further mutilation of his hands and feet he was at length put to death and his body hung upon a tree.

When one regards the wretched situation of the Western Provinces, the murders and devastations which are daily committed it is impossible not to reflect on the happiness which the natives, freed from the barbarity of Musalman despotism, enjoy under the mild influence of the British Government, protected in their laws, liberty and property."

हा एक शत्रु गेल्यामुळें महादजीचा अमंल कायम झाला. इस्माइलबेगास कनोद व रेवारी वगैरे महाल जहागीर देऊन महादजीनें त्याला रवाना केलें. पुढें थोडकेच दिवसांनीं खुद्द महादजीची स्वारी मथुरेहून दिल्लीस गेली व त्यानें बादशहाची भेट घेतली, तेव्हां त्यास फार संतोष होऊन पाटीलबावांस आपला मुलगा असें तो समजूं लागला! महादजीनें बादशहास गादीवर स्थापून, त्याच्या खर्चासाठीं सालीना ९ लाख रुपये देण्याचा ठराव केला. बादशहानें या प्रसंगीं साध्या पाटीलबोवांस, "मदारउल्महाम्, अलिजाबहादुर" असा किताब दिला व पेशव्यांस 'वकील-इ-मुतलक' ही पदवी दिली. याचवेळीं दिल्ली व आग्रा वगैरे प्रांत महादजीनें खालसा करून मराठी राज्यास

---

१ "महादजी शिंदे यांस बादशहा बोललेकीं, शाबास, आच्छा काम तुम्ने मेरा किया! तूं मेरा बेटा!" प. बखर पृ. १५३; बादशहा कारागृहांत असतां त्यानें आपल्या दुःखांचे वर्णनपर कांहीं पद्यें लिहलीं त्यांतही हेच उद्गार आहेत. त्या पद्यांचें भाषांतर कीन साहेबानीं आपल्या पुस्तकांत दिलें आहे, त्यांतून पुढील वेंचा घेतला आहे.

"Even the base-born man of Hamadan, and Gul Mohammad' full of wickedness; Allah Yar also, and Solaiman and Badal-Beg all met together for my trouble.

And now that this young Afghan hath destroyed the dignity of my empire, I see none but thee, O Most Holy! to have compassion upon me.

Yet per adventure Timur Shah my kinsman may come to my aid; and Madhoji Sindhia, *who is even as a son unto me*, he also will surely avenge my cause.

Asaf-ud-daula and the chief of the English; they also may come to my relief.

Shame, were it, if Princes and People gathered not together; to the end that they might bring me help.

Of all the fair women of my chambers none is left to me but Mubarik Mahal.

O Aftab! verily hast thou been this day overn-thrown by Destiny; yet God shall bless thee and restore thy fallen bright-ness."
*Keene's Fall of hte Moghul Empire, page 193.*

सामील केले, व आपल्या राज्यांत गोवध बंद करण्यासाठीं बादशहाची सनद मिळविली.

ह्याप्रमाणें मोंगल बादशाहीचा शेवट झाला. अकबराची राजनीति सोडून अलमगीर बादशहानें हिंदुलोकांवर धर्म संबंधानें अत्यंत जुलूम केल्यामुळें जीं बंडें सुरू झालीं व ज्या धर्मछलाच्या दुष्ट परिणामामुळें अवरंगझेबाची हिंदुस्थानांतील सत्ता डळमळीत झाली, त्याची फळें आज पक्कतेस पोंचलीं. डोंगरांतील चोऱ्या पेक्षां ज्यांचें शौर्य कांहीं नाहीं असें मोंगलांस वाटत होतें, त्यांनीं अवरंगझेबाचा नाश करून, मोंगल बादशहांचें जगद्विख्यात राष्ट्र रसातळास पोंचविलें! आज सुमारें सातशें वर्षें ज्या मुसलमानांचा हिंदुस्थानावर पगडा बसला होता व ज्यां दिल्लीश्वरांच्या सत्तेपुढें व अद्वितीय ऐश्वर्या पुढें परकीयांचे डोळे दिपून जात, त्या सर्वांचा ऱ्हास परचक्राकडून न होतां गरीब व दीन हिंदुप्रजेकडून झाला!

तात्पर्य, दास्यत्वाला व सहनशीलतेला सुद्धां कांहीं मर्यादा आहे व ती मर्यादा पोंचल्यामुळें गरीब व दुर्बल हिंदुनां सुद्धां जुलूमा विरुद्ध बंड करण्याचें धैर्य उत्पन्न झालें. ज्यांच्या सहाय्यानें अकबरानें आपल्या राज्याचा विस्तार करून प्रजेला सुख व शांति दिली, त्यांशींच द्वेष केल्यामुळें अवरंगझेबानें मुसलमानी राज्याचा शेवट केला. यावेळेस पंजावांत शीख लोक प्रबळ झाल्यामुळें अफगाणिस्थानांतून मुसलमान येण्याची भीतिच राहिली नाहीं, व मराठ्यांच्या सत्तेमुळें निजाम डोकें वर उचलील ह्मणण्याची आशा राहिली नव्हती. अयोध्येचा नवाब व टिपू ह्यांचे इंग्रजांशीं सदोदित बखेडे चालू असल्यामुळें त्यांच्यासारख्यां पुरुषांकडून मुसलमानांची शक्ति एक वटण्याची आशा नव्हती; बाकी राहिलेला इस्माइलबेग यानें पाटीलबांवाशीं स्नेह केल्यामुळें तोही इसलामाच्या कार्यास निरूपयोगीच

२ " यारबफादार सीपेसाकर, रुस्तमे हिंद, महादजी शिंदे फर्जंद अर्जमंद महादजी शिंदे अलिजहा बहादूर मुजफरजंग, असेप्रकारें मरातबीची मरामत किताब शहाअलम बादशहा गाजीनें दिली." वि. वि. पुस्तक, ११. पृ. ८२; त्याप्रमाणें बादशहानें पाटीलबावांचें पदरचे शेणवी व विंचूरकर वगैरे पेशव्यांचे सरदारांस मोठमोठ किताब दिले.

झाला होता. तात्पर्य यावेळीं मुसलमानांच्या सत्तेचा लोप होऊन पाटीलबावांचा विजयदुंदुभि हिंदुस्थानभर गाजूं लागला. इंग्रजांचा स्नेह व दक्षिणेतील सरदारांची कमकुवत, हीं पाटीलबोवांच्या अपार सत्तेला मोठीं बळकट कारणें झालीं आणि पंगु महादजी शिंदे यशोगिरीच्या अत्युच्च शिखरावर आरूढ झाले!

इतकें झालें तरी आपल्या सत्तेला कोणत्यावाजूनें भीति आहे हें पाटीलबावांच्या ध्यानांत होतें व त्या बाजू बळकट करण्याच्या तजविजीस ते लागले. इस्मायलबेगाजवळ मोठी फौज होती, तथापि ती यावेळीं कमी करण्यास सांगण्याचें पाटीलबावास भय होतें, म्हणून त्यांनीं या शूर सरदाराचें मन न दुखवितां त्याला दिल्लीच्या दक्षिणबाजूस बराच मुलूख जाहगीर देऊन त्यास संतुष्ट राखण्याचा प्रयत्न केला, परंतु तो फार वेळ टिकला नाहीं.

इस्माइलबेगाप्रमाणेंच रजपूत व शीख लोकांची महादजीस भीति होती. तसेंच होळकर, अल्लिबहाद्दर व गोसाव्यांच्या फौजेचा मुख्य हिंमत बहाद्दर हे ही आपला द्वेष करतात हें पाटील बोवांस पुरें माहीत होतें; म्हणून त्यानीं या सरदारांस शीख लोकांवर पाठविण्याचें योजिलें. या वेळीं मराठी राज्याच्या सरहद्दीवर त्या लोकांनीं लूट आरंभिली होती. पाटील बोवांचें ऐश्वर्य पाहून दक्षिणेंतून आलेले सरदार त्यांचा हेवा करूं लागले व पुढें हा द्वेष स्पष्ट दिसूं लागला. या सर्व गोष्टी लक्षांत आणून पाटीलबोवांनीं आपली फौज वाढविण्याची सुरवात केली. गुलामकादराचा पराभव झाल्यावर, त्यांच्या पदरचा प्रसिद्ध सरदार डिबॉइन हा चाकरी सोडून लखनौ येथें जाऊन व्यापार उदीम करूं लागला, व लेस्तानो पळून गेल्यामुळें कवाइती फौज बेपर्वाईनें वागूं लागली. एकदां तर त्या फौजेनें बंडाव्याचीं चिन्हें दाखविलीं, यामुळें पाटीलबोवानीं डिबॉइन याला परत बोलावून त्याचा पगार वाढविला व ज्यास्त फौज तयार करण्याचा हुकूम दिला. महादजीनें दिल्लीच्या बंदोबस्तास रावोमल्हार यास नेमिलें व हिराखान जाटानें कांहीं दंगा आरंभिला होता त्याचाही बंदोबस्त केला.

महादजीनें या वेळीं आपल्या फौजेंत फार सुधारणा आरंभिली. त्याच्या अनुभवास असें आलें होतें कीं, आपल्या फौजेंत दक्षिणेंतील लोकांचा भरणा फार असल्यामुळें आपल्या सत्तेस पुढें मागें धक्का येईल; कारण हे दक्षिणी लोक स्वतंत्र रीतीनें वागत व लूटीच्या इच्छेमुळें त्यानां स्वस्थता मोडण्याची हौस असे. परशत्रूंशीं लढाई करणें व स्वराज्यांत स्वस्थता राखून कोट, किल्ले, शहरें व भरवस्ती चे मुलुख यांचा बंदोबस्त राखणें हीं दोन्हीं कामें वेगळीं असून, मराठे लोकांची फौज या दुसऱ्या कामास निरुपयोगी होती. तसेंच लढाईच्या कामीं सुद्धां शीख, रोहिले, पठाण रजपूत वगैरे बळकट बांध्याच्या, उंच व धिप्पाड लोकांशीं तुलना करून पहातां दक्षिणी मराठे कमी होते, यांत संशय नाहीं. तसेंच हिंदुस्थानांत जाणाऱ्या साधारण मराठे शिलेदारांस सुद्धां, आपण मराठा ह्मणून खुद्द पाटील-बोवांच्या बरोबरीचा, असा अभिमान असे, त्यामुळें राज्यव्यवस्थेंत मुख्य गोष्ट वरिष्ठांची आज्ञा बाळगणें ती या लोकांकडून होत नसे. या कारणांसाठीं व आपलें राज्य हिंदुस्थानांत स्थापन झाल्यामुळें सदोदित महाराष्ट्रांतून फौज भरणा करण्याची अडचण लक्षांत आणून पाटीलबोवांनीं आपल्या नव्या फौजेंत तद्देशीय रजपूत, मेवासी, जाट, पठाण वगैरे लोकांचा फारच भरणा केला. पाटीलबावांच्या या व्यवस्थेपासून मराठेलोकांस त्यांच्या विषयीं अप्रीति उत्पन्न झाली.

महादजीनें १७९० च्या प्रारंभीं डिबॉईन याला मथुरेस परत बोलावून, त्यानें जशा पूर्वीं दोन पलटणी तयार केल्या होत्या तशा १० पलटणींची एक ब्रिगेड करण्याचें ठरविलें. त्या फौजेंत या फ्रेंच सरदारानें पुष्कळ फ्रेंच, इंग्लिश वगैरे अधिकारी नेमून कवाइत थेट इंग्लिश पद्धतीप्रमाणें सुरू केली. कवाइतींतील हुकमाचे शब्द सुद्धां इंग्रजीच असत. या पलटणींत रोहिलखंड, औध व दुआब प्रांतांतील मुसलमानांचा भरणा फार होता. दक्षिणचा संबंध बाजूस ठेऊन महादजीच्या स्वार्थपर राजकीय दृष्टीनें पहातां, त्यांची ही योजना योग्य होती, कारण लढाऊ लोकांस नोकऱ्या देऊन खूष ठेविल्यानें आपल्या विरुद्ध बंडाचा संभव कमी होता. याच वेळीं पाटील बो

वांनीं मराठे स्वारांचा मांड चोळणा कमी करून टांचेपर्यंत पोंचणारी विजार अमलांत आणिली. ही जी पहिली कंपू तयार झाली त्यांतील ७ पलटणींस तेलिंगा ह्मणत व बाकीच्या तीन पलटणींस नजीव ही संज्ञा होती. या शिवाय मेवाती लोकांची एक पलटण, एक तुर्कस्वारांची पलटण व साठ तोफांचा तोफखाना त्यानें उभा केला. डिबाइनानें महादजीच्या पदरीं चाकरी पत्करतानां दोन करार केले ते असे कीं, फौजेचा पगार वक्तशीर पोंचावा व आपणास इंग्लिशांविरुद्ध लढाई करण्यास पाठवूं नये. यास्तव महादजीनें या नव्या फौजेच्या खर्चासाठीं डिबॉईनाला दुआबांतील कांहीं प्रांत जैदाद अगर सरंजामादाखल दिला, त्याचें उत्पन्न अदमास तीस लाख रुपये होतें.

या नवीन तयार झालेल्या फौजेनें पुढें लवकरच सर्व राजस्थानांत पाटीलबावांचा अंमल स्थापन केल्यामळें, अशाप्रकारची फौज आणखी जास्त वाढविण्याविषयीं त्यानीं डिबाईनाला परवानगी दिली. त्यावरून त्या उद्योगी व शूर सरदारानें पुढें १७९१ व १७९३ सालांच्या दरम्यान आणखी दोन नवीन कंपू तयार केले. प्रत्येक कंपूंत जवळजवळ १०,००० लोक असत. या लोकांची मुख्य हत्यारें बंदुका व संगीनी असून कांहीं पलटणींतील शिपायांकडे ढाल, तरवारी व पिस्तुलें ही दिलीं होतीं. हीं सर्व हत्यारें व तोफा आग्र्याच्या किल्यांत चालविलेल्या कारखान्यांत तयार होत, व त्यांचे काम अगदीं इंग्लिशांच्या हत्यारांप्रमाणें होतें[२].

---

१ डिबॉइनच्या पलटणींच्या संबंधानें तपसीलवार माहितीसाठीं वाचकांनीं Compton's, De Boigne (*p. p.* 48-50; 62-72) पहावें. सदर ग्रंथांत शुद्ध मराठी तऱ्हेची फौज व ही नवीन फौज यांची खालीं लिहिल्याप्रमाणें तुलना केली आहे.

"When Madhoji Sindhia inspected his new Brigade for the first time, he must have been struck with the contrast between it and his own undisciplined Maràthà army. The Deccan soldiery of the last century were perhaps the most irregular ruffians in India. Every individual trooper asserted his independence and freedom

ही नवीन फौज जरी एका अर्थानें चांगली होती, तरी तिची बरोबरी इंग्लिशांच्या कवायती फौजे बरोबर कधींही झाली नाहीं. ज्या पद्धतीनें मराठ्यांनीं मोंगलांचा नाश करून हिंदुस्थान जिंकिलें ती पद्धत कवाइती फौजेशीं सुद्धां टक्कर देण्यांस फार उपयोगी पडते ही गोष्ट, अलिकडे युरोपीयन युद्धकलेंत अत्यंत सुधारणा झाली तरी

---

from control; he was the proprietor of his horse and arms, and whilst agreeing to give his services in return for a certain payment, he did not consider it any part of the contract to imperil his property. Warfare, he regarded, as a legitimate means of plundering, but as his steed and spear represented his entire capital, and constituted his sole claim to employment, he sedulously avoided all conflict (which somewhat detracted from his merits as a combatant) and preferred flight to fight on every occasion of danger.

The camps of these immense armies of discreet, and yet, at times, dashing warriors, were vast halting places, formed without any idea of order or regularity, and covering extended tracts of ground. Every trooper slept with his horse picketed beside him, and there were generally three camp followers to each fighting man A teeming bazaar accompanied the armies in their line of march wherein all trades and professions of city life were represented, and which included every accessory of Asiatic civilization from bevie of dancing girls to bands of professional thieves, who plied thei licensed callings under privilege of a trade tax. The multitude which a Maràthá prince led to war consisted of a vast medley c conglomerate elements, as far removed in appearance from military expedition as it is possible to conceive, and powerful onl in their over-whelming numbers, their wonderful endurance, an the almost incredible rapidity, with which they could move fro place to place, either for attack or in retreat.

De Boigne's Brigade was the very antithesis of a Maràthá arn It was a small, solid, compact, slow-moving body, in which obedien and discipline were the guiding principles. Every military operati was carried out with precision and routine; the men marched a manœvred in the methods that obtained in European armies, a in camp afforded a spectacle of order and system that would b done credit to a Company's Sepoy regiment." *Compton's De Boig Page 49.*

सुद्धां अफगाणस्थान, इजिप्त वगैरे स्वाऱ्यांतील ताज्या उदाहरणां वरून अनुभवास आली आहे. कांहीं दूरदर्शी मराठे व इंग्रज सरदारांचा सुद्धां या मराठ्यांच्या कवायती फौजांबद्दल असाच अभिप्राय होता. महादजीनें पलटणी तयार करण्याकडे जितकें लक्ष दिलें, तितकेंच जर त्यानें आपली मराठी फौज थोरल्या शिवाजीच्या नियमां प्रमाणें सुधारण्याकडे दिलें असतें, तर चालू शतकाच्या प्रारंभीं मराठ्यांचे जे अपजय झाले तसे झाले नसते. कवायती फौजेखेरीज या वेळीं शिंदे, होळकर, पटवर्धन वगैरे सरदारांकडे ज्या जुन्या चालीच्या मराठ्यांच्या मोठ्या फौजा होत्या, त्या सुद्धां अव्वल मराठेशाईच्या शिलेदारी बाण्याच्या नसून फार निकृष्ट स्थितीस पोंचल्या होत्या.

---

1 "In the face of this almost universal adoption of the European system it is strange to find that the innovation proved of doubtful advantage. Regular corps were delicate machines, requiring special knowledge and expert handling to keep them in order. They were apt to become dangerous to those who employed them when not punctually paid and properly controlled. The radical changes, their introduction brought about in Maràthà warfare, were not suited to the national character of the people. The Maràthàs were essentially cavaliers, fitted only for predatory compaigns. Rapid retreats formed as important an element in the economy of their operations, as daring incursions, and a horse was a *sine quà non* for any display of confidence and courage, of which they possessed but a very moderate share. The introduction of infantry and artillery involved pitched battles, and afforded no scope for those marvellously quick, and hence demoralising advances, and those equally swift strategic movements to the rear, which distinguished the wild Deccan horse-man of the past. The result was that before long the Maràthás as a nation, began to lose that which they could least spare, their courage, and also much of their former mobility, and confidence in distant enterprises. And there were those who prophecied that the very innovations which had created Madhoji Sindhiàs power, would in the end prove the ruin of his race. Colonel James Skinner describes an incident which admirably illustrates this distrust of the military policy. When Doulat

महादजीच्या पदरीं हिंमतबहादर गोंसाव्याची मोठी फौज होती. हा हिंमतबहादर मूळचा बादशहाचा नोकर होता, व इ० स० १७८४ सालीं महादजीला त्यानें मदत केली. परंतु याचें वर्तन दिवसेंदिवस बंडखोरपणाचें दिसूं लागलें. महादजीचा पराभव झालेला पाहून हा त्याच्या शत्रूंस मदत करीत होता. आलिकडे होळकर व अलिबहा-

---

Rao Sindhia gave orders for the erection of a permanent Cantonment at Ujjuin, Gopal Rao, who had been restored to favour after Madhoji's death, and was now Commander-in-Chief of the Maràthà army (a term used in these pages to distinguish the national cavalry from the mercenary trained infantry), made a striking remark in open Durbar. "Our fathers" he said, "the first founders of the Maràthà power, made their houses on the backs of horses; gradually the house came to be made of cloth, and now you are making it of mud. Take care that in a short time it does not turn to mud, and is never built again." Daulat Rao Sindhia laughed and replied, "Who is there dare oppose me so long as I have my infantry and guns?" "Beware," answered the old Maràthà general, "it is very those infantry and guns which will be your ruin."

A similar prediction came from a source even more illustrious In a speech in the House of Commons Sir Philip Frances quoted an opinion on this point passed by Warren Hastings. "Sir" said the great Pro-Consul to him, "the danger you allude to, in the progress the Maràthàs are making in the art of casting cannon, in the use and practice of artillery, and in the discipline of their armies is imaginary. The Maràthàs can never be formidable to us in the field on the principles of an European army. They are pursuing a scheme in which they can never succeed, and by doing so they detach themselves from their own plan of warfare, on which alone, if they acted wisely, they would place dependence." A similar opinion was expressed by the Duke of Wellington." *Compton's De Boigne. Page 88.*

त्याचप्रमाणें मराठी फौजांच्या निकृष्ट स्थितीचें खरें स्वरूप वाचकांस पहाणें असल्यास त्यांनीं 'Broughton's' Letters From a Mahratha Camp' हें पुस्तक वाचावें.

द्दर यांच्या मसलतींत असून तो महादजीविरुद्ध उघड रीतीनें वागूं लागला. ह्मणून त्याला कैद करण्यासाठीं महादजीनें आपले लोक पाठविले, त्यावरून तो पळून जाऊन अल्लिबहाद्दर यांचे गोटांत गेला व त्यानें जरीपटक्याचा आश्रय धरिला. त्याला स्वाधीन करावें ह्मणून महादजीनें फार आग्रह धरला व त्याचप्रमाणें पेशव्याचें निशाणाचा ज्यानें आश्रय केला त्याला आपण स्वाधीन करीत नाहीं असा अल्लिबहद्दरानें हट्ट धरला. शेवटीं हें क्षुल्लक प्रकरण विकोपास चढून लढाई होण्याचा रंग होता, परंतु पेशव्याच्या हुजूर फौजेंतील 'ब्राह्मण दरकदारांनीं मध्यस्ती करून तें प्रकरण मिटविलें. हिंमतबहाद्दर पुढें लखनौ येथें निघून गेला, तथापि अनुपगीर गोंसाव्याचे हाताखालीं गोंसाव्यांची फौज महादजीचे चाकरीस राहिली'.

या हिंमतबहाद्दराचे प्रकरणांत पाटीलबोवांनीं अल्लिबहाद्दर याची खोड मोडण्याचा निश्चय केला होता, परंतु राणाखान वगैरे पदरच्या शहाण्या माणसांनीं त्यांची समजूत काढल्यामुळें पेशव्यांच्या फौजेशीं लढाई झाली नाहीं, परंतु त्या दिवसापासून अल्लिबहाद्दर याशीं वैमनस्य वाढून शेवटीं तो शिंद्याची फौज सोडून हिंमतबहारद्दाचे सांगण्याप्रमाणें आपणासाठीं बुंदेलखंडांत स्वतंत्र मुलुख संपादन करण्यास गेला. त्याच्या ह्या वर्तनाबद्दल महादजीनें नानाकडे लिहून कळविलें. परंतु नानानें मोठ्या समजुतीचें उत्तर लिहून महादजीचा राग शमविण्याचा प्रयत्न केला.

महादजीनें बादशहाचे खर्चाचा जरी चांगला बंदोबस्त बाह्यतः केला होता, तरी त्याच्या खर्चाची व्यवस्था शहा निजामअल्लि नांवाच्या

---

१ या प्रसंगाचें तपशीलवार वर्णन "होळकरांची कैफियत" पृ. ५२-५४ व "चिटणीसकर घ. इतिहास" पृ. १०६ यांत पहावें. See, also Broughton's 'Letter from the Mahratha Camp' P. 96. २ नानानें लिहलेलें ह्मणून एक पत्र सरंजामे यांणीं आपल्या पुस्तकांत (पृ. १०७) छापिलें आहे. तें पत्र खरें असल्यास नानाच्या धूर्ततेस व शहाणपणास शोभणारें असें तें मार्मिक आहे यांत संशय नाहीं. तें पत्र पुढें परिशिष्टांत दिलें आहे.

२ पेशव्यांची बखर पृ. १५०.

इसमाकडे सोंपविली होती, तो मध्येंच पैसा खाऊन बादशाहाचे पोटापाण्याचे हाल हाल करी. ही गोष्ट डिबॉइन यानें पाटीलबावांचे नजरेस आणल्यावरून त्याविषयीं नंतर फारसा बोभाटा झाला नाहीं. पुढें आपण दक्षिणेंतून परत आल्यावर बादशहाची चांगली व्यवस्था करण्याचे पाटीलबोवांनीं कबूल केलें होतें, परंतु त्यांच्या मरणामुळें तो योग आला नाहीं. याच डिबाइनच्या खटपटीनें हिंदुस्थानांतील अत्यंत सुंदर व मोंगल बादशहाचें वैभवाचें स्मारक अशी ताजमहाल इमारत चांगल्या स्थितींत राहिली. खुद्द पाटीलबावांचें लक्ष त्या इमारतीच्या सुंदर कामाकडे नसून, ती मौल्यवान दगडानीं बांधलेली आहे, एवढी त्यांची व्यापारी दृष्टि मात्र त्या इमारतीवर होती! पाटीलबोवांचा हात खर्चाच्या कामाकडे थोडा ओढताच असल्यामुळें व सामान्यतः मराठे लोकांची कलाकुसरीच्या कामाकडे मुळींच नजर नसल्यामुळें, हा त्यांचा अभिप्राय सरळच होता[१]!

महादजीला वृद्ध बादशहाचा कोणीही अपमान केलेला सहन होत नसे. एकदां होळीच्या सणांत आनंदराव नरसिंह नांवाच्या मराठ्या सरदारानें खुद्द बादशहाचें सोंग आणून त्याची थट्टा केली, त्याबद्दल शहाअलमास राग न येतां त्यानें त्याला उलट बक्षीस दिलें. परंतु ही गोष्ट पाटीलबोवांस कळतांच त्यानीं त्या सरदाराचा गोट लुटून त्यास हद्दपार केलें[२]. थोर मनुष्यांची अमर्यादा केलेली महादजीस आवडत नसे.

महादजी पाटील पानिपत येथून पळून आले, तेव्हां जी जखम झाली होती तीमुळें त्यानां चालतां येत नसे, चालूं लागतानां दोन माणसांची मदत लागे[३]. यासाठीं पूर्वीं खुद्द राजपुत्रांसही जो मान मिळत नव्हता तो मान बादशहानें महादजीस दिला, तो असा कीं भरदरबारांत सांप्रदायाप्रमाणें उभें न रहातां तक्ताजवळ पाय खालीं सोडून बसण्याची परवानगी त्यास मिळाली[४].

---

१ Compton's De Boigne P. 81-85. २ Elliot, Vol VIII P. 245. ३ Elliot, Vol VIII P. 157. ४ वि. ज्ञानविस्तार पु. ११. पृ. ८३.

डिबॉइनानें तयार केलेल्या फौजांस लवकरच मोठी कामगिरी आली. इस्माइलबेगास जहागीर उपभोगून स्वस्थ रहाण्याचें नावडून तो पुनः खटपटीस लागला. प्रथम त्यानें अफगाणलोकांचा बादशहा तैमूरशहा ह्याशीं संधान लाविलें, तें जमेना ह्मणून त्यानें शीख व रजपूत लोकांशीं सख्य करून लढाईची तयारी चालविली. खुद्द त्याचे जवळ अद्यापि मोठी फौज व तोफखाना होता. होळकराचे फौजेनें याचवेळीं त्याचीं कांहीं गांवें लुटलीं, हें कृत्य पाटीलबावांच्या संमतीनेंच झालें असावें, असा संशय घेऊन त्यानें तात्काळ बंडाचा झेंडा चढविला व आपल्या सर्व फौजेसह तो जयपूरसंस्थानांत जाऊन त्यानें शेखावती प्रांतांत पाटण ह्मणून एक मोठी बळकट जागा आहे तेथें फौज जमविली. शिखांनीं ही उत्तरेंकडे गडबड चालविल्यामुळें महादजीनें त्यांच्यावर बाळोजी इंगळे व काशीराव होळकर या सरदारांस २० हजार फौजेसह रवाना केलें; व इस्माइलबेगाचे तोंडावर बावू होळकर व अंबाजी इंगळे यांस पाठविलें.

लालसोटच्या लढाईत रजपूतलोकांनीं शिंद्याचा पराभव केल्यापासून ते गर्विष्ठ झाले होते. त्यांचें पारपत्य करण्याचें महादजीचे मनांत होतें. या लढाईमुळें जोधपूरच्या बिजयसिंगानें अजमीरशहर व महाल मराठ्यांकडून घेऊन खंडणी बंद केली. त्याचप्रमाणें जयपूरकरांनीं ही खण्डणी देण्याचें नाकारिलें, हें शल्य महादजीचे मनांत होतें. आपला भाऊ जयाप्पा यास ठार मारिलें त्याबद्दल "मुंडकाटी" ह्मणून जो कर शिंदे यांनीं जोधपूरकरांवर लादला, त्याच्या फेडीकरितां अजमीर प्रांत लावून दिला होता. आपले बंधु जयाप्पा, दत्ताजी व संताजी यानीं लढाया मारून मोठ्या श्रमानें संपादन केलेलें व ज्या लढायांत संताजी[१] व जयाप्पा मारले गेले होते, तें शहर आपण एवढे पराक्रमी असतां गमावावें ही गोष्ट पाटीलबोवांस फार असह्य होऊन, त्यांच्या म-

---

१ महादजीचा भाऊ संताजी ह्मणून होता, तोही पहिल्या नागोरच्या स्वारींत मारला गेला. Tod's Rajsthan. Vol. I. P. 663 त्याची व जयाप्पाची छत्री पुष्करास आहे.

नांत रजपुतांचा एकदां पुरा समाचार घेण्याचा विचार आला. इस्मायल बेगाच्या सहायास विजेसिंगानें पूर्ववत् आपले हजारों शूर राठोर स्वार पाठविले व जयपूरच्या कछावह लोकांनींही आपली फौज पाठविली. त्यांच्यावर महादजींनें डिवॉइन, गोपाळराव भाऊ, लखबादादा वगैरे प्रसिद्ध सरदारांस मोठ्या जमावासह १७९० च्या मार्च महिन्यांत पाठविलें. ही फौज ग्वाल्हेरच्या वाटेनें मे महिन्याचे सुमारास पाटणचे आसपास पोंचली. हें स्थळ फार विकट असल्यामुळें हल्ला करून घेण्यासारखें नव्हतें, तेव्हां शत्रूस जेरीस आणण्यासाठीं प्रथम मराठ्यांच्या स्वारांनीं आसपासचा मुलुख उद्ध्वस्त करून बराच त्रास दिला. तथापि इस्मायल बेगाच्या तोफांपुढें त्यांचा इलाज चालेना. शत्रूस कसें तरी मैदानांत ओढून लढाई करावी असा डिवॉइनाचा हेतू होता. ता० २० जून १७९० रोजीं शत्रूंची सर्व फौज मराठ्यांवर चालून आली. परंतु या वेळींच जयपूरचे कछावह लोकांस लखबादादानें फितूर केल्यामुळें लढाईंत न मिळतां ते रण सोडून गेले. रजपुतांचें हें नीच वर्तन, टॉडसाहेबाच्या ह्मणण्याप्रमाणें एका लहानशा कडव्या वरून झालें. लालसोटच्या लढाईंत जो विजय प्राप्त झाला, तो राठोरलोकांच्या शौर्यामुळें आला, ह्यास्तव ते गर्विष्ट होऊन कछावह लोकांचे मनास लागण्यासारखें त्यांनीं एक कवन रचलें होतें; त्यांत "जयपूरवाल्यांच्या बायकांची अब्रू राठोरांनीं राखिली" असा भावार्थ होता. त्यामुळें राठोरांची खोड मोडण्याची जयपूरकर वाट पहात होते! इस्माईलबेगानें मोठ्या त्वरेनें डिबाईनावर हल्ले करून, मराठ्यांवर तोफांचा भडिमार चालविला व राठोर ही त्वेषास चढून त्यांनीं जिवाची पर्वा न करतां मराठ्यांच्या तोफांवर चालून घेतलें. तथापि यावेळीं लढाईचें सर्व ओझें पलटणींवर न घालतां, मराठे स्वारांनींही चांगलें काम केल्यामुळें संध्याकाळचे सुमारास शत्रूंचा पूर्ण पराभव झाला. ही लढाई फारच निकराची होऊन राठोरांची कत्तल उडाली. शत्रूंकडील सुमारें बारा हजार लोक मराठ्यांनीं कैद केले आणि त्यांचीं निशाणें, हत्ति, घोडे, उंटें, तोफा वगैरे पुष्कळ सामान पाडाव केलें. शूर राठोरांची तर या लढाईंत इतकी गाळण झाली कीं, त्यांचीं घोडीं बायकांनीं सुद्धां

पकडली। इस्माइलबेगाची बहुतेक फौज मारली गेली व कैद झाली, त्यामुळें तो विजयसिंगाच्या आश्रयास जाण्याकरितां नागोर येथें पळून गेला. या लढाईंत शत्रूकडे २६,००० हजार स्वार व ३०,००० हजार पायदळ असून सुमारें २०० तोफा होत्या. डि-बॉईनाच्या १० हजार शिपायांखेरीज मराठ्यांची इतर फौजही पुष्कळ होती. या लढाईनंतर तीन दिवसांनीं पाटणशहर मराठ्यांनीं काबीज व जमीनदोस्त करून तेथील रजपूत संस्थानिकास कैद केलें. यालढाईंत मराठ्यांच्या पक्षाचें ७००।८०० मनुष्य पडलें, परंतु शत्रूंचा फार नाश झाला व मराठ्यांनीं त्यांचा जयपूरपर्यंत पाठलाग करून वाटेंत हजारों लोकांची कत्तल केली. राठोरांचा पराभव झाल्यामुळें जयपूरवाल्यांस आनंद होऊन त्यांनींही राठोरांवर एक कवन रचिलें[1].

इकडे मराठ्यांची फौज पत्याला पर्यंत गेली होती, ती शिखांचा बंदोबस्त करून परत येतांच, महादजीनें तिची सुद्धां रवानगी रजपुतांवर केली आणि पाटणचा विजय मिळाल्यामुळें स्वस्थ न बसतां सर्व राजस्थान पादाक्रांत करण्याचा त्यानें विचार केला. पाटणहून मराठ्यांची फौज जयपुरावर गेली, तेंव्हां नयपूरकरांनीं तहाचीं बोलणीं लावि-

१ ह्या लढाईत डिबॉइन यानेंच सर्व पराक्रम केला, असें खुद्द त्याच्या पत्रांवरून इंग्लिश ग्रंथकार लिहितात, परंतु मराठ्यांचें ह्मणणें आपण पराक्रम केला. कित्येक ठिकाणीं या लढाईत होळकराच्या फौजेनें कांहींच काम केलें नाहीं असें लिहिलें आहे, परंतु "होळकराच्या कैफियतींत" अंबाजी इंगळे व बापूजी होळकर यांच्या पराक्रमानें हा जय मिळाला असें लिहिलें आहे. ( पहा—हो. कै. पृ. ५५. Compton's De Boigne 52-55; Tod's Rajsthan Vol II, p. 648-651. G. Duff. 497. ) यालढाईंत मराठ्यांस १०७ तोफा, ६००० बंदुका, २५२ निशाणें, १५ हत्ति, २०० उंटें, ३०० घोडे व हजारों मैल मिळाले. ( De Boigne's Letter, Calcutta Gazette; ) या लढाईत राठोरांनीं काय काय गमाविलें तें जयपूरकरांनीं रचलेल्या पद्यांत सांगितलें आहे:–

घोगा, जूगा, पागरी ॥ मुछा, खग्, मारवार
पांच रेकमां भेळलिदा, ॥ पाटणमें, राठोर.

Tod's Rajasthan Vol II. p. 551. मराठ्यांच्या नुकसानी बद्दल पहा:- Compton's De Boigne. p. 54; प. व या. ४०१.

ली, परंतु विजयसिंगास राग येऊन त्यानें आपल्या पदरचे विकानेर, रूपनगड, किशनगड वगैरे संस्थानांचे राजे जमवून मराठ्यांस शरण न जातां त्यांशीं लढाई चालविण्याचा बेत केला. त्यावरून शिंद्याचे फौजेनें पुढें चाल करून सांबर, रुपनगड वगैरे जागा काबीज केल्या व अजमीरच्या किल्ल्यास वेढा दिला. ( ता. १९ आगष्ट १७९०. ) अजमीरचा ताराकिल्ला अंरवली पहाडांतील एका उंच भागावर असल्यामुळें फारच विकट होता. तो घेण्याविषयीं मराठ्यांनीं मोर्चेबंदी करून वेढा घातला, परंतु किल्ला कांहीं केल्यानें खालीं येईना. इतक्यांत विजयसिंगानें मारवाडांतील खेड्यापाड्यांतन चौदा वर्षां पासून साठ वर्षांचे वयापर्यंत एकंदर पुरूष गोळा करून पाटणच्या लढाईंत गेलेलें यश पुनः संपादून मराठ्यांचा नाश करण्याचा बेत केला. त्यानें सुमारें ३०,००० राठोर स्वार मेडतें ( मिर्ता ) या प्रसिद्ध जाग्यावर जमविले. हें स्थळ राजस्थानांतील इतिहासांत लढायांविषयीं फार प्रसिद्ध आहे. याच विजयसिंगाचा जयाप्पा शिंद्यानें याठिकाणींच तीस पस्तीस वर्षांखालीं पराभव करून राठोरांची मोठी कत्तल केली होती[१].

मिर्ता शहर अजमिराच्या पूर्वेस तीस मैलांवर एका उंचवट्यावर असून त्याच्या आसपास लढाईस योग्य असें मोठें सपाट मैदान आहे. बिजयसिंगाची तयारी ऐकून खुद्द पाटीलबोवा जयपूरच्या वाटेनें अजमिरास आले. वाटेंत त्यांनीं जयपूरकरांकडून मोठी खंडणी घेऊन तह केला. पाटीलबोवा आल्यावर अजमीरची मोर्चेबंदी आपण करून, इतर एकंदर सरदारांस तयारीनिशीं मिर्तावर पाठविलें. ता० ८ सपटंबर १७९० रोजीं[२] मराठ्यांनीं लूनीनदी उतरून शत्रूवर लहान स्वारांच्या टोळ्या पाठविल्या, परंतु डिबॉइनाचा कंपू व तोफखाना नदीपार झाला नव्हता. या संधींतच मराठे स्वारांवर हल्ला करण्याचा

---

१ मागें पृ. ३११३३ पहा. २ ही लढाई १७९१ सालांत झाली असें ग्रांटडफ ह्मणतो, परंतु डिबॉइनाचें पत्र, व "कलकत्ता क्रॉनिकल" मधील रिपोर्टावरून, ती १७९० मध्येंच वर दिलेले तारिखेस झाली असें स्पष्ट होतें.

See Compton p. 60-61; Keene p. 205.

शत्रूंच्या सरदारांचा बेत होता. यावेळीं शत्रूंच्या फौजेंत राणा विजयसिंग नसून तो जोधपुरास होता व फौजेचें आधिपत्य गंगाराम बिनधारी व भीमराज शिंगवी यांचेकडे होतें. इस्माइलबेगाची कुमक पोंचेपर्यंत मराठ्यावर हल्ला करूनये असा भीमराजाचा अभिप्राय पडल्यामुळें मराठ्यांस दोन दिवस फुरसत सांपडून त्यांची एकंदर फौज नदीपार होऊन ता. १० रोजीं शत्रूसमोर उभी राहिली.

तथापि त्या दिवशीं कांहीं मांडलिक राजांनीं मारूं किंवा मरूं असा निश्चय करून कुसुंबा घेऊन केशरी पोषाख चढविले; ते पोषाख चढविले ह्मणजे जो लढाईत जाईल त्याणें प्राण गेला तरी बेहत्तर परंतु रणांतून विन्मुख जावयाचें नाहीं अशी शपथ घेतली, असें समजतात. या मांडलीक राजांपैकी आहवा येथील ठाकूर शिवसिंग व असोप येथील महीदास हे राठोरांचे पुढारी होते. ता. १० रोजीं रात्रींच डिबॉइन व लखबादादा याणीं लढाईची तयारी करून निशा घेऊन निजलेले रजपूत जागे होण्या पूर्वींच भल्या पांहटेस त्यांच्यावर तोफांचा मारा सुरू केला, तेव्हां शत्रूंकडे एकच गोंधळ झाला. तथापि इतक्यांत केशऱ्या घेऊन मरणास सिद्ध झालेल्या चार हजार राठोरांनीं त्यांच्या रीतीप्रमाणें तोफांवरच चाल केली व कांहीं फौजेनें गोपाळराव व जिवबादादा यांचेवर निकराचा हल्ला केल्यामुळें त्याच्या तुकड्या पळून गेल्या. तथापि डिबॉइनच्या कंपूनें खूप बंदूक चालवून जितके वेळां राठोर चालून आले तितके वेळां त्यांस परतून लाविलें! याचवेळीं होळकराची फौज मदतीस येऊन दोन्ही दळें मिसळून जाऊन लढाईची गर्दी झाली. जे चारहजार राठोर आले होते त्यांपैकीं एक सुद्धां जीवंत न रहातां सारे ठार झाले! लढाई सकाळपासून दुपार पावेतों चालली, शेवटीं रजपुतांचा पराभव होऊन ते पळूं लागले. तिसऱ्याप्रहरीं मराठ्यांच्या फौजेनें मिर्ताशहरावर हल्ला करून तें काबीज केलें व पुष्कळ लूट मिळविली. भीमराज शिंगवी नागोरास पळाला व तेथें त्याणे जहर घेऊन प्राण दिला! गंगाराम बिनधारी व अलियारबेगखान हे दोघे मुख्य सरदार पाडाव झाले व शत्रूचें तोफा वगैरे पुष्कळ सामान मराठ्यांस मिळालें. रणांगणांत राजस्थानांतील निवडक शूर पुरुषांचे प्रेतांचे ढीग पडले होते,

त्यांतच बिजयसिंगाचे मांडलिक ठाकूर मरून पडले होते. राठोरांनीं या लढाईत इतका पराक्रम केला कीं, एकदां तर डिबॉइनच्या कंपूची अगदी कत्तल होण्याचीच वेळ आली होती. याच लढाईंत पुढें इतिहासांत प्रसिद्धीस आलेले यशवंतराव होळकर यानीं प्रथम तरवार केली. या लढाईत मराठ्यांचेही शेकडों लोक मेले, तथापि राठोरांचा पूर्ण पराभव होऊन बिजयसिंगानें तहाची बोलणीं लाविलीं. आहवा येथील रणशूर ठाकूर सत्तावीस जखमा लागल्यातरी रणांगणांत कण्हत पडला होता, त्यास लखबादादानें आणून औषधोपचार करून बरें करविलें व त्याचें शौर्य ऐकून राणा विजयसिंग स्वतः त्याला भेटण्यास येत होता, इतक्यांतच त्या वृद्ध वीराचा अंत झाला!

वरील पराभव झाला तरी इस्मायलबेगानें आपली होती नव्हती तितकी फौज आणून, तो विजयसिंगास लढाई करण्यास उत्तेजन देऊं लागला. परंतु पुढें थोडेच दिवसांनीं अजमीर किल्ल्याचा ठाणेदार दमराज यानें मराठ्यांपुढें जेरीस येऊन त्यांचे हातीं जीवंतपणीं किल्ला देऊं नये ह्मणून हिरकणी खाऊन प्राण दिला, त्यामुळें तें प्रसिद्ध व मजबूद ठाणें पाटीलबावांस मिळालें, व मराठ्यांनीं दुसरींहीं ठाणीं घेतल्यामुळें नवंबर महिन्यांत विजयसिंगानें त्यांच्याबरोबर तह केला. त्यांत मराठ्यांस अजमीर पुष्कर वगैरे जागा परत मिळाल्या व लढाईबद्दल ६० लाख रुपये विजयसिंगानें दिले. जिंकलेल्या मुलखाची सुभेदारी लखबादादाकडे सांगून पाटीलबावा परत मथुरेस गेले.

---

१ यालढाई बद्दल जास्त माहितीसाठीं, Compton's De Boigne 55 62; Tod's Rajasthan 652-654; होळकराची कैफियत. ५७; पत्रें या. ३४५ पहा. या विजयाबद्दल सुद्धां शिंदे व होळकर यांचें सरदारांत मतभेद पडला. या विजयाची बातमी समजतांच नानानेंही (प. या. ३४५) सरदारांची तारीफ केली. मागच्या मिरता येथील लढाईबद्दल नानासाहेब पेशव्यानें जयाप्पाची अशीच तारीफ केली होती. परंतु त्यावेळी व आता, पेशवे व त्यांचे सरदार यांचे संबंध मात्र कायम राहिले नव्हते. या लढाईत रजपुतांकडे ३०,००० स्वार, १ लाख पायदळ व २५ तोफा होत्या. मराठ्यांकडे तितकेच स्वार, ८० तोफा व ७।८ हजार कवायती पायदळ होतें.

मराठ्यांचा जय झाल्यावर त्यांनीं पुष्करतीर्थावर लाखोंरुपये धर्म करून तेथें एक मोठें देवालय बांधिलें.

याप्रमाणें जयपूर व जोधपूर हीं रजपुतांचीं मुख्य घराणीं पादाक्रांत झालीं व पाटीलबावांस कोणीच शत्रू उरला नाहीं. इस्मायलबेग अद्यापि मिळाला नव्हता, परंतु त्याचेकडे आतां फार फौज नसून त्याला आतां कोणाचें पाठबळ उरलें नव्हतें. यानंतर पाटीलबोवांनीं हिंदुस्थानांतील आपल्या राज्याचा चांगला बंदोबस्त करून गोपाळरावभाऊ चिटणीस यांस सर्व सुभ्यांवर मुख्य नेमिलें व मुख्य मुख्य प्रांतांत डिबॉईन, लखबादादा, जिवबादादा, अंबाजी इंगळे वगैरे सरदारांस बंदोबस्तास नेमून खुद्द स्वारीनें पुण्यास जाण्याचा विचार केला. या वेळीं त्यांच्या सर्व सरदारांत डिबॉइनावर त्यांचा फारच भरवंसा होता व मागें सांगितल्याप्रमाणें, त्याला दुसरे दोन कंपू तयार करण्याची पाटीलबावांनीं याचवेळीं परवानगी दिली. पाटीलबोवांनीं याप्रमाणें व्यवस्था करून बादशहाची अखेरची भेट घेऊन दक्षिणेंत जाण्याची परवानगी मागितली तेव्हां शहाअलमानें पूर्वीच्या सनदा कायम करून पेशवे व शिंदे यांस दिलेले अधिकार वंशपरंपरा चालण्याचे केले.

इ. स. १७७० सालीं पाटीलबोवांनीं रतनसिंगाचे मदतीसाठीं राणा हरशी याचे बरोबर लढाई चालविली होती. पुढें तह होऊन राणा हरशीचा अंमल कायम झाला व शिंदे यास मेवाडांतील कांहीं सुपीक प्रांत मिळाला, हें मागें सांगितलें आहे. तेव्हांपासून उदेपूर संस्थानांचा शिंद्याबरोबर चांगला स्नेह होता व लढाईच्या खर्चाच्या फेडीसाठीं लावून दिलेले प्रांत मराठ्यांकडे सुरळीत चालू होते. इ. स. १७७९ सालीं छोंदावत कुळापैकीं बेगू येथील रावळानें बंड केलें होतें, तें मोडण्यास महादजीची मदत घेतली होती. त्यावेळीं सुद्धां पाटीलबावांस कांहीं मुलुख मिळाला. पाटीलबोवांप्रमाणें होळकर, पोंवार वगैरे मराठ्यासरदारांनीं या अतिप्राचीन राजघराण्यावर स्वाऱ्या करून, खंडण्या व मुलुख घेऊन हें संस्थान अगदीं संपुष्टांत आणिलें होतें. परंतु यांत केवळ मराठ्यांचाच दोष नसून खुद्द रजपुतांचीच मोठी चूक होती. त्यांच्या निरनिराळ्या कुळांतील लोकां-

मध्यें व राजपुत्रांमध्यें अनेक क्षुल्लक कारणांवरून हाडवैरें पडून सदोदित कलह चालू असत. ते कलह मोडून स्वस्थता आणण्यासाठीं मराठे सरदारांची मदत त्यांस वारंवार घ्यावी लागे. तेव्हां लढाईच्या खर्चासाठीं संस्थानाचे महाल शिंदे व होळकर यांचेकडे जे आले, ते अद्यापि चालले आहेत. टॉडसाहेबानां रजपुतांचा फार अभिमान असल्यामुळें, ते प्रांत मराठ्यांकडून काढून परत उदेपूर संस्थानाला दिले नाहींत ह्मणून इंग्रज सरकाराला त्यानीं दोष दिला आहे. परंतु आमचे मतें, ही व्यवस्था होतानां वऱ्हाड वगैरे हिंदुस्थानांतील पुष्कळ प्रांत इंग्लिशांकडे जे अर्धवट हक्कानें चालू आहेत तेही जिकडले तिकडे दिल्यास सरळपणा दिसेल !

---

इ.स. १७३६ त मराठ्यांची उदेपूरावर स्वारी झाली तेव्हां पासून या दाक्षिणी लोकांनीं त्या राज्याचे सुपीक प्रांत बुचाडून घेतले असा दोष टॉडसाहेबानीं दिला आहे; परंतु उदेपूर संस्थानांतील त्यावेळची अंतस्थ व्यवस्था जी होती ती त्यांनीं दिलेल्याच वर्णनावरून पहातां अगदीं वाईट होती. रजपुतांमध्यें जर एकी असती तर मराठ्यांची काय पर्वा होती ! आमच्या लोकांत जर एकी असती तर टॉडसाहेब तरी इकडे कशास आले असते ! राज्यें संपादन करण्याचा इतिहास सर्वत्र एकच आहे !

मराठ्यांबद्दल या प्रसिद्ध व शोधक ग्रंथकारानें पुढील उद्गार काढले आहेतः—

"We may here briefly recapitulate the diminution of territory and wealth in Mèwar from the period of the first Mahratta visitation in A. D. 1736, to the death of Hamir. It were a waste of time to enumerate the rapacions individuals who shared in the spoils of this devoted country. We may be content to say their name was "legion" These forty years were surcharged with evil. The Mogul princes observed at least the forms of government and justice, which occasionly tempered their aggressions; the Mahrattas were associations of vampires, who drained the very life-blood, wherever the scent of spoil attracted them. In three payments we have seen the enormous sum of one crore and eighty-one lacs, upwards of two millions of English money, exacted from Mèwar, exclusive of individual contributions levied on chiefs, ministers, and the Pretender's party; and a Schedule drawn up by the reigning prince, of contributions levied up to his own time, amounts to 5,000,000 sterling," Tod's Rajasthan, Vol I. Page 265.

उदेपूरचा राणा हरशी याचा खून झाल्यावर त्याचा मुलगा हमीर गादीवर बसला. तो इ. स. १७७८ त मरण पावल्यावर त्याचा भाऊ भीमसिंग गादीवर बसला व तो अल्पवयी असल्यामुळें त्याची आई राज्यकारभार पहात होती. उदेपूरसंस्थानांतील छोंदावत, मेवावत, सक्तावत वगैरे पुष्कळ पोट कुळें असून, राजदरबारांत वर्चस्व मिळविण्यासाठीं त्यांचे परस्परांमध्यें फारच कलह होत आणि ज्यांची सरशी होई ते उलट पक्षावर फार जुलूम करीत. अशा तऱ्हेचा घोटाळा असतां लालसोंट येथें महादजीचा पराभव झाला त्यामुळें उदेपूरकरांसही उत्तेजन येऊन, त्यांनीं मराठ्यांचीं ठाणीं हांकून दिलीं. परंतु थोडकेच दिवसांत अहिल्याबाईनें मोठी फौज पाठवून, शिंद्याचे पराङ्मुख झालेले सर्व लोक जमवून उदेपुरावर स्वारी केली व गेलेला मुलूख सर्व परत मिळविला; इतक्यांत छोंदावत व सक्तावत लोकांमध्यें लढाई जुंपली. उदेपूरचे दरबारांत हल्लीं सक्तावत लोक पुढारी होते, त्यांनीं बंडखोर छोंदावंतांस नरम करण्यासाठीं कोट्याचा प्रसिद्ध सरदार झालिमसिंग याची मदत घेतली. याचा व पाटीलबोवांचा स्नेह होता. मागें जी उदेपूरवर स्वारी झाली, त्या स्वारींत उज्जनी जवळ झालेल्या लढाईंत हा झालीमसिंग शिंद्याचे हातीं सांपडला, तेव्हां पासून पाटीलबावांचा स्नेह करून त्यांच्या जोरावर तो रजपुतान्यांत एक प्रस्थ बनला होता. यावेळीं पाटीलबोवांची मदत घेण्यासाठीं तो उदेपूरचे प्रधानांसह पुष्करास गेला. तेथें पाटीलबोवांनीं मदत देण्याचें कबूल करून आपला प्रसिद्ध सरदार अंबाजी इंगळे यास मोठी फौज देऊन उदेपुरावर पाठविलें. त्यानें पाटीलबोवा येण्याचे अगोदरच छोंदावत लोकांचीं हमीरगड, बसी वगैरे ठाणीं सर केलीं व इतिहासप्रसिद्ध चितोरगडास वेढा दिला. इतक्यांत पाटीलबोवाही आपल्या फौजांसह आले व त्यांचा बहुमान करण्यासाठीं खुद्द उदेपूरचा राणा सामोरा आला. उदेपूर जरी मराठ्यांनीं जिंकल्यासारखेंच होतें, तथापि त्या गर्विष्ट व जुनाट सिसोदे घराण्यानें असा मान दिल्लीपतींसही क्वचित्‌च दिला असेल, तो आज पाटीलबोवांस मिळाला. पुढें पाटीलबोवांनीं त्या तरूण राण्यास बरोबर घेऊन चितोरगडापा-

शीं आणिलें, तेव्हां त्या गडाचा वेढा चालूच होता. शेवटीं अंबाजींचें व चितोरच्या अधिपतीचें सूत जमून त्यांनीं झालीमसिंगास मेवाडांतून काढण्याचा बेत केला. झालीमसिंग गेला तर चितोरगड खालीं येतो व पैसाही मिळतो असें अंबाजीनें सांगतांच ती गोष्ट स्वकार्यदक्ष पाटीलबोवांस पसंत पडून त्यांनीं झालीमसिंगास परत पाठविलें. पाटीलबोवांस दक्षिणेंत जाण्याची गडबड असल्यामुळें त्यांनीं तांतड करून पुष्कळ पैसा वसूल केला व उज्जनीचा मार्ग धरला; परंतु मार्गे अंबाजीस उदेपूरचा सुभेदार नेमून त्याला त्या संस्थानांतील पुंडाई मोडून राण्याचा अंमल स्थापन करण्यास नेमिलें. अंबाजी इंगळे त्या प्रांतांत आठ वर्षे सुभेदार होता व त्याच्या कारकीर्दीत उदेपुरांत स्वस्थता होऊन प्रजेस फार सुख मिळालें असें टॉडसाहेबही कबूल करतात[१].

याप्रमाणें बादशाही संपादन झाली, मुसलमानांचीं बंडें मोडलीं, व रजपुतान्यांतील कछावह, राठोर व शिसोदे या तीनही प्रसिद्ध घराण्यांस शरण आणून, पाटीलबावा पुणें येथें वर्चस्व स्थापन करण्यास निघाले. दक्षिणेंत जाण्यापूर्वी प्रथम उज्जनीस जाऊन तेथें त्यांनीं फौजेची बाकी चुकवून, आपल्या राज्याची सर्व व्यवस्था केली.

पाटीलबावानां हिंदुस्थानांत जाऊन सुमारें बारावर्षे लोटलीं. इतकीं वर्षे दक्षिणेंत न येतां कोणत्याही मराठ्या सरदारानें आजपर्यंत हिंदुस्थानांत वास केला नव्हता. फौजेची भरती दक्षिणेंतून होत असे यासाठीं व पेशव्यांकडे मुलुखगिरीचा हिशोब दाखवावा लागे यासाठीं ते सरदार वरचेवर दक्षिणेंत येत. परंतु महादजीनें हिंदुस्थानांत आपलें स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा घाट घातल्यामुळें व तिकडेच फौजा उभारल्यामुळें त्यास दक्षिणेंत येण्याची फारशी जरूरच राहिली नव्हती. शिवाय तिकडे जीं एकामागून एक महत्वाचीं कामें उत्पन्न झालीं, त्यामुळें पाटीलबावांस फावलेंही नाहीं. परंतु यावेळीं दक्षिणेंत जाण्यासारखीं बरींच कारणें झालीं होतीं. इ. स. १७९० सालीं इंग्रजांनीं टिपूवर मोठी स्वारी करण्याचा निश्चय केला तेव्हां पेशव्यांनीं

१ Tod's Rajasthan, Vol. I, ch. XVII. होळकराची कैफियत. ५८.

१०,००० फौजेची त्यांस मदत द्यावी असा उभय पक्षांत पुणें येथें तह झाला होता. त्या तहामुळें इंग्लिशांचा पुण्याच्या दरबारीं विशेष बोज वाढून पाटीलबावांचें वजन कमी झालें: इंग्लिशांनीं टिपूवर मोहीम करतांना पाटीलबोवांस मदत देण्याबद्दल लिहिलें, परंतु त्यानींच इंग्रजांच्या दोन पलटणी हिंदुस्थानांत आपल्या मदतीस मागितल्यामुळें, इंग्रजांनीं तो नाद सोडून दिला व नानाशींच संधान बांधिलें. या मोहिमेंत टिपूचा पराभव होऊन त्याचे राज्याची वांटणी होण्याचा प्रसंग आलेला पाहून, पाटीलबोवांस आपण ही यशाचे वांटेकरी व्हावें अशी इच्छा झाली. पुण्याच्या ब्राह्मणांनीं शिंदेहोळकरांच्या मदती शिवाय टिपूस पादाक्रांत केल्यास ब्राह्मणांचा जोर होऊन इंग्रजास त्यांचेंच महत्व वाटेल, ही सुद्धां पाटीलबोवांस भीती होती; शिवाय आपल्या संमती खेरीज टिपूवर स्वारी केली ही गोष्टही त्यांचे पोटांत होती. तसेंच हिंदुस्थानांत होळकर, अलिबहादर वगैरे सरदारांनीं सध्या त्यांच्या विरुद्ध उघडरीतीनें कारस्थानें चालवून रजपुतान्यांत व बुंदेलखंडांत तंटे सुरू केले. त्यांनां पुण्याच्या दरबारची फूस होती अशी महादजीची समजूत होऊन, त्यांचा बंदोबस्त पुण्यास जाऊन करावा असा त्यानें संकल्प केला. त्या शिवाय निजाम

१ होळकराची कैफीयत. ५८.

"Had Holkar merely confined himself to the establishment of an infantry brigade, modelled on the lines of De Boigne's, Sindhia might have regarded his endeavours with tolerable indifference. But simultaneously cabals and intrigues were set on foot at the Peshwa's Court at Poonah, and every craft brought to bear to undermine Madhoji's influence. So successful were the conspirators that Sindhia soon found it necessary to proceed to the capital to protect his own interests, and counteract the schemes of his enemies. The step was a serious one, and the necessity was great; Sindhia's ambition comprehended an assertion of power, not merely in Hindustan, but over the whole of the Mahratta dominions, and Holkar's hostility neutralized in the south, all that De Boigne's successes had wrought in the north." Compton, p. 72.

व नागपूरकर यांच्या संबंधानेंही बारीकसारीक कागाळ्या होत्याच. या वेळीं पाटीलबावा व निजामाचा वजीर मशीर-उल्मुल्क यांचे पेशव्याचे दरबाराविरुद्ध बेत चालू होते अशी सुद्धां बातमी पसरली होती. नानाफडणीस व महादजी यांचें आलिकडे १२ वर्षें पर्यंत मनोमन नीट नव्हतें ही गोष्ट जगप्रसिद्धच होती, यामुळें शिंदे हे नानाचें पारपत्य करण्यास मोठ्या फौजेसह येत आहेत अशीही कंडी उठली होती; आणि यासाठींच नानानेंही टिपूबरोबर तहाची गडबड करवून हरीपंताची फौज जलदीनें पुणें येथें परत बोलाविली. तात्पर्य, हें पाटीलबोवांचें प्रस्थ दक्षिणेंत मोठ्या फौजेसह येत आहे हें समजतांच नागपूर, पुणें, हैदराबाद वगैरे दरबारांत निरनिराळे तर्क उत्पन्न झाले. परंतु बादशहाकडून मिळालेल्या सनदा, वस्त्रालंकार, भूषणें व पालखीनालकी वगैरे वहानें श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे यानां अर्पण करण्यासाठीं आपण जात आहों, असें पाटीलबावा सांगत होते. दक्षिणेंत आपल्या फौजेबद्दल चर्चा होते असें समजतांच त्यानीं कांहीं फौज परत पाठविली, तथापि जो जमाव त्यांचे समागमें येत होता त्यांत नवीन पलटणी असल्यामुळें दक्षिणेंत वरीच गडबड उडाली व नानानें पुणें येथें फौज जमविण्याचें सुरू केलें[२]. पाटीलबावांनीं आजपर्यंत पुणें दरबाराशीं विशेष संबंध न ठेवितां हिंदुस्थानांत मोठा पराक्रम करून पुष्कळ मुलुख आणि दौलत संपादन केली आणि प्रचंड फौज उभारली, यामुळें ते आतां जोरावर व गर्विष्ठ होऊंन पुणें येथें आपलें वर्चस्व स्थापन करण्यास येत आहेत, असा त्यावेळीं सर्वांचा समज होऊन, आतां मराठ्यांच्या राज्यांत कोणत्या उलाढाली होतात, हें पहाण्याकडे

---

१ निजामाकडून महादजीकडे बाबूराव वकील होते,[१] त्यांच्या स्नेहामुळें त्यानीं निजामाची कांहीं बायका माणसें दिल्लीहून बंदोबस्तानें दक्षिणेंत पाठविलीं व पुढें त्यांच्याच मध्यस्तींन नानाफडणिसाविरुद्ध खलबतें चालविलीं. नागपुरकर भों. बखर १४१. २ होळकराची कै. ५९. "Moreover with diplomatic moderation he confined his escort to a single Battlion commanded by Michael Filoze and a body-guard raised for the occasoin by Col. J. Hessing" Compton. 72.

सर्व हिंदुस्थानाचे डोळे लागले[1]. पुण्याचे ब्राह्मण मुत्सदी या हिंदुस्थानच्या प्रचंड व्याघ्राच्या तडाक्यांतून आपला कसा बचाव करतात, याविषयीं हिंदुस्थानांतील प्रत्येक दरबारांत वाटाघाटी होऊं लागल्या.


पाटीलबावांच्या दक्षिणेंतील मोहिमेबद्दल जे निरनिराळे तर्क चालले होते ते बहुतेक खरे होते, हें पुढील भागांतील हकीगतीवरून स्पष्ट होईल; तथापि त्यानां ज्या कृत्यांपासून मराठ्यांच्या साम्राज्याचीं व्यंगें शत्रूंच्या दृष्टोत्पत्तीस येतील, असा दांडगाईचा व बेपर्वाईचा मार्ग अवलंबन आपला कार्यभाग साधावयाचा नसून युक्तीनें, गोडीगुलाबीनें व नाटकी रागरंगानेंच आपल्या हातीं दिल्लीप्रमाणें पुण्याचीं राज्यसूत्रें घ्यावयाचीं होतीं. यावेळीं त्यांच्या बद्दल ज्या कंड्या लोकांनीं पिकविल्या होत्या, त्या कांहीं अंशीं त्यांच्या ऐश्वर्याविषयीं मत्सरबुद्धीनें व त्यांच्या प्रचंडशक्तीच्या भयानें उत्पन्न झाल्या होत्या. पाटीलबावांनीं उज्जनी सोडते वेळीं पुण्याच्या लोकांस चकित करण्यासाठीं आपल्या बरोबर हजारों मौल्यवान हत्ति, घोडे, तंबु, डेरे, इत्यादि निवडक व उंची चिजा घेतल्या होत्या आणि त्यांच्या बरोबर फौजे खेरीज एवढा मोठा लवाजमा होता कीं, त्यांची स्वारी आपल्या मुलुखांतून गेल्यानें पिकापाण्याची दुर्दशा होईल ह्मणून नागपूरच्या भोंसल्यानें, पाटीलबावांनीं दुसऱ्या मार्गानें पुण्यास जावें अशी विनंती केली[2]! नर्मदेच्या आलिकडे येण्याचे अगोदरच पाटीलबोवांनीं नेमाडांतील सत्वास महालांत अहिल्याबाईनें वसविलेलें एक ठाणें हांकून देऊन तेथें आपला अंमल बसविला, त्यामुळें त्या महासाध्वीनें रागावून, भावी गोष्टीचा सूचक शाप दिला कीं, "हा मेला, पुनः हिंदुस्थान पहाणार नाहीं[3]!"

१ ना. भों. ब. १४१. २ ना. भों. ब. १४२. ३ हो. कै. ५९.

# भाग १० वा.

## पुण्यांतला मुक्काम.

### अखेरचा रंग आणि अवतारसमाप्ति.



"हिंदुस्थान गुजराथ सोडुनि शिंदा दखनेंत आला ॥ हुकूम केला बादशहानें त्याला ॥ धृ० ॥ मजल दरमजल नर्मदा उतरून आले पार ॥ धरला दखनचा सुमार ॥ वेगु वेग येऊनि पाणी घेतलें गंगातीर ॥ फौज होती चाळीसहजार ॥ मनीं मनसबा करूनी चढले बालेघांटावर । धरला व्यंकाजी तस्कर ॥ मग कित्येकांसी जरब पोंचली मरून झाले चूर ॥ पळाले पुंड पालेकर ॥ तेथुन जलदीनें कूच करोनी दाखल तुळजापूर ॥ आले दखनांत झाले जाहीर ॥ दखनदेशीं अंबाभवानी दैवत अनिवार ॥ देविसीं केला नमस्कार ॥ चाल धुमाळी॥ दिलें तुळजापूर सोडुनी ॥ गेले चंद्रभागा उतरूनी ॥ खबर ऐकिली श्रीमंतांनीं ॥ दोन कोस आले चालूनी ॥ भेटले हाडपसरच्या रानीं ॥ नेमिली पुण्याची छावणी ॥ जवळ पेठ आहे भवानी ॥ मुक्काम वानवडीवर केला ॥ हुकूम केला बा० ॥ १ ॥

या पोवाड्यांत वर्णन केल्याप्रमाणेंच अलिजहाबहादर यांची स्वारी पुण्यास आली. नर्मदेच्या आलिकडे ते येण्याचे अगोदरच नागपूरचे भोंसल्याचे वकील व्यंकटराव काशी हे त्यांस भेटले. तेव्हां

---

१ पोवाडा. काव्योतिहाससंग्रह. प व या. ५९.

पाटीलबोवांनीं सेनासाहेबांची भेट घेण्यासाठीं नागपुरास जाण्याची इच्छा दर्शविली. परंतु ही वडी स्वारी आपल्या प्रदेशांतून जाऊंनये यासाठींच ह्या वकीलास पाठविलें होतें, ह्मणून त्यानें "पाटीलबावांनीं परस्पर जाऊन प्रथम पेशव्यांचें दर्शन घ्यावें, सेनासाहेब कांहीं आपल्या बाहेर नाहींत," असें मोठ्या युक्तीनें सांगून त्यांचा नागपूरचा बेत रहित केला[1]. महादजीची स्वारी बऱ्हाणपुरास येण्याचे अगोदर ता. २९ मे १७९२ रोजीं, हरिपंत फडके आपल्या फौजेसह पुण्यास दाखल झाले, त्यामुळें नानांच्या जीवांत जीव आल्या सारखें झालें. नानानें इंग्लिशांच्याही कांहीं पलटणी मागितल्या होत्या, परंतु त्या मिळाल्या नाहींत[3]. शिंदे पोंचण्याचे अगोदर आपली फौज पुण्यास जमविण्यासाठीं त्यानें मोठ्या गडबडीनें टिपूशीं तह करविला, त्यांत पुष्कळ मुलुख व पैसा मिळून तुंगभद्रेपर्यंत पेशव्यांचा अंमल पोंचला. ही वेळ अशी भरभराटीची होती कीं चोहोंबाजूंनीं पेशव्याचे फौजेच्या विजयाच्याच बातम्या येत होत्या! या भाग्यवान् पेशव्याच्या कारकीर्दींत मराठ्यांचा क्वचित् अपजय झाला.

पाटीलबावा पुढें पैठणींवरून गोदानदी उतरून, त्यांचें अज्ञातवा-

१ ना. भों. बखर. १४२. २ हो. कै. ५९. G. D. 495. परंतु कित्येक ठिकाणीं ते चैत्रांत (एप्रिल) आले असें आहे. प. व या. ३३३, ५९२. पं. प्र. शकावलींत खुलासा नाहीं. पृ. ३५. ३ G. D. 498. ४ पाटीलबाबा पैठणास आले तेव्हांची एक आख्यायिका सांगतात ती अशी कीं, त्यानीं सदाशिव नाईक वानवळे या सावकाराचें पन्नास लक्ष रुपये कर्ज देणें होतें. शिंदे पैठणास आले तेव्हां त्यांस सावकारानें तगादा केला; तेव्हां पाटीलबोवा बोलले कीं, 'तुमच्यानें धर्म तर होतनाहीं मग रुपये वसूल करून काय करणार?' तेव्हां नाईक बोलले कीं जितके रुपये याल तितका धर्म करतों! तेव्हां त्यांची परीक्षा पहाण्यासाठीं शिंदे यानीं वीस लाख रुपये दिले. शिंदे तेथें असतांच नायकानीं विष्णुयाग करून सर्व पैसा धर्म केला! (लो. हि. वा. ऐ. गोष्टी १०६) महाराष्ट्रांत यावेळीं अपार संपत्ति होती. हिंदुस्थानच्या द्रव्याचा लोट कांहीं वर्षें दक्षिणेकडे वाहत होता. वानवळ्या प्रमाणेंच हरिभक्त, कर्णे, रास्ते, वांकडे, तांबेकर वगैरे कोट्याधीश पुण्यामध्यें होते. मराठ्यांचा व्यवहार बहुतेक सावकारी कर्जावर चाले; जिंकलेल्या मुलुखांचा वसूल व खंडण्या बद्दल वराती होत, यास्तव यावेळीं शेकडों धनाढ्य लोक झाले होते. "या वेळीं पुण्यांत सोन्याचा धूर निघत होता. सगळे पृथ्वींतील वकील पुण्यास होते." सवाईच्या स्वा. बखर. पृ. ४

सांतील रहाण्याचें ठिकाण बीड येथें गेले[१]; तेथें आपल्या गुरूचे स्थानाचें दर्शन घेऊन ते पुढें निघाले. बीड व औरंगाबाद या ठिकाणांशीं आपला पूर्वसंबंध बराच असल्यामुळें हीं स्थळें मराठ्यांकडे यावीं अशी त्यांची फार इच्छा होती ह्मणून, त्यांनीं पेशव्याला औरंगाबाद व आपणाला बीड परगणा द्यावा अशी निजामावर मागणी केली. त्याचप्रमाणें बादशहाच्या वतीनें नजराण्याचीही मागणी चालविली, परंतु निजामानें त्यांतून कांहींच दिलें नाहीं. यावरून निजामाबद्दल त्यांचे मनांत वैषम्य उत्पन्न झालें. निजामाकडे पेशव्यांचा कांहीं मुलुख गुंतलेला होता, तो परत घेण्याबद्दल नानाचे व इतर मराठे मुत्सद्यांचे यत्न चालू होते, त्यांस पाटीलबावा अनुकूळ होते. पुढें बालेवांट चढन शिंदे हे तुळजापुरास जाण्यास निघाले; वाटेंत व्यंकाजी नांवाच्या एका पुंडाचें त्यांनीं पारिपत्य केलें असें वरील पोवाड्यावरून दिसतें. तुळजापुरास त्यांचा कांहीं दिवस मुक्काम होता. तेथें देवीचे नवस फेडून, पुढें जाण्याचे अगोदरच तेथील एका पुजाऱ्याची सुंदर मुलगी त्यांचे दृष्टीस पडली. तिच्या स्वरूपास लुब्ध होऊन, आपल्या वयाकडे लक्ष न देतां त्यानीं तिशीं विवाह केला. पाटीलबावांस पुत्र नव्हता व तो व्हावा अशा इच्छेनें त्यानीं बरींच लग्नें केलीं त्यांपैकींच हें एक लग्न होतें[२]. तेथून पुढें पंढरपुरावरून कूच दरकूच करीत पाटीलबावांची स्वारी ता. ११ जून इ. स. १७९२ रोजीं पुणें येथें संगमावर दाखल झाली. त्यानां भेटण्याकरितां सवाईमाधवराव, नानाफडणीस, हरिपंत फडके हे मोठ्या थाटमाटानें सामोरे गेले. पेशव्यांस पाहून महादजीबावांस अत्यानंद होऊन त्यांनीं आपल्या बरोबरच्या एकंदर फौजेची त्यांचे पुढें सलामी करविली. शिंद्याचे फौजेची टापटीप

---

१ मागें पृ. ४७ पहा. २ Broughton's "Letters from a Mahratta Camp" P. 142

कवाईत व संपत्ति पाहून श्रीमंत फार खूष झाले. नंतर शिंदे हे आपल्या फौजेचा तळ वानवडीस देऊन तेथेंच मुक्काम करून राहिले.

पाटीलबावा पुणें येथें दाखल झाल्या नंतर प्रथमतः पेशवे यांस बादशहानें दिलेली फर्मानें, पोषाख व राजचिन्हें अर्पण करण्याबद्दल बोलणें चाललें. परतु ही बहुमानाची पदवी पेशव्यानीं न स्वीकारितां सातारचे महाराजांकडे पाठवावी असा नानाचा अभिप्राय होता. पेशवे हे छत्रपतिमहाराजांचे मुख्य प्रधान असून आतां बादशाहाची वजीरी त्यानीं घ्यावी व विशेषतः सनदेंतील 'महाराजाधिराज' हें उपपद धारण करावें, ही गोष्ट नानास व सातारचे राजमंडळास पसंत

---

१ ह्या फौजेच्या सलाम्रीचें ( रिव्ह्यू ) वर्णन पेशव्यांचे बखरींत चांगलें दिलें आहे, त्यांतून पुढील उतारा घेतला आहे. "त्यासमयीं महादजी शिंदे यांणीं आपली फौज दुरस्ता फऱ्यानें उभी सरकारचे मुजऱ्यासाठीं केली. एक तर्फेनें घोडेदळ उभें राहिलें. त्यांत पागे व शिलेदार व पठाण हुजरात शिंदे यांची उभी राहिली. दुसऱ्या तर्फेनें चार कंपू उभे केले. त्यांमध्यें तोफा उभ्या राहिल्या. बैल तोफेस जुंपलेले. असा सरंजाम सरकारचे सलामासाठीं उभा केला. त्या वेळेस शिंदे यांचे दौलतीची वर्णना काय करावी? कीं रावणासारखी ज्यास दौलत अशी उपमा!! घोडेस्वार घोड्यांवर स्वार झालेले. त्यांचे डोकीस मंदील, अंगांत झगा, अंगावर शालजोड्या, हातांत शाल नाम्याचा रुमाल, पायांत किनखापी विजारा- असे साज बंदूका बांधून मुजऱ्यासाठीं उभे राहिले. हातांत सोन्याचीं कडीं, गळ्यांत कंठी, कानांत चौकडे, असे स्वार, भालेकरी व आड-हत्यारी व करोले, उभे राहिले. तसेच हत्ती उभे, वरती अंबाऱ्या ठेविलेल्या. याप्रमाणें कोतवाल घोड्यांचा सरकारचे मुजऱ्या साठीं फरा उभा राहिला आहे. दुसरे तर्फेनें कंपू उभे साहा, दोन कोस पर्यंत तोफां सुद्धां उभे केले आहेत. तेव्हां सरकारची स्वारी मुजरा घेत चालली. दुतर्फा मुजरे होऊं लागले. भालदार नांवें घेऊन बोलतात. याप्रमाणें दोन कोस पर्यंत स्वारी सरकारची मुजरे घेत आली. शेवट झाला तेथें उभी राहिली आणि तोफा सोडावयाची व कवाईत करण्याची आज्ञा सरकारची झाली. त्या वेळेस कंपूची कवाईत व तोफेचे अवाज एकदम होऊं लागले तेव्हां तोफांच्या धुराची दाटी झाली. माणसाला माणूस दिसेनासें झालें. बारशें तोफेचा अवाज सुटला. त्या समयीं श्रीमंतांची मर्जी प्रसन्न होऊन स्वारी वाड्यांत जावयास फिरली. शिंदे आपली फौज घेऊन आपले तळावर जावयास निघाले. याप्रमाणें होऊन शिंदे वानवाडीचे तळावर जाऊन उतरले." पे. बखर १५९।१६०.

यावेळीं शिंदे यांचे बराबर २ पलटणी, तोफखाना व ४० हजार स्वार इतकी फौज होती. हो. कै. ५८. प, प्र. श. ३५.

नव्हती. तथापि शिंदे यांचे आग्रहावरून शेवटीं त्याबद्दल साताऱ्याहून महाराजांची मान्यता आणविली व सुमुहूर्त पाहून त्या दिवशीं वस्त्रें व फर्मानें देण्याच्या समारंभाची तयारी सुरू केली. पाटीलबावा पुण्यांत आल्यावर आठदहा दिवसांनीं त्यांचे भेटीस नाना फडणीस गेले. त्या प्रसंगीं महादजीबोवानीं इतका विनय दाखविला कीं नानासमोर बैठकीवर बसण्याचेंही नाकारिलें! नाना हे पेशव्याचे मुख्य दिवाण ह्मणून त्यांचा अत्यंत बहुमान करून सुखदुःखाच्या गोष्टी सांगून त्यांस खूष केलें. दुसऱ्या दिवशीं पाटीलबोवा श्रीमंतांस भेटण्यास शनवारवाड्यांत गेले तेव्हां त्यानीं हिंदुस्थानांतून आणलेल्या अनेक अमोल्य चिजा पेशव्यांस अर्पण केल्या. दुसरे दिवशीं ह्मणजे आषाढ शु. ३ येच्या दिवशीं दुपारीं वानवडीं येथें वर ठरलेला समारंभ व्हावयाचा होता, त्याबद्दल मराठ्यांच्या राजधानींत सगळी तारंबळ उडाली होती.

सर्व पेशव्यांत सवाईमाधवराव यांची कारकीर्द एका अर्थानें फारच भरभराटीची होती. नानासाहेबानीं हिंदुस्थान पादाक्रांत केलें होतें तरी त्यांस स्वस्थता नसून प्रजाही यावेळच्या सारखी सुखी नव्हती. पानिपतच्या पूर्वीं सुद्धां इतक्या ऐश्वर्याचा काळ सगळ्या मराठेशाईत नव्हता ह्मटला तरी शोभेल. पेशवे जरी अल्पवयी होते तरी पुणें दरबारची छाप एकंदर महाराष्ट्र मंडळावर असून, नानानें आपल्या शहाणपणानें सर्वांचें आकलन करून ठेविलें होतें. ह्यावेळीं भोंसले, गायकवाड, शिंदे, होळकर इत्यादि घराणीं जरीं जोरावर झालीं होतीं, तरी अद्यापि सारे मराठे सरदार पेशव्याचे जरीपटक्या भोंवतीं जमण्यास तयार होते. हीच स्थिती कांहीं कालपर्यंत न चालण्यासारखीं यावेळीं तरी कांहीं चिन्हें दिसत नव्हतीं. तथापि पुढें महाराष्ट्राच्या दुर्दैवानें मोठमोठे कर्ते पुरुष, सरदार, मुत्सद्दी व खुद्द पेशवे सुद्धां थोडक्याच काळाच्या अंतरानें मृत्युमुखीं पडल्यानें, सर्व पोराटकी होऊन सुकर्णधार नसल्यानें जसी नौकेची स्थिती व्हावी, त्याचप्रमाणें महाराष्ट्रराज्य नौका खडकावर आदळून तिचीं अनेक शकलें झालीं व तिचा बूड रसातळास गेला!

यावेळीं मराठ्यांचा अंमल सतलज नदी पासून तुंगभद्रेपर्यंत अव्याहत

चालला असून त्यानां एकही बलिष्ट शत्रु उरला नव्हता. जसे बाहेरून शत्रु नव्हते तसे आतां राज्यांतही बखेडे नसून सर्व कारभार सुयंत्र चालू होता. अहिल्याबाईच्या राजपद्धतीनें माळवा ज्या प्रमाणें सुखी होता, त्याचप्रमाणें आलिकडे वऱ्हाड, नागपूर, गुजराथ, महाराष्ट्र, कोंकण वगैरे प्रांतांत, प्रजेस स्वास्थ्य मिळालें होतें. यामुळें चोहोंकडे आबादानी असून, पुण्यांतले लोक लवकरच होणाऱ्या महोत्सवाच्या आनंदांत गढून गेले होते!

समारंभाची जागा शिंदे यांचे लष्करांत वानवडीवर ठरविली होती. तेथें मोठमोठे भरगच्ची डेरे देऊन बैठकीस मौल्यवान गालीचे व मखमालीचे रुजामे घालून दरबारची जागा सुशोभित केली होती. दरबारचे मध्यभागीं बादशहाचें सिंहासन केलें होतें व त्याचे उजवेबाजूस पेशव्यासाठीं तक्त तयार केलें होतें. सगळी तयारी झाल्यावर पाटीलबोवा आपल्या तमाम इतमामासह थाटानें पेशव्यांस बोलाविण्यास आले. तेव्हां पेशव्यांची स्वारी तयार होऊन अलंकारभूषणांनीं शृंगारलेल्या हत्तीवर आयन्याच्या अंबारींत बसून निघाली. त्यांच्यापाठीमागें मुख्य कारभारी नानाफडणवीस यांचा हत्ति असून, मागें पेशव्यांचे फौजेचे सेनापति-हरिपंततात्या व महादजीबोवा यांचे हत्ति होते. त्यांचे मागें एकंदर मोठमोठे मुत्सद्दी, ब्राह्मण सरदार व मराठे सरदार यांच्या स्वाऱ्या होत्या आणि पाठीमागून हुजरातीची व सरदारांची फौज होती. स्वारीपुढें शेंकडों शृंगारलेले कोतवाल घोडे तसेच जरीपटक्याचे व जिलबीचे हत्ति चालले होते. त्याचप्रमाणें डंके, भेरि, नौबद, सनयादि अनेक वाद्यें पुढें वाजत चालली होतीं व शेंकडो भालदार, चोपदार, बल्लम वगैरे ललकारत होते. अशा मोठ्या थाटांत रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या लाखों प्रेक्षकांचे नेत्रांस संतोषवीत श्रीमंत सवाईमाधवराव यांची स्वारी तिसऱ्या प्रहरीं वानवडीस दरबारचे जाग्यावर पोंचली. दरबारांत शिरतांच बादशहाचे सिंहासनास वंदन करून सांप्रदायाप्रमाणें त्यापुढें नजर ठेवून पेशवे आपल्या तक्तावर विराजमान झाले.

नंतर नृत्य गायन सुरू झाल्यावर पाटीलबोवांनीं श्रीमंतांपुढें येऊन विनंती केली कीं, बादशहा शहाअलमगाजी यानीं संतोषित होऊन

दिलेले फर्मान स्वीकार करावें. नंतर त्यांनीं पेशव्यापुढें बादशहानें पाठविलें नऊ पोषाख व भूषणें ठेविलीं, तीं घालण्यासाठीं पेशवे उठून जवळच्या दुसऱ्या तंबूत गेले व पोषाख घालून स्वारी निघणार तोंच मोठ्या अदबीनें पाटीलबोवानीं आपला पूर्वीचा हुजऱ्याचा सेवाधर्म लक्षांत आणून खांकेंतून आणलेला बादशाही जोडा पेशव्यांपुढें ठेविला! मुसलमानांस पादाक्रांत करून जयपूर, जोधपूर व उदेपूर येथील महाराजांसही जिंकून ऐश्वर्याच्या शिखरावर असलेल्या अलिजहाबहादराचीही लीनता व विनय पाहून, पुणेंकर मुत्सद्यांत आश्चर्य वाटलें व ह्या नाटकी वर्तनाचें खरें स्वरूपही त्यांचे लक्षांत आलें! तेव्हां पाटीलबोवा ह्मणाले कीं, 'आपण श्रीमंताचा पुरातन हुजऱ्या, तेव्हां तें नातें कसें सोडावें!' असो. पुढें पेशवे दरबारांत बसल्यावर पारसनवीसानें बादशहाकडून आलेलें फर्मान व वकील-इ-मुतलक व गोवध प्रतिबंधाची सनद हे कागद वाचले. त्यानंतर बादशहानें श्रीमतांस पाठविलेले जिन्नस पुढें आणिले व माहीमरातब, पालखीनालकी इत्यादि राजचिन्हें व वाहनें श्रीमंतास नजर केलीं. त्याबरोबर एकदम हजारों मंगल वाद्यांचा गजर झाला आणि शेंकडो तोफांचे आवाज, भालदार चोपदारांचीं ललकारणी, भाटांचे स्तुतिपाठ, व वारांगनांचें सुंदर गायन ह्यांनीं तो दरबार गजबजून गेला! नंतर पानसुपारी, हारतुरे व अत्तर गुलाब झाल्यावर स्वारी परत जाण्यास निघाली. यावेळीं रात्र होत आल्यामुळें हजारों मशालींच्या व हत्तींवर लाविलेल्या चंद्रज्योतींच्या प्रकाशांत स्वारी नालकींत बसून चालली. नालकीच्या दोन्ही बाजूंस हरिपंत व पाटीलबोवा हे चवऱ्या वारीत होते व पुढें बादशहाकडून आलेले मरातब हत्तींवरून चालले होते. यावेळीं सातार-राजमंडळचे मानकरी व सरदार होते ते मात्र नालकी बरोबर चालले नाहींत, ते मागें पुढें चालत होते. नंतर स्वारी वाड्यांत पोंचल्यावर बादशाही पोषाख उतरून नवा पोषाख घालून दरबारांत आली तेव्हां एकंदर मानकरी, सरदार, पागे, सरकारचे कारभारी, मुत्सद्दी, व शिलेदार यांचे मुजरे व नजर नजराणे झाले. नंतर त्याच बैठकीस पेशव्यांनीं पाटीलबोवास वजिरीच्या गुमास्तगिरीचीं वस्त्रें दिलीं व त्यांचे साठीं बादशहानें पाठ-

विलेला 'राजे महाराज माधवराव शिंदे मदारउलमहा' हा किताब तशींच वस्त्रें, जवाहीर, हत्ति, घोडा, माहीमरातब, नालखी व पालखी हीं सर्व अर्पण केलीं. या प्रमाणें पाटीलबावांच्या इच्छेनुरूप समारंभ साजरा झाल्यावर दरबार खलास झाला.

---

१ बादशहानें दिलेली सनद व मरातबीचें वर्णन पुढें परिशिष्टांत दिलें आहे तें पहावें. समारंभाचें वर्णन 'पेशव्याचे बखरी' चे आधारानें दिल आहे. प्रभाकर कवीनेंही त्याचेवर एक फार सुरस पोवाडा लिहिला आहे, त्यांतून पुढील वेंचा घेतला आहे.

केवढें भाग्य रायाचें । चहुंकडे सेवक यशस्वी हाती हें पुण्य त्या पायांचें ॥ करितां स्मरण जयाचें । कांहीं तरी लाभ व्हावा असें बलवत्तर नांव जयाचें[१] ॥ प्रधानपद मूळ यांचें । सत्रा़शें चवदांत मिळालें वजीरपद बाच्छायाचें ॥ चाल ॥ मुगुटमणी ते पाटीलबावा । कोठवर त्यांचा प्रताप गावा । दर्शनमात्रें तापच जावा । नवस नवसितां फळास यावा । हरहमेशा शत्रुंसि दावा । माहित सगळा मराठी कावा । हुशार फौजा लढाई लावा । जिंकुनि हिंदुस्थान परतले ॥ चाल ॥ चवदा वर्षें बहुत भागले । ह्मणुनि शिरस्ते पाहुनि मागले । तरतुदीस कारभारी लागले । उंच उंच पोषाख चांगले । देऊनि फार मर्जिनें वागले । भेटी समयीं जंबुर डागले । मग तोफांचे बार शिलगले । सूर्यबिंब अगदीं झांकलें ॥ चाल ॥ राव जेव्हां नालकींत बसले । कृष्ण तेव्हां ते जनास दिसले । अर्जुन पाटीलबावा भासले । पायपोस पदरानें पुसिले[२] । चरणीं मिठी माराया घुसले । कर प्रभूनीं बगलेंत खुपसले । इमानी चाकर नाहींत-असले । धन्य धनी आणि धन्य दास ते ॥ इ०.

---

१ श्रीमंत सवाईमाधवराव हे अवतारी पुरुष आहेत अशी पाटीलबावांची व त्या वेळच्या पुष्कळ लोकांची समजूत होती व संकटसमयीं पाटीलबोवा त्यांचें स्मरण करीत अशी आख्यायिका आहे. २ पेशव्यांचे जोडे प्रासादिक ह्मणून पाटीलबोवांनीं आपल्यापाशीं ठेविले होते असें सांगतात.

पेशव्यानीं जी पदवी घेतली ती केवळ पाटीलबोवाच्या आग्रहास्तव घेतली. दक्षिणेंतील अभिमानी मराठ्यांस हा बादशाही डौल मनापासून नको होता. जेव्हां लोकमता विरुद्ध एखादी गोष्ट घडते, तेव्हां कांहीं तरी अपाय होणार अशी लोकांची समजूत होते आणि जे सृष्टींतील चमत्कार नित्य घडणारे असतात त्यांचेकडे अशा प्रसंगीं लोकांचें विशेष लक्ष लागून, त्यांचा संबंध ते वरील गोष्टीशीं जोडतात. त्याच प्रमाणें या समारंभानंतर घडलेल्या कांहीं गोष्टी राज्याचे अपायांची पूर्व चिन्हें, ह्मणून बखर लिहणाऱ्यांनीं नमूद केल्या आहेत. यासालीं पर्वतीवरील श्रीकार्तीकस्वामीच्या देवळावर वीज पडली; शनवार वाड्यांतील सातखणी जळाली; त्र्यंबकेश्वर येथें व मदनगड येथें भूमि चिरली, या प्रमाणें 'भूमि कंप, नक्षत्रपात विद्युल्लतापात ऐशीं दुश्चिन्हें बहुत झालीं,' व याच महिन्यापासून जो दुष्काळ पडला तो पुढें शके १७१५ आश्वीन महिन्या (इ. स. १७९२ जुलै पासून १७९३ आक्टोबर,) पर्यंत होता. त्याचें स्वरूप भयंकर असून अत्यंत महागाई झाली व हजारों माणसें पुण्यांत व मुलुखांत मरण पावलीं.

या समारंभानंतर शिंदे यांचे आग्रहावरून पेशवे एकदांच कायते नालकींत बसून पर्वतीस गेले होते. पुढें हीं सर्व वाहनें व मरातबी दसऱ्याचे वेळीं मात्र निघत.


महादजी शिंदे ह्यांचा दक्षिणेंत येण्याचा मुख्य हेतु पुणें दरबारांत आपलें वर्चस्व स्थापन करण्याचा होता ही गोष्ट नानादि ब्राह्मण मुत्सद्यांचे लक्षांत आली होती. पाटीलबावांच्या मनांतून तरूण व होतकरू पेशव्यांस नानाच्या कडक सासूरवासांतून सोडवून मोकळा करावा व त्यांचे मन आपले विषयीं अनुकूळ करावें असें होतें. ह्मणून त्यानीं दरबारांत वरचेवर जाणें येणें ठेऊन पेशव्यांशीं मोकळ्या मनानें गोष्टी सांगाव्या, नजरा द्यावा, समारंभ करावे आणि त्यांच्या मनोरंजनार्थ

---

१ धा- श. महाराजांचें चरित्र. ५७. प. व या. वगैरे पृ. ५२१।५२३. पं. प्र. श ३५. या नंतर पाटीलबावा, हरिपंत आणि पेशव्यांचें कुटुंब यांचे मृत्यु व पुढें पेशव्यानीं केलेली आत्महत्या वगैरे गोष्टींस अनुलक्षून अशीं च पुष्कळ दुष्ट चिन्हें वरील बखरकारानीं लिहिलीं आहेत.

गेंड्यांच्या लढाया, मल्लांच्या कुस्त्या व कसरती वगैरे वारंवार करवाव्या असा क्रम चालविला. जात्या तरतरीत, व वयपरत्वें स्वतंत्र होऊं पाहणाऱ्या सवाई माधवरावाचें ह्या करमणुकींकडे सहाजीकच मन वळलें व लहानपणापासून नानाच्या नजरे खालीं वागल्यानें कंटाळून जाऊन, त्यांस पाटीलबावा आल्यापासून जरा मोकळीक मिळाली. यामुळें त्यांचें पाटीलबावाकडे विशेष लक्ष लागलेलें पाहून नानासारख्या संशयी पुरुषाचे मनांत शिंद्याबद्दल विशेष स्पर्धा उत्पन्न झाली. इतकें झालें तरी खुद्द पेशव्या कडून नानाची कोणतीच अमर्यादा झाली नव्हती व नाना बद्दल त्याची कृतज्ञता बुद्धि ढळली नाहीं. महादजीनें पुण्याचा कारभार आपल्याकडे असण्याबद्दल पेशव्याकडे संधि पाहून गोष्ट काढली, परंतु त्यांनीं तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. पाटीलबावांचे व पेशव्याचे स्नेहाचें लक्षण जसजसें जास्त दिसूं लागलें, तसतसे नानाच्या मनांत विकल्प येऊन त्यानें पेशव्यावर फारच देखरेख सुरू केली व उघडे दरबार कमी केले. आपला अधिकार जाईल ह्या भीतीनें या फार धूर्त, खोल व अभिमानी, परंतु मत्सरी आणि भित्र्या मुत्सद्यानें यापुढें पेशव्याशीं जें वर्तन सुरू केलें त्या योगानें, अलिकडे झालेल्या एका अशाच महाराष्ट्रांतील राजपुत्राप्रमाणें, या लोकांच्या प्रीतीस पात्र झालेल्या तरूण व तेजस्वी राजपुत्राला आत्महत्या करावी लागली! तरी सुद्धां नानाचे डोळे उघडले नाहींत व ब्राह्मणशाईच्या खोट्या अभिमानानें काळ वेळ न पहातां त्यानें जीं कारस्थानें पुढें केलीं, त्यांच्या योगानें पेशवाई रसातळास गेली. ज्या थोर मुत्सद्यानें कांहीं वर्षें पर्यंत पेशवाईची शक्ति एकवटून मराठ्यांच्या राज्याचें संरक्षण केलें, त्यानेंच आपल्या उतरत्या वयांत चालविल्या कोत्याबुद्धीच्या मसलतीनीं ब्राह्मणशाई नाहींशी झाली. नानाच्या खोलबुद्धीची व त्याच्या मध्यवयांतील मुत्सद्दीपणाची कितीही तरफदारी केली तरी, या पुढें त्याचें वर्तन महाराष्ट्र राज्यास अपायकारक झालें नाहीं असें ह्मणणें आमच्या मतें साहसाचें वाटतें. या पुढें नानानें पेशव्यावर कडक पहारा ठेउन पाटीलबोवांच्या मसलती बंद करण्याचे उपाय चालविले. आपल्या परवानगी वांचून पेशव्यास

कोणी भेटूं नये, स्वारीशिकारीस जाऊं नये, असा बंदोबस्त केला. त्यानें पेशव्यांच्या जवळचीं त्यांच्या स्नेहाचीं माणसें दूर करून आपल्या मसलतींतील चहाडखोर लोकांचा भोंवती पहारा ठेविला! उघडा दरबार बंद होऊन परवानगीशिवाय मोठमोठ्या मुत्सद्यांसही



नाना फडणवीस.

पेशव्याची भेट बंद झाली! नानाचा यावेळचा कारभार सगळा उलटा झाला. "मातबरलोक व फौज सरदार यांचा कंटाळा; महालमुलुख

यांजवर तेज करणें व चढ बसविणें; रयतेची दाद नाहीं; सर्व लोकांचीं व प्रजेचीं कामें बंद झालीं; (आणि) लहान माणसें व शागीर्द कृपेंत वागूं लागले[१]." असे प्रकार सुरू झाल्यामुळें व पेशव्यावर विशेष जरब झाल्यानें माधवरावाच्या चेहऱ्यावर खिन्नता व औदासिन्य भासूं लागलें! हरिपंत फडके सुद्धां नाना ह्मणतील त्यास मान डोलवूं लागले. तात्पर्य पाटीलबावाच्या स्पर्धेनें बिचाऱ्या पेशव्यास नानाची फार जाचणूक होऊं लागली.

यापुढें दरबारांत हिशेबासंबंधानें आणि अलिबहाद्दर व होळकर यांचे संबंधानें पाटीलबावा व नानादिकांचे उघड वादविवाद झाले. तथापि पाटीलबावानीं मुख्य कारभाऱ्याचा स्पष्ट अपमान किंवा उपमर्द न करितां सदोदित आपणाकडे कमीपणा घेण्याचा क्रम ठेविला.

याच सुमारास बंगालच्या खंडणीबद्दल दिल्लीदरबाराकडून अर्थात् पाटीलबावाकडून गव्हर्नरजनरलकडे मागणी गेली. परंतु इंग्रजांनीं पाटीलबावा लढाईस निघत नाहींत, अशा खात्रीमुळें ती खरी व कायदेशीर मागणी मोठ्या जोरानें नाकारिली. ईस्टइंडिया कंपनीचा कमजोर राज्यांशीं संबंध ठेवण्याचा नमुना एकच होता. असल्या कामांत इंग्लिशांचा व्यहवारांतील सचोटीपणा बहुतकरून दृष्टोत्पत्तीस येत नव्हता. पुढें पाटीलबावानींही इंग्रजांचें मन न दुखवितां ती मागणी चालविली नाहीं. पाटीलबावा जर थोडे तरूण असते व पुणें दरबाराचें त्यांस पाठबळ असतें तर खंडणी वसूल करण्याचा निराळा मार्ग त्यानां सुचला असता.

पाटीलबावा दक्षिणेंत येतात न येतात तोंच इस्माईलबेगानें बंडाची तयारी पुनः चालविली, त्यालाही होळकराची फूस होती[२]. रजपुतांकडून मदतीची निराशा झाल्यावर, नजफकुलीखान ह्मणून एक जुना सरदार मेवाडांत रहात होता, त्याची विधवा बायको, गुलामकादराची बहीण, फौज बाळगून होती तिचे आश्रयास तो गेला.

ती बाई सुद्धां तिचे भावाप्रमाणेंच धीट होती, तिनें शिंद्याचे हुकूम न जुमानतां कनोद किल्ल्यांत फौज जमवून लढाई चालविली. तिला

१ धा. श. म. च. पृ. ५८ २ Compton p. 73

इस्माईलबेगाचें सहाय मिळतांच हें बंड जरा पसरूं लागलें. त्यावरून डिबॉइनानें पेरनच्या हाताखालीं चार पलटणी व तोफा देऊन कनोद किल्ल्यावर पाठविलें. या खेपेस कसेंहीकरून इस्माईलबेगास जीवंत अगर मेलेला पकडल्या खेरीज परतूं नये, असा पेरन याला हुकूम होता. इस्माईलबेगानें २०,००० फौज व ३० तोफा बेगमेच्या मदतीस आणिल्या होत्या. पेरनची फौज कनौद येथें पोंचतांच त्यानें किल्ल्या खालीं इस्माईलबेगाची फौज होती तीवर हल्ला करून दोन तासांचे आंत त्यांतील २ हजार लोक ठार केले व त्यांच्या तोफा पकडल्या. तेव्हां बेग राहिलेल्या लोकांसह किल्ल्यांत आश्रयास गेला. त्यामुळें मराठ्यांच्या फौजेनें त्या किल्ल्यास वेढा दिला. तो किल्ला फारच बळकट होता यामुळें पेरनचा उपाय थकण्याची वेळ आली होती, परंतु एक दिवस ती बेगम बुद्धिबळें खेळत असतां मराठ्यांच्या तोफेचा गोळा तिला लागून मरण पावली. तेव्हां फौजेचा धीर सुटून, त्यांनीं इस्माइला विरुद्ध बंड केलें, तेव्हां तो घाबरून पेरनच्या स्वाधीन झाला. त्याला पकडल्याचें वर्तमान समजतांच, ठार मारावा असा पाटीलबोवानीं हुकूम दिला होता, परंतु डिबॉइनानें मध्यस्ती करून त्याचा जीव वांचविला. पुढें त्याला दरमाहा ६०० रुपये खर्चास देऊन आग्र्याच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें, तेथेंच तो इ. स. १७९९ सालीं मरण पावला.

शिंदे यानीं दक्षिणेंत येतानां गोपाळराव भाऊ चिटणीस यांस सरसुभेदार नेमिलें होतें. त्यांचा स्वभाव गर्विष्ट असून त्यांनीं होळकराशीं कांहीं उद्धटपणाचें वर्तन केलें. त्यामुळें त्याशीं घांसाघांसी करण्यापेक्षां आपण दूर जावें या हेतूनें होळकरानें जयपूरप्रांतांत स्वारी करून आपल्या खंडणीबद्दल मागणी केली. इतक्यांत होळकराचा एक सरदार खुशालकुंवर नांवाचा होता, त्यानें शिंदे यांचे अंमलांतील एका गांवांत कांहीं खासगी कामासाठीं मुक्काम केला. तेव्हां कसा तरी लढाईचा प्रसंग आणण्याच्या इराद्यानें गोपाळरावानें त्याच्यावर लखबादादास पांच हजार फौजेनिशीं पाठविला. तेव्हां

1 Compton, 224.

त्यांनीं त्याचेवर हल्ला केल्या मुळें त्यानेंही लढाई चालविली. पुढें तो पडल्यावर त्याचे लोकांनीं जिवावर उदार होऊन तो गांव सोडून ते होळकरास जाऊन मिळाले. पुढें होळकरानें कांहीं खंडणीच्या पैशा बद्दल जयपूरवाल्यांच्या माचेरीवाल्यावर वराती घेतल्या होत्या. तो पैसा वसूल करण्यास बापू होळकर गेले, तेव्हां गोपाळराव भाऊनें हरकत केली कीं, माचेरीवाल्यानें आपले दहा लाख रुपये देणें आहेत ते देईपर्यंत तुह्मीं वसूल करूं नये. अशी तक्रार करूनही स्वस्थ न राहतां त्यानें आपली फौज पुढें आणिली. इतक्यांत दोन्हीं पक्षांकडील पेंढाऱ्यांत मारामारी सुरू होऊन लढाईचा बेत आला, तरी शिंद्याचे बड्या फौजेशीं लढाई करणें चांगलें नाहीं असें मनांत आणून होळकरानें मागें सरून बनास नदीचे तीरीं मुक्काम केला. याच वेळीं जयपूरकरांनीं दोघांसही सांगितलें कीं, ज्याचे मनगटांत जास्त जोर असेल त्यानें पैका वसूल करून घ्यावा. त्यावरून गोपाळराव व जिवबादादा याणीं खुद्द तुकोजी होळकरावर हल्ला करून त्याला बनास नदी पार हांकून त्याचे पाठीवर फौज ठेविली. तेव्हां होळकरासही राग येऊन त्यानें सड्या स्वारीनें हारावती प्रांतांत आपल्या एका मजबूद गढींत मुक्काम करून मोठ्या तारांबळीनें अहिल्याबाईस कुमक पाठविण्याविषयीं लिहिलें. तेव्हां त्या रागीट व अभिमानी बाईनें तावडतोब मोठी कुमक पाठविली. त्याशिवाय यावेळीं होळकराकडे डिड्रुनेक ( ढुंजरनेक ) नामक फ्रेंच सरदारानें कवायती शिकलेल्या चार पलटणी व तोफखाना उभारिला होता. शिंद्याच्या फौजेच्या भीतीनेंच होळकरास अशी पायदळ फौज तयार करावी लागली. पुढें होळकराच्या स्वारांनीं दोनतीन महिने शिंद्याचे फौजेस कोट्याचे आसपास फिरवून जेरीस आणिल्यामुळें अंतर्वेदींतील वसुलाचा हिस्सा देण्याचें कबूल करून गोपाळराव वगैरे मंडळीनें तंटा मिटविला होता, परंतु मल्हारराव होळकर या तरूण सरदारानें अखेरीस लढाईचा प्रसंग आणिला. शिंद्याची फौज गोपाळराव, जिवबादादा, लखबादादा, डिबॉइन वगैरे सरदारांच्या हाता खालीं होती. त्यांचे कडे २०,००० स्वार, डिबॉयनची ९ हजारांची एक ब्रिगेड व ८० तोफा होत्या.

होळकराकडे जुंजरनेक, मल्हारराव, काशीराव व तुकोजी होळकर असे सरदार होते आणि ३०,०००स्वार, कवाइतींचीं चार पलटणें व पुष्कळ तोफा होत्या. या दोन्हीं फौजांची गांठ लाखेरीच्या बारींत पडली. प्रथम डिबॉइनानें होळकरावर तीन पलटणी व ५०० रोहिले स्वार पाठविले. लढाईची जागा बिकट असून सर्व फौज उभी रहाण्या पुर्ती खुला मार्गही नव्हता. इतक्यांत शिंदे यांचे फौजे जवळ असलेली दारू अकस्मात् पेटून मोठा घोटाळा झाला. तेव्हां होळकराचे स्वारांनीं चाल केली, परंतु डिबॉइनानें त्याच सुमारास पुनः आपले लोक गोळा करून स्वारांवर बंदूक चालविली तेव्हां ते पळूं लागले; परंतु जुंजरनेकच्या लोकांस पळून जाववेना, यामुळें त्यांच्यावर हल्ला होऊन ते सारे लोक कापले गेले आणि त्यांच्या ३८ तोफा शिंद्याचे फौजेनें घेतल्या. या लढाईत डिबॉइनालाही जखम लागली. लढाई सकाळ पासून तिसरे प्रहरापर्यंत चालून होळकराचे लोक पाण्यासाठीं व्याकूळ होऊन पळूं लागले. ज्या मल्हाररावाचे भरंवशावर ही लढाई जुंपली तो गोळी लागून पडला होता, त्याला हत्तीवर घालून नेलें. ही लढाई फारच निकराची झाली असें डिबॉइनाचें मत होतें. यावेळीं होळकराचा फार नाश झाला व लखबादादा, जिवबादादा यांनीं जर पाठलाग केला असता तर होळकरास त्यांनीं कैदच केलें असतें. परंतु झालें तितकें पुरे असें ह्मणून शिंद्याचे सरदारांनीं पुढें जास्त नाश न करितां ते आपली फौज घेऊन उदेपुराकडे गेले व होळकर माळव्यांत परतले. ही लढाई ता. २० सपटंबर १७९२ रोजीं झाली. होळकराच्या लोकांनींही परत येतानां शिंद्याचीं उज्जनी[1] वगैरे ठाणीं लुटलीं.

ह्या लढाईची बातमी पुणें येथें समजतांच चिटणिसानें विजयदर्शक तोफा सोडण्याची परवानगी मागितली, परंतु महादजीनें धिक्कारून ती दिली नाहीं. आपल्या व होळकरांचे घराण्यांतील तंटा आपल्यामागें सरदारांनीं एवढ्या स्वरूपास आणिल्याबद्दल पाटीलबावांस वाईट वाटून, ते

---

१ उज्जनी लुटल्या बद्दल ग्रांटडफच्या शिवाय दुसरा आधार नाहीं. मालकम व मराठी बखरीकार याचा उल्लेख करीत नाहींत.

ह्मणाले, “आपसांत कटकट करून जन्माचे भाऊपणांत पाणी घातलें! तोफा सोडाव्या असें मला वाटत नाहीं. याउप्पर सुभेदारांची माझी भेट होत नाहीं!” असें बोलतांना पाटीलबावा गहिंवरून आले. आपल्या सरदारांनीं केलेल्या अमर्यादेबद्दल त्यानीं गोपाळराव भाऊंस कमी करून भेलसें येथें कैदेंत ठेविलें व जिवबादादास आपणापाशीं पुण्यास आणिलें. त्यांच्या मागें हिंदुस्थानचा कारभार जगन्नाथराम (जगून्नापू) व लखबादादा यांचेकडे सोंपविला व डिबॉइनाला फौजेवर मुख्य केलें[1]. होळकरांशीं जी लढाई झाली तो प्रसंग केवळ पाटीलबावांच्या उतावीळ सरदारांनीं आणिला होता, त्यानीं स्वतः यागोष्टीला कधींही अनुमोदन दिलें नाहीं. हा तंटा खंडणीच्या व मुलुखाच्या वाटणीबद्दल असून त्याचा निकाला पेशव्याचे दरबारांत थंडपणानें झाला असता, परंतु यापुढें होणाऱ्या अनर्थांचीं हीं सूचक दुष्ट चिन्हें एव्हांच दिसूं लागलीं! पुढें होळकरानेंही मुद्दाम जास्त कवायतींचे कंपू तयार करविले व बाजीरावाच्या कारकीर्दीच्या प्रारंभास कर्ते व शहाणे पुरूष गेल्यामुळें शिंदेहोळकरांच्या फौजा पुण्यांत लढूं लागल्या[2]!

होळकराचें व शिंद्याचे फौजेचें युद्ध जुंपलेलें पाहून जयपूरचा राणा प्रतापसिंग यानें खंडणी देण्याची टंगळमंगळ चालविली, त्यावरून डिबॉइनानें लाखेरीच्या लढाई नंतर आपली फौज त्याच्यावर नेली, तेव्हां तो शरण येऊन त्यानें सर्व पैसा दिला व डिबॉइनाचा दरबारांत फार चांगला सत्कार करून त्यास निरोप दिला. तेथून हा पाटीलबावांचा अत्यंत विश्वासूक सरदार दुआबांत परत जात असतां अलवारचे राजास भेटण्यास माचेरी येथें गेला. तेव्हां त्याला दरबारांत मारण्याचा बेत ठरला होता, परंतु तो वेळेवर समजल्यामुळें निभावला[3].

---

१ नानाशीं मसलती केल्याबद्दल गोपाळरावास दूर केलें असेंही आढळतें. Compton p. 77. याच पुस्तकांत गोपाळरावा नंतर सरसुभेदारी पाटीलबावानीं डिबॉइनाला दिली असें लिहिलें आहे. परंतु हो. कै. पृ. ६५ पहा.–२ होळकराशीं लढाई करण्यांत पाटीलबावांचा हेतू नसून, हा तंटा फक्त उभय पक्षांच्या सरदारांत आकस्मिक झाला, असें मालकमसाहेब ह्मणतो. Malcome, Vol I p. 190
3 Compton p. 75.

हिंदुस्थानांतील शिंद्याचे फौजांनीं केलेल्या तंट्याचें वर्तमान पुणें येथें कळतांच दोन्हीं पक्षांनीं लढाई बंद करावी असा दरबारचा-ही हुकूम गेला, तथापि कदाचित् महादजीस वाईट वाटून तो आपल्या फौजांच्या जोरावर एखादा घोंटाळा करील, या भयास्तव नानानें पर्शुरामभाऊंला फौज व तोफखाना घेऊन तासगांवाहून पुण्यास आणविलें. त्यामुळें महादजीनेंही पेरनच्या हाताखालील पलटणी हिंदुस्थानांतून आपणाजवळ आणविल्या. परंतु ही फक्त परस्पर संशयामुळें तयारी होती, वास्तविक पहातां दोघांचाही इतक्या थरास तंटा पोंचविण्याची इच्छा नव्हती.

पाटीलबावांचा हिशोबासंबंधानें वादविवाद चालत असे, असें वर सांगितलेंच आहे. एके दिवशीं भरदरबारांत पाटीलबावा बोलले कीं, 'इतके दिवस स्वाऱ्या व मुलुखगिऱ्या करून पुष्कळ देश जिंकले व वजिरात वगैरे मिळवून श्रीमंतांचा लौकीक अटकेपर्यंत केला, तर आतां शेवटली इच्छा हुजूरच्या जवळ राहून दौलतीचा कारभार करण्याविषयीं आहे. त्यासाठीं माझे दौलतीचा हिशेब आपण घ्यावा व सरकारचे दौलतीचा हिशेब मला द्यावा!' हें उघड दरबारांतलें भाषण ऐकून पाटीलबावांचा मनोरथ सर्वांस कळला आणि नाना व फडके यांस त्याबद्दल फार वाईट वाटलें[1]. दिवसेंदिवस अनेक कारणांवरून ही वाटाघाट जास्त होऊं लागली व पाटीलबोवा नानाच्या अधिकारांतील कामांत वेलाशक ढवळाढवळ करूं लागले.

यावेळीं रघुनाथ शंकराजी सचीव हे अल्पवयी असल्यामुळें संस्थानची व्यवस्था त्यांचे कडून काढून घेऊन, नानानें बाजी मोरेश्वर नांवाच्या एका आपल्या मनुष्याकडे सोंपविली. हा मनुष्य लोकप्रिय नव्हता. नानाचें करणें पाटीलबोवांस नावडून त्यानीं सचीवास पुणें येथें आणून बाजी मोरेश्वरास दूर करविलें. त्यासंबंधानें बोलतानां पाटीलबोवानीं नानाची भरदरबारांत निर्भर्त्सना केली[2].

फत्तेसिंग गायकवाड इ. स. १७८९ त मरण पावल्यावर त्याच्या

१ पे. ब. १६३. २ ना. भों. ब. १४३. धा. श. म. चरित्र. ५९.

बंधुंमध्यें गादीबद्दल विवाद उत्पन्न झाला. गोविंदराव गायकवाडाचा गादीवर वडीलपणामुळें अधिक हक्क असतांही नानाफडणवीसानें पुष्कळ खंडणी व नजराणा घेऊन मानाजी गायकवाडाचा पक्ष घेतला. परंतु पुढें महादजी शिंदे याचे मध्यस्तीनें गोविंदरावानें आपला अर्ज पेशव्यापुढें ठेविला. त्यामुळें निरुपायास्तव नानानें पहिली नेमणूक रद्द करून गोविंदरावास सेनाखासखेलीचीं वस्त्रें दिलीं. त्यावेळीं मानाजीनें मुंबईचे सरकार व मिस्तर मालेट यांचे मार्फत पुष्कळ खटपट केली व कांहींतरी तोड करण्यास सुचविलें. परंतु त्याला महादजी प्रतिकूळ असल्यामुळें गोविंदरावाची नेमणूकच पुढें कायम झाली[1].

सांवतवाडीच्या थोरल्या खेमसांवतास जयाप्पा शिंदे याची मुलगी लक्ष्मीबाई दिली होती. त्यामुळें खेमसांवतास बादशहा कडून 'राजेबहाद्दूर' हा किताब व मोरचेल वगैरे राजचिन्हें महादजीनें देवविलीं होतीं. परंतु ही गोष्ट कोल्हापूरकरांस नावडून त्यानीं वाडीकरांवर स्वारी करून त्यांचे कांहीं गड घेतले. वाडीकरांचा मुलुख या सालीं पाटीलबावा व पर्शुरामभाऊ यांचे जरबेनें कोल्हापूरच्या राजानें परत दिला.

वाडीकर देसाई समुद्रांत चांचेपणाकरून इंग्रजांचीं गलबतें लुटीत, त्यामुळें त्यांचेवर मुंबई सरकाराचा राग झाला होता, शेवटीं महादजी शिंदे यांचे मध्यस्तीनें त्याचा निकाल झाला.

हीं राजकीय प्रकरणें चाललीं असतां आपल्या हातांत कारभार येण्या बद्दल पाटीलबावांची पेशव्याजवळ खटपट चाललीच होती. परंतु स्पष्टपणें पेशव्याशीं मसलत करण्यास त्यांस सवड सांपडत नसे, कारण नानाच्या पक्षाचीं माणसें श्रीमंतांभोंवती रात्रंदिवस हजर होतीं. तथापि एक दिवस पेशवे व पाटीलबोवा पर्वतीहून परत येत असतां हिराबागेच्या मागें तलावांत नावेंत बसून चालले[3]. त्या नांवेंत

---

१ या मदतीबद्दल महादजीनें गोविंदरावाकडून तीन लाख रुपये घेतले व आपली मुलगी आनंदरावास देण्याचें ठरविलें. Wallace "Giucowair" p.69.

२ "Selections From Bombay Government Record." No X; new series- p. 3,159.  ३ ग्रांट डफ लोहगांवच्या तलावांत असें लिहितो.

एका नानाख्याखेरीज दुसरा परका मनुष्य नव्हता असें पाहून, आपणास कारभार द्यावा ह्मणजे सर्व राज्याचा बंदोबस्त करून नानाचाही बंदोबस्त करतों असें पाटील ह्मणाले. तेव्हां सुद्धां पेशव्यानें कबूली दिली नाहीं व उलट असें उत्तर केलें कीं " नाना व तुह्मीं माझे दोन हात; उजवा हात नाना व डावा तुह्मीं. या दोन हातांपैकीं कोणताही हात कमी झाला तरी मीं लंगडा होणार! या करितां आहे व्यवस्था हीच चालावी हें उत्तम! " या उत्तरा पुढें पाटीलबावा खजील होऊन स्वस्थ बसले. ही सुद्धां बातमी नानांस समजतांच त्यानीं एके दिवशीं पेशव्याची एकांतांत भेट घेऊन त्यांचेवर आपण लहानपणापासून कोणते उपकार केले, राघोबाचें बंड कसें मोडलें, राज्य कसें वाढविलें वगैरे सर्व गोष्टींचा त्यांचे पुढें पाढा वाचला आणि पाटीलबावांचा ब्राह्मणशाई मोडण्याचा घाट चाललेला आहे हेंही सांगितलें; हें सांगत असतां नानाच्या डोळ्यांत अश्रु आले! तेव्हां पेशव्यानें त्यांस आश्वासन देऊन निरोप दिला.

महादजीच्या मनांत कारभार करण्याचें पूर्वींपासून होतें[1], परंतु तेव्हां संधी नव्हती. आतां त्यांची फौज भारी होऊन, त्यानीं त्याच उद्देशानें पुणें येथें मुक्काम केल्यामुळें, या कारस्थानाचा परिणाम वाईट होणार असें ध्यानांत आणून नाना व हरिपंत यांनीं काशीयात्रेस जाण्याचा निश्चय केला; आणि एक दिवस दोनप्रहरीं हरिपंत एकाएकीं सड्यास्वारीनें पाटीलबोवांस भेटण्यास वानवडीस गेले. असे ते एकटेच व उदासीन मुद्रेनें आलेले पाहून पाटीलबावांसही आश्चर्य वाटलें. त्यांनीं पंतांचें रीतीप्रमाणें आगतस्वागत करून, येण्याचें कारण विचारिलें, तेव्हां हरिपंत ह्मणाले, 'अहो बावा, यावयाचें कारण तुह्मीं सरकारचा कारभार करणार, नानानीं व मीं कारभारांत नसावें. आह्मीं उभयतां सरकारचे अपराधी, ह्मणून तुह्मापाशीं आलों. काय पारिपत्य करावयाचें असेल तें करावें, कोणीकडून श्रीमंताचें राज्य निर्विघ्नपणें चालावें हा आमचा संकल्प आहे." हें ऐकून पाटीलबानीं आपला तसा हेतू होता, तरी ज्याअर्थीं स्वतः श्रीमंतांचीही मर्जी

१ मागें पृष्ठ १४५ पहा.

नाहीं त्याअर्थी आतां आपण ती खटपट करीत नाहीं, असें स्वच्छ मनानें सांगितल्यावर, परस्परांच्या आणाभाका होऊन पुष्कळ राजकीय गोष्टींचा विचार झाला. त्यांत निजामानें पेशव्याशीं विरोध करून बेदरापर्यंत चाल केली होती, हेंही वर्तमान निघालें. नंतर पाटीलबावानीं तात्यांस वस्त्रें व जवाहीर देऊन निरोप दिला. निजामानें रघुनाथरावाच्या वेळीं पेशव्यांचा मुलुख बळकाविला होता, तो परत घेण्याचा मराठ्यांचा यावेळीं इरादा होता, परंतु पाटीलबावाचें संधान राखावें अशी मशीरउल्मुल्क याची यावेळीं मसलत असावी असें दिसतें. या बैठकीस हरिपंतानीं जी शिष्टाई केली तिचा चांगला उपयोग होऊन, यापुढें नाना व पाटीलबावा या उभयतांचा समेट झाला[1].

यापुढें दरबार नित्याप्रमाणें चालू झाले व एक दिवस शनवार वाड्यांत पाटीलबावा, नाना, हरिपंत यांच्या एकांतांत भेटी होऊन भाषणें झालीं. "त्या बैठकींत त्रिवर्गांचीं बोलणीं परस्पर होऊन तिघांचे चित्ताची प्रांजळता झाली. कोणाचे चित्तास कारभाराविषयीं कांहीं एक किंतु राहिला नाहीं[2]." पुढें तिघेही उठून श्रीमंतांजवळ आरसे महालांत गोष्टी सांगत बसले. याच बैठकींत पाटीलबावा गोष्टींच्या नादांत सरकत सरकत पेशव्यांचे मसनदी जवळ गेले, तें पाहून श्रीमंतांजवळ तुळाराम मिरधे हा उभा होता, त्यानें स्पष्टपणें पाटीलबावांस इषारा दिला, तेव्हां ते चपापून मागें सरकले, आणि दरबार उठतांच त्यानीं त्याला बक्षीस दिलें!

यानंतर पूर्ववत् उत्साह व मेजवान्या चालूच होत्या. इतक्यांत पेशव्यांचें कुटुंब मरण पावल्यामुळें, थोडक्याच दिवसांनीं त्यांचें दुसरें लग्न झालें. त्या समारंभांत पाटीलबावा वगैरे पुढारी होते. मध्यंतरीं पुण्यांत पूर्वी कधीं न झालेला असा अतसबाजीचा व दारूकामाचा मोठा समारंभ पेशव्यांचे मनोरंजनार्थ पाटीलबोवानीं केला. पुढें शिमग्यामध्यें हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांच्या सांप्रदायाप्रमाणें रंगाचा मोठा उत्सव करण्याचें पाटीलबोवांनीं ठरविलें. पाटीलबावांचा पुण्यास मुक्काम झाल्यापासून त्यांनीं नानाच्या कडक दरबारांत

---

१ पे. ब. १६६. ना. भों. ब. १४४. २ पे. ब. १६६.

मोंगलाईतील व हिंदुस्थानांतील जे अनेक विलास परिपाठांत आणिले त्यांतीलच हा रंगाचा महोत्सव झाला. ही वेळ पेशवाईच्या ऐन रंगाची असून हा अखेरचा रंग झाल्यावर मराठेशाईचा अपकर्ष सुरू झाला, आणि यापुढें पाटीलबावा व तात्या हे दुसरा महोत्सव पहाण्यास जीवंत राहिले नाहींत ह्यास्तव त्यांचे आयुष्यांतील व मराठ्यांच्या राज्यांतील हा शेवटला महोत्सव ह्मणून, आह्मीं या रंगाचे वर्णनाचा उतारा वाचकांसाठीं मुद्दाम दिला आहे.

" मग शिंदे यांणीं तयारी रंगाची आपले लष्करांत केली. तसेंच ज्या ज्या रस्त्याचे लोकांस आज्ञा झाली त्यांणीं ही आपले ठिकाणीं रंगाची तयारी दुरस्ता केली. तसेंच शिंदे यांचे लष्करांत रंगाची तयारी केली. खेरीज जागो जागीं वाटेनें सरकारचे व शिंदे यांजकडील हौद भरून ठेविले. गुलालाची तयारी झाली. सरदार व मानकरी व पागे, पथके, शिलेदार, एकांडे, मुत्सद्दी व कारभारी व कारकून मंडळी असे तमाम तयार होऊन वाड्यापाशीं आले. तशीच सर्व फौज व हत्ती व सांडणी स्वार असे तयार होऊन उभे राहिले. सरकारची ही निघण्याची तयारी झाली. निघावयाचे वेळेस वाड्यांत थोरल्या चौकांत बिछायत करून सरकारची स्वारी येऊन तेथें बसली. त्या वेळेस नाना व तात्या व आपा बळवंत, पेठे, त्रिंबकराव परचुरे, नारोपंत चक्रदेव असे सर्व लहान थोर, खेरीज ब्राह्मण सरदार—रास्ते, विंचूरकर, ओढेकर, बाहिरो अनंत, राजे बहाद्दर, पानशे, पुरंदरे, माधवराव रामचंद्र, मराठे मंडळ—घोरपडे, निंबाळकर, पाटणकर, मोहिते, दरेकर, मानाजी फांकडे, जोताजी जाधवराव, पाठीमागोन पटवर्धन, माधवराव रामचंद्र बिनीवाले, व बेहरे,—असे सर्व येऊन नाचास बसले. तमाम पागे-धायबर, निकम, भोइटे, थोरात, बाबुराव अनंत, भास्कर जगन्नाथ, निळकंठराव, रामचंद्र, अवधूतराव येशवंत, असे बावन्न पागे बैठकेस येऊन दाखल झाले. वानवडीहून महादजी शिंदे तयार होऊन सरकारची स्वारी न्यावयास आले. असे समाज वाड्यांत मिळाले. तेथें रंग खेळावयास प्रारंभ झाला. त्या रंगाची वर्णन

किती करावी ? हजारों गुलालगोटे उडूं लागले. रंगाचे बंब चालूं लागले. तसाच गुलाल खंड्याचे खंड्या वाड्यांत उडाला.

"असा रंग खेळून सरकारची स्वारी सायंकाळचे दहा घटिका दिवसास वानवडीस जाण्यास अंबारींत बसून खवासखान्यांत महादजी शिंदे व आप्पा बळवंत पाठीमागें बसले. वाडा डावा घालून, सरकारची स्वारी बुधवारांतून, कापड-आळीनें आदितवारांत हरिपंत तात्यांचे वाड्यापाशीं येई तों पर्यंत वाटेनें सरकारचे लोकांनीं रंग करून ठेविला होता त्यांनीं एकच गर्दी रंगाची केली. तसेंच हरिपंत तात्याचे वाड्यापाशीं स्वारी आल्यानंतर तेथें दोन घटिकापर्यंत रंगाचा मार झाला. त्या रंगाच्या योगानें रस्त्यानें चिखल पडला. व शेकडों पल्ले गुलाल उधळला. असा दोन घटिका येथें रंग खेळून सरकारची स्वारी पुढें रंग खेळत चालली. शेकडों पल्ले गुलाल हत्तींवर ठेविला होता तो रस्त्यांत उधळीत चालले. असे नाकझरी उतरून रास्ते यांचे पेठेंतून चालले असतां, तसे खेळत रास्ते यांचे वाड्यापाशीं आले. तेथें रास्ते यांनीं रंगाचा समारंभ केला. गच्चयांवरून रंगाचे बंब उडूं लागले. तेव्हां स्वारीमध्यें जसा पर्जन्य पडतो असा रंग पडूं लागला. दोन घटिका तेथें रंग खेळून वानवडीस स्वारी दाखल झाली.

मग जेथें श्रीमंत बसावयाची जागा केली होती, तेथें ते जाऊन बसले. तेव्हां झाडून सरदार, मानकरी, पागे व मुत्सद्दी व कारकून त्या कचेरीस येऊन बसले. बसल्यानंतर दोन घटिकापर्यंत नाच व गाणें झालें. नंतर रंग खेळावयास प्रारंभ झाला. रंग खेळतां खेळतां रंगाचे पाट नदीस मिळाले. असा रंग द्वापारयुगीं श्रीकृष्ण भगवान् खेळले. तसा कलियुगीं श्रीमंत सवाईमाधवराव खेळले. असा कोणी पुढें खेळावयाचा नाहीं व मागेंही कोणी खेळला नाहीं. रस्त्यामध्यें गुलालाचा पेर व रंगाचा चिखल झाला तो किती गणतीस धरावा ? असा रंग खेळल्यानंतर सरकारची स्वारी स्नानास उठली. त्या समयीं शिंदे यांनीं शेकडों कढ्या पाण्याच्या तापत ठेविलेल्या होत्या. शेकडों ब्राह्मण पाणक्ये घंगाळ घागरी घेऊन उभे. असा बंदोबस्त स्नानाचा ब्राह्मण मंडळीचा झाला. तसाच मराठे सरदार, मानकरी यांचा बंदो-

बस्त केला होता. मग अवघ्यांचीं स्नानें झाल्यानंतर ज्या कचेरीस रंग खेळले त्याच मखमाली डेऱ्यांत फरास यानें येऊन, ती बिछायत काढून, नवी बिछायत घालून तयारी केली. सर्व मंडळी लहान थोर स्नानें करून, नवीन वस्त्रें घेऊन येऊन कचेरीस बसली. मग नाचास प्रारंभ झाला. मग महादजी शिंदे यांनीं श्रीमंतांस सर्व पोषाग, जवाहीर, शीरपेंच व तुरा वगैरे गळ्यांत मोत्यांच्या माळा असा दिला. तसेंच सर्व कारभारी, मुत्सद्दी व कारकून मंडळी व शिलेदार लोक व मानकरी व हुजुरातेचे लोक व पागे पथके असे सर्वांस शिंदे ह्यांनीं पोषाग वांटून नंतर पानसुपारी, अत्तर, गुलाब हारतुरे गजरे, दिले. इतका समारंभ होई तों तीन घटिका रात्र झाली.

मग सरकारची स्वारी पुण्यास यावयास निघाली तेव्हां हजार पांचशें दुशाका हत्तीवर लावून मोठ्या थाटानें स्वारी मोठ्या डौलानें चालली. ज्या समयीं स्वारी माघारी आली त्या समयीं शहरांत दुरस्ता चिराखदानें करून लोक आपापल्या माड्यांवरून दिवे लावून तमाशा पहावयास उभे राहिले. त्यांनीं त्या दिवशीं सोन्यारुप्याचीं फुलें श्रीमंताचे अंबारीवर उडविलीं. अशा थाटानें स्वारी वाड्यांत दहा घटिका रात्रीचे अमलांत दाखल होऊन श्रीमंत मसनदीवर बसले. सर्व मंडळीस पानसुपारी,अत्तरगुलाब देऊन घरीं जाण्याची आज्ञा सर्वांस झाली. त्यासमयीं सर्वांनीं नजरनजराणे करून आपले ठिकाणीं सर्व लहानथोर गेले. असा रंगाचा समारंभ झाला. चैत्र शुद्ध १ शके १७१९,प्रमादी नामसंवत्सरे.[1]"

पुढें इ. स. १७९४ च्या फेब्रुआरी महिन्यांत पाटीलबावांस एकाएकीं ताप येऊन तो नवज्वरावर गेला. त्यांचा या दुखण्यांत शेवट होईल असें कोणाच्या ध्यानीं मनींही नसतां त्यांस ता. १२ फेब्रुआरी, शके १७१९, प्रमादी संवत्सरांत माघ शुद्ध १३ बुधवारीं पांच घटिका रात्रीं वानवडी येथें देवाज्ञा झाली. त्या दिवशीं श्रीमंत वगैरे

१ पे.ब.१७०. २ प. व यादी. ५१५-५२१; पं. प्र. श. ३६;सरंजामे ३४; ह्यांत ही तिथी दिली आहे. परंतु पे. ब. "भाद्रपदमासीं," धा. शा. म. च. "माघ वद्य १३" असें देतात. इंग्लिश ग्रंथकार ता. १२ फेब्रुआरी देतात त्यादिवशीं बुधवार असून शुद्ध ११ पडते. ही मिति म. सा. छो. ब. १०४, यांत मात्र दिली आहे.

मोठ मोठे समाचारास गेले होते, त्यानां अत्यंत दुःख झालें, आणि मराठ्यांच्या राज्यांतला मोहरा गेलेला पाहून सर्वत्र औदासिन्य भासूं लागलें. त्यांच्या मृत्यूमुळें राज्याची एक बाजूच खचली[१]!

मरणसमयीं पाटीलबावांचें वय ६७ वर्षांचें होतें[२]. पाटीलबावांच्या मागें पुत्रसंतति नसल्यामुळें त्यानां सुद्धां आपल्या दौलतीची काळजी होती. पुत्र होईल अशी त्यांची फार इच्छा होती, परंतु त्याविषयीं निराशा झाल्यावर त्यानीं आपला धाकटा बंधू तुकोजी याचा नातू दौलतराव यास दत्तक घेण्याची इच्छा दर्शविली होती. तुकोजीला केदारजी, खळोजी व आनंदराव असे तिघे पुत्र होते. केदारजी संतति शिवाय मरण पावला होता, खळोजीला दोन मुलगे होते, तथापि महादजीचें प्रेम आनंदरावाचा मुलगा दौलतराव यांचेवर फार होतें व त्याला दत्तक घेण्याबद्दल त्यानें अनेक वेळां बोलून दाखविलें होतें. पाटीलबावांच्या अंतकाळीं दौलतराव तुळजापुरास होते, ते तिसऱ्या दिवशीं येऊन त्यानीं क्रियाकर्मांतर केलें. पुढें १२ वे दिवशींच नानानीं पेशव्यांचे संमतीनें त्यांस दौलतीवर स्थापन करून बाहशाही मानममरातब दिले. त्याचें दत्तविधान होऊं नये अशी लक्ष्मीबाईनें मात्र हरकत घेतली होती. पाटीलबोवांच्या देहाचें सार्थक वानवडीवर ओढ्याचे कांठीं झालें, तेथें त्यांची छत्री बांधण्यास सुरवातही केली होती[३], परंतु आज शंभर वर्षांत या आपल्या इतिहासप्रसिद्ध व दौलत संपादन करणाऱ्या पूर्वजाचें योग्य स्मारक करण्याचें त्यांच्या वंशजांचे मनांत आलें नाहीं, हें आश्चर्य आहे! शिंदे सरकारचे राज्यांत लाखों रुपयांचीं कामें वर्षोवर्ष चालत असून पहिले अलिजहाबहादराची समाधी अद्यापि एका गवती खोपटांत आहे!!

या पुस्तकाच्या प्रारंभीं पाटीलबोवांची तसबीर जोडिली आहे. ही त्यांच्या एक दोन खात्रीच्या ज्या तसबिरी आहेत, त्यांच्या पैकीं

---

१ तारीख इ. मुजफरी या मुसलमानी पुस्तककारानें पाटीलबोवांस पेशव्यानें मारेकरी पाठवून मारिलें असें दिलें आहे! Keene, Fall of the Moghul Empire 218. २ Franklin 120. ३ पं. प्र. श. ३४.

च आहे. या चित्रावरून त्यांचें स्वरूप सहज लक्षांत येण्यासारखें आहे. सध्या गणेशखिंडींत गव्हर्नरसाहेबांच्या बंगल्यांतील एका दिवाणखान्यांत भिंतीवर एक मोठी हातानें काढलेली जुनी तसबीर आहे. त्यांत पाटीलबोवा, नाना व श्रीमंत सवाईमाधवराव हे तिघे एके ठिकाणीं बसलेले काढिले आहेत. ह्या चित्रावरून पाटीलबावांच्या स्वरूपाचें चांगलें ज्ञान होण्यासारखें आहे. पाटीलबावा आलिकडे शरीरानें बरेच स्थूल झाले होते. त्यांची उंची मध्यम असून शरीर बांधेसुध दिसतें. त्यांचा वर्ण चांगला काळा सांवळा होता. त्यांची मुद्रा प्रसन्न, निष्कपटी व उदार भासते. नानाच्या स्वरूपांत हे गुण दिसत नव्हते; पाटीलबावा कृष्णभक्त होते ह्मणून मुद्रा लावीत व त्यांच्या हातांत स्मरणीही असे. ही स्मरणी अर्थात् त्यांच्या उतार वयांत आलेली असावी. त्यांचा पोषाख त्यांच्या योग्यतेच्या मानानें पहातां फारच साधा असे. पाटीलबोवानां अधिकार मोठा पाहिजे होता, तरी इतर गोष्टींत साधेपणा त्यानां फार आवडे आणि त्यानां पोकळ छानछोकीचा तिरस्कार होता. तात्पर्य स्वतःच्या घरगुती वर्तनामध्यें त्यांची अवरंगझेबाशीं तुलना करण्यास हरकत नाहीं. पाटीलबोवा मोठे धार्मीक बुद्धीचे असून ते आपल्या उतार वयांत ईश्वर भजनांत पुष्कळ काळ खर्च करीत; त्याच प्रमाणें नित्य स्नान, पूजादि त्यांचीं पुष्कळ नित्यनैमित्तिकें होतीं असें सांगतात. त्यांची धर्मावर पूर्ण श्रद्धा होती, यासाठीं त्यानीं मथुरा, गोकूळ, वृंदावन, पुष्कर वगैरे ठिकाणीं पुष्कळ पैका खर्च केला होता, आणि बादशहाकडून गोवधाची मनाई करविली. तथापि स्वधर्माबद्दल त्यांचा अभिमान शिवाजी सारखा नव्हता हें खरें. शिवाजीला स्वधर्मा पेक्षां इतर धर्म कधींही बरा वाटला नाहीं व त्याची राज्य संपादन करण्याची इच्छा स्वार्थपरते पेक्षां स्वधर्म रक्षणासाठीं विशेष होती. पाटीलबोवा मुसलमानांचे पीर, साधु, संत यांसही मान देत व त्यांचा मुख्य गुरू तर एक मुसलमान फकीर होता. धर्म संबंधानेंही त्यांची समबुद्धि होणें साहजीकच

---

१ वानवाडी येथें त्यांच्या छत्री जवळ दरसाल भंडारा होतो त्यांत प्रथम फकिरांस अन्न देतात, मग इतर हिंदूस देतात! सरंजामे. ३९.

होतें. कारण शाहूमहाराजांपासून पुढें मराठ्यांचा धर्मसंबंधानें मुसलमानांविषयीं द्वेष कमी होत आला होता. त्या काळांतील सामान्य सुशिक्षित मनुष्या प्रमाणें पाटीलबावांचाही मुहूर्त शकुनादिकांत फार भरंवसा होता. इ.स. १७८४ सालीं पाटीलबोवांची स्वारी आग्र्यास जाण्यास निघाली तेव्हां त्यांच्या पदरचा एक हत्ति मरण पावला, तेवढ्या अपशकुनावरून त्यांनीं पुढें गेलेली आपली सारी फौज परत आणिली! चितोरगडची स्थापना रामचंद्राचा पुत्र कुश यानें केली अशी दंत कथा आहे. त्यावरून त्याच वंशांतील उदेपूरच्या राण्यानें किल्ल्यावर तोफ सुरू करीपर्यंत पाटीलबोवांनीं तोफा चालविल्या नाहींत असें सांगतात.

पाटीलबावा त्यावेळच्या मराठ्यांच्या मानानें पहातां सुशिक्षित होते. त्यानां मराठी लिहितां वाचतां चांगलें येत असून जमाखर्च उत्तम समजत होता. त्याचप्रमाणें फारशी व उर्दू भाषा बोलण्या पुर्त्या त्यानां समजत. त्यानीं आपल्या राज्याचे हिशेब चोख ठेवून चांगली व्यवस्था ठेविली होती. त्यानां स्वतः थोडीच फुरसद सांपडे, परंतु त्यांची माणसांची योजना चांगली होती. राज्य संपादन झाल्यावर त्यांत स्वस्थता करण्याकडे त्यांचें फार लक्ष होतें. ते आपल्या प्रजेच्या कल्याणाकडे त्या काळच्या रीती प्रमाणें बरेंच लक्ष देत.

त्यानीं उज्जनी शहर चांगलें सुधारिलें व मालेटसाहेबानें आग्र्यास जातांना जेव्हां तें शहर पाहिलें तेव्हां तें चांगल्या भरभराटींत होतें. ग्वाल्हेर येथें शिंद्याचें कांहीं लष्कर रहात होतें, व पाटीलबावांचाही तेथें मुक्काम होत असे. परंतु त्यांच्या हयातींत तें शहर शिंदे सरकारची राजधानी झालें नव्हतें. पुढें तेथें लष्कर राहूं लागल्यामुळें मातबर सरदार व सावकारांनीं आपापले गोट वसविले. पाटीलबावानीं आपल्या कारकीर्दींत वसुलाची व्यवस्था चांगली करून, त्यांचे घराण्यानें होळकरांचें पुष्कळ कर्ज देणें होतें, त्याची फेड केली. त्यांच्या कारकीर्दींत माळव्यांतील रजपूत रजवाड्यांवर त्यानीं फार जुलूम केला, असा त्यांच्यावर एक आरोप आहे. परंतु ह्या गोष्टी त्यांच्या सरदारांकडून घडत व त्यावेळीं त्यांची बातमी तरी खुद

पाटीलबावांस लागे किंवा नाहीं याची शंकाच आहे. शिवाय ब-ऱ्याच प्रसंगीं रजपुतांचीं बंडें मोडण्याचा त्यानां प्रसंग आल्यामुळें त्यांचें कडक शासन करणें भागही पडलें असावें. नवीन जिंकलेल्या मुलुखांत आपला अंमल कायम करण्यासाठीं असे प्रकार अलिकडील कांहीं सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या राजांनीं केलेले सुद्धां जर आढळतात, तर महादजीस दोष देण्यांत अर्थ नाहीं. पाटीलबावानीं जिंकलेल्या मुलुखांची व्यवस्था जरी बरी ठेविली होती, तरी त्यासंबं-धानें अकबर, शिवाजी, किंवा अहिल्याबाई यांच्या बरोबर त्यांची तुलना करतां येणार नाहीं.

पाटीलबोवांचा स्वभाव मोठा मिठ्ठा होता. त्यांचें बोलणें ऐकून व विशेषतः त्यांचें मोकळें मन पाहून सर्वांस ते प्रिय होत. मोठें ऐश्वर्य व बोलण्याचालण्यांत साधेपणा हीं एकत्र मिळणें दुर्मीळ, परंतु तीं पाटीलबावांत वास करीत होतीं. कित्येक प्रसंगीं हा साधेपणा फारच होई. ज्यानें हिंदुस्थान पादाक्रांत केलें व रजपुतांस जिंकलें, आणि ज्याच्या पदरीं ३० हजार कवायती पायदळ, पांचशें तोफा व लाख घोडा, एवढी फौज, त्यानें पेशव्याचे जोडे पुसावे व दरबारांत पेश-व्यांच्या इतर मानकऱ्यांच्या खालीं बसण्याविषयीं इच्छा दाखवावी! ह्या साधेपणाचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांतही दुर्मीळ आहेत! त्यानां कित्येकवेळां फार राग येत असे; रागाच्या आवेशांत केव्हां केव्हां ते कडक वागत व त्याच्या सपाट्यांत ते आपल्या मनांतील गुप्त गोष्टी सुद्धां पटकर बोलून जात. लढाईतून पळून येणाऱ्या व भित्र्या शिपायांस ते फार शिक्षा देत. ज्यांना ज्यांना पाटीलबावांशीं भेटण्याचा प्रसंग आला, त्यांच्या मनांवर त्यांच्या विषयीं चांगला ठसा बसे व पूज्य बुद्धि उत्पन्न होई. मॉलेट, अंडरसन, पामर, डि-बॉइन वगैरे प्रसिद्ध युरोपियनांनीं असेच उद्गार काढिले आहेत. पाटीलबावांचें पूर्ववय लढायांतच गेलें आणि त्यांचे बंधू जीवंत असे पर्यंत त्यांचें नांव फारसें पुढें आलें नाहीं, परंतु ते मोठे शूर शि-पाई होते अशी ख्याती होती. ते पागेंत बारगीर असतां त्यानीं निजामावर हल्ला करून शौर्य व शिपायगिरी ह्यांबद्दल ख्याती

मिळविली होती, हें मागें सांगितलें आहे. पानिपत नंतर ते पंगु झा-ल्यामुळें स्वतः शिपायगिरी फारशी करीत नसत, तथापि तोही प्रसंग त्यानां इंग्रजांबरोबर लढाई करण्याच्या वेळीं आला होता. त्यांच्या शिपायगिरीपेक्षां अनुभवानें त्यांची सरदारींत प्रविणता झाली होती. सरदारी ह्मणजे काय व शिपायगिरी काय यांचा भेद नानासाहेब पेशव्यां प्रमाणें त्यानां समजत होता. त्यांचा बंधु दत्ताजी शूर शिपाई व महायोद्धा होता; परंतु फौजांची हालचाल धोरणानें व शत्रूंचे डांवपेंच पाहून कशी करावी हें त्याला चांगलें समजत नव्हतें. त्याच प्रमाणें परांङ्मुखते पेक्षां धारातिर्थी देह अर्पण करणें बरें अशी दत्ताजीची समजूत होती, परंतु ती नानासाहेबांसही पसंत नव्हती. महादजीला आपलें सर्वस्व नाश होई पर्यंत लढावें, हें आवडत नसे. पराभव झाला तर तो मागें फिरे आणि शत्रूंची खोड मोडण्या पूर्ती आपली तयारी झाल्या खेरीज धाडस करीत नसे. गोदर्दसाहेबाचा जोर पाहून त्यानें फौज दूर नेली, परंतु कर्नल क्यामाकवर सपाटून हल्ला केला. लालसोंटचा पराभव झाला तेव्हां न डगमगतां व एक-दम जिवावर उदार न होतां आपली पराभव पावलेली फौज गोळा करून तो मागें फिरला व जास्त तयारी करून नंतर त्यानें रजपु-तांची खोड मोडली. एकदम सर्वांशीं विरोध न करितां एकाशीं स्नेह तर एकाशीं बिघाड, आणि तोंडानें गोड बोलून "राज्यकारभार अष्टपैलुपणास" उचित असें मुत्सद्दीपणाचें वर्तन ठेवावें, असा जो बाळाजीपंत पेशव्याचा उपदेश होता, तो महादजीला चांगला ठसला होता. गुलाम कादराचे पारपत्याचे वेळीं इस्माईलबेगाशीं स्नेह व रजपूतांशीं लढतानां जाटांशीं स्नेह, अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें मागें दिलींच आहेत. कसाही बिकट प्रसंग आला तरी न डगमगतां "चित्ताचें समाधान करून" प्रसंगोचित आचरण करण्यांत त्याची बरोबरी खुद्द शिवाजीशींही करितां येईल व त्याच्या ह्या गुणाबद्दल युरोपियनलोकही त्याची वाखाणणी करीत, हें मागें सांगितलेंच आहे. पाटीलबावांनीं काळवेळ पाहून आपल्या फौजेंत काय सुधारणा केली हें

१ मागें पृष्ठ २४ पहा.

मागें आलेंच आहे. ते जर जाणखी दहा वर्षें वांचते तर आसई, लासवारी वगैरे लढायांचें स्वरूप वेगळें झालें असतें. परंतु त्यांच्या मागें त्यांची सर्व व्यवस्था मोडली व त्यांच्याच दौलतींत अनेक तंटे उत्पन्न होऊन इंग्लिशांस चांगली सवड मिळाली.

पाटीलबावांची कारकीर्द ह्मणजे मराठेशाईतील पेशवाईचा सगळा इतिहास ह्मटला तरी चालेल. त्यांच्या इतके वयोवृद्ध होऊन मरण पावलेले मुत्सद्दी व सरदार मराठे शाईत थोडेच झाले. यामुळें त्यांच्या पोक्त व धोरणी विचारांचे अनुभवीक मुत्सद्दी फार थोडेच राहिले होते. नानावर सुद्धां यांची जास्त कडी होती. नाना केवळ मुत्सद्दी कारकून व पुण्यांत वाढलेला; परंतु पाटीलबावा शिपाई, सरदार व मुत्सद्दी असून हिंदुस्थानभर स्वारींत हिंडलेला फिरलेला होता. त्यामुळें पाटीलबावांचे विचार जास्त विस्तृत व थोरबुद्धीचे असत, परंतु नानाची मसलत कोती व मत्सरी असे. यांचे स्वभावांत हे फरक पुढें पुढें जास्तच दिसूं लागले. पाटीलबावा पेशवाईच्या व आपल्या ऐश्वर्यांत मरण पावले, परंतु बिचारा नाना पेशवाईच्या पडत्या काळांत हाल अपेष्टा सोसून मेला. पाटीलबावांची मरण्या पूर्वी एक इच्छा मात्र सफळ झाली नव्हती. पेशवाईची दिवाणगिरी करण्याविषयीं त्यांची अत्यंत खटपट असून ती मात्र साधली नाहीं. हा योग जर जमला असता तर मोंगलाई व मराठेशाई हीं दोन्हीं ताब्यांत येऊन पाटीलबावा एकाच वेळीं शिवाजी आणि अवरंगझेब यांचे वैभवास पोंचले असते!

मराठेशाईतील समकालीन प्रसिद्ध मुत्सद्दी या बाजूनें पहातां नाना व पाटीलबावा यांच्या मसलती एकाच प्रकारच्या होत्या. नानाला व महादजीला मुख्य अधिकार चालविण्याची जरी इच्छा होती व तेवढ्या गोष्टी पुर्ती जरी त्यांची स्पर्धा होती तरी खुद्द पेशव्याचे ठिकाणीं दोघांचीही भक्ति होती. पेशवाईचें वैभव वाढावें, 'महाराष्ट्रराज्य' जिकडे तिकडे करावें, व मुसलमान, इंग्रज इत्यादि शत्रूंस जेरीस आणावें, असे दोघांचेही अखेरपर्यंत बेत चालू होते. इंग्रजांना जरी महादजी बराच वचकत होता तरी त्यांचा हिंदुस्थानांत दिवसेंदिवस जास्त प्रभाव झालेला पाहून

त्यास वाईट वाटे; म्हणूनच टिपूसारख्या इंग्रजांच्या बळकट शत्रूचा नाश करूं नये असें त्याचें मत होतें. तथापि सालबीच्या तहानंतर त्यानें इंग्लिशांच्या स्नेहाच्या जोरावर नानाशीं जें वर्तन ठेविलें होतें त्यामुळें संधी साधतांच नानालाही तोच मार्ग धरावा लागला. वॉरन् हेस्टिंग्स साहेब गेल्यावर पाटीलबावांचें इंग्रजाशीं रहस्य कमी झालें होतें, आणि त्यांच्या मनांतून ह्या परकीय लोकांस हिंदुस्थांतून घालविण्याचे विचार फार दिवस घोळत होते व कवायती कंपू तयार करण्याचा त्यांचा उद्योग या उद्देशानेंच चालला होता.

पाटीलबावांकडे काशीचा राजा चेतसिंग आश्रयास आला असतां, तो दरबारांत आल्यास आपण तहाचें बोलणें करणार नाहीं, अशी वॉरन् हेस्तिंग्सानें भीति घातल्यामुळें, त्याला पाटीलबावानीं हांकून लाविलें, हें नानालाही आवडलें नाहीं[1]. बंगालच्या खंडणीबद्दल त्यानें जितक्या जोरानें मागणें करावयाचें होतें तितकें केलें नाहीं, हें एक त्याच्या इंग्रजाविषयीं भिऱ्यास्वभावाचें उदाहरण कांहीं ग्रंथकारांनीं दिलें आहे, परंतु त्याच्या धोरणानें पहातां तसें वागणें त्या प्रसंगीं जरूर होतें. पत्रांच्या मायन्याबद्दल मुंबईच्या गव्हर्नराचें व पाटीलबावांचें मन बिघडलें होतें आणि त्याचप्रमाणें आलिकडे लार्ड कार्नवालीस याच्या मदतीनें निजामाचें मराठ्यांशीं उद्धटपणाचें वर्तन सुरू झाल्यामुळें निजाम व इंग्रज यांचें पारिपत्य करावें असें त्यांस वाटूं लागलें होतें. मरण्यापूर्वीं कांहीं दिवस त्यानीं टिपूशीं स्नेह चालविला होता आणि नानाचें व त्यांचें सख्य जुळल्यामुळें सर्वांनीं एक विचारानें इंग्रजांवर स्वारी करावी अशी त्यांची खटपट चालू होती. परंतु त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें, सर्व हिंदुस्थान मराठ्यांचें करण्याचे त्यांचे बेत जागच्याजागीं राहिले. इंग्रजांनीं ब्राह्मण मुत्सद्यांस अनुकूळ करून घेतल्यापासून, पाटीलबावाच्या पोटांत त्यांच्याविषयीं राग होता. पाटीलबावा जोरावर होतात असें पाहून नानानें आपल्या दरबाराचें महत्व हळूहळू कसें वाढविलें हें मागें सांगितलें आहे[2].

---

१ प. व या. २९४. २ मागें पृ. १९३ पहा.

पाटीलबावांचे समकालीन थोर पुरूष ह्मणजे हैदर व निजाम हे होते, परंतु त्या दोघांपेक्षांही यांची बुद्धि तरतरीत होती, धोरण मोठें होतें व स्वभाव त्यांच्यासारखा क्रूर किंवा बेमानी नव्हता.

स्वजातीय मराठे सरदारांचेवर आपली कडी असावी एवढीच त्यांची इच्छा होती, परंतु त्यांचा नाश व्हावा व तीं घराणीं बसावीं असा त्यांचा कधींही हेतू नव्हता. लाखेरीच्या लढाईनंतर सुद्धां त्यानीं तुकोजीशीं अगदीं घरोब्यानें पत्रव्यहवार ठेविला होता, असें मालकमसाहेब लिहितात. कोल्हापूरकर, गायकवाड, सचीव इत्यादि-कांशीं त्यांचें वर्तन या धोरणानेंच असे. तथापि हिंदुस्थानांत फार दिवस राहिल्यामुळें नानापेक्षां पाटीलबावांना मराठ्यांविषयीं अभि-मान कमी होता हें उघडच आहे.

महादजी शिंदे यांचें मनांत ब्राह्मणांस मागें टाकून पुनः मराठे-शाई करावी व सातारचे राजाचा अधिकार स्थापन करावा असें होतें, असें एका आलिकडील इतिहासकारानें लिहिलें आहे[1], परंतु त्याबद्दल आह्मांस कांहींच आधार आढळला नाहीं, उलट तो सातार-राजमंडळाची पर्वा करीत नव्हता असेंच दिसतें. त्याची सवाई माध-वरावाबद्दल जी भक्ति होती, तितकी छत्रपतींचे ठायीं होती किंवा नाहीं ह्याची शंकाच आहे. खुद्द मराठ्यांबद्दल, ते केवळ स्वजातीय ह्मणून महादजीस काडीभर सुद्धां अभिमान नव्हता व त्यांना आपल्या फौजेंत ठेवावें अशी सुद्धां त्याला इच्छा नव्हती; त्याचा ब्राह्मणां विषयीं द्वेष सुद्धां नाना, फडके वगैरे दरबाराचे मुत्सद्यां पलिकडे होता असें दिसत नाहीं. त्याचे विश्वासू कारभारी, सरदार आणि अधिकारी शेणवी, मराठे,मुसलमान,ख्रिश्चिअन इत्यादि सर्व प्रकारचे लोक होते. धर्म किंवा जात ह्यांबद्दल त्याचा कटाक्ष विशेष नव्हता असें दिसून येतें.

रघुनाथरावानें पुतण्याचा खून करून बंड केलें असतां, महादजीनें त्याचा पक्ष स्पष्टपणें न सोडतां एकसारखा धरसोडीचा प्रकार चाल-विला होता हें चांगलें नव्हतें. रघुनाथरावाचा सर्व इलाज संपल्यावर

१ भागवतकृत 'मराठ्यांविषयीं चार उद्गार' पृ. ५३.

सुद्धां पुणें दरबारास बाऊ दाखविण्याकरितां त्याला, व तत्पक्षीय चिंतो विठ्ठल वगैरे मंडळीस आपले पाशीं ठेवण्यांत महादजीची मसलत नीतिदृष्ट्या दोषास्पद होती, तथापि रघुनाथरावाच्या दुष्ट कृत्यांनीं पेशवाईचा व पुणें दरबारचा जोर कमी झालेला पाहून महादजीनें या यादवीचा स्वार्थपर उपयोग केला. पेशव्याच्या घरांत जर असे तंटे झाले नसते तर महादजी तरी एवढ्या थोरवीस पोंचता किंवा नाहीं याची शंकाच होती. रघुनाथरावाच्या पक्षाविरुद्ध महादजी एकदम गेला नाहीं याबद्दल आतां दोष देणें सोपें आहे, परंतु ज्या काळांत व लोकांत तो रहात होता, त्यांत मनुष्य नीच व दुरात्मा असला तरी तो जोंपर्यंत जोरावर असे, तों पर्यंत त्याचे दोष कोणीच पुढें काढीत नसे ह्मटलें तरी चालेल; त्यामुळें पुढेंमागें कदाचित् रघुनाथराव जर विजयी झाला तर कठीण पडेल, हें धोरण ठेवून त्याला वागावें लागलें. रघुनाथराव आपल्या ताब्यांत जर आला तर पुणेंकरांस आपलें केवढें भय वाटेल हें धूर्त पाटीलबावांचे लक्षांत पुरें होतें.

महादजी गुणांचा चहाता होता व आपल्या सरदारांवर त्याचा विश्वासही चांगला होता, यामुळें पहिल्या बाजीरावाप्रमाणें त्याच्या पदरीं पुष्कळ सरदार व कारकून उदयास आले. डिबॉईन, लखबादादा, राणाखान, जगूबापू, अप्पा खंडेराव, अंबाजी इंगळे, जिवबादादा वगैरे पुष्कळ माणसें त्याच्या पदरीं महत्वास चढलीं.

महादजीच्या ठायीं कांहीं दोष नव्हते असें भांडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्या काळांतील स्थिति, रीतीरिवाज व समजुती प्रमाणें त्याचेंही वर्तन होतें, परंतु तसल्या काळांतही एवढ्या योग्यतेचा मनुष्य विरळाच निपजला, यासाठींच त्याचें नांव आर्यभूमींतील महन्मणिमालेंत गोंवणें योग्य आहे. त्याच्या हातून कांहीं दोषही घडले असतील व त्यांबद्दल मागें प्रसंगोचित् आह्मीं टीकाही केली आहे, परंतु त्याच्या ठायीं कोणतें ह्मणण्यासारखें कायमचें दोषस्थान नव्हतें व तो दुर्व्यसनांपासून मुक्त होता एवढी गोष्ट निर्विवाद आहे. मरा-

ह्यांच्या इतिहासांत एवढा थोर, कर्ता, शूर, सरदार व मुत्सदी पुरूष, शिवाजी व बाळाजीपंत नाना यांच्या खेरीज तिसरा कोणीच निपजला नाहीं. केवळ शिपाई किंवा केवळ मुत्सदी असे हजारों मराठे झाले आणि त्यांच्या शिवाय कांहीं हिंदुस्थानांत भगवा झेंडा फडकला नसता हें खरें, तथापि एके ठिकाणीं अनेक गुण वास करणारीं माणसें थोडींच निपजलीं आणि या उणीवी मुळेंच एवढ्या ऐश्वर्यास चढलेल्या व शक्तिमान महाराष्ट्रराज्याची पाटीलबावांच्या मागें थोडक्याच काळांत दुर्दशा झाली.

पाटीलबावांच्या मागें असा प्रकार होणें, हें इकडील राज्यांच्या नेहमीच्या क्रमांतली गोष्ट होती. त्यानीं उभारलेली ही प्रचंड इमारत त्यांच्याच आधारावर उभी होती व तो आधार संपताच मराठेशाईचा अपकर्ष उघडच झाला. व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या राज्यांचा असा परिणाम होणें साहजीक आहे. अकबर, शिवाजी, रणजितसिंग इत्यादिकांच्या मागें त्यांच्या राज्यांची अशीच स्थिती झाली. तात्पर्य पाटीलबावांच्या मागें मराठ्यांचें राज्य जें एकदम विरघळलें, त्याचें कारण पानिपतचा पराभव नसून कर्ते व दूरदर्शी पुरुष नाहींसे झाले हें होतें. राज्यांचीं आयुष्यें त्यांतील लोकांच्या शहाणपणावर व पराक्रमावर अवलंबून असतात. त्या गुणांचा प्रवाह सतत चालला पाहिजे व तो जर मध्येंच खुंटला तर राज्यांचा लय होतो. नानाफडणीस, तुकोजी होळकर, महादजी शिंदे, हरिपंत, परशरामभाऊ, अहिल्याबाई यांनीं उभारलेलें मराठ्यांचें विस्तृत राज्य बाजीराव, यशवंतराव, दौलतराव, सर्जेराव घाटगे, त्रिंबकजी डेंगळे यांच्या हातांत गेल्यामुळें परिणाम अनिष्ट झाला, यांत आश्चर्य नाहीं.

# उपसंहार.

सवाई माधवराव पेशव्याचे मागें पुण्याच्या गादीबद्दल विवाद उत्पन्न होऊन जी यादवी माजली व ज्याचा अखेर परिणाम इंग्रजी राज्याचा विस्तार होऊन मराठ्यांचीं सातारा, पुणें व नागपूर येथील राज्यें गेलीं तो इतिहास सांगण्याची या ठिकाणीं जरूरी नाहीं. त्या राज्यक्रांतीच्या गडबडींत शिंद्यांचाही जरी कांहीं मुलुख गेला, तरी महादजीनें मजबूद पायावर रचलेली माळव्यांतील मूळ इमारत कायम राहिली आहे. आजही शिंद्याचे राज्याचें क्षेत्रफळ ३३,११९ चौरस मैल असून, लोक संख्या ३० लक्षांजवळ आहे. हें राज्य माळवा व आग्रा प्रांतात असून, हिंदुस्थानचा तो भाग फार सुपीक आहे. त्याच प्रमाणें खनिजसंपत्ति, वनस्पति, हवा पाणी इत्यादिकांनींही हें राज्य समृद्ध आहे.

हल्लींचा काळ नवीन मुलूख काबीज करण्याचा नाहीं व मुलुखगिऱ्या करून लूट आणण्याचाही नाहीं. चक्रवर्तिनी विक्तोरिया महाराणीचे राज्यामुळें सर्व देशास स्वास्थ्य मिळून दंगे धोपे बंद झाले आहेत, तेव्हां अशा काळांत प्रजेला उपयुक्त विद्या सुलभ करून त्यांचीं उद्योग, धंदे, व्यापारांत भरभराटी व्हावी व त्यांची संपत्ति वाढून ते सुखी व्हावे, ही इच्छा हल्लींच्या महाराजांनीं ठेवावी अशी सर्व हिंदुस्थानची उमेद आहे. पाटीलबावा महादजी शिंदे यांच्या मागें आज बरोबर शंभर वर्षांनीं त्यांचेच नांव धारण करणारे हल्लींचे तरूण, सुबुद्ध व होतकरू महाराज अलिजहाबहादर माधवराव शिंदे हे गादीवर आहेत. त्यांनींही हल्लींच्या काळास अनुसरून वागून प्रजाजनांचा आशिर्वाद संपादावा व आपलाही कीर्तिध्वज उभारावा. ग्वाल्हेरचा किल्ला कैलासवासी जयाजी महाराज यांस परत देण्याचे प्रसंगीं लार्ड डफरिन यानीं जो उपदेश केला, तो महाराजांनीं लक्षांत ठेवावा. "ब्रिटीशसरकारचें प्राबल्य, आणि दीनांचें संरक्षण,

बंडखोरांचे शासन व राजनिष्ठांचा संतोष करण्याविषयीं त्या सरकारची इच्छा, ह्यां विषयीं सध्या नेटीव संस्थानांतील प्रजेची खात्री होऊन, ती प्रजा सुखांत व स्वस्थतेनें उन्नतीचा मार्ग क्रमूं लागली आहे. त्याचप्रमाणें त्या संस्थानांचे बहुतेक अधिपति सुद्धां, सार्वभौमिनी बादशाहीनींचे ठायीं राजनिष्ठा व ज्या प्रजेच्या सुखाबद्दल सार्वभौम सरकार अखेर जबाबदार आहे, त्या प्रजेचें सुख वाढण्यासारखी राज्य पद्धति ठेवल्यानें, आपलीं घराणीं चिरकाल चालविण्यासाठीं व आपले हक्कांचे रक्षण करण्या विषयीं जें सार्वभौम सरकार दक्ष आहे, त्या सरकारा पासून होणारे फायदे ओळखूं लागले आहेत." आलिकडे बडोदें, त्रावणकोर, ह्मैसूर इत्यादि संस्थानांत कसकशी सुधारणा होत आहे हें लक्षांत ठेवावें आणि केवळ राज्याचें उत्पन्न वाढलें ह्मणजे राज्य चांगलें व प्रजा सुखी आहे असें न समजतां, लोकांच्या खऱ्या हितावर दृष्टि देऊन आपली राज्यपद्धति सुखकारक करावी, एवढें सांगून व महाराजांस उदंड आयुष्य आणि अखंड कीर्ति व यश मिळावें अशी ईश्वरापाशीं प्रार्थना करून हा लेख पुरा करितों.

समाप्त.

Date Due

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

Shivaji And Sarvadharma Samabhav
Programme Committee
S. N. D. T. Women's University,
BOMBAY.

VM923.254
Shi/Nat

103138

AUTHOR Natu Vishnu R.

TITLE Mahadaji Shinde yanche charitra va karkirda

| DATE DUE | BORROWER'S NAME |
| --- | --- |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

VM 923.254
Shi/Nat
103138